# ‘‘ उस्मानाबाद व  सोलापूर शहराचे १९८१ नंतरचे नागरीकरण : एक चिकित्सक अभ्यास ’’

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या, सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीकरता सादर केलेला शोधप्रबंध.**


**-: संशोधक विद्यार्थी :-**

**प्रा. वरशेट्टी आर. व्ही.**

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

अणदूर जि. उस्मानाबाद

**-: संशोधन मार्गदर्शक :-**

**डॉ. खंदारे व्ही. बी.**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

श्री. आसारामजी भांडवलदार महाविद्यालय,

देवगाव (रंगारी), जि. औरंगाबाद.


**मे - २०१५**

# प्रमाणपत्र

**“ उस्मानाबाद व सोलापूर शहराचे १९८१ नंतरचे नागरीकरण : एक चिकित्सक अभ्यास ”** या विषयाचा सामाजिकशास्त्रे विद्याशाखातंर्गत अर्थशास्त्र या विषयातील पीएच.डी. पदवीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडे सादर होत असलेला हा शोधप्रबंध **श्री. वरशेट्टी राजशेखर विरपाक्षप्पा** यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. सदरील प्रबंध पीएच. डी. पदवीसाठी सादर करण्यास योग्य असा झाला आहे.

**मार्गदर्शक**

**डॉ. खंदारे व्ही. बी.**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

श्री. आसारामजी भांडवलदार महाविद्यालय,

देवगाव (रंगारी), जि. औरंगाबाद.

स्थळ : औरंगाबाद.

दिनांक : मे, २०१५.

# <u>प्रतिज्ञापत्र</u>

मी प्रस्तुत प्रबंधाचा लेखक **श्री. वरशेट्टी राजशेखर विरपाक्षप्पा** नमुद करतो, की **‘‘ उस्मानाबाद व सोलापूर शहराचे १९८१ नंतरचे नागरीकरण : एक चिकित्सक अभ्यास ’’** या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे विद्याशाखातंर्गत अर्थशास्त्र या विषयातील पीएच.डी. पदवीसाठी शोधप्रबंध सादर करीत आहे. हा शोधप्रबंध व त्याचा अंश यापुर्वी मी या किंवा इतर कोणत्याही विद्यापीठाकडे या किंवा अन्य कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

**संशोधक**

**प्रा. वरशेट्टी आर. व्ही.**

स्थळ : औरंगाबाद.

दिनांक : मे, २०१५.

# ऋणनिर्देशन

एखाद्या विषयाची उत्सुकता तेंव्हाच पूर्ण होते. जेव्हा त्या विषयाच्या मुळापर्यंत जातो. मला उस्मानाबाद व सोलापूर शहरातील नागरीकरणाबाबत उत्सुकता वाटत असे. म्हणून मी प्रस्तुत विषयाची निवड केली. मला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठास पीएच.डी. पदवीसाठी हा प्रबंध सादर करताना मोठा आनंद होत आहे. मी हे संशोधन कार्य माझे गुरूवर्य डॉ. विलास खंदारे यांच्या मार्गदर्शनामुळे पुर्ण करू शकलो. त्यांनी मला अमुल्य वेळ देऊन संशोधनविषया संदर्भात मार्गदर्शन केले. त्यामुळे मी त्यांचा सदैव ऋणी राहिल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागातील डॉ. व्हि. बी. भिसे सर, डॉ. सांगळे सर, डॉ. नरवडे सुनिल यांनी संशोधन कार्य करण्याबदद्ल नेहमीच प्रेरणा दिली. त्यामुळे मी त्यांचे आभार मानतो.

तसेच मा. मधुकरराव चव्हाण अध्यक्ष शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर, सचिव, प्रमुख मार्गदर्शक व प्रेरणास्थान असलेले आदरणीय श्री. सि. ना. आलुरे (गुरूजी) यांनी शैक्षणिक क्षेत्रात कार्य करण्याची संधी दिली त्यामुळेच तर संशोधन कार्य पूर्ण करता आले. त्यामुळे मी त्यांचे ऋण व्यक्त करतो. प्राचार्य डॉ. अनिता मुदकण्णा, डॉ. मल्लिनाथ लंगडे, डॉ. अंकुश कदम आणि महाविद्यालयातील इतर सर्व सहकारी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सततच्या प्रोत्साहनामुळे मी हे कार्य पूर्ण करू शकलो. त्यामुळे मी त्यांचे आभार मानने मी माझे कर्तव्य समजतो.

**प्रा. वरशेट्टी आर. व्ही.**

# अनुक्रमनिका


| प्रकरण | शिर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | ऋणनिर्देश | IV |
| | तक्त्यांची यादी | V-X |
| प्रकरण पहिले | प्रास्ताविक | १ ते ३२ |
| प्रकरण दुसरे | संशोधन साहित्याचा आढावा | ३३ ते ४६ |
| प्रकरण तिसरे | भारतातील नागरीकरण | ४७ ते ८५ |
| प्रकरण चौथे | उस्मानाबाद व सोलापूर शहरातील नागरीकरणाची प्रवृत्ती | ८६ ते १२३ |
| प्रकरण पाचवे | उस्मानाबाद व सोलापूर शहरातील नागरीकरणाच्या समस्या | १२४ ते १८४ |
| प्रकरण सहावे | सारांश, निष्कर्ष व शिफारशी | १८५ ते २१२ |
| | संदर्भ सूची | २१३ ते २२३ |

# तक्त्यांची यादी


| तक्ता क्र. | शिर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ३.१ | विकसित व विकसनशील देशांतील नागरीकरण | ५१ |
| ३.२ | निवडक देशांतील नागरीकरणाची पातळी (वर्ष १९९०, टक्केवारीत) | ५२ |
| ३.३ | भारतातील नागरीकरणाची प्रवृत्ती | ५६ |
| ३.४ | आकारमानानुसार भारतातील नगरांचे वर्गीकरण (टक्के वारीत) | ५९ |
| ३.५ | भारतातील विविध प्रमुख राज्यातील नागरीकरणाची प्रवृत्ती (टक्के वारीत) | ६१ |
| ३.६ | प्रमुख राज्यांमधील नागरी लोकसंख्या दशवार्षिक वृध्दीदर टक्केवारीत | ६३ |
| ३.७ | भारतातील राज्यनिहाय नगरांची संख्या | ६५ |
| ३.८ | भारतातील महानगरांची लोकसंख्या (१९०१ ते १९९१) | ६७ |
| ३.९ | एक दशलक्षापेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या नगरांतील लोकसंख्यावाढीचा निर्देशांक | ६८ |
| ३.१० | 'अ' वर्ग नगरांमध्ये व महानगरांमध्ये लोकसंख्येची वाटणी (१९९१ च्या जनगणनेनुसार) | ७० |
| ३.११ | महाराष्ट्रातील नागरीकरणाची पातळी व लोकसंख्या वृध्दिदर | ७२ |
| ३.१२ | नगराच्या आकारमानानुसार महाराष्ट्रातील नागरीकरण प्रवृत्ती | ७४ |

| | | |
|---|---|---|
| ३.१३ | ग्रामीण भागातून नागरी भागात व नागरी भागातून नागरी भागात झालेले स्थलांतरण (टक्केवारी १९९१) | ७५ |
| ३.१४ | वास्तव्य करणाऱ्या कालखंडावरून स्थलांतरण (टक्केवारीत) (१९९१) | ७७ |
| ३.१५ | १९९१ च्या जनगणनेनुसार व्यावसायिक वर्गीकरणानुसार कामगारांचे स्थलांतरण (टक्केवारीत) | ७८ |
| ४.१ | उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील एकूण शहरी लोकसंख्या | ८९ |
| ४.२ | उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्याच्या शहरी भागातील लोकसंख्या वृद्धिदर (टक्के वारीत) | ९१ |
| ४.३ | उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील एकूण नागरी लोकसंख्येत प्रत्येक नगराचा वाटा (टक्के वारीत) | ९३ |
| ४.४ | उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील लोकसंख्येचे शहराच्या आकारमानानुसार वर्गीकरण (२००१ च्या जनगणनेनुसार) | ९५ |
| ४.५ | उस्मानाबाद जिल्ह्यातील शहरी लोकसंख्येचे व्यावसायिक वर्गीकरण (१९८१ ते २००१, टक्के वारीत) | ९७ |
| ४.६ | सोलापूर जिल्ह्यातील शहरी लोकसंख्येचे व्यावसायिक वर्गीकरण (१९८१ ते २००१, टक्के वारीत) | ९९ |
| ४.७ | उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील स्थलांतरण ( १९९१ ते २००१, टक्के वारीत) | १०६ |
| ४.८ | उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील उद्योगाच्या वर्गीकरणानुसार कामगारांचे स्थलांतरण ( २००० ते २००१, टक्के वारीत) | १०८ |

| | | |
|---|---|---|
| ४.९ | उद्योगांच्या वर्गीकरणानुसार कामगारांचे स्थलांतरण ( २००० ते २००१ टक्के वारीत) | १११ |
| ४.१० | उस्मानाबाद जिल्ह्यातील प्रति हजार लोकसंख्येमागे प्रमुख उद्योगांची व कामगारांची संख्या ( २००१ च्या जनगणनेनुसार) | ११२ |
| ४.११ | सोलापूर जिल्ह्यातील प्रति हजार लोकसंख्येमागे प्रमुख उद्योगांची व कामगारांची संख्या (२००१ च्या जनगणनेनुसार) | ११३ |
| ४.१२ | उस्मानाबाद जिल्ह्याच्या ग्रामीण व नागरी भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या (२००१ च्या जनगणनेनुसार) | ११५ |
| ४.१३ | सोलापूर जिल्हयाच्या ग्रामीण व नागरी भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या (२००१ च्या जनगणनेनुसार) | ११६ |
| ४.१४ | उस्मानाबाद व सोलापूर जिल्हयाच्या नागरी भागातील अशोधित जननदर व मृत्यूदर (२००१ च्या जनगणनेनुसार) | ११९ |
| ५.१ | उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील शहरी भागातील बेघर लोकसंख्येचे प्रमाण (२००१ च्या जनगणनेनुसार) | १२८ |
| ५.२ | उस्मानाबाद व सोलापूर जिल्हयातील नागरी भागातील संस्थात्मक कुटुंबे व लोकसंख्या (२००१ च्या जनगणनेनुसार) | १३१ |
| ५.३ | उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील शहरी भागातील घरांची स्थिती (२००१ च्या जनगणनेनुसार) | १३३ |
| ५.४ | उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील नागरी भागातील घरभाडे (प्रति महिना रुपयांत) | १३५ |
| ५.५ | उस्मानाबाद जिल्हयातील झोपडपट्यांची स्थिती | १३८ |

| | | |
|---|---|---|
| ५.६ | सोलापूर जिल्ह्यातील झोपडपट्यांची स्थिती | १३९ |
| ५.७ | उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरी भागातील खुल्या जमिनीच्या किमती (प्रति चौरस मीटरची किंमत रुपयांत) | १४१ |
| ५.८ | सोलापूर जिल्ह्यातील नागरी भागातील खुल्या जमिनीच्या किमती (प्रति चौरस मीटरची किंमत रुपयांत) | १४२ |
| ५.९ | उस्मानाबाद जिल्ह्यातील नगरनिहाय दारिद्र्य (२००१ च्या जनगणनेनुसार) | १४५ |
| ५.१० | सोलापूर जिल्ह्यातील नगरनिहाय दारिद्र्य (२००१ च्या जनगणनेनुसार) | १४६ |
| ५.११ | दर हजार लोकसंख्येमागे वाहनांची संख्या (मार्च २००१ ) | १४८ |
| ५.१२ | महानगरातील हवा प्रदूषण (टक्के वारीत) | १५१ |
| ५.१३ | विविध वाहनांतील प्रदूषण घटक (प्रति कि.मी. ग्रॅम) | १५२ |
| ५.१४ | उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरी भागातील कचरा व टाकाऊ पदार्थ (सन २००१, किलो ग्रॅम) | १५५ |
| ५.१५ | सोलापूर जिल्ह्यातील नागरी भागातील कचरा व टाकाऊ पदार्थ (सन २००१, किलो ग्रॅम) | १५६ |
| ५.१६ | उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरी भागातील प्रदूषित पाणी (सन २००१, हजार लिटर) | १६० |
| ५.१७ | सोलापूर जिल्ह्यातील नागरी भागातील प्रदूषित पाणी (सन २००१, हजार लिटर) | १६१ |

| | | |
|---|---|---|
| ५.१८ | उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील नागरी पाणी पुरवठयाची स्थिती (सन २००१, लिटरमध्ये) | १६३ |
| ५.१९ | सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे भाषेनुसार वर्गीकरण | १६६ |
| ५.२० | सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे धर्मानुसार वर्गीकरण | १६७ |
| ५.२१ | सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे संवर्गनिहाय वर्गीकरण | १६८ |
| ५.२२ | सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांच्या घरांचे स्वरूप | १६९ |
| ५.२३ | सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे सुविधेनुसार वर्गीकरण | १७० |
| ५.२४ | सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे साफसफाईबाबत मत | १७१ |
| ५.२५ | सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे कचराकुंडीबाबत मत | १७२ |
| ५.२६ | सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे नियमित कचरा गोळा करण्यासंदर्भातील मत | १७३ |
| ५.२७ | सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे सांडपाणी सुविधेबाबत मत | १७४ |

| | | |
|---|---|---|
| ५.२८ | सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे व्यवसायानुसार वर्गीकरण | १७५ |
| ५.२९ | सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे मुळ राहण्याच्या ठिकाणानुसार वर्गीकरण | १७६ |
| ५.३० | सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे शहरात येण्याचे कारण | १७७ |
| ५.३१ | सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे नागरी समस्यांबाबत मत | १७८ |
| ५.३२ | सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे कुटुंबप्रकारानुसार वर्गीकरण | १७९ |

# प्रकरण-पहिले

## प्रास्ताविक

### १.१ प्रस्तावना:

आज वाढत्या शहरीकरणाचे प्रश्न सर्वच देशांना भेडसावत आहेत; कारण ग्रामीण भागात लोकसंख्येमुळे रोजगाराच्या संधी कमी उपलब्ध होत आहेत. रोजगारासाठी ग्रामीण भागातून शहरी भागात लोक स्थलांतर करत आहेत; त्यामुळे शहरी भागात अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. उदा. प्रदूषण, घराचे प्रश्न, दारिद्र्य, गर्दी, शैक्षणिक समस्या, वाहतुक, झोपडपट्टी, वीजपुरवठा, पाणीपुरवठा इत्यादी.

कोणत्याही देशाच्या विकासात औद्योगिक विकास हा एक महत्त्वाचा घटक आहे. औद्योगिकीकरण ही विकासाची पूर्वअट, आवश्यकता मानली जात आहे. देशाचा आर्थिक विकास साध्य करण्यासाठी औद्योगिकीकरणावर भर देण्यात येत आहे. औद्योगिक केंद्राच्या भोवती लोकांच्या रहिवासाला, वस्तीस्थानांच्या निर्मितीला वेग आला; परिणामी वाढत्या लोकसंख्येचे रोजगारासाठी स्थलांतर होण्यास सुरुवात झाली. या प्रक्रियेला शहरीकरण असे म्हणतात.[१]

आज लहान शहरातून मोठ्या शहरातही लोक स्थलांतर करत आहेत. कारण मोठ्या शहरात लहान शहरापेक्षा जास्त सोयी उपलब्ध आहेत. उदा. रेल्वे, विमान, शैक्षणिक संस्था, औद्योगिकीकरण, तांत्रिक सुविधा इ. शहरीकरणाच्या प्रक्रियेमुळे एका बाजूने विकासप्रक्रियेने वेग घेतला असे दिसत असले; तरी याच प्रक्रियेने अनेक सामाजिक व आर्थिक समस्यांना जन्म दिला असे दिसत आहे.

भारतामध्ये नागरीकरणाची प्रक्रिया १९ व्या शतकात सुरू झाली आणि

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तिला वेग प्राप्त झाला. साधारणपणे पंचवार्षिक योजनांमुळे औद्योगिकीकरण उद्योगीकरणास चालना मिळाली. दळण-वळण क्षेत्रात अनेक सुधारणा घडू लागल्या आहेत. त्यामुळे नागरीकरणाच्या प्रक्रियेला वेग आला.

नागरीकरण ही अशी प्रक्रिया आहे, की ज्या प्रक्रियेमध्ये ग्रामीण वसाहतीचे नागरी वसाहतीमध्ये रूपांतर होत आहे. अनेक लोक ग्रामीण भागातून सतत नागरी भागाकडे स्थलांतरित होत असतात. साधारणपणे शेतीचे यांत्रिकीकरण घडून येते. तेव्हा शेती क्षेत्रावर अवलंबून असणारे लोक अधिक मात्रेने अतिरिक्त (Surplus) ठरतात. त्याच वेळी उद्योग क्षेत्रामध्ये उत्पादन हाताऐवजी यंत्राच्या साहाय्याने घेतले जाते. तेव्हा अशा मोठ्या कारखान्यामध्ये काम करणाऱ्या मजुरांना मागणी वाढते, व्यापार वाढत जातो. त्यासाठी ग्रामीण भागातील अतिरिक्त लोकसंख्या नागरी भागाकडे कामधंद्याच्या निमित्ताने स्थलांतरित होत आहे. त्यामुळे शहरीकरणाची प्रक्रिया गतीमान होत आहे.[२]

विकसनशील देशांपुढील विकासाच्या समस्या सर्वसाधारणपणे सारख्याच असतात. नागरीकरणाची प्रक्रिया वाढल्याने विकासाच्या प्रक्रियेचा आलेख उंचावल्याचे ठळकपणे दाखवू शकतो. भारतातील शहरीकरणाचा विचार केला तर भारतात शहरीकरणाची प्रवृत्ती जास्त वेगाने वाढत आहे. यात मोठ्या शहरांची वाढण्याची प्रवृत्ती लहान शहरापेक्षा जास्त आढळून येते. त्यामुळे मोठ्या शहरांत वाढत्या नागरीकरणामुळे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. आज महाराष्ट्र हे देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य आहृे, की ज्याचे शहरीकरण जास्त झाले आहे. कारण महाराष्ट्राचे औद्योगिकीकरण जास्त झाले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातून शहरी भागात जास्त स्थलांतरण झालेले

आहे. उस्मानाबाद व सोलापूर जिल्हा हे मागास जिल्हे म्हणून ओळखले जातात या जिल्ह्यांतील एकूण उद्योगांची, कारखान्यांची संख्या कमी आहे; परंतू एका विशिष्ट उद्योग केंद्राभोवती स्थलांतर प्रक्रियेतून नागरीकरणाचा वेग वाढलेला दिसत आहे. त्यामुळे उदभवलेल्या आर्थिक, सामाजिक समस्यांचा अभ्यास करण्यासाठी सदरील विषयाची निवड करण्यात आली आहे.

आर्थिक विकासामागे शहरीकरण दडलेले आढळून येते. शहरीकरण वाढल्यामुळे स्थानीयीकरणही वाढत असते. उद्योजक आपली भांडवली गुंतवणूक करताना तिथे स्थानीयीकरण आहे किंवा नाही, याचा विचार करत असतात. स्थानीयीकरण निर्माण करण्याचे कार्य मात्र शहरांना करावे लागते; म्हणूनच जागतिक विकासात शहरीकरणाचा वाटा मोलाचा आहे. ज्या देशात स्थानीयीकरण जास्त आहे, तिथे औद्योगिक विकास जास्त झाल्याचे अमेरिका, जपान, जर्मनी या देशांवरून दिसून येते.

औद्योगिकीकरण वाढल्यामुळे उत्पादनात वाढ होते. त्यामुळे रोजगारात वाढ होते; परंतु औद्योगिकीकरण वाढण्यासाठी शहरीकरण आवश्यक आहे. १९९९-२००० च्या जागतिक बँकेच्या जागतिक विकास अहवालानुसार शहरी उत्पन्नाचा वाटा जगातील कमी उत्पन्न गटातील देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नात शहरी उत्पन्नाचा वाटा ५५ टक्के, मध्यम उत्पन्न गटातील राष्ट्रीय उत्पन्नात वाटा ७३ टक्के, तर उच्च उत्पन्न गटातील देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नात हा वाटा ८५ टक्के असल्याचे आढळून आले आहे. याच अहवालानुसार १९९८ सालाचे भारतातील उत्पन्न दरडोई ४३० डॉलर, अमेरिका २९,३४० डॉलर, जपान ३२,३८० डॉलर, इंग्लंड २१,४०० डॉलर व स्वित्झर्लंड ४०,०८० डॉलर एवढे आहे. कारण या सर्व देशांचे शहरीकरण सरासरी ८० टक्क्यापेक्षा जास्त

झालेले आहे, तर भारताचे शहरीकरण २७ टक्के झालेले आहे. म्हणजेच दरडोई उत्पन्न वाढीमध्ये शहरीकरणाची भूमिका महत्त्वाची आहे.

शहरीकरणामुळे शेती क्षेत्राचाही फायदा झाला आहे. शहरीकरणामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन यांत्रिकी उत्पादन वाढत आहे. त्यामुळे शेती क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन उत्पादकता वाढवता येते. भारतामध्ये १९९४-९६ या वर्षी दर हजार कृषी कामगारांमागे पाच ट्रॅक्टर व शेती यंत्रे उपलब्ध होते, तर हेच प्रमाण अमेरिकेत १,४५२, इंग्लंड ८७०, जपान ५९३, कॅनडा १६८३ असे होते. म्हणजे शहरीकरण व शेतीविकास यांचाही संबंध आहे.

शहरीकरणामुळे उत्पादन वाढत आहे. त्यामुळे उत्पादनाच्या घटकांचा, बाजारपेठाचा विकास होत आहे. शहरीकरण वाढीबरोबर दळणवळण व वाहतुकीमध्ये वाढ होत आहे. यामुळे उत्पादकांच्या वाहतुक खर्चामध्ये घट होत आहे. तसेच एकमेकांवर अवलंबून असणाऱ्या उद्योगांना कच्चा माल जाग्यावरच उपलब्ध होत आहे, म्हणजेच बाजारपेठाची समस्या निर्माण होत नाही. शहरीकरण वाढीमुळे उत्पादन वाढून शहराचे आकारमान वाढत आहे. यामुळे वेतनदरात वाढ होऊन कामगारांचे राहणीमान उंचावत आहे. शहरीकरण वाढीमुळे अंतर्गत बचती व बहिर्गत बचतीमध्ये वाढ होऊन देशाचा आर्थिक विकास वाढण्यास मदत होते आहे, त्यामुळे निर्यातीत वाढ होऊन शोधन-शेष आधिक्य निर्माण होते व विदेशी चलनसुध्दा जास्तीचे उपलब्ध होते.

शहरीकरणामुळे देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाचा चेहरामोहराच बदलून जातो. आज अमेरिका, जपान, कॅनडा, फ्रान्स या देशांमध्ये साक्षरतेचे प्रमाण,

शिक्षण सुविधा, आरोग्य सुविधा, शुध्द पिण्याचे पाणी, राहण्याची सुविधा जास्त प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळे शहरीकरण आजच्या काळाची गरज आहे. शहरे आपल्या देशाची संस्कृती, आचार-विचार, जगाला देत असतात त्यावरुन त्या-त्या देशाचा विकासाचा तोंडवळा दिसतो.

वाढत्या शहरीकरणाने फायद्याबरोबरच काही समस्यीही निर्माण होत आहेत. शहरामध्ये लोकसंख्या वाढल्याने घराच्या समस्या, पाणीपुरवठा समस्या, प्रदूषणाच्या समस्या, आरोग्य समस्या, शैक्षणिक समस्या, शौचालये, जमिनीच्या वाढत्या किमती, जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमती, वाहतूक समस्या, करांमध्ये वाढ, झोपडपट्टी, गुन्हेगारी, चोऱ्या, घाणीचे साम्राज्य अशा अनेक समस्या शहरामध्ये निर्माण होत आहेत. त्यामुळे मोठ्या शहरांमधील लोक खेड्याकडे चला असा संदेश देत आहेत, म्हणजेच शहरी जीवनातील समस्यांना कंटाळलेले आहेत.[३]

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषिप्रधान अर्थव्यवस्था आहे. त्यामुळे भारतात ७० टक्के लोक कृषीवर आधारित आहेत; परंतु वाढत्या लोकसंख्येबरोबर भूमी/मनुष्य प्रमाण (Land/man Ratio) व्यस्त होत चालले आहे. त्यामुळे भारतीय शेती ग्रामीण भागातील सर्वच कामगारांना रोजगार देऊ शकत नाही. भारतातील ७० टक्के शेती निसर्गाच्या लहरीवर आधारित आहे. म्हणजेच भारतीय शेती मागासलेली आहे. ग्रामीण भागात दारिद्र्य, बेकारी, आर्थिक विषमता सतत वाढत आहे. तसेच शिक्षणाच्या सुविधा, आरोग्यसुविधा, पाणीपुरवठा, वीजपुरवठा अशा अत्यावश्यक सुविधांची कमतरता असते.[४] म्हणून ग्रामीण भागातून रोजगारासाठी आर्थिक उन्नतीसाठी व विलासी जीवन जगण्यासाठी बरेच लोक शहरी भागात स्थलांतरण करत आहेत.

त्याचबरोबर शहरी भागातील नैसर्गिक लोकसंख्यावाढीचा दर वेगाने वाढत आहे, त्यामुळे शहरामधील लोकसंख्या वाढून शहरांच्या सीमा विस्तारत आहेत. त्यामुळे अनेक खेडी शहरामध्ये विलीन होत आहेत. त्यामुळे शहरीकरण प्रवृत्ती वाढत आहे.

भारताचे व महाराष्ट्राचे शहरीकरण १९९१ च्या जनगणनेनुसार अनुक्रमे २५.०० व ३८.०० टक्के झालेले आहे; तर उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्याचे शहरीकरण १९९१ च्या जनगणनेनुसार अनुक्रमे २१ व २२ टक्क्यांच्या आसपास झालेले आहे. त्यामुळे राहणीमान खालावले आहे. शैक्षणिक, आरोग्यविषयक, पायाभूत विकास कमी झाला आहे. पर्यायाने आधुनिक तंत्रज्ञानाचा विकास कमी झाला आहे; म्हणून शेती क्षेत्राचाही विकास कमी झाला आहे. म्हणजेच या दोन्ही जिल्ह्यांचे शहरीकरण कमी असल्यामुळे त्या-त्या जिल्ह्यातील आर्थिक-सामाजिक विकास कमी झाला आहे. म्हणूनच संशोधनासाठी उस्मानाबाद व सोलापूर हे दोन जिल्हे निवडण्यात आले आहेत.[५]

प्रस्तुत प्रकरणामध्ये अभ्यासाचा उद्देश, अभ्यासाची गृहीत कृत्ये, अभ्यासाची पद्धत, अभ्यासाच्या पद्धतीचे विश्लेषण, अभ्यासात येणाऱ्या अडचणी यांचे विवेचन करण्यात आले आहे.

## १.२ नागरीकरणाचा अर्थ किंवा व्याख्या:

नागरीकरण हा शब्द इंग्रजीतील Urban (अर्बन) या शब्दापासून बनला आहे. Urban हा शब्द लॅटिन भाषेतील Urbs (अर्ब्स) या शब्दापासून तयार झालेला आहे. लॅटिन भाषेत Urbs या शब्दाचा अर्थ नगर असा होतो या प्रकारे Urban शब्दाचा अर्थ नगरासंबंधी किंवा शहरासंबंधी अथवा नगरात किंवा शहरात असा होतो.

नागरीकरणाची संकल्पना (अर्थ, प्रक्रिया) समजून घेताना एखाद्या ठिकाणाची वाढ कशी व कोणत्या प्रकारे होते हे पाहणे महत्त्वाचे आहे. नेल्सन अंडरसनच्या मतानुसार, ''ज्या ठिकाणी उद्योगधंद्यांचा (कारखाने) अधिक प्रमाणात विकास होऊन तेथील जीवनपध्दती ग्रामीण भागापेक्षा वेगळी तयार होते, अशा बदलास नागरीकरण असे म्हणतात.''

आधुनिक काळात उद्योगधंद्यांमुळे ज्या ठिकाणाची मोठ्या प्रमाणात प्रगती होते, की ती ठिकाणे उद्योगधंद्यांची केंद्रे बनली आहेत. त्या ठिकाणाकडे निरनिराळ्या भागांतील अनेक लोक रोजगार मिळविण्यासाठी येऊ लागतात. त्यामुळे त्या ठिकाणची पूर्वीची जीवन पद्धती बदलुन नवीन व वेगळी पद्धती तयार होते. ही पद्धती खेड्यापेक्षा वेगळी असते. कारण उद्योगधंद्याच्या ठिकाणी असलेले बहुतांश लोक द्वितीय श्रेणीच्या व्यवसायात गुंतलेले असतात. तर ग्रामीण भागातील लोक कृषी व्यवसायात गुंतलेले असतात. त्यामुळे ग्रामीण भागापेक्षा शहरातील जीवनपद्धती वेगळी असते.

संयुक्त राष्ट्रसंघाने केलेल्या व्याख्येनुसार, ग्रामीण वसाहती, तेथील व्यवसाय व उत्पादने यांचे वेगळ्या वसाहती, वेगळे व्यवसाय व वेगळ्या उत्पादनांत होणारे रूपांतर म्हणजे नागरीकरण होय.

नागरीकरणात एखाद्या ठिकाणी उद्योगधंदे सुरू झाले म्हणजे तेथील पूर्वीचे व्यवसाय बदलून नवीन व्यवसाय येतात. पूर्वीच्या उत्पादनांत बदल होतात आणि तेथे एक वेगळीच वसाहत स्थापन होते. ही वसाहत खेड्यापेक्षा पूर्णपणे वेगळी असते. अशा प्रकारे बदल झाला म्हणजे त्या ठिकाणाचे नागरीकरण झाले असे समजावे.[६]

## १.३ नागरीकरण ओळखण्यासाठीचे निकष :

नागरी भाग ओळखण्यासाठी युनायटेड नेशन्सने प्रमुख सात निकष सांगितले आहेत.

### १) लोकसंख्येचा आकार व घनता :

ग्रीनलँडमध्ये ३००, डेन्मार्क २००, आईसलँड ३००, व्हेनेझुएला १०००, न्यूझीलंड १५००, आयर्लंड २०००, फ्रान्स, अर्जेंटिना २५००, ग्रीक १००००, जपान ३००००, यू.एस.ए., मेक्सिको व भारतामध्ये ५००० लोकसंख्या मर्यादा हा ग्रामीण व शहरी भाग ओळखण्याचा छेदन बिंदु आहे. ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या ठिकाणाला नगर म्हटले जाते. ग्रामीण भागामध्ये लोकसंख्येची घनता २०० ते १००० व्यक्ती असते. शहरी भागामध्ये कमीत कमी ५०० व जास्तीत जास्त ५०००० व्यक्ती प्रति चौ.कि.मी. लोकसंख्या घनता असल्यास तेथे नागरीकरण झाल्याचे समजले जाते.

### २) आर्थिक कार्य :

१९९१ च्या जनगणनेनुसार एकूण कामकरी लोकसंख्येपैकी शहरी भागात ७५ टक्के बिगरशेती व्यवसायांत व २५ टक्के शेती व्यवसायात गुंतलेले असावेत.

### ३) सामाजिक मूल्ये :

नागरी भागामध्ये विविध जातींचे व विविध भाषा बोलणारे लोक असतात. शहरामध्ये अस्पृश्यता पाळली जात नाही, शहरी भागाची संस्कृती ग्रामीण भागापेक्षा वेगळी असते. फॅशन-राहणीमानात भिन्नता असते. शहरामध्ये सामाजिक मूल्ये जास्त प्रभावी असतात.

**४) व्यवस्थित नगररचना :**

नागरी भागामध्ये घरांची रचना व्यवस्थित असते. मोटारीसाठी, पादचाऱ्यांसाठी रस्ते वेगवेगळे असतात, रस्ते विभाजक असतात, शहरामध्ये स्नानगृहे, शौचालय, नळ, वीजपुरवठा, सार्वजनिक कार्यालये, न्यायव्यवस्था, संरक्षणदले, दवाखाने, वाहतुकीची साधने, सांडपाण्यासाठी नाल्या असतात, कचऱ्यासाठी कुंड्या असतात, दररोज शहराची साफसफाई केली जाते.

**५) कार्यात्मक निकष :**

नगरामध्ये व्यापारात्मक कार्य करणारी लोकसंख्या जास्त असते, नागरी भागात दररोज बाजार असतो, नगरामध्ये कपडा, स्टेशनरी, किराणा, औषधी, सराफ, अडत लाईन असे बाजार असतात. यावरून शहर व ग्रामीण भाग ओळखता येते.

**६) शासकीय प्रदेश :**

शासकीय सोईसाठी प्रांताची मुख्यालये, राजधानी, जिल्हा, तालुका, विभागीय कार्यालये ज्या ठिकाणी असतात, त्याला नगर असे म्हणतात.

**७) स्थानिक शासन संस्था असलेला प्रदेश :**

ज्या प्रदेशांत एक विशिष्ट स्वायत्ता शासन प्रणाली असते, त्यांनाही नगर म्हणावे. उदा. नगरपालिका.

**८) इतर निकष :**

१) अन्नधान्याच्या बाबतीत शहरी लोक ग्रामीण भागावर अवलंबून असतात.

२) नगर हे त्या भागातील वाहतुकीचे मुख्य केंद्र असावे.

३) नगराची रचना ग्रामीण भागापेक्षा वेगळी असावी.

४)	नगराला इतिहास असावा.

५)	मार्क जेफरसन यांच्या मते, "शहरात प्रति चौ.कि.मी. ला १०००० एवढी कमीत कमी लोकसंख्या घनता असावी. सामाजिक दृष्टिकोनातून नागरीकरण ही संकल्पना नगरातील वाढत्या लोकसंख्येसाठी वापरली जाते. ती नागरी जीवनाचा मार्ग व विस्तार सांगते; परंतु आर्थिक दृष्टिकोनातून बिगरशेती क्षेत्रावर अवलंबून असणारी लोकसंख्या वाढत जाणे म्हणजे नागरीकरण होय. "

एखाद्या विशिष्ट प्रदेशातील शहरात राहणाऱ्या लोकसंख्येशी त्या विशिष्ट प्रदेशाच्या एकूण लोकसंख्येचे असलेले प्रमाण म्हणजे त्या प्रदेशाचे नागरीकरण होय.

लोकसंख्या घनतेचा परिणाम सामाजिक जीवनावर होतो. समाजाच्या राहणीमानात बदल होतो, रस्त्यांची संख्या वाढते. नगरामधील मुख्य गाभ्यात बदल होतो. आर्थिक व तांत्रिक बदल होतात, या प्रक्रियेला नागरीकरण म्हटले जाते.

जे. सी. मिटवेल ग्रँड बेस (१९६९) यांच्या मते, घ्नागरीकरण म्हणजे अशी प्रक्रिया आहे, की जीमुळे शेती क्षेत्राकडून बिगरशेती क्षेत्राकडे कामगारांना आकर्षित केले जाते.ङङ नेल्सन ॲन्डसर (१९५७) च्या मते, " नागरीकरण म्हणजे ज्या देशाच्या ग्रामीण भागातील शेती क्षेत्राकडून नगरामधील बिगर शेती क्षेत्राकडे लोक स्थलांतरण करतात. व्यक्तीची सामाजिक वागणूक बदलून वैचारिक पातळीत बदल होतो. त्याला नागरीकरण म्हटले जाते. "

जॉकब्सन आणि वेदप्रकाश (१९७१) यांच्या मते, " नागरीकरण ही अशी प्रक्रिया आहे, की ज्यामुळे लोकांची स्थिती बदलून, समाजात अनेक बदल होतात, नागरीकरणाचा अभ्यास स्थूल रूपात केला जातो तर नगराचा व शहरी घटनांचा

अभ्यास सूक्ष्म पातळीवर केला जातो, त्याला नागरीकरण म्हणतात. ''

युनायटेड नेशन्स (१९५७) च्या मते, '' नागरीकरण ही अशी प्रक्रिया आहे, की जीमुळे शहरी भागातील लोकसंख्येचे प्रमाण वाढते, त्यामुळे सांस्कृतिक व सामाजिक बदल होऊन जीवन जगण्यात आधुनिकता येते व शहराचा सीमाविस्तार होऊन खेड्यांची संख्या कमी होते. ''

१९०१ च्या भारतीय जनगणनेनुसार नगर या संज्ञेत तीन गोष्टी अंतर्भूत केल्या आहेत:

१) कितीही लोकसंख्या असलेली नगरपालिका.

२) नगरपालिकांच्या हद्दीत नसलेल्या सर्व सिव्हिल लाईन.

३) ५००० पेक्षा जास्त व्यक्तींची कायम वस्ती असलेले कोणतेही ठिकाण.

या व्याख्येमध्ये लोकसंख्या हा महत्त्वाचा निकष असून शासकीय विभाग हा मुख्य निकष आहे. उदा. छावणी, वसाहती यांची लोकसंख्या ५००० पेक्षा कमी असते, तरीही याला नगर म्हटले आहे.

भारतामध्ये संस्थानांचे विलीनीकरण झाले. १९५१ पासुन पंचवार्षिक योजनांना सुरुवात झाली, म्हणून १९६१ च्या भारतीय जनगणनेने नागरीकरणाच्या वास्तवतेवर भर देऊन व्याख्या केलेली आहे आणि तीच व्याख्या १९९१ च्या जनगणनेने वापरली आहे. १९९१ च्या जनगणनेने नागरीकरणाचे पुढील प्रमाणे काही निकष सांगितलेले आहेत:

१) सर्व नगरपालिका, महानगरपालिका, लष्करी वसाहती, छावणी यांचा समावेश शहरी प्रदेशात करावा.

२)	बाकीच्या वस्तीस्थानासाठी पुढील तीन कसोट्या पूर्ण होणे गरजेचे आहे.

अ)	किमान ५००० लोकसंख्या असावी.

ब)	आर्थिक कार्यानुसार एकूण कामगारांच्या ७५ टक्के कामगार बिगर शेती व्यवसायात गुंतलेले असावेत.

क)	प्रति चौरस कि.मी. ला ४०० व्यक्ती किंवा दर चौरस मैलास १०० व्यक्ती एवढी लोकसंख्या घनता असावी.

वरील निकष ज्या वस्तीस्थानाला लागू पडतात तेथे नागरीकरण झाले आहे असे म्हणतात.[७]

**१.४ व्याख्येचे परीक्षण:**

१९९१ च्या भारतीय जनगणनेने जी नागरीकरणाची व्याख्या केलेली आहे. त्या व्याख्येत बरेच दोष असल्याचे दिसून येते.

नगरपालिका, छावणी, महानगरपालिका यांच्यापेक्षा महसुली खेडी पूर्णतः वेगळी असल्यामुळे व्याख्येचा पहिल्या भागात समाधान व्यक्त करु शकतो. परंतू जर प्रशासकीय विभाग हा निकष घेतला तर भारतामध्ये १९८१ साली ३४२५ शहरामध्ये प्रशासकीय विभाग नव्हते. जर प्रशासकीय विभाग हा निकष घेतला तर बऱ्याच प्रमाणात नागरीकरण घडु शकते.

भारतामध्ये १२००० गावे अशी आहेत, की ज्यांची लोकसंख्या ५००० पेक्षा जास्त आहे; परंतु त्यापैकी ३४२५ ठिकाणांनाच नगरे म्हणून संबोधले जात होते. तसेच बाकीच्यांना खेडे म्हणून ओळखले जात होते. तसेच १९८१ च्या जनगणनेनुसार भारतात २३० नगरांची लोकसंख्या ५००० पेक्षा कमी होती, तरीही त्यांना नगर म्हटले

आहे. काही गावांमध्ये नगरपालिका नसल्यामुळे त्यांची लोकसंख्या २०००० असताना त्यांना शहराचा दर्जा मिळालेला नाही. उदा. उस्मानाबाद जिल्ह्यातील येडशी गाव होय. म्हणूनच ही जनगणनेची व्याख्या चुकीची वाटते.

केवळ लोकसंख्या घनता दर चौ.कि.मी. ला ४०० विचारात घेतली तर १९८१ च्या जनगणनेनुसार केरळ, पश्चिम बंगाल, बिहार राज्याची लोकसंख्या-घनता ४०० पेक्षा जास्त होती; मग या राज्याचे नागरीकरण जास्त आहे, असे म्हणता येईल का? असा प्रश्न निर्माण होतो.

एकूण कामगारांच्या ७५ टक्के कामगार बिगरशेती व्यवसायांत गुंतलेले पाहिजेत हा निकषही अवास्तव आहे. कारण भारतामध्ये १९८१ च्या जनगणनेनुसार ९००० नगरांमध्ये ४० टक्क्यांपेक्षा जास्त कामगार शेती व्यवसायात गुंतलेले आहेत. उस्मानाबाद जिल्ह्यात फक्त उस्मानाबाद नगरात व सोलापूर जिल्ह्यात सोलापूर, पंढरपूर, द.सोलापूर व अक्कलकोट नगरांमध्ये हा निकष पूर्ण केला जातो; मग इतर नगरांना नगर म्हणावे की नाही, असा पेच निर्माण होतो. म्हणून या सर्व निकषांचा एकत्रित विचार करावा लागतो. भारतातील बहुतेक शहरे केवळ पहिल्या निकषांवरच शहरे म्हणून संबोधली जातात. यापैकी केवळ 'अ' वर्गातील शहरे दुसऱ्या निकषांच्या तिन्ही अटींची पूर्तता करतात, इतर नगरांना त्या ठिकाणी नगरपालिका असल्यामुळेच शहर म्हटले जाते.[८]

## १.५ भारतीय नागरीकरणाचा इतिहास:

भारतामध्ये प्राचीन काळी शहरे होती हे हडप्पा व मोहन्जोदाडो संस्कृतीमुळे सिद्ध होते. आर्यांनी भारतामध्ये सिंधू, यमुना खोऱ्यामध्ये नद्यांकाठी आपली गावे

वसवली होती. त्यामुळेच या नद्याकाठी जास्त नागरीकरण पाहण्यास मिळते. इतिहासकाराच्या मते वैदिक कालखंडातही शहरांची रचना आधुनिक पध्दतीची होती. आर्यांनी धर्माच्या नावावर गावे वसविलेली आहेत. भारतामध्ये झुसी, कौरांबी, मथुरा, अयोध्या, हस्तिनापूर ही महत्त्वाची शहरे आर्यांनीच वसविलेली आहेत.

प्राचीन कालखंडात वर्णव्यवस्था व जातीनुसार व्यवसाय केले जात होते. म्हणूनच भारतात बांगडी उद्योगामुळे फिरोजाबाद व चामडी उद्योगामुळे कानपूर ही नगरे विकसित झाली आहेत.

प्राचीन कालखंडातील कौशल, मगध, पाटलीपुत्र या नगरांत अशोक, मौर्य, गुप्त, चोल या राजांनी आपल्या राजधान्या वसविल्या म्हणून त्या नगरांचे नागरीकरण घडून आले आहे. नालंदा व तक्षशिला विद्यापीठांनी आसपासची शहरे निर्माण केली होती. तर बुध्दाने कुशीनगर, लुंबीनी अशी सहा शहरे निर्माण केली होती. म्हणजेच भारतामध्ये प्राचीन कालखंडामध्ये धर्मामुळे, शिक्षणामुळे, राजधांन्यामुळे अनेक नगरे विकसित झाली आहेत.

१६ व्या शतकात मराठा कालखंडामध्ये २९ मुलकी विभाग होते. या मुलकी विभागाची प्रशासकीय कार्यालये पुणे, वाई, सातारा, भिवंडी, कल्याण, महाड, जुन्नर, रायगड व कोल्हापूर अशा अनेक शहरांमध्ये होती. तसेच शिवाजी महाराजांनी, अहिल्याबाई होळकरांनी अनेक ठिकाणी मंदिरे बांधून, त्या गावांचा धार्मिक विकास करून, त्यांना शहरांचा दर्जा प्राप्त करून दिला.[९]

### १.५.१ भारतातील ब्रिटिश कालखंडातील नागरीकरण :

ब्रिटिश कालखंडात भारतातील नागरीकरण अधोगतीला गेले, याची थोडक्यात

पुढील कारणे होत:[१०]

१) ब्रिटिशांना भारताचा आर्थिक विकास करावयाचा नव्हता.

२) जेव्हा इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली होती, तेव्हा इंग्लंडमध्ये नागरीकरणाची प्रक्रिया अतिशय गुंतागुंतीची झाली होती. तशीच परिस्थिती भारतात होईल म्हणून भारतात नागरीकरण होऊ दिले नाही.

इ.स. १८०० मध्ये भारतामध्ये एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असणारी १६ शहरे व लहान शहरे १५०० च्या आसपास होती. या शहरांमध्ये एकूण लोकसंख्येच्या ११ % लोकसंख्या राहत होती. १८७२ च्या पहिल्या जनगणनेनुसार १,००,००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली १६ शहरे, ५०,००० लोकसंख्येची ४३ शहरे होती. या शहरांमध्ये एकूण लोकसंख्येपैकी ८७ % लोक राहत होते. म्हणजेच १९ व्या शतकात भारतातील नागरीकरण घटले होते. १९ व्या शतकात इंग्लंडच्या विकासासाठी रेल्वेजाळे, बंदरे यांचा विकास केला गेला. औद्योगिकीकरणास सुरुवात झाली. त्यामुळे भारतामध्ये मुंबई, पुणे, अहमदाबाद, दिल्ली, कोलकत्ता, मद्रास अशी मोठी शहरे निर्माण झाली आहेत. २० व्या शतकात ब्रिटिशांचा भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन अनुकूल स्वरूपाचा झाल्यामुळेच १९०१ पासून नागरीकरण वाढत राहिले आहे.

### १.५.२ ब्रिटिश राजवटीचा नागरीकरणावर झालेला परिणाम:

ब्रिटिश राजवटीचा नागरीकरणावर पुढीलप्रमाणे परिणाम झाला आहे.[११]

**१) महानगरे :**

२० व्या शतकाच्या सुरुवातीला भारतात एकही शहर दशलक्ष लोकसंख्या

असणारे नव्हते. कोलकत्ता शहराची लोकसंख्या ९ लाख, वाराणशी, आग्रा व अहमदाबाद शहरांची लोकसंख्या प्रत्येकी २ लाख एवढी होती; परंतु औद्योगिकीकरणामुळे उत्पादनात वाढ झाली. व्यापारी केंद्रे वाढली.रोजगारात वाढ झाली. रेल्वेजाळे पसरले. नवीन तंत्रज्ञान येऊ लागले; त्यामुळे नागरीकरण प्रवृत्ती वाढून अनेक महानगरे निर्माण झाली.

**२) उंच ठिकाणे व वनस्पतींची ठिकाणे :**

१८७० मध्ये भारतात ब्रिटिशांनी ८० उंच ठिकाणे विकसित केली होती. कारण ब्रिटिश अधिकारी उन्हाळ्यात दार्जिलिंग, महाबळेश्वर, नैनिताल अशा थंड हवेच्या ठिकाणी विश्रांतीसाठी जात. त्यामुळे अशा ठिकाणी हॉटेल्स, विश्रामगृहे निर्माण झाली. नक्षीकाम व्यवसाय विकसित झाले; त्यामुळे अशा उंचीवरील ठिकाणांचे रूपांतर शहरांमध्ये झाले. आसाममधील कॉफी, चहा पिकणारी ठिकाणे व्यापारी केंद्रे म्हणून विकसित झाली. त्यामुळे त्या ठिकाणीही शहरे निर्माण झाली आहेत.

**३) सिव्हिल लाईन आणि छावणी :**

मोठ्या शहरांच्या सुरक्षिततेसाठी ब्रिटिशांनी छावण्या उभारल्या, अशी ठिकाणेही विकसित होऊन त्यांची शहरे झाली.

**४) रेल्वे व औद्योगिकीकरण :**

भारतामध्ये १८५३ मध्ये रेल्वे वाहतूक सुरू झाली. ज्या-ज्या भागात रेल्वे लाईन उपलब्ध होती त्या-त्या ठिकाणी औद्योगिकीकरण होऊन बाजारपेठांचा विकास झाला. त्यामुळे रोजगारासाठी अनेक लोक इतर ठिकाणांहून त्या ठिकाणी स्थलांतरित झाले; त्यामुळे अशा नगरांची नागरीकरण प्रवृत्ती वाढत राहिली आहे.

### ५) नागरी सुविधा व नागरी प्रशासन :

ब्रिटिश कालखंडामध्ये ब्रिटिशांच्या सोईसाठी काही विशिष्ट नगरांत नळ, वीजपुरवठा, मैदाने, बगिचे, करमणूक साधने या सोर्यींचा स्थानिक शासन प्रणालीने पुरवठा केल्यामुळे इतर ठिकाणचे लोक नगरांकडे आकर्षित झाले व नागरीकरण वाढले.

## १.६ नागरीकरण प्रक्रिया:

नागरीकरण प्रक्रिया ही हळूहळू घडते, ती पुढील प्रक्रियेनुसार घडते.[१२]

१) नागरीकरण ही राजकीय व प्रशासकीय प्रक्रिया आहे.

२) नागरीकरण ही आर्थिक प्रक्रिया आहे, तीमध्ये

- अ) प्राथमिक उत्पादन,
- ब) द्वितीय क्षेत्रातील उत्पादन, नागरीकरण व
- क) तृतीय क्षेत्रातील उत्पादन व नागरीकरणाचा समावेश होतो.

३) नागरीकरण ही औद्योगिक प्रक्रिया आहे; म्हणजेच

- अ) स्थूल नागरीकरण
- ब) महानगरे
- क) उपनगरे

या तीन टप्प्यांमध्ये नागरीकरण प्रक्रिया होत असते. मानवी पर्यावरणवाद्यांनी नागरीकरण प्रक्रियेसाठी POET हा शब्द शोधून काढला आहे.

### अ) P = लोकसंख्या (Population)

१) केंद्रित लोकसंख्येचा आकार

२) ग्रामीण-शहरी स्थलांतराची रचना

३) लोकसंख्येची धार्मिक, वांशिक, भाषिक तत्त्वावर रचना

४) जनन व मृत्युदराचे प्रमाण

५) स्त्री-पुरुष प्रमाण

६) साक्षरता दर

**ब) O = संघटन (Organisation) -**

१) बिगरशेती क्षेत्रांत गुंतलेले कामगार

२) व्यवसायांकडे वळण्याची संरचना

३) व्यवसायाची मुक्त व बंद संधी

४) नोकरीभरती पद्धत

५) आर्थिक विनिमयाचे स्वरूप

६) हातमागाचे नवीन उद्योगाकडे होणारे स्थलांतरण

**क) E = पर्यावरण (Environment) -**

१) वस्ती असलेले भौगोलिक क्षेत्र

२) भौगोलिक क्षेत्राचे भौतिक आकारमान

**ड) T = तंत्रज्ञान (Technology) -**

१) वाहतुकीतील बहुविधपणा

२) दळणवळण सुविधा

३) नवनिर्मित तंत्रज्ञान

वरील प्रमाणे नागरीकरणाची प्रक्रिया होते.

## १.७ भारतातील नागरीकरणाच्या प्रवृत्तीची कारणे :

भारतामध्ये नागरीकरणाची प्रवृत्ती मोठ्या नगरांमध्ये जास्त व लहान नगरांमध्ये कमी आढळून येते. याची विविध कारणे पुढीलप्रमाणे आहेत.[१३]

### १) औद्योगिकीकरण :

भारतामध्ये औद्योगिकीकरण ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात जास्त झाले आहे. त्यातल्या त्यात ब्रिटिशांनी मुंबई, दिल्ली, मद्रास, कोलकत्ता, पुणे, नागपूर, ठाणे, कानपूर या नगरामध्ये औद्योगिकीकरण जास्त केले होते व भारत सरकारने याच नगरांमध्ये भांडवली गुंतवणूक वाढवून औद्योगिकीकरण जास्त केले आहे. त्यामुळे मोठ्या नगरांमध्ये दळणवळण सुविधा, बाजारपेठा, शैक्षणिक सुविधांचा विकास जास्त झाला आहे. म्हणून ग्रामीण भागातून व लहान लहान नगरांमधून मोठ्या नगरामध्ये रोजगारासाठी, शिक्षण घेण्यासाठी, व्यवसायासाठी अनेक लोक स्थलांतरित झाले आहेत.

### २) शैक्षणिक सुविधा :

भारतामधील प्रचंड लोकसंख्येला स्वतःच्या पायावर उभे करावयाचे कार्य शिक्षण पार पाडते. म्हणून शिक्षण महत्त्वाचे आहे. मोठ्या नगरामध्ये, विद्यापीठे, इंजिनीअरिंग कॉलेज, मेडिकल कॉलेज, इतर व्यावसायिक शैक्षणिक संस्था व बिगर व्यावसायिक संस्था केंद्रित झाल्या असून त्या उत्तम दर्जाच्याही आहेत. म्हणूनच मुंबई, पुणे, दिल्ली, औरंगाबाद या मोठ्या नगरांचे नागरीकरण झाले आहे.

### ३) विविध विभागीय प्रशासकीय कार्यालये :

ज्या नगरामध्ये राजधानी, उपराजधानी, प्रादेशिक कार्यालये, जिल्हा मुख्यालयाची

ठिकाणे, मिलिटरी कॅम्प स्थापन झालेले आहेत अशा मुंबई, दिल्ली, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, हैद्राबाद, भोपाळ व लखनौ या नगरांमध्ये नोकऱ्यांसाठी अनेक लोक स्थायिक झालेले आहेत; त्यामुळे या नगरांची नागरीकरण प्रवृत्ती वाढत आहे.

**४) नगरांच्या सीमांमध्ये होणारी वाढ :**

मोठ्या नगरांच्या सीमा, व्यवसायामुळे, औद्योगिकीकरणामुळे, शैक्षणिक संस्थांमुळे विस्तारत आहेत. नगरामधील वाढत्या गर्दीमुळे लोक नगरांच्या बाहेर घरे बांधत आहेत.

**५. शेतातील मागासलेपणा :**

भारतीय कृषीमध्ये परंपरागत उत्पादन तंत्राचा वापर केल्यामुळे शेतीची उत्पादकता कमी होत आहे. बारमाही पिकणाऱ्या शेतीचे प्रमाणदेखील अल्प आहे. ७० टक्के शेती कोरडवाहू आहे. त्यामुळे सर्वच कामगारांना ग्रामीण भागात काम मिळत नाही. त्यामुळे हे कामगार रोजगारासाठी मोठया शहरामध्ये स्थलांतरित होऊन तेथे स्थायिक झालेले आहेत. त्यामुळे मोठया शहरांची नागरीकरण प्रवृत्ती वाढली आहे.

**६. नागरी जीवनाचे आकर्षण :**

मोठया नगरामध्ये नागरी सुविधा ग्रामीण भागापेक्षा व लहान लहान नगरापेक्षा चांगल्या दर्जाच्या उपलब्ध असतात; म्हणून ग्रामीण भागातील व लहान नगरामधील श्रीमंत व्यक्तींना नागरी जीवनाचे आकर्षण असते. त्यामुळे असे लोक मोठया नगरामध्ये स्थलांतरित झाल्यामुळे लहान नगरापेक्षा मोठया नगरांची नागरीकरण प्रवृत्ती वाढत आहे.

७. **जातीय विषमता :**

ग्रामीण भागामध्ये व लहान नगरामध्ये आजही जातीयवाद आहे. अस्पृश्यता पाळली जाते. बहिष्कार टाकले जातात. म्हणून या भागातील लोक मोठ्या नगरामध्ये स्थलांतरित होत आहेत. कारण मोठ्या नगरामध्ये जातीय विषमता कमी असते. अनेक जातीधर्मांचे लोक एकत्र राहतात. त्यामुळे ग्रामीण व लहान शहरातून मागासवर्गीय लोक मोठया नगरामध्ये स्थलांतरण करत आहेत. त्यामुळे नागरीकरण वाढत आहे.

८. **व्यवसाय व बाजारपेठेचे केंद्रीकरण :**

मोठया नगरामध्ये व्यवसायाचे केंद्रीकरण झाल्यामुळे बाजारपेठांचे वर्गिकरण होऊन कपडा बाजार, सराफा बाजार, भांडी बाजार, कृषी साहित्य बाजार, बांधकाम साहित्य बाजार, भाजीपाला बाजार असे अनेक बाजार विकसित झाल्यामुळे ग्रामीण भागातून व लहान नगरामधून लोक व्यवसायासाठी मोठया नगरामध्ये स्थलांतरित होत आहेत. त्यामुळे नागरीकरण प्रवृत्ती वाढत आहे.

९. **नैसर्गिक लोकसंख्या :**

मोठया नगरामध्ये आरोग्य सुविधा जास्त असल्यामुळे बालमृत्यूचे व सामान्य मृत्यूदराचे प्रमाण घटत आहे; तर जननदर वाढत आहे. त्यामुळे नैसर्गिक लोकसंख्येत भर पडत आहे; म्हणून मोठया नगरांची नागरीकरण प्रवृत्ती वाढत आहे. त्यामुळे अनेक खेडी नगरामध्ये समाविष्ट होत आहेत.

## १.८ राज्या-राज्यांमधील नागरीकरणाच्या असमानतेची कारणे :

राज्यामधील नागरीकरणाच्या असमानतेची विविध कारणे पुढील प्रमाणे सांगता येतील:[१४]

**१. ब्रिटिशांची राजनीती :**

ब्रिटिशांनी स्वतःच्या सोईसाठी जी राज्ये सोईस्कर वाटतात, अश्याच राज्यांचा विकास जास्त केला. त्यामुळे महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, पश्चिम बंगाल राज्यांचे नागरीकरण जास्त झाले आहे. कारण या राज्यामधून जलवाहतूक करता येत होती, म्हणूनच या राज्यामध्ये उद्योग, वाहतूक, दळणवळण यांचा विकास केला गेला. त्यामुळे अशा राज्यांचे नागरीकरण इतर राज्यांपेक्षा जास्त झाले आहे.

**२. भारत सरकारचे धोरण :**

जी राज्ये पुढारलेली आहेत अशा राज्यात भारत सरकारने आतापर्यंत जास्त गुंतवणूक केली आहे. म्हणूनच महाराष्ट्र, गुजरात तामिळनाडू राज्यांचे नागरीकरण जास्त झाले आहे.

**३. सामाजिक विषमता :**

ज्या राज्यांमध्ये शैक्षणिक, आरोग्य सुविधा जास्त आहेत, अशाच केरळ, महाराष्ट्र, गुजरात राज्यांचे नागरीकरण जास्त झाले आहे; तर बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान राज्यांत या सुविधा कमी असल्यामुळे नागरीकरण कमी झाले आहे.

**४. औद्यागिकीकरणातील असमानता :**

महाराष्ट्र, तामिळनाडू, गुजरात, पश्चिम बंगाल राज्यांचे औद्योगिकीकरण जास्त झाल्यामुळे बाहेरच्या राज्यांतून व त्याच राज्यामधून रोजगारासाठी अनेक लोक स्थलांतरित झालेले आहेत. त्यामुळेच अशा राज्यांचे नागरीकरण जास्त झाले आहे. तर आसाम, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, ईशान्येकडील राज्यांचे औद्योगिकीकरण कमी झाल्यामुळे नागरीकरण सुध्दा कमी झाले आहे.

**५. भौगोलिक कारण:**

पंजाब, हरियांना या राज्यांना बारमाही वाहणाऱ्या नद्या लाभल्या आहेत. महाराष्ट्र, तामिळनाडू, गुजरात, पश्चिम बंगाल, गोवा राज्यांना समुद्रकिनारा लाभला आहे. आंध्र प्रदेशामध्ये खनिज संपत्ती बऱ्यापैकी आहे; म्हणूनच या राज्यांचे नागरीकरण जास्त झाले आहे. याला अपवाद मात्र बिहार राज्य आहे.

**६. ऐतिहासिक ठिकाणे व पर्यटन स्थळे:**

महाराष्ट्र, गुजरात, गोवा, तामिळनाडू, पश्चिम बंगाल राज्यांना इतिहासही लाभला आहे. थंड हवेचे ठिकाणे, किल्ले, धार्मिक स्थळे, पर्यटन स्थळे या राज्यांमध्ये मोठया प्रमाणात आहेत. त्यामुळे अशा राज्यांमधील काही नगरे या कारणामुळे विकसित झाले आहेत. म्हणून अशा राज्यांचे नागरीकरण जास्त झाले आहे व ईशान्येकडील राज्ये, मध्य प्रदेश, राजस्थान, बिहार या राज्यात पर्यटन स्थळे, ऐतिहासिक स्थळे कमी असल्यामुळे नागरीकरण कमी झाले आहे.

**७. वित्त आयोगाचे धोरण :**

भारतीय वित्त आयोगाने जी राज्ये पुढारलेली आहेत, अशाच राज्यांना उत्पन्नातील वाटप जास्त केले आहे. त्यामुळे अशाच राज्यांत औद्योगिक, आर्थिक, सेवा, कृषी क्षेत्राचा विकास जास्त झाला आहे. त्यामुळे अशा राज्यांचे नागरीकरण वाढले आहे.

## १.९ भारतातील नागरीकरणाची कारणे :

नगरांचे औद्योगिकीकरण ग्रामीण भागापेक्षा जास्त झालेले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील अनेक लोक रोजगारासाठी नागरी भागात स्थलांतरण करत आहेत. नगरांतील वाढत्या नैसर्गिक लोकसंख्येमुळे गर्दी वाढत आहे. म्हणून नगरांच्या बाहेर

उद्योग प्रवृत्ती वाढत असलेली दिसून येते. भारतातील नागरीकरणाच्या वाढीची मुख्य तीन कारणे असून ती पुढीलप्रमाणे आहेत.[१५]

### १.९.१ स्थलांतरण :

स्थलांतरण हा घटक लोकसंख्या विकेंद्रित करणारा घटक आहे; त्यामुळेच लोकसंख्या समान होते. म्हणूनच म्हटले जाते, की स्थलांतरण हे सांस्कृतिक, आचार-विचार, उत्पादन, सामाजिकता, तंत्रज्ञान, राजनैतिकता बदलणारे साधन आहे. आज जगामध्ये मुक्त अर्थव्यवस्थेचे वारे वाहत आहेत. त्यामुळे स्थलांतरण वाढत आहे. स्थलांतराची दिशा उपभोगाच्या उपलब्ध साधनांवर अवलंबून असते; त्यामुळे नागरीकरणामुळे एखाद्या प्रदेशात सतत स्थलांतरण होत असेल, तर आर्थिक विकासाचे लक्षण मानले जाते.

#### १.९.१.१ स्थलांतरण व गतिक्षमता :

लोकसंख्येची हालचाल विशिष्ट सीमेबाहेर कायम स्वरूपाची होत असेल, तर ते स्थलांतरण होय व लोकसंख्येची हालचाल विशिष्ट सीमेअंतर्गत तात्पुरत्या स्वरूपाची होत असेल तर तीस गतिक्षमता म्हटले जाते.

#### १.९.१.२ स्थलांतराची व्याख्या :

स्थलांतराच्या विविध व्याख्या पुढीलप्रमाणे करण्यात आल्या आहेत.

१) सामान्यपणे जेव्हा एखादी व्यक्ती एक देश सोडून दुसऱ्या देशात एक वर्ष वा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी जात असेल, तर त्याला स्थलांतरण म्हणतात.

२) एका विशिष्ट कालावधीत एका सीमाबद्ध घटक प्रदेशातील निवासस्थान सोडून त्या प्रदेशाच्या सीमापलीकडे दुसऱ्या घटक प्रदेशात वास्तव्यासाठी जाणे म्हणजे

स्थलांतरण होय.

३) संयुक्त राज्य अमेरिका ब्युरोच्या मते, जे लोक एक देश सोडून दुसऱ्या देशात जातात, त्यांचा समावेश स्थलांतरितांत केला जातो.

४) मंगल याच्या मते, " एका भौगोलिक स्थानातून दुसऱ्या भौगोलिक स्थानात कायम वास्तव्यासाठी हालचाल करणे व नवीन मूल्य स्वीकारणे म्हणजेच स्थलांतरण होय."

५) सामान्यपणे, रोजगारधारक त्याच्या स्वेच्छेने एका भौगोलिक स्थानातून दुसऱ्या भौगोलिक प्रदेशात सामाजिक, सांस्कृतिक वारसा बरोबर घेऊन रोजगाराच्या संधीसाठी हालचाल करतो, त्याला स्थलांतर म्हणतात.

या विविध व्याख्यांवरुन आपणाला स्थलांतरण म्हणजे असे म्हणता येईल, की जी व्यक्ती एका भौगोलिक प्रदेशातून दुसऱ्या भौगोलिक प्रदेशात, रोजगाराच्या संधीसाठी, शिक्षणासाठी, व्यवसायासाठी, वैवाहिक संबंधासाठी व नैसर्गिक आपत्तीमुळे कायम वास्तव्यासाठी सोबत आपला सांस्कृतिक, सामाजिक तंत्रज्ञानाचा वारसा घेऊन जाते व सांस्कृतिक तांत्रिक देवाण-घेवाण करून आपल्या जीवनमूल्यात बदल करते, याला स्थलांतरण म्हणता येईल.

**१.९.१.३ स्थलांतराची वैशिष्ट्ये :**

स्थलांतराच्या प्रश्नास स्पष्ट स्वरूप देण्यासाठी त्याची लक्षणे पाहणे आवश्यक आहे.

**१) सामाजिक परिवर्तन :**

स्थलांतराबरोबर संस्कृतीचे स्थलांतरण होत असल्यामुळे सामाजिक परिवर्तन

लवकर घडून येते.

२) **स्थलांतराचा उदय :**

बेकारी, दारिद्र्य, वेतनभिन्नता, आर्थिक मागासलेपण, लग्न, जातीयवाद, नैसर्गिक आपत्तीमुळे स्थलांतरण केले जाते.

३) स्थलांतरण ही लोकसंख्या समानतेची प्रक्रिया आहे.

४) फॅशन, राहणीमान, तंत्रज्ञान ही स्थलांतराची साधने आहेत.

५) स्थलांतरामुळे सामाजिक समस्या निर्माण होतात.

### १.९.१.४ स्थलांतराचे सिद्धांत :

स्थलांतराचे अनेक सिद्धांत विविध विचारवंतांनी मांडले आहेत. त्यांपैकी प्रमुख विचार पुढीलप्रमाणे आहे :

१) **लेविस :**

लेविसने आपल्या अमर्यादित श्रमपुरवठा या सिद्धांतात भांडवली व परंपरागत अशी दोन क्षेत्रे घेतली आहेत. परंपरागत क्षेत्रामध्ये श्रमपुरवठा अतिरिक्त असतो, त्यामुळे हा अतिरिक्त श्रमपुरवठा नागरी भागातील भांडवली क्षेत्रात स्थलांतरित केला, तर उत्पादनात वाढ होऊन जास्तीची भांडवल निर्मिती होईल. लेविसच्या मते, ''नागरी भागातील भांडवली क्षेत्रातील वेतनदार ग्रामीण भागातील प्राथमिक क्षेत्रातील वेतनदारापेक्षा ३०टक्क्यांनी वेतनदर जास्त असतो. त्यामुळे ग्रामीण मजूर नागरी भागाकडे स्थलांतरित होत आहेत.''

**१.९.१.५ तोडारोचे स्वरूप :**

हरीश तोडारोच्या मते, ''वेतनभिन्नता हेच ग्रामीण भागातून होणार स्थलांतराचे कारण नसून स्थलांतराची प्रमुख दोन कारणे आहेत.''

१) ग्रामीण व शहरी भागातील वास्तव उत्पन्नातील फरक,

२) नागरी भागात मिळणाऱ्या रोजगाराच्या संधी.

**१.९.२ अपसरण किंवा प्रत्याकर्षण घटक :**

जेव्हा मानवी गरजा एखाद्या प्रदेशात भागत नाहीत, तेव्हा त्याचे तेथे वास्तव्य अशक्य होते; त्यामुळे मानवावर बाह्य घटकांचा प्रभाव पडून तो मूळ वास्तव्यापासून स्थलांतरण करतो किंवा बेकारी, दारिद्र्य, आर्थिक मागासलेपणामुळे जेव्हा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरण केले जाते, तेव्हा त्याला अपसरण म्हणतात.

**१.१० संशोधनाचे उद्देश:**

१. उस्मानाबाद व सोलापूर शहरातील १९८१ नंतरच्या नागरीकरण प्रवृत्तींचा अभ्यास करणे.

२. उस्मानाबाद व सोलापूर शहरातील नागरीकरण प्रवृत्तींचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३. वाढत्या नागरीकरणामुळे उस्मानाबाद व सोलापूर शहरात निर्माण झालेल्या समस्यांचा अभ्यास करणे.

४. उस्मानाबाद व सोलापूर शहरात नागरीकरणामुळे स्थलांतरित झालेल्या नागरिकांच्या रोजगार व व्यवसायविषयक समस्यांचा अभ्यास करणे.

५. उस्मानाबाद व सोलापूर शहरातील नागरीकरणाच्या कारणांचा अभ्यास करणे.

## १.११ संशोधनाची गृहीतके:

१. नागरीकरणामुळे उस्मानाबाद व सोलापूर शहरात स्थलांतरित झालेल्या नागरिकांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली.

२. नागरीकरणामुळे उस्मानाबाद व सोलापूर जिल्हयांच्या दारिदयात घट झाली.

३. उस्मानाबाद व सोलापूर शहरात रोजगारासाठी मोठया प्रमाणात स्थलांतरण झाले.

## १.१२ संशोधन पद्धती:

संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम सामग्री पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. स्थलांतरीत नागरीकांच्या समस्या जाणुन घेण्यासाठी उस्मानाबाद शहरातील ५० व सोलापूर शहरातील ५० स्थलांतरीत नागरीकांच्या मुलाखती घेवून प्राथमिक सामग्री जमा करण्यात आली. दुय्यम सामग्रीसाठी जिल्हा जनगणना व जिल्हा नगरपालिका वार्षिक अहवालांचा मुख्य स्त्रोत म्हणून उपयोग करण्यात आला आहे. या अहवालांमधून दोन्ही जिल्ह्यांतील शहरीकरण प्रवृत्ती, दोन्ही जिल्ह्यांतील आर्थिक व सामाजिक वैशिष्ट्ये, नगरपालिकेची आर्थिक स्थिती व विविध सुविधांचा पुरवठा ही माहिती घेण्यात आली आहे. तसेच भारतीय जनगणनेने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या माहितीचा वापर करण्यात आला आहे. दोन्ही जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांतून पाणीपट्टीचे दर व शहरी दारिद्र्याची माहिती मिळविण्यात आली आहे, तर ग्रामीण दारिद्र्याच्या माहितीसाठी डी.आर.डी. संचालक कार्यालयातून माहिती संकलित करण्यात आली आहे. राष्ट्रीय शहरी आयोगाने वेळोवेळी प्रसिध्द केलेले अहवाल, जागतिक विकास अहवाल यांचाही वापर करण्यात आला आहे. त्याचबरोबर विविध

मासिके, पुस्तके, वर्तमानपत्रे यांमध्ये प्रसिध्द झालेल्या माहितीचे संकलन करून आलेख व तक्ते यांच्या साहाय्याने विश्लेषण करण्यात आले आहे. तालिका व आलेख पध्दतीचा अवलंब करूनही शहरीकरणाच्या प्रवृत्तीचा, कारणांचा व परिणामांचा अभ्यास करण्यात आला आहे. भविष्यकालीन लोकसंख्येचा अंदाज करण्यासाठी बीजगणितीय व सरासरी अशा दोन पध्दतींचा अवलंब करण्यात आला आहे. शहरी लोकसंख्येचा आकार व बिगरशेती क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण यांच्यातील संबंध अभ्यासण्यासाठी प्रतिपगमन विश्लेषणाच्या वापर करण्यात आला आहे. याचे सूत्र पुढील प्रमाणे होय.

$Y = a+bx$

Y = बिगर शेती क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण

X = लोकसंख्या (हजारात)

a = अंतरर्छेद

b = चढ

शहरीकरण व जलसिंचन सुविधा यांचा संबंध अभ्यासण्यासाठी स्थान सहसंबंध गुणकाचा अवलंब करण्यात आला आहे. याचे सूत्र पुढीलप्रमाणे होय.

$d^2$ = शहरीकरण व जलसिंचन स्थानातील पूरकाचा वर्ग होय.

N = तालुक्यांची संख्या

### १.१३ प्रकरणाची मांडणी:

प्रस्तुत अध्ययनाची सात प्रकरणांमध्ये मांडणी करण्यात आली आहे. पहिल्या प्रकरणामध्ये अभ्यास क्षेत्रातील शहरीकरणाच्या समस्या आर्थिक विकासामध्ये कशा कारणीभूत ठरत आहेत, त्याचे वर्णन केलेले आहे. त्याचबरोबर नागरीकरणाच्या संकल्पना, नागरिकरणाचे महत्त्व, नागरिकरणाची कारणे, स्थलांतर व स्थलांतराची

कारणे इत्यादी बाबींचा समावेश या प्रकरणात करण्यात आला आहे. तसेच प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे, गृहीतके, संशोधन पद्धती व प्रकरणाची मांडणीदेखील प्रस्तुत प्रकरणात समाविष्ट करण्यात आली आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये नागरीकरणाच्या संदर्भातील प्रादेशिक व राष्ट्रीय पातळीवरील संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात आलेला आहे.

तिसऱ्या प्रकरणात शहरीकरण प्रक्रिया, भारतातील शहरीकरणाची प्रवृत्ती, भारतातील लहान व मोठ्या शहरांतील शहरीकरणाची प्रवृत्ती, शहराच्या गटाची संकल्पना व शहरी लोकसंख्येतील दशवार्षीक बदल दर्शविण्यात आला आहे. राज्या-राज्यांतील शहरीकरण प्रवृत्ती, राज्यांमधील शहरी लोकसंख्येचा दशवार्षीक वृद्धीदर, भारतातील महानगरांतील शहरीकरणाची प्रवृत्ती, महाराष्ट्रातील शहरीकरण प्रवृत्ती व शहरांच्या आकारानुसार शहरीकरण प्रवृत्ती इत्यादी बाबींचा समावेश या प्रकरणामध्ये करण्यात आलेला आहे.

चौथ्या प्रकरणामध्ये उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येत शहरी लोकसंख्येचा वाटा, शहरनिहाय नागरी लोकसंख्येतील दशकीय वृद्धीदर, सरासरी वार्षिक वृद्धीदर, शहरीकरणातील शहरनिहाय वाटा, शहरांच्या आकारमानानुसार शहरीकरणाचा वाटा, उस्मानाबाद व सोलापूर शहरांच्या संख्येतील वाढ दर्शविण्यात आली आहे. तसेच शहरी लोकसंख्येचे व्यावसायिक वर्गीकरण, उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील शहरीकरणाची कारणे, स्थलांतर, शहराच्या हद्दी किंवा सीमा इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

पाचव्या प्रकरणामध्ये उस्मानाबाद व सोलापूर शहरातील नागरीकरणाच्या

समस्या याअंतर्गत शहरीकरणामुळे होणाऱ्या समस्या, घरांची समस्या, लोकसंख्या, दोन्ही जिल्ह्यातील शहरी भागातील घरांची स्थिती, शहरी भागातील घर-भाड्यांची समस्या, झोपडपट्टी अथवा गलीच्छ वस्ती समस्या इत्यादी बाबी घेण्यात आल्या आहेत. तसेच शहरी दारिद्र्य, लोकसंख्या, गर्दी, रस्त्यावरील वाहनांची संख्या, कचरा व टाकाऊ पदार्थांची समस्या, पाणीपुरवठा समस्या, शहरी भागातील पाणीपुरवठा समस्या, दोन्ही जिल्ह्यांच्या शहरी भागातील आरोग्य समस्या, पाणीपट्टीतील वृध्दी इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच प्राथमिक सामग्रीवर अधारीत माहितीचे विश्लेषण देखील याच प्रकरणात करण्यात आले आहे.

सहाव्या प्रकरणात संशोधनाचा सारांश, निष्कर्ष व शिफारशी करण्यात आलेल्या आहेत.

**संदर्भ:**


१. A.N. Agarwal (१९९३) : Indian Economy Problems of Development and Planning. Wiley Eastern Publishing Ltd; Delhi.

२. Jai Prakash (१९९४) : Agricultural Production in India (Flood Prone Areas under Risk), Radhu Publication, New Delhi.

३. S.A.R. Bicgrami (१९९६) : An Introduction to Agricultural Economics, Himalaya Publishing House Ltd, Bombay.

४. Bedabeti Mohanty (१९९७) : Employment perspective in Rural India, A.P.H. Publishing Corporation, Ansari Road,

Daryaganj, New Delhi.

५. तत्रैव.

६. वाघ राम (१९९३) : लोकसंख्याशास्त्र, न्यू रचना प्रकाशन, लातूर.

७. तत्रैव.

८. तत्रैव.

९. सुंदरम के.पी.एम., आणि रुद्रदत्त (१९९८) : भारतीय अर्थव्यवस्था, एस. चाँद आणि कम्पनी लि., रामनगर, नवी दिल्ली.

१०. तत्रैव.

११. तत्रैव.

१२. तत्रैव.

१३. कोलारकर शरद (१९९३) : प्राचीन भारताचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, श्री शांतीदुर्ग निवास, रामदास पेठ, नागपूर.

१४. दांडेकर व्ही. एम. समितीचा अहवाल (१९८४) : महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीचा अहवाल, महाराष्ट्र शासन

१५. जैन रंजना (१९९९) : लोकसंख्येचे अध्ययन, रिसर्च पब्लिकेशन हाऊस, जयपूर.

# प्रकरण - दुसरे
# संशोधन साहित्याचा आढावा

## २.१ प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणात नागरीकरणाच्या संदर्भातील विविध संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे. शहर वाढीच्या एकांगी प्रक्रियेमुळे एकीकडे शहरांची बेसुमार वाढ; तर दुसरीकडे खेड्यांची वाढती उपेक्षा असे चित्र निर्माण झाले आहे. नगर व खेडे यांतील सामाजिक व आर्थिक अंतर कमी न होता वाढत आहे. हा भेद कमी करणे इष्ट आहे हे निर्विवाद असून या संदर्भात प्रादेशिक नियोजन किती महत्वाचे आहे याची यावरून कल्पना येईल. राजा जयसिंग यांनी इ.स. १७२८ मध्ये वसविलेले नगर जयपूर ही नगररचना तत्त्वाची प्रतिमा आहे. आपल्या देशात नावीन्यपूर्ण घटना जी झाली, ती म्हणजे वसाहती राज्य स्थापनेनंतर झपाट्याने झालेले नगरीभवन. या प्रक्रियेत युरोपियन, विशेषतः इंग्रजी राजवटीत झालेली दळणवळणातील क्रांतिकारक वाढ आणि आधुनिक औद्योगिकीकरणाचा उगम या गोष्टी लक्षणीय आहेत. त्यामुळे दिल्ली, मुंबई, कोलकत्ता व चेन्नई ही नगरे म्हणजे विशालनगरे प्रदेश ठरले. या व अन्य वाढत्या नगरांच्या इतक्या समस्या, नंतरच्या काळात, निर्माण झाल्या की आपल्या देशात ७० टक्के लोक खेडेगावांत राहतात व भारत हा अजूनही ग्रामप्रधान देश आहे असे म्हटले जाते.

जॅकसन (१९७२)[१] यांनी लोकांची बदलत जाणारी स्थिती व समाजात होणारे बदल सांगून नागरीकरण स्पष्ट केले आहे. यांच्या मते, ‘‘नागरीकरण ही अशी प्रक्रिया आहे, की जीमुळे लोकांची स्थिती बदलून, समाजात अनेक बदल होतात.

नागरीकरणाचा अभ्यास स्थूल रूपात केला जातो; तर नगरांचा व नागरी घटनांचा अभ्यास सूक्ष्म पातळीवर केला जातो. त्याला नागरीकरण म्हणतात.''

चौधरी (१९८२)[२] यांनी ग्रामीण व नागरी भागातील भिन्नता विचारात घेतली व स्थलांतरण कसे वाढत चालले आहे, याविषयी आपले मत मांडले. यांच्या मते, ''नागरी भागातील व ग्रामीण भागातील वेतनातील भिन्नतेमुळे व नगरातील वाढत्या औद्योगिकीकरणामुळे ग्रामीण भागातून नागरी भागात रोजगारासाठी स्थलांतरण होत आहे. त्यामुळे भारतातील नागरीकरणाची प्रवृत्ती वाढत आहे.''

दांडेकर समिती (१९८४)[3] यांच्या मते, ''राज्य शासनाची कार्यालये पुणे, मुंबई व नागपूर येथे केंद्रित झाल्यामुळे विदर्भ व मराठवाडा यांना कमी प्रतिनिधित्व मिळाले आहे. त्यामुळे प्रादेशिक असमतोल वाढत आहे. म्हणून मुंबईहून नाशिकला, पुण्याहून औरंगाबादला, नागपूरहून अमरावतीला काही शासकीय कार्यालये हलवून काही प्रमाणात नागरीकरणातील व प्रोदशिक सेवांमधील असमतोल कमी करता येईल.''

पाटील व सहस्त्रबुध्दे (१९८४)[४] यांनी कोल्हापूर जिल्हयातील नागरीकरण व विकासाचा असमतोल याचा अभ्यास केला आहे. त्यांच्या मते, ''नागरीकरणामुळे विकासात असमतोल निर्माण झाला आहे. कोल्हापूर जिल्हयात १९८१ मध्ये करवीर व हातकणंगले तालुक्यांचे नागरीकरण अनुक्रमे ५६.४३ व २८.६२ टक्के झाले होते. कारण करवीर तालुक्यात कोल्हापूर व हातकणंगले तालुक्यात इचलकरंजी ही दोन औद्योगिक नगरे आहेत. त्यामुळे ३१ मार्च १९७९ रोजी करवीर व हातकणंगले तालुक्यात जिल्हयातील एकूण यंत्र उद्योगांपैकी (७६२) अनुक्रमे ६१८ व ९५ उद्योग

आहेत, तर जंगलावर आधारित जिल्हयातील एकूण (८५०) उद्योगांपैकी अनुक्रमे ३४७ व ३४६ उद्योग करवीर व हातकणंगले तालुक्यात होते. म्हणजेच ज्या तालुक्यांचे नागरीकरण कमी झाले आहे, तेथे औद्योगिकीकरण कमी झाले आहे. म्हणून नागरीकरणामुळे विकासात असमतोलपणा निर्माण झाला आहे.''

अत्रे (१९८४)[५] यांनी नागरीकरणाची प्रक्रिया व महाराष्ट्रातील नागरीकरणाची वैशिष्टये याचा अभ्यास केला आहे. त्यांनी महाराष्ट्रातील नागरीकरणाची एकांगी नागरी वसाहत, नगरांतील लोकसंख्येत वाढ, ग्रामीण स्थलांतराचे प्रमाण जास्त, घरांची टंचाई आणि औद्योगिक नगरांचा आर्थिक पाया ही वैशिष्टये सांगितली.

डांगे (१९८४)[६] यांनी महाराष्ट्रातील नागरीकरणवाढीच्या दिशा याचा अभ्यास केला आहे. त्यांच्या मते, ''१९८२ मध्ये महाराष्ट्रामध्ये २७६ नगरे होती. १९५१ मध्ये अ दर्जाची ७ नगरे होती. त्यात वाढ होऊन १९८१ मध्ये २५ नगरे झाली आहेत. १९७१-८१ या दशकात औरंगाबाद, ठाणे, उल्हासनगर, परभणी, लातूर, चंद्रपूर, नाशिक, इचलकरंजी, धुळे व नांदेड या १० नगरांमध्ये ५० टक्क्यापेक्षा जास्त लोकसंख्येत वाढ झाली आहे.'' म्हणजे महाराष्ट्रातील नागरीकरणाची दिशा 'अ' वर्ग नगराकडे झुकलेली दिसून आल्याचे त्यांनी नमूद केले

कोपर्डेकर (१९८६)[७] यांनी महाराष्ट्रातील नागरी विकासाच्या सामाजिक बाजूंचा अभ्यास करून नागरीकरणाविषयी मत मांडले. त्यांच्या मते, ''नगरांच्या विकासासाठी औद्योगिकीकरणाबरोबर शैक्षणिक व सामाजिक विकास आवश्यक आहे. तसेच नागरी भागात अन्नधान्यावरील खर्चात घट झाल्याचे दिसून आले आहे. नगरातील कुटुंबाचा ७५

टक्के खर्च भौतिक साधनांवर होत असल्याचे दिसून आले आहे.''

श्रीराम पेडगांवकर (१९८६)[८] यांनी नागरी दारिद्र्याचा (नांदेड शहराचा विशेष अभ्यास) अभ्यास केला आहे त्यांच्या मते, १९७१ मध्ये नांदेड नगरातील एकूण लोकसंख्येपैकी १६.०८ टक्के लोक झोपडपट्टीत राहत होते. यामध्ये नवबौध्द ३५.८१ टक्के हिंदू, SC/ST ३१.३० टक्के, मुस्लिम १७.२१ टक्के व इतर १५.६७ टक्के लोक होते. नांदेड नगरातील झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकसंख्येपैकी, झोपडीत ४३.८१ टक्के, कच्च्या घरात ४८.८९ टक्के व पक्क्या घरात ७.३० टक्के लोक राहत होते. झोपडपट्टीतील ६६.९ टक्के लोकांना विद्युत पुरवठा नाही, ६९.१८ टक्के लोकांना नळाचे पाणी नाही, ७१.४२ टक्के लोकांकडे स्वच्छतालये नव्हती. नांदेड नगरातील झोपडपट्टीतील लोकांचा प्रतिमहिना दरडोई सरासरी खर्च ९२.३२ रुपये आढळून आला, जो, की महाराष्ट्राच्या सरासरीपेक्षा फार कमी आहे.

कोपर्डेकर (१९८६)[९] यांनी उत्पन्न व गरिबी याचा अभ्यास करून नागरीकरण स्पष्ट केले आहे. यांच्या मते, नागपूर, पुणे, औरंगाबाद व नांदेड नगरात प्रत्येकी ५ टक्के, कुटुंबे उच्च दर्जाचे जीवन जगतात. नागपूर व पुणे नगरात प्रत्येकी १५ टक्के आणि औरंगाबाद व नांदेड नगरात प्रत्येकी १० टक्के कुटुंबे मध्यम दर्जाचे जीवन जगतात, तर पुणे ८० टक्के, नागपूर ८० टक्के, औरंगाबाद ८५ टक्के व नांदेड नगरात ८५ टक्के कुटुंबे निम्न दर्जाचे जीवन जगत असल्याचे दिसून आले आहे.

बालसुब्रमण्यम (१९८८)[१०] यांनी औरंगाबाद नगराच्या भविष्यकालीन लोकसंख्येच्या अंदाजाचा अभ्यास केला. त्यांच्या मते, औरंगाबाद नगरातील लोकसंख्या, ग्रामीण घटकामुळे जास्त वाढली आहे. औरंगाबाद नगराचा

लोकसंख्यावाढीचा दर १९७१-८१ या दशकात वार्षिक ७ टक्के आहे. महाराष्ट्रातील नगरांची लोकसंख्या वार्षिक ३ टक्के दराने वाढली आहे. महाराष्ट्रातील एक लाख लोकसंख्या असणाऱ्या नगरांतील लोकसंख्यावाढीच्या दरापेक्षा औरंगाबाद नगराचा लोकसंख्यावाढीचा दर जास्त आढळून आला आहे. औद्योगिकीकरण वाढत असल्यामुळे १९८१-८६ या काळात औरंगाबाद नगराचा लोकसंख्यावाढीचा दर वार्षिक ६.५० टक्के होता; तो १९९६-२००१ या काळात १.२ टक्के होता; त्यामुळे २००१ मध्ये औरंगाबाद नगराची लोकसंख्या ७.७ लाख होईल, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला. एकंदरीत औरंगाबाद नगराचा भविष्यकालीन लोकसंख्यावाढीचा दर घटेल, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला होता.

रामचंद्रम (१९८९)[११] यांनी नगराची विकासप्रक्रिया लक्षात घेतली आहे. त्यांच्या मते, भारतामध्ये मोठया नगरांमध्ये शैक्षणिक विकास, औद्योगिक विकास, व्यावसायिक, सामाजिक व राजकीय विकास जास्त झाल्यामुळे लहान नगरांमधून व ग्रामीण भागातून अनेक लोक रोजगारासाठी, शिक्षणासाठी, व्यवसायासाठी स्थलांतरित झालेले आहेत. त्यामुळे मोठया नगरांची नागरीकरण प्रव्रत्ती वाढली आहे.

चौधरी (१९९३)[१२] यांनी नगराविषयी अभ्यास करत असताना लहान नगर व मोठया नगरातील प्रवृत्ती स्पष्ट करून सांगितली. यांच्या मते, भारतामध्ये मोठया नगरांची नागरीकरण प्रवृत्ती लहान नगरांपेक्षा जास्त आढळून आली आहे. कारण मोठया नगरामध्ये रोजगाराच्या संधी जास्त उपलब्ध असल्यामुळे एकूण वाढीव लोकसंख्येपैकी ५० टक्के लोकसंख्या ‘अ’ दर्जाच्या नगरात स्थलांतरित होत आहे. तसेच नगरामधील नैसर्गिक लोकसंख्यावाढ जास्त असल्यामुळेही नागरीकरण प्रवृत्ती

वाढत आहे.

कुंदु (१९९५)[१३] यांनी आपल्या लेखात भारतातील दारिद्रय निर्मुलनाच्या संदर्भात स्थलांतरण आणि नागरीकरणाचे विश्लेषन केले आहे. आर्थिक परिस्थीतीत सुधारणा करण्याच्या हेतूने शहरातील नागरी वस्तीत वाढ झाली आहे. सर्व प्रकारच्या नागरी भागातील नागरीकांची गरीब बनण्याची संभाव्यता ग्रामीण भागातील नागरीकांपेक्षा कमी आहे. मोठया शहरांमध्ये दारिद्रय कमी आहे परंतु अवाजवी स्थलांतरण व रोजगारात मोठी भिन्नता आहे. दारिद्रय निर्मुलनात भारतातील मोठया शहरांचा सहभाग अधिक आहे. अलिकडील काळात गरीबांना सामावून घेण्याची मोठया शहरांची क्षमता कमी झाली आहे. मोठया शहरातील उद्योग आणि व्यापारी क्षेत्र कृषी क्षेत्रातील अतिरिक्त नागरीकांना सामावून घेण्यास मदत करीत आहेत. नागरीकरणाच्या वाढासाठी आर्थिकदृष्टया मागास राज्यांना विशेष आर्थिक मदत करण्याची गरज आहे. विशेषत: लहान व मध्यम आकाराच्या शहरांतील भांडवली प्रकल्पांना आर्थिक मदत करणे आवश्यक आहे. यामुळे नागरीकरणाच्या विकासासाठी आवश्यक संसाधने विकसित होण्यास मदत होईल. नागरी भागातील गरीब व्यक्तींना पायाभुत सुविधा पुरविण्यासाठी लहान व मध्यम शहरांत गुंतवणुक करणे फायदेशीर ठरेल.

पवार (२००१)[१४] यांनी महाराष्ट्र नगरपालिका कायदा १९६५-नुसार मराठवाडयातील नगरपालिंकांनी पार पाडावयाची कर्तव्ये याचा अभ्यास केला आहे. त्यांनी असा निष्कर्ष मांडला, की मराठवाडयातील ९२ टक्के नगरपालिकांनी शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली नाही. मराठवाडयातील ‘क’ वर्ग नगरपालिकेत रस्त्यांची लांबी १५ ते २० कि.मी. ते ८० ते १०० कि.मी. रस्त्याची लांबी दिसून आली आहे. दवाखाने

चालवण्यात नांदेड नगरपालिका अग्रेसर दिसून आली आहे. तसेच मराठवाडयातील नगरपालिकांची करवसुली ५० ते ६० टक्के असल्याचे दिसून आले आहे.

देवगिरीकर (२००१)[१५] यांनी मराठवाडयातील नागरीकरण प्रवृत्तीचा अभ्यास केला आहे. त्यांना १९०१ ते १९८० या काळात मराठवाडयातील नगरांची संख्या १४० टक्क्यांनी वाढलेली आढळून आली आहे; तर मराठवाडयातील नगरांची संख्या ४० टक्क्यांनी वाढलेली आढळून आली आहे. मराठवाडयातील जिल्हानिहाय नागरीकरण पाहिले असता, १९५१-८१ या काळात औरंगाबाद १४.१३ टक्क्यांवरुन २२.०९ टक्के, नांदेड १५.६१ टक्क्यांवरुन १८.९० टक्के, परभणी १५.३७ टक्क्यांवरुन १९.७४ टक्के, उस्मानाबाद १३.१४ टक्क्यांवरुन १५.३९ आणि बीड १०.४७ टक्क्यांवरुन १५.४६ टक्क्यांपर्यंत नागरीकरण झाल्याचे दिसून येते. १९८१ मध्ये सर्वांत कमी नागरीकरण उस्मानाबाद जिल्हयाचे राहिले आहे.

ढाकणे (२००१)[१६] यांनी महाराष्ट्रातील व्यापारी बाजारपेठा व नागरीकरण याचा अभ्यास केला आहे. त्यांच्या मते, ''महाराष्ट्रातील नागरीकरणाच्या विविध कारणांपैकी व्यापारातील वाढीमुळे निर्माण झालेले नागरीकरण हे एक कारण आहे.'' महाराष्ट्रातील ग्रामीण भागात ब्रिटिशांच्या धोरणामुळे कच्चा माल खरेदीसाठी बाजारपेठा निर्माण झाल्या. कालांतराने या बाजारपेठांचे रूपांतर नगरात होऊ लागले, ही नगरे शिक्षण व लघुउद्योग केंद्रे बनली. यामुळे ग्रामीण भागातील अनेक लोक रोजगारासाठी नगराकडे स्थलांतरित झाले. म्हणूनच मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, इचलकरंजी, सोलापूर, निफाड, लासलगाव या नगरांना व्यापारी नगरे म्हणून दर्जा मिळाला.

दत्ता (२००६)[१७] यांनी आपल्या लेखात भारतातील नागरीकरणाचे विश्लेषन केले

आहे. त्यांनी सन १९०१ ते २००१ च्या जनगणनेच्या आधारे भारतातील नागरीकरणाचे विश्लेषन केले आहे. त्यांनी भारतातील नागरीकरणाची पध्दती, नागरीकरणाच्या समस्या व नागरीकरणा संदर्भातील शासकीय धोरणांवर प्रकाश टाकला आहे. सध्या देशातील मोठया शहरांमध्ये रोजगार निर्मिती करणे आणि वाढती गर्दी सामावून घेण्याची क्षमता राहिलेली नाही. नेमकेपणाने शहरांचा विकास करण्यासाठी नागरी पायाभूत सुविधा निर्माण योजना व विकास आणि पुनःर्वापर योजनांचा प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. तसेच मोठया शहरांवरील वाढता ताण कमी करण्यासाठी नवीन छोटया-छोटया शहरांच्या विकासासाठी योजना तयार करणे आवश्यक आहे.

कुंदु (२०११)[१८] यांनी आपल्या लेखात भारतातील नागरीकरणाची प्रवृती आणि प्रक्रीया यावर प्रकाश टाकला आहे. अलीकडील गेल्या काही दशकात भारतातील नागरी लोसंख्येत लक्षणीय वाढ झाली आहे; परंतु लोकसंख्या वाढीत कमी-अधिकपणा देखील आहे. आशिया भविष्यकालीन नागरीकरणाचे प्रमुख केंद्र असेल व अधिकच्या लोसंख्येमुळे आशियातील नागरीकरणात भारताची भूमिक महत्वाची असेल. ग्रामीण-शहरी स्थलांतरणाबाबत नियोजनकर्त्यांची नकारात्म भूमिका भारतातील वाढत्या नागरीकरणासाठी कारणीभूत आहे. विविध तज्ज्ञ समित्या आणि अंतरराष्ट्रीय सांखिकिय एजन्शींच्या अंदाजाप्रमाणे जगात अती नागरी वाढ होणार असुन त्यावर आळा घालण्यासाठी शासकिय धोरणात सकारात्मक बदल करुण नवील लहान-लहान नागरी केंद्रांना प्रोत्साहन देऊन त्यांची जास्तीत जास्त वाढ करणे आवश्यक आहे. मोठी शहरे स्वतःचा विकास करीत असून ती गुंतवणुकदारांना आकर्षीत करण्यास सक्षम आहेत. नागरी वृध्दी विकसीत राज्य, विभाग व शहरांमध्ये केंद्रीत होत आहे. छोटी

शहरे जागतिक गुंतवणुकदारांना आकर्षीत करण्यास कमी पडत आहेत तर मोठी शहरे स्वतःच्या प्रकल्पांद्वारे पायाभूत सुविधा निर्माण करुण जागतिक गुंतवणुकदारांना आकर्षीत करीत आहेत.

भगत (२०११)[१९] यांनी नवीन नागरीकरण पध्दतीचे अध्ययन केले आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील नागरीकरण अपेक्षेपेक्षा जास्त वाढले आहे. सन १९८० ते १९९० या दशकात भारतातील नागरी लोकसंख्या कमी झाली आहे. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा देशातील नागरी लोकसंख्येत ग्रामीण लोकसंख्येपेक्षा जास्त वाढ झाल्याचे दिसते. भारतातील नागरी लोकसंख्या सन १९८० ते १९९० या दशकात कमी झाली तर सन २००१ ते २०११ या दशकात मोठी वाढ झाली आहे. भारतातील नागरी लोकसंख्या सन २००१ मध्ये २८.६ लाख एवढी होती ती सन २०११ मध्ये ३७.७ लाखापर्यंत वाढली. या दशकातील निव्वळ वाढ ९.१ लाख एवढी आहे.

त्रिपाठी (२०१३)[२०] यांनी नागरीकरण, नागरी आर्थिक विकास आणि नागरी समानता या विषयावरील लेख प्रकाशित केला. संशोधनाचा महत्वाचा हेतू भारतातील नागरीकरणाची प्रवृत्ती, नागरी दारिद्र्य आणि असमानतेचे विश्लेषन करणे हा होता. त्यांनी आपल्या या लेखात भारतातील नागरीविकास योजना व नागरीकरण कार्यक्रम यावरही प्रकाश टाकला आहे. त्यांच्या मते नागरीकरणामुळे देशात उच्च आर्थिक विकास व दारिद्र्य कमी होण्यास मदत झाली परंतु विषमतेत वाढ झाली. भारतातील क्रमांक एकच्या शहरांमध्ये नागरीविकास मोठया प्रमाणात झाला आहे. भारतात गेल्या काही दशकात शहरांच्या आजुबाजुच्या परीसरात नागरी लोकसंख्या वाढली आहे. शहरी उत्पन्नामध्ये सेवा क्षेत्राचा हिस्सा इतर क्षेत्रांच्या तुलनेत जास्त आहे. सेवा

क्षेत्रातील वित्त, विमा, स्थावरमालमत्ता व व्यवसाय इत्यादिंचा नागरी उत्पन्नात मोठा हिस्सा आहे. देशांतर्गत घरगुती उत्पादनापेक्षा नागरी घरगुती उत्पादनवाढीचा दर जास्त असल्याचे त्यांनी नमुद केले आहे. अभ्यास कालवधित उच्च उत्पन्न असलेल्या ३० टक्के नागरीकांचा खर्च आणि अल्प उत्पन्न असलेल्या नागरीकांचा खर्च जवळपास सारखाच असल्याचे मत त्यांनी नोदविले आहे. विविध नागरी विकास योजनांद्वारे नागरी पायाभुत सुविधा विकसित करुण भारतातील नागरीकरणाला चालना देण्यात आली.

चंद्रशेखर आणि शर्मा (२०१४)[२१] यांनी भारतातील नागरीकरण आणि विशेष अंतर्गत स्थलांतरण पद्धतीचे अध्ययन केले आहे. सन २००१ मध्ये भारतातील नागरीकरणाची पातळी ३१.१६ टक्के एवढी असुन भारत जगातील प्रमुख दहा देशांमध्ये सर्वात खालच्या स्थानावर आहे. भारतातील रोजगार विरहीत विकासामुळे स्थलांतरणात वाढ झाली आहे. भारतात ग्रामीण-ग्रामीण स्थलांतरण असले तरी ग्रामीण शहरी स्थलांतरण मोठया प्रमाणात आहे. भारतात अल्प कालावधिचे स्थलांतरण अधिक असुन परतीचे स्थलांतरणही वाढल आहे. सर्वेक्षनावरुण स्पष्ट होते की कार्यालयीन आकडेवारीपेक्षा भारतातील नागरीकरण जास्त आहे. सन १९०१ ते २००१ या कालावधिच्या तुलनेत सन २००१ ते २०११ या काळात मोठया शहरांमधील नागरी लोकसंख्येचे प्रमाण कमी झाले आहे.

**सारांश :**

वाढत्या औद्योगिकीकरण, व्यावसायिकीकरण व नगरातील गर्दीमुळे नगरे विस्तारून महसुली खेडी व ग्रामीण भूमी नगरामध्ये विलीन होऊन घटत आहेत. नगरामध्ये मोकळया जागा शिल्लक नसल्यामुळे नवीन उद्योग, घरे, शाळा,

महाविद्यालये, हॉटेल्स, दुरुस्ती सेवा केंद्र, शासकीय व प्रशासकीय कार्यालये नगराच्या बाहेर निर्माण होत आहेत. त्यामुळे नगरपालिका हद्द वाढून ग्रामीण भूमी घटत आहे. त्यामुळे नागरीकरणाला गती आली आहे. वरील सर्व अभ्यासावरून नागरीकरणावरील अभ्यासाचे सिंहावलोकन केल्यास असे लक्षात येते, की नागरिकीकरणामुळे लोकांचे जीवनमान सुधारले, कृषी क्षेत्रावरील भार कमी होतो; परंतु नगरीय समस्याही निर्माण होतात.

फार अल्पप्रमाणात महाराष्ट्र राज्यस्तरावर व विभागीय स्तरावर स्थलांतरित नागरिकांचे अध्ययन करण्यात आले आहे. उस्मानाबाद व सोलापूर शहराचे १९८१ नंतरचे नागरीकरण यासंदर्भात कोणत्याही प्रकारचा अभ्यास सर्वसाधारणपणे महाराष्ट्रात व विशेषत: उस्मानाबाद व सोलापूर जिल्हयात झालेला नाही. नागरीकरणाच्या अध्ययनामधील हे अंतर या संशोधनामुळे निश्चितच दूर होईल.

**संदर्भ:**


१. Jackson J. ( १९७२) : Urban and Regional Studies No. ३ The Urban Future, George Allen and Unwin Ltd, at the alden perss, Oxford.

२. P. L. Choudhari (१९८२) : Podities and Administrative of slums in Poona city, Ph. D. Thesis, Poona University, Pune.

३. दांडेकर व्ही. एम. समितीचा अहवाल (१९८४) : महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीचा अहवाल, महाराष्ट्र शासन.

४. पाटील ज. फा. व सहस्त्रबुध्दे (१९८४) : शहरीकरण व जिल्हयातील असमतोल: एक अभ्यास, शोधनिबंध, मराठी अर्थशास्त्र परिषद, डिसेंबर १९८४.

५. अत्रे मा. ल. (१९८४) : शहरीकरण प्रक्रिया-समस्या आणि उपाय, शोधनिबंध मराठी अर्थशास्त्र, परिषद, डिसेंबर १९८४.

६. डांगे प्र. अ. (१९८४) : महाराष्ट्रातील शहरीकरण वाढीच्या दिशा, शोधनिबंध, मराठी अर्थशास्त्र परिषद, डिसेंबर १९८४.

७. Kopardekar H. D. (१९८६) : Social Aspects of Urban Development, Bombay Popular Prakashan, Bombay.

८. Pedgonkar S. L. (१९८६) : Urban poverty (A CCcase Study of Nanded), Ph. D. Thesis, Dr. B. A. M. U., Aurangabad.

९. Kopardekar H. D. (१९८६) : Social Aspects of Urban Development, Bombay popular Prakashan, Bombay.

१०. Balasubramanian K. (१९८८) : Population projection for Aurangabad Municipal Corporation १९८१-२००१, Artha Vijnana Journal of the Gokhale Institute of Politics & Economics, vol-xxx, No-१, Pune.

११. Ramchandram R. (१९८९) : Urbanization and Urban System in India, Oxford University press, Bombay.

१२. choudhary J. R. (१९९३) : migration and Remittance Inter Urban Linkages, Sage Publications (India) Ltd. Block Market, New Delhi.

१३. Kundu A. (१९९५) : Migration and Urbanisation in India in the Context of Poverty Alleviation, root cause of migration especially those related to poverty, United Nations १९९५ Population and Development vol. १.

१४. पवार दे. भि. (२००१) : महाराष्ट्र नगरपालिका कायदा १९६५, मराठवाडा २००१, खंड -२.

१५. देवगिरीकर अ. ब. (२००१) : मराठवाडयातील नागरीकरण प्रवृत्ती, मराठवाडा २००१, खंड -२.

१६. ढाकणे भ. क. (२००१) : महाराष्ट्रातील व्यापारी बाजारपेठा व नागरीकरण, मराठवाडा २००१, खंड -२.

१७. Datta Pranati (२००६) : Urbanization in India, Population Studies Unit, Indian Statistical Institute, Kolkata.

१८. Kundu A. (१९९५) : Migration and Urbanisation in India in the Context of Poverty Alleviation, root cause of migration especially those related to poverty, United Nations १९९५ Population and Development vol. १.

१९. Bhagat R. B.(२०११) : Emerging Pattern of Urbanisation in India, vol xlvI no. ३४, Economic & Political Weekly, August, २०.

२०. Tripathi (२०१३) : An overview of Indias Urbanization, Urban Economic Growth and Urban Equity, Institute for Social and Economic Change, Banglore.

२१. Chandrasekhar S. and Sharma A. (२०१४) : Urbanization and Spatial Pattern of Internal Migration in India, Indira Gandhi Institute of Development Research.

# प्रकरण - तिसरे

# भारतातील नागरीकरण

## ३.१ प्रस्तावना :

श्री ज्ञानेश्वरांची तेराव्या शतकातील ही उक्ती सध्याच्या एकंदर परिस्थितीचा विचार करता कितपत यथार्थ होईल याबद्दल शंका वाटावी. नगरात वस्ती करून राहिलेला मनुष्य शहाणा व समंजस होतो. नगरामुळे संस्कृतीची वाढ होते व आर्थिक प्रगती होते, हे प्राचीन काळातील मोहेंजोदाडो, हडप्पा, ऊर, बॅबिलॉन, ग्रीसमधील अथेन्स, स्पार्टा व भारतातील गुप्त साम्राज्यात राजधान्यांची वाढ व त्यांनी निर्माण केलेल्या संस्कृती पाहता प्रत्ययास येते. Civilization हा शब्द Civitas (शहर) या शब्दापासून उत्पन्न झाल्याने मानवी संस्कृती निर्माण करण्यात नगरांचा मोठा वाटा आहे. तथापि, आजकालची महानगरे व शहरे मानवी जीवन समृध्द करीत आहेत, की निकृष्टावस्थेत नेत आहेत, हा प्रश्न विचारवंतांना भेडसावीत आहे. मुंबई, कोलकत्ता, मद्रास अशा महानगरामधील विलक्षण दाटी, वाहतुकीची ओढाताण, शुध्द हवा व निवास यांसारख्या मूलभूत गरजा भागविताना येणाऱ्या अडचणी, बेकारांचे तांडे, झोपडपट्या या सर्व गोष्टी पाहिल्या व अनुभवल्या तर शहरामुळे आर्थिक समृध्दी येते व संस्कृतीची देवाण-घेवाण होते, असे म्हणणे धाडसाचे ठरेल.[१]

आजकालच्या नगरामध्ये खऱ्या अर्थाने नागरिकता अभावानेच आढळते. परस्परांच्या सहकार्याने जीवन व्यतीत करण्याऐवजी जो तो आपल्या जीवनातील आजचा दिवस कसा जाईल याच व्यक्तिगत काळजीने ग्रासलेला आढळतो. सुदैवाने नोकरी असली तरी राहण्याच्या जागेचा प्रश्न अनेकांना भेडसावीत असतो आणि जे

फुटपाथवरच दिवस काढतात, त्यांना रोजगार उपलब्ध नसतो. अनेक कुटुंबातील गृहिणींना नोकरी करणे अपरिहार्य ठरते. त्यांना कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडणे अशक्य होते. घरी मुलांकडे लक्ष पुरविता येत नाही. त्यांच्यावर सुसंस्कार करण्यासाठी वेळ मिळत नाही. सामाजिक अलिप्तपणा एवढा निर्माण होतो, की एकमेकांच्या शेजारी फ्लॅट मध्ये राहणाऱ्यांची वर्षानुवर्षे ओळख नसते. संघर्ष व तणाव तर लोकांच्या पाचवीला पुजलेले असतात. बससाठी, तिकिटासाठी, रेशनसाठी लांबच-लांब रांगा लावाव्या लागतात. पाण्याच्या नळाशी भांडणे तर नित्याची, मग ती झोपडपट्टीत असोत वा चाळीत असोत. चोऱ्या, मारामाऱ्या, जुगार, वेश्याव्यवसाय यांसारखे समाजविघातक प्रकारसुध्दा प्रामुख्याने नगरातून आढळून येतात. अशा नागरी पर्यावरणात मानव जातीचा विकास होत आहे, की विनाश होत आहे याचा विचार जरूर व्हावयास व्हावा.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ६० वर्षे लोटली तरी ग्रामीण लोकांची शहराकडे वळण्याची ओढ कमी न होता, बळावतच आहे. याचे मुख्य कारण म्हणजे ग्रामीण भागातील खडतर व कष्टप्रद परिस्थिती व अनेकविध समस्या व शहरी जीवनाबद्दल ग्रामीण जनतेने कल्पिलेले सौख्य... खेड्यात कमी काम करून चतकोर भाकरी मिळणे मुश्कील वाटणाऱ्या खेडुताला शहरात गेले तर नोकरी मिळेल ही आशा सतत भुलवीत आहे. शिवाय तुलनेने सुखाची राहणी, सिनेमा, हॉटेल यांसारख्या सुखसोयींचे प्रलोभन, अशा अनेक कारणांमुळे ग्रामीण जनतेला शहराची ओढ लागते. शहरात आल्यानंतर मात्र लवकरच त्यांना वस्तुस्थितीची कल्पना येते व शहरातील तथाकथित सुखी राहणीबद्दल भ्रमनिरास होतो. शहरात नोकरी मिळत नाही. निवाराही लाभत

नाही. पोटापुरते अन्न मिळणेही मुश्कील माणसांमाणसांतील आटलेला जिव्हाळा, या साऱ्यांची झळ लागल्यानंतर नागरी जीवन सुखाचे नसून तेही कष्टदायी आहे. याबद्दल त्यांची खात्री पटते. शहरांच्या मृगजळामागे लागून तेथे आलेली माणसे वैफल्यग्रस्त व एकप्रकारे आधार तुटल्यासारखी बनली तर नवल नाही. अर्थात या समस्या केवळ भारतीय जीवनापुरत्याच नसून जगाच्या इतर भागांतही त्या तशाच आहेत, याची जाणीव ठेवली पाहिजे. या दृष्टिकोनातून जगातील निरनिराळ्या प्रदेशांमध्ये नागरीकरणाची प्रक्रिया कशी पार पडली, याचा मागोवा घेणे उपयुक्त ठरेल.

### ३.२ आंतरराष्ट्रीय पातळीवरील नागरीकरण :

मानवी जीवनाच्या आतापर्यंतच्या इतिहासात नगराची संकल्पना अस्तित्वात होती; मात्र नागरीकरण १९ व्या शतकापासून गतिमान झालेले दिसून येते. जगामध्ये अनेक राष्ट्रे पाश्चात्त्य साम्राज्यापासून मुक्त झाली. त्याच वेळेस वाफेच्या इंजिनाचा शोध लागला आणि औद्योगिक क्रांती घडून आली. त्यामुळे यंत्रोत्पादन सुरू झाले आणि अनेक कारखाने शहरी भागामध्ये निर्माण झाले. त्यामुळे आजूबाजूच्या परिसरातील, ग्रामीण भागातील लोक नगरांमध्ये रोजगारासाठी, व्यवसायासाठी स्थलांतरित झाले म्हणून नागरीकरण प्रवृत्तीस सुरूवात झाली.[२]

जगामध्ये ज्या देशांनी औद्योगिकीकरणाची कास सुरुवातीपासून धरली आहे. त्या देशांचे नागरीकरण जास्त झालेले आहे व विकसनशील देशांनी औद्योगिकीकरणास सुरुवात उशिरा केल्यामुळे नागरीकरण कमी झालेले आहे. वाढत्या यांत्रिकीकरणामुळे विकसित देशांतील नागरीकरण अंतिम टप्प्यात जाऊन पोहचले आहे; तर विकसनशील देशांमधील नागरीकरण प्रवृत्ती हळूहळू वाढत आहे. कारण यांत्रिकीकरणाचा अवलंब

उशिरा केला आहे; तरी परंतु आज विकसनशील देशांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे औद्योगिकीकरणाने जोर धरला आहे म्हणून नागरीकरण प्रवृत्ती वाढत आहे.

सन १९०१ मध्ये जगातील विकसित देशांमध्ये सरासरी ३० टक्के नागरीकरण झालेले होते; तर भारतात ११ टक्के नागरीकरण झालेले होते. सन १९९१ मध्ये विकसित देशांचे ७५ ते ८० टक्के नागरीकरण झालेले आहे; तर भारताचे २६ टक्के व विकसनशील देशांचे २५ ते ३० टक्के झालेले होते. जगामध्ये नागरी लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा चीन, रशिया व अमेरिकेनंतर चौथा क्रमांक लागतो. तक्ता क्र. ३.१ मध्ये विकसित व विकसनशील देशांतील नागरीकरण दर्शविण्यात आले आहे.

तक्ता क्र. ३.१ वरून असे स्पष्ट होते, की युरोप कालखंडातील नागरी लोकसंख्या सन १९२० मध्ये ३४.७ टक्के; तर सन २००० मध्ये ५५ टक्के होती. याच कालखंडात कमी विकसित देशातील शहरी लोकसंख्या सन १९२० मध्ये ६.७ टक्के होती; तर सन २००० पर्यंत ३१.२ टक्क्यांपर्यंत वाढली.

### ३.३ निवडक देशांतील नागरीकरणाची पातळी:

तक्ता क्र. ३.२ मध्ये निवडक देशांतील नागरीकरणाची पातळी दर्शविण्यात आली आहे. तक्ता क्र. ३.२ वरुन असे स्पष्ट होते, की पाकिस्तान, चीन या शेजारी राष्ट्रांतील नागरीकरण भारतापेक्षा जास्त झालेले आहे. अमेरिका, रशिया, ऑस्ट्रेलिया, जपान या राष्ट्रांपेक्षा भारतातील नागरीकरणाची पातळी अतिशय खालच्या पातळीवर आहे हे स्पष्ट होते. जगातील नागरीकरणाची टक्केवारी ४५ असून जगात सर्वाधिक नागरीकरण ८५ टक्के ऑस्ट्रेलिया, त्यानंतर ७७ टक्के जपान, ७५ टक्के अमेरिका, ७३

टक्के युरोप; तर भारतात केवळ २६ टक्के नागरीकरण झाले आहे.

**तक्ता क्र. ३.१ विकसित व विकसनशील देशांतील नागरीकरण**

| वर्ष | नागरी भागात राहणारी लोकसंख्या (टक्केवारीत) | | नागरीकरणाचा सरासरी वार्षिक वृध्दीदर (टक्केवारीत) | |
|---|---|---|---|---|
| | युरोप | कमी विकसित देश | युरोप | कमी विकसित देश |
| १९२० | ३४.७ | ६.७ | ०.६ | १.६ |
| १९३० | ३७.२ | ७.८ | ०.७ | १.६ |
| १९४० | ३९.५ | ९.७ | ०.६ | २.२ |
| १९५० | ४०.७ | १२.९ | ०.३ | २.९ |
| १९६० | ४४.२ | १६.७ | ०.८ | २.६ |
| १९७० | ४७.१ | १९.७ | ०.६ | १.६ |
| १९८० | ४९.५ | २३.२ | ०.५ | १.६ |
| २००० | ५५.० | ३१.२ | ०.५ | ०.८ |
| सरासरी | ४३.३९ | १५.९९ | ०.५८ | १.८६ |

स्त्रोत : Giriraj Gupta, Main Currents in Indian Sociology Urban India, Vol. VI, P-७४.

## ३.४ भारतातील नागरीकरणाची प्रवृत्ती :

१९ व्या शतकात औद्योगिकीकरण व नागरीकरण लग्नाचे जोडपे मानले जात होते; परंतु आज औद्योगिकीकरणाबरोबर इतर घटकही नागरीकरणास कारणीभूत आहेत. जगातील औद्योगिकदृष्ट्या मागास देशांमध्येही चांगले नागरीकरण झालेले आहे. भारतामध्ये सन १९०१ ते १९९१ या कालखंडात प्रतिवर्ष २.४ टक्के दराने नागरीकरण वाढले आहे. भारतामध्ये खऱ्या अर्थाने १९०१ पासून नागरीकरणास

सुरुवात झाली आहे. भारतामध्ये मागील ४० वर्षांच्या कालखंडात लहान नगरांपेक्षा मोठ्या नगरांची नागरीकरण प्रवृत्ती जास्त वाढली आहे.[३]

भारतीय नागरीकरणाच्या बाबतीत काही विचारवंतांनी पुढीलप्रमाणे मते मांडली आहेत.

**१) किंगस्टले डेव्हिस :**

भारतामध्ये नवीन औद्योगिकीकरण होत असल्यामुळे नवीन तंत्रज्ञानात बदल होऊन मनुष्याचे जीवन बदलत आहे. पर्यायानेच सामाजिक जीवनही बदलले जात आहे.[४]

**तक्ता क्र. ३.२ निवडक देशांतील नागरीकरणाची पातळी (वर्ष १९९०, टक्केवारीत)**

| देश | नागरिकरणाची टक्केवारी | देश | नागरिकरणाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| जग | ४५ | ऑस्ट्रेलिया | ८५ |
| लॅटिन अमेरिका | ७२ | यू.एस.एस.आर. | ६६ |
| दक्षिण अमेरिका | ७५ | पाकिस्तान | ३२ |
| चीन | ३९ | बांग्लादेश | १८ |
| जपान | ७७ | श्रीलंका | २१ |
| युरोप | ७३ | भारत | २६ |

**स्त्रोत : Census of India १९९१, Series-१, Paper-२, P-१४.**

**२) जॉन्स - ओफोरी आप्टा :**

भारतीय नागरीकरण राजकारणामुळेही वाढत आहे. ज्या ठिकाणी राजकीय नेता खंबीर भेटला, त्या ठिकाणचे औद्योगिकीकरण होऊन रोजगारांमध्ये वाढ होत आहे; म्हणून भारतीय नागरीकरण प्रवृत्ती वाढत आहे.

**३) पी. एल. चौधरी (१९८२) :**

नागरी भागातील व ग्रामीण भागातील वेतनातील भिन्नतेमुळे व नगरातील वाढत्या औद्योगिकीकरणामुळे ग्रामीण भागातून नागरी भागात रोजगारासाठी स्थलांतरण होत आहे. त्यामुळे भारतातील नागरीकरणाची प्रवृत्ती वाढत आहे.[५]

**४) जयश्री रॉय चौधरी (१९९३) :**

भारतामध्ये मोठ्या नगरांची नागरीकरण प्रवृत्ती लहान नगरांपेक्षा जास्त आढळून आली आहे. कारण मोठ्या नगरांमध्ये रोजगाराच्या संधी जास्त उपलब्ध असल्यामुळे एकूण वाढीव लोकसंख्येपैकी ५० टक्के लोकसंख्या 'अ' दर्जाच्या नगरात स्थलांतरित होत आहे. तसेच नगरांमधील नैसर्गिक लोकसंख्यावाढ जास्त असल्यामुळेही नागरीकरण प्रवृत्ती वाढत आहे.[६]

**५) जॉर्ज एस. टोली (१९८४) :**

नागरीकरणाची प्रवृत्ती वाढत्या उत्पादकतेमुळे वाढत आहे. कारण वाढीव उत्पादकतेमुळे अनेक उत्पादन घटकांना रोजगार मिळतो. तसेच मुंबई, दिल्ली, टोकियो, वॉशिंग्टन या शहरांनी विशिष्ट उत्पादनात विशेषीकरण प्राप्त केल्यामुळे व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ विकसित झाल्यामुळे या नगरांची नागरीकरण प्रवृत्ती वाढत आहे.[७]

**६) कापाडिया व के. आर. युनी (१९६५) :**

ग्रामीण भागातील परंपरागत व्यवसाय बंद पडल्यामुळे ग्रामीण भागातील अनेक बेकार लोक शहरी भागातील बिगर परंपरागत व्यवसायांत प्रवेश करत आहेत; त्यामुळेच भारतातील नागरीकरण प्रवृत्ती वाढत आहे.[८]

**७) जे. एम. हालपरन :**

ग्रामीण भागात आजही जातीयता, अस्पृश्यता पाळली जाते. त्यामुळे ग्रामीण भागातील मागासवर्गीय लोक नागरी भागात स्थलांतरण करत आहेत. कारण नागरी भागात जातीयता व अस्पृश्यता कमी आहे. त्यामुळेही भारतातील नागरीकरण प्रवृत्ती वाढत आहे.[९]

**८) आर. रामचंद्रम :**

भारतामध्ये मोठ्या नगरांमध्ये शैक्षणिक विकास, औद्योगिक विकास, व्यावसायिक, सामाजिक व राजकीय विकास जास्त झाल्यामुळे लहान नगरामधून व ग्रामीण भागांतून अनेक लोक रोजगारासाठी, शिक्षणासाठी, व्यवसायासाठी स्थलांतरित झालेले आहेत. त्यामुळे मोठ्या नगरांची नागरीकरण प्रवृत्ती वाढली आहे.[१०]

**९) ओरिसा इकॉनॉमिक जर्नल :**

ज्या भागात कृषी क्षेत्राचा विकास जास्त झाला आहे, अशा विभागातील कृषी उद्योगांचा व कृषी बाजारपेठेचा विकास जास्त झाला आहे. अशा विभागातील नागरीकरण जास्त झाले आहे. उदा. पंजाबमध्ये १९९१ च्या जनगणनेनुसार २१.९६ टक्के नागरीकरण झालेले आहे. कृषी विकासामुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या उत्पादनातील वाढीमुळे शेतकरी शहरी जीवनाकडे आकर्षिले जात आहेत. त्यामुळे अमृतसर,

लुधियाना, पटियाला, अंबाला शहरांची नागरीकरण प्रवृत्ती वाढली आहे.[११]

भारतामध्ये राष्ट्रीय उत्पादनात नागरी उत्पन्नाचा वाटा सन १९५०-५१ मध्ये २९ टक्के होता, तो शतकाच्या अखेरीस ६० टक्के एवढा झाला आहे. यावरून नागरीकरणाचे महत्त्व लक्षात येते. भारतामध्ये सन १९०१ व १९९१ मध्ये नागरी लोकसंख्या अनुक्रमे २६ व २७ दशलक्ष होती; म्हणजेच ९० वर्षाच्या कालखंडात शहरी लोकसंख्येत आठ पटींनी वाढ होऊन सन १९०१ मध्ये शहरी लोकसंख्येचे प्रमाण ११ टक्के होते, त्यात वाढ होऊन सन १९९१ मध्ये ते २६ टक्के झाले आहे. तर सन २०११ मध्ये ३३ टक्के नागरीकरण होईल असा अंदाज आहे.

दुसऱ्या महायुध्दानंतर व भारताच्या फाळणीनंतर भारतातील नागरीकरण जास्त वाढले. कारण या कालखंडात ग्रामीण भागातून नागरी भागात जास्त स्थलांतर झालेले आहे. सन १९७१-८१ व १९८१-९१ या दशकांतील नागरीकीकरणाचा दर अनुक्रमे ४६ व ३६ टक्के होता. सन १९७१-८१ या दशकात नागरीकीकरणाचा दर जास्त राहिला आहे. कारण सन १९६१ च्या जनगणनेने नागरीकीकरणाची व्याख्या बदलली होती व या दशकात ग्रामीण स्थलांतरणही नागरी भागात जास्त झाले होते. त्यामुळे नागरीकीकरण वृध्दी या दशकात वाढली आहे, तर १९८१-९१ या दशकात ग्रामीण स्थलांतराचे प्रमाण घटल्यामुळे व नैसर्गिक लोकसंख्या दर घटल्यामुळे नागरीकीकरण प्रवृत्ती कमी झाली आहे.[१२]

तक्ता क्र. ३.३ मध्ये भारतातील नागरीकरणाची प्रवृत्ती दर्शविण्यात आली आहे. सन १९०१ मध्ये भारतातील नागरीकरण १०.९४ टक्के होते, ते सतत वाढत जाऊन सन १९९१ पर्यंत २५.७१ टक्के झाले. सन १९०१ ते १९९१ या कालखंडात भारतातील

नागरीकरणात अडीच पटीपेक्षा जास्त वाढ झाल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र. ३.३ भारतातील नागरीकरणाची प्रवृत्ती**

| वर्ष | नगरांची संख्या | नागरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण | दशवार्षिक वद्धीदर | सरासरी वार्षिक वद्धीदर |
|---|---|---|---|---|
| १९०१ | १८२७ | १०.९४ | -- | -- |
| १९११ | १८१५ | १०.२९ | ०.३५ | ०.०३ |
| १९२१ | १३३९ | ११.१८ | ८.२७ | ०.७९ |
| १९३१ | २०७२ | ११.९९ | १९.१ | १.७५ |
| १९४१ | २२५० | १३.८६ | ३३.० | २.७७ |
| १९५१ | २८४३ | १७.२९ | ४१.४ | ३.४७ |
| १९६१ | २३६५ | १७.९७ | २६.४ | २.३३ |
| १९७१ | २५९० | १९.९१ | ३८.२ | ३.२१ |
| १९८१ | ३३७८ | २३.९४ | ४६.१ | ३.८३ |
| १९९१ | ३७६८ | २५.७१ | ३६.५ | ३.०९ |

**आधार** : भारतीय जनगणना अहवाल २००१.

भारतातील नागरी लोकसंख्या वाढीचा दशवार्षिक वृद्धीदर १९५१ पर्यंत सतत वाढल्याचे दिसून येते. सन १९६१ मध्ये मात्र नागरीकरणात घट झाल्याचे दिसून येते. कारण १९६१ मध्ये भारतीय जनगणनेने नागरीकरणाच्या व्याख्येत बदल केला होता. त्यामुळे नगरांची संख्या ४७८ ने कमी झाली होती म्हणून नागरीकरणाचा दशवार्षिक वृध्दीदर

१९५१-६१ या कालखंडात कमी झाल्याचे दिसते; परंतु १९६१-७१ व १९७१-८१ या दोन दशकांत पुन्हा नागरीकरणात वाढ झाली आहे. कारण ग्रामीण भागात फार मोठया प्रमाणात बेकारी व दारिद्रय वाढत होते, त्यामुळे ग्रामीण भागातून नागरी भागात रोजगारासाठी जास्त लोक स्थलांतरित झाले. तसेच नैसर्गिक लोकसंख्यावाढीचा वृद्धीदरही या दोन दशकात जास्त होता, त्यामुळे या दोन दशकांतील नागरीकरणाचा वृद्धीदर वाढला आहे. सन १९८१ ते १९९१ या दशकात पुन्हा नागरीकरणाचा दशवार्षिक वृद्धीदर ४६.१ टक्के ते ३६.५ टक्क्क्यांपर्यंत कमी झाला. कारण या दशकांत ग्रामीण भागाच्या विकासाकडे बरेच लक्ष देण्यात आले होते. रोजगार निर्माण करणारी साधने ग्रामीण भागात निर्माण करण्यात आली व विविध कार्यक्रम आखले; त्यामुळे ग्रामीण स्थलांतरात घट झाली. तसेच लोकसंख्या नियंत्रणाचे अनेक प्रोत्साहनपर कार्यक्रम राबवले जात आहेत; त्यामुळे नगरातील नैसर्गिक लोकसंख्या दर घटून नागरी लोकसंख्या वाढीतील दशवार्षिक वृद्धीदर कमी झाल्याचे दिसून येते. सन १९११ मध्ये नागरी लोकसंख्येचा सरासरी वार्षिक वृद्धीदर ०.०३ टक्के होता हा दर सन १९९१ मध्ये ३.०९ पर्यंत वाढल्याचे दिसून येते.

एकंदरीत नागरीकरणाचा प्रत्यक्ष उत्पादनाशी संबंध येतो. त्यामुळे नवीन उत्पादन तंत्रात सुधारणा होते. याचा परिणाम ग्रामीण भागातील उत्पादन घटक नागरी भागात स्थलांतरित होतात. म्हणून नागरीकरण वाढत जाते. त्यामुळे भारतातील प्रादेशिक असमतोल कमी होण्यासही मदत होत असल्याचे दिसून येते.

### ३.५ भारतातील लहान व मोठ्या नगरातील नागरीकरणाची प्रवृत्ती :

ब्रिटिशांनी भारतामध्ये स्वतःच्या प्रशासकीय सोईसाठी नगरपालिका, छावण्या

निर्माण केल्या होत्या, परंतु औद्योगिकीकरण मात्र केले नव्हते; त्यामुळे ब्रिटिश कालखंडात नागरीकरण फारसे वाढले नव्हते. ब्रिटिशांनी २० व्या शतकात जे औद्योगिकीकरण केले, रेल्वे मार्ग, दळणवळण यांचा विकास केला, तो इंग्लंडच्या विकासासाठी केला होता; परंतु प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष त्याचा फायदा भारताला झाला होता. ब्रिटिशांनी ज्या ठिकाणी दळणवळण सुविधा आहे त्याच ठिकाणी औद्योगिकीकरण, व्यापारीकरण केले; त्यामुळे भारतातील ग्रामीण भागातील लहान-लहान शहरांमधील अनेक लोक रोजगारासाठी व्यापारी व औद्योगिक केंद्राकडे आकर्षित झाले त्याचा परिणाम लहान-लहान शहरांचे नगरांमध्ये रुपांतर होऊन ती मोठी नगरे झाली.[१३]

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने मोठ्या नगरांमध्येच औद्योगिकीकरण वाढवले. अनेक प्रशासकीय प्रादेशिक कार्यालये मोठ्या नगरांमध्येच सुरू केली. तसेच जे आधुनिक कारखाने खासगी व सार्वजनिक क्षेत्रात उभे केले गेले तेही मोठ्या नगरांमध्येच त्याचा परिणाम मोठ्या नगरांचा विस्तार झाला. अनेक खेडी व ग्रामीण भूमी या नगरांमध्ये विलीन झाली, अनेक ग्रामीण बेकारांना मोठ्या नगरांनी सामावून घेतले; त्यामुळे मोठ्या नगरांची नागरीकरण प्रवृत्ती लहान नगरांपेक्षा जास्त वाढली होती.

तक्ता क्र. ३.४ मध्ये आकारमानानुसार भारतातील नगरांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. सन १९०१ मध्ये भारतात एकूण नगरांची संख्या १८२७ होती. सन १९६१ चे दशक वगळता सतत वाढ होत जाऊन सन १९९१ मध्ये ती ३७३८ नगरांपर्यंत पोहोचली. कारण शहरी भागामध्ये औद्योगिक व व्यावसायिक विकास झाल्यामुळे अनेक नगरांमध्ये ग्रामीण भागातील लोक रोजगारासाठी स्थलांतरित झाली. त्यामुळे एकूण

नगरांच्या संख्येत वाढ झाली. सन १९६१ च्या भारतीय जनगणनेने नागरीकरणाची व्याख्या बदलल्यामुळे या दशकात नगरांची संख्या घटून २३६५ एवढी झाल्याचे दिसून येते. त्यानंतर मात्र वाढत्या औद्योगिक, व्यावसायिक सेवाक्षेत्राच्या विकासामुळे नगरांची संख्या वाढून सन १९९१ साली ३७६८ पर्यंत वाढ झाली.

**तक्ता क्र. ३.४ आकारमानानुसार भारतातील नगरांचे वर्गीकरण (टक्केवारीत)**

| वर्ष | नगरांची संख्या | अ | ब | क | ड | ई | ऊ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९०१ | १८२७ | १.३३ | २.३७ | ७.१८ | २१.५९ | ४१.८० | २६.४५ |
| १९११ | १८१५ | १.३० | २.२८ | ७.७० | २०.७० | ४०.३१ | २७.६५ |
| १९२१ | १३३९ | १.५३ | २.३८ | ७.६६ | १९.५३ | ३८.७५ | ३०.१५ |
| १९३१ | २०७२ | १.८३ | २.७८ | ९.०७ | २१.५२ | ५९.६६ | ३५.२४ |
| १९४१ | २२५० | २.२४ | ३.३८ | ११.०५ | २२.७४ | ४२.०१ | १८.५८ |
| १९५१ | २८४३ | २.७२ | ३.२६ | ११.७० | २१.७५ | ४०.२१ | २०.३६ |
| १९६१ | २३६५ | ४.४९ | ५.६८ | १९.९५ | ३१.६८ | ३१.३२ | ७.५८ |
| १९७१ | २५९० | ५.९८ | ६.९९ | २२.५३ | ३३.४० | २५.१६ | ५.९४ |
| १९८१ | ३३७८ | ६.६६ | ८.३२ | २२.७४ | ३२.४५ | २२.७७ | ७.०६ |
| १९९१ | ३७६८ | ८.२० | ९.४५ | २५.६८ | ५१.४५ | २०.०९ | ५.१३ |
| सरासरी | २४२५ | ३.६२८ | ४.६८९ | १४.५३ | २७.६८ | ३६.२१ | १८.४१ |

**आधार** : भारतीय जनगणना अहवाल २००१.

भारतामध्ये सन १९०१ पासून १९९१ पर्यंत 'अ' वर्ग, 'ब' वर्ग, 'क' वर्ग व 'ड' वर्ग नगरांचा वाटा सतत वाढत राहिला आहे. तर 'इ' वर्ग व 'उ' वर्ग नगरांचा वाटा सतत घटत राहिला आहे. कारण मोठ्या नगरांमध्ये जास्त औद्योगिकीकरण झाल्यामुळे मोठ्या नगरांची संख्या वाढली आहे. तर लहान नगरांचा औद्योगिक विकास, व्यावसायिक विकास, शैक्षणिक विकास कमी झाल्यामुळे लहान नगरांमध्ये रोजगाराच्या

संधी कमी प्रमाणात उपलब्ध होतात; त्यामुळे लहान नगरांमधील लोक मोठ्या नगरांमध्ये स्थलांतरित झाल्याने मोठ्या नगरांची संख्या सतत वाढत राहिली व लहान नगरांची संख्या सतत घटत राहिली.

## ३.६ राज्या-राज्यांतील नागरीकरण प्रवृत्ती :

भारतातील प्रत्येक राज्याची आर्थिक, सामाजिक, भौगोलिक, राजकीय, ऐतिहासिक, औद्योगिक व कृषी विकासातील परिस्थिती वेगवेगळी आहे. त्यामुळेच राज्या-राज्यामध्ये विकासात असमतोलपणा आहे. म्हणूनच प्रत्येक राज्यातील नागरीकरण प्रवृत्तीही वेगवेगळी आहे.[१४]

ज्या राज्यांचा सर्वांगीण विकास झाला आहे, अशा महाराष्ट्र, पश्चिम-बंगाल, गुजरात, तमिळनाडू, कर्नाटक, पंजाब इत्यादी राज्यांमध्ये नागरीकरण जास्त झालेले आहे व ज्या राज्यांचा औद्योगिक, सामाजिक, आर्थिक व कृषिविकास कमी झाला आहे, अशा राज्यांचे नागरीकरण कमी झाले आहे. तक्ता क्र. ३.५ मध्ये भारतातील विविध प्रमुख राज्यांतील नागरीकरणाची प्रवृत्ती दर्शविण्यात आली आहे. सन १९०१ मध्ये देशामध्ये आंध्र प्रदेश, आसाम, बिहार, मध्य प्रदेश, ओरिसा व केरळ ही राज्येभारताच्या (१०.८४ टक्के) सरासरी नागरीकरण पातळीपेक्षा खालच्या पातळीवर होती; तर गुजरात, महाराष्ट्र, राजस्थान, तमिळनाडू हरियाना, कर्नाटक, पंजाब, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश या राज्यांचे नागरीकरण भारताच्या सरासरीपेक्षा जास्त होते, कारण इंग्रजांनी जास्तीत-जास्त भांडवली गुंतवणूक या राज्यांमध्ये केलेली होती.

## तक्ता क्र. ३.५
## भारतातील विविध प्रमुख राज्यातील नागरीकरणाची प्रवृत्ती (टक्केवारी)

| राज्य | १९०१ | १९११ | १९२१ | १९३१ | १९४१ | १९५१ | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | ९.६५ | १०.०९ | १०.२१ | ११.१३ | १३.४३ | १७.४२ | १७.४४ | १९.३१ | २३.३२ | २६.८४ |
| आसाम | २.३४ | २.४१ | २.७४ | २.९२ | ३.११ | ४.२९ | ७.२१ | ८.८२ | १०.२९ | ११.८० |
| बिहार | ४.०२ | ३.८१ | ४.१५ | ४.५४ | ५.४१ | ६.७७ | ८.४३ | १०.०० | १२.४७ | १३.१७ |
| गुजरात | २२.३३ | १९.२५ | २०.१५ | २०.५० | २३.७९ | २७.७३ | २५.७७ | २८.०८ | ३१.१० | ३४.४० |
| हरियाणा | १२.४२ | १०.७७ | ११.३१ | १२.३८ | १३.३९ | १७.०७ | १७.२३ | १७.६६ | २१.८८ | २४.७९ |
| कर्नाटक | १२.५६ | ११.५६ | १३.७६ | १५.३० | १६.९४ | २२.९५ | २२.३३ | २४.३१ | २८.८० | ३०.९१ |
| मध्यप्रदेश | ८.६५ | -६.६८ | ७.५१ | ८.३० | ९.८१ | १२.०२ | १४.२९ | १६.२९ | २०.२९ | २३.२१ |
| महाराष्ट्र | १६.५९ | १५.१३ | १८.५० | १८.६० | २१.११ | २८.७५ | २८.२२ | ३१.१७ | ३५.०३ | ३८.७३ |
| ओरिसा | २.४७ | २.४२ | २.५२ | २.५४ | ३.०० | ४.०६ | ६.३२ | ८.४१ | ११.७९ | १३.४३ |
| पंजाब | १२.३९ | १२.०८ | १२.१६ | १४.५८ | १७.२६ | २१.७२ | २३.०६ | २३.७३ | २७.६८ | २९.४२ |
| राजस्थान | १५.०६ | १३.४४ | १४.३३ | १४.७२ | १५.२७ | १८.५० | १६.२८ | १७.६३ | २१.०५ | २२.८८ |
| तामिळनाडू | १४.१५ | १५.०७ | १५.८५ | १८.०२ | १९.७० | २४.३५ | २६.६९ | ३०.२६ | ३२.९५ | ३४.२० |
| उत्तरप्रदेश | ११.०९ | १०.३९ | १०.५८ | ११.१९ | १२.४१ | १३.६४ | १२.८५ | १४.०२ | १७.९५ | १९.८९ |
| पश्चिमबंगाल | १२.२० | १३.०५ | १४.४१ | १५.३२ | २०.४१ | २३.८८ | २४.८५ | २४.७५ | २६.४७ | २७.३९ |
| केरळ | ७.११ | ७.३४ | ८.७३ | ९.६४ | १०.८४ | १३.४८ | १५.११ | १६.२४ | १८.७४ | २६.४४ |
| पुर्ण भारत | १०.८४ | १०.२९ | ११.१८ | ११.९९ | १३.५६ | १३.२४ | १७.२७ | १७.९१ | २३.३१ | २५.७७ |

**आधार** : भारतीय जनगणना अहवाल २००१.

सन १९९१ मध्ये भारताचे नागरीकरण २५.७७ टक्के झाल्याचे आढळून येते. राज्या-राज्यातील नागरीकरणात महाराष्ट्र (३८.७२ टक्के) अग्रेसर असून त्यानंतर गुजरात (३४.८० टक्के), तमिळनाडू (३४.४० टक्के), कर्नाटक (३०.९१ टक्के), पंजाब (२९.४२ टक्के) राज्यांचा क्रमांक लागतो. महाराष्ट्र, गुजरात, तमिळनाडू, पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये औद्योगिकीकरण जास्त झालेले आहे. पंजाबमध्ये शेतीचा विकास जास्त

झाला आहे. केरळमध्ये सामाजिक विकास जास्त झाला आहे. तसेच काही राज्यांना भौगोलिक परिस्थितीही लाभली आहे. म्हणजेच समुद्रकिनारा, बारामाही वाहणाऱ्या नद्या, सुपीक जमीन या सर्व कारणांमुळे वरील राज्यांची नागरीकरण प्रवृत्ती इतर राज्यांपेक्षा जास्त दिसून येते. याचाच अर्थ; जी राज्ये औद्योगिकदृष्ट्या व सेवाक्षेत्राच्या विकासात, पुढारलेली आहेत त्यांचे नागरीकरण जास्त झाले आहे व जी राज्ये विकासाच्या दृष्टीने मागास आहेत त्यांचे नागरीकरण कमी झाले आहे. म्हणजेच विकास व नागरीकरण यांचा जवळचा संबंध आहे हे स्पष्ट होते.

### ३.७ राज्यामधील नागरी लोकसंख्येचा दशवार्षिक वृध्दीदर व नगरांची संख्या :

भारतातील विविध राज्यांमधील नागरी लोकसंख्येचा दशवार्षिक वृध्दीदर तक्ता क्र. ३.६ मध्ये दर्शविण्यात आला आहे. आंध्र प्रदेश, बिहार, गुजरात, हरियाना, कर्नाटक, महाराष्ट्र व उत्तर प्रदेश इत्यादी राज्यांचा नागरी लोकसंख्येचा दशवार्षिक वृद्धीदर १९५१-६१ ते १९७१-८१ या दशकापर्यंत वाढल्याचे दिसून येते. कारण ही राज्ये मुळातच जास्त लोकसंख्येची असून औद्योगिकीकरणही सतत वाढत असल्यामुळे लोकसंख्येचा दशवार्षिक वृद्धीदर अधिक आहे.[१५]

त्यानंतर सन १९८१-९१ या दशकात नागरी लोकसंख्येचा दशवार्षिक वृद्धीदर घटला आहे. कारण साक्षरता वाढून लोकांना कुटुंब नियोजनाचे महत्त्व पटल्यामुळे नैसर्गिक लोकसंख्या वाढीचा दर घटला व ग्रामीण भागात अधिक रोजगार निर्माण करण्यासाठी अनेक योजना सुरू केल्या गेल्या. त्यामुळे या दशकात नागरी लोकसंख्येचा दशवार्षिक वृद्धीदर कमी झाला आहे.

**तक्ता क्र. ३.६ प्रमुख राज्यांमधील नागरी लोकसंख्या दशवार्षिक वृद्धीदर टक्केवारीत**

| राज्य | १९५१-६१ | १९६१-७१ | १९७१-८१ | १९८१-९१ |
|---|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | १५.७६ | ३३.९२ | ४८.६२ | ४२.६४ |
| बिहार | ४९.०३ | ४३.९५ | ५४.७६ | ३०.३९ |
| गुजरात | २०.२७ | ४१.०० | ४१.४२ | ३३.६० |
| हरियाना | ३५.०२ | ३५.५८ | ५९.४७ | ४३.०७ |
| कर्नाटक | १८.२६ | ३५.२३ | ५०.६५ | २९.०९ |
| केरळ | ३९.८९ | ३५.७२ | ३७.६४ | ६०.८९ |
| मध्य प्रदेश | ४७.७० | ४६.६३ | ५६.०३ | ४४.८९ |
| महाराष्ट्र | २१.३१ | ४०.७५ | ३९.९९ | ३८.६६ |
| ओडिसा | ८६.७९ | ६६.३० | ६८.५४ | ३६.०८ |
| पंजाब | २९.०६ | २५.२७ | ४४.५१ | २९.११ |
| राजस्थान | ११.०४ | ३८.४७ | ५८.५९ | ३९.२४ |
| तमिळनाडू | २२.५९ | ३८.६४ | २७.९८ | १९.२८ |
| उत्तर प्रदेश | ९.९० | ३०.६८ | ६०.६२ | ३८.४७ |
| प.बंगाल | ३५.९७ | २८.४१ | ३१.७३ | २८.९० |
| पूर्ण भारत | २५.८५ | ३७.९१ | ४६.२३ | ३६.०९ |

**स्त्रोत :** Arup Mitra (१९९४) : Urbanisation, slums, Informal sector Employment and Poverty An Exploratory study P-47.

तक्ता क्र. ३.७ मध्ये भारतातील नगरांची राज्यनिहाय संख्या दर्शविण्यात आली आहे. सन १९८१ मध्ये भारतामध्ये नगरांची एकूण संख्या ३३७८ होती. देशातील एकूण नगरांपैकी सर्वात जास्त (१९.५० टक्के) नगरांची संख्या उत्तर प्रदेशात होती, त्या नंतर मध्य प्रदेश (८.९६ टक्के), महाराष्ट्र (८.१७ टक्के), आंध्र प्रदेश (६.९२टक्के), कर्नाटक (७.४० टक्के), तमिळनाडू (७.२५ टक्के), गुजरात (६.४४ टक्के), राजस्थान

(५.७७ टक्के) या राज्यांचा क्रमांक लागतो. सन १९९१ मध्ये भारतात नगरांची संख्या ३७६८ होती. त्यांपैकी सर्वांत जास्त वाटा उत्तर प्रदेश (१८.६९ टक्के) चा होता, त्याखालोखाल मध्य प्रदेश (११.४९ टक्के), महाराष्ट्र (७.६९ टक्के), तमिळनाडू (६.९० टक्के), कर्नाटक (६.७४ टक्के), गुजरात (५.९७ टक्के), राजस्थान (५.७० टक्के) व बिहार (५.५९ टक्के) असा वाटा होता. जी राज्ये आकाराने व लोकसंख्येने मोठी आहेत त्या राज्यांमध्ये नगरांची संख्या जास्त आढळून आली आहे. जरी नगरांची संख्या या राज्यांमध्ये जास्त असली तरीही उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार, राजस्थान राज्यांतील शहरी लोकसंख्येचे प्रमाण गोवा, हरियाना, केरळ या राज्यांपेक्षा कमी आहे. म्हणजेच नगरांची संख्या व नागरीकरण यांचा तेवढासा संबंध दिसत नाही. म्हणजेच नागरीकरणासाठी औद्योगिकीकरण, सामाजिक, कृषी व राजकीय विकास महत्त्वाचा असतो. तक्ता क्र. ३.७ वरून असे दिसून येते, की सन १९८१ ते १९९१ या दशकात सर्वाधिक ६६.६६ टक्के नगरांच्या संख्येतील वाढ अरुणाचल प्रदेश या राज्याने नोंदविली आहे; तर सर्वात कमी -८.९८ टक्के वाढ आंध्र प्रदेश या राज्याची आहे. भारतातील सन १९९१ मधील एकूण नगरांच्या संख्येतील सर्वाधिक प्रमाण ६.७४ टक्के कर्नाटक या राज्याचे असून त्या खालोखाल ५.९७ टक्के गुजरात, ५.६५ टक्के आंध्रप्रदेश व ५.५९ टक्के बिहार या राज्याचा क्रमांक लोगतो. अरुणाचल प्रदेश व गोवा या राज्यांचा भारतातील एकूण नगरांतील हिस्सा एक टक्क्यांपेक्षाही कमी आहे.

### ३.८ भारतातील महानगरीय नागरीकरणांची प्रवृत्ती:

भारतामध्ये १९०१ मध्ये फक्त एकच महानगर होते; परंतू आजमितीला (१९९१) देशात २३ महानगरे आहेत. म्हणजेच भारतातील महानगरांची नागरीकरणाची प्रवृत्ती

बरीच वाढल्याचे स्पष्ट होते. सन १९९१ च्या जनगणनेनुसार ज्या नगराची लोकसंख्या एक दशलक्षापेक्षा जास्त आहे अशा नगराला महानगर म्हटले जाते. हॉन्स ब्ल्यूमेन फल्ड (१९६७) यांच्या मते महानगरे ही आधुनिक जगाची ओळख आहेत. भारतातील एकूण आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या २० टक्के व्यापार एकट्या मुंबई महानगरातून होतो. एकंदरीत महानगरे ही त्या देशाच्या संस्कृतीचे प्रतीक आहे व महानगराचे महत्वही आज वाढले आहे.[१६]

**तक्ता क्र. ३.७ भारतातील राज्यनिहाय नगरांची संख्या**

| राज्य | १९८१ | प्रतिशत प्रमाण | १९९१ | प्रतिशत प्रमाण | सन १९८१ ते १९९१ या दशकात वाढलेल्या नगरांची टक्के वारी |
|---|---|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | २३६ | ६.९२ | २१३ | ५.६५ | -८.९८ |
| अरुणाचल प्रदेश | ६ | ०.१७ | १० | ०.२६ | ६६.६६ |
| आसाम | ७ | २.२७ | ८७ | २.३० | १२.९८ |
| बिहार | १७९ | ५.२९ | २११ | ५.५९ | १७.८७ |
| गोवा | १५ | ०.६४ | २६ | ०.६९ | ७३.३३ |
| गुजरात | २२० | ६.५१ | २२५ | ५.९७ | २.२७ |
| हरियाना | ७७ | २.२७ | ९० | २.३८ | १६.८८ |
| हिमाचल प्रदेश | ४६ | १.३६ | ५५ | १.४५ | १९.५६ |
| जम्मू काश्मीर | ५६ | १.६५ | ७२ | १.९१ | २८.५७ |
| कर्नाटक | २५० | ७.४० | २८४ | ६.७४ | १.०६ |
| पूर्ण भारत | ३३७८ | १०० | ३७६८ | १०० | ०.०० |

**Source :** Arup Mitra (१९९४) : Urbanisation, slums, Informal sector Employment and Poverty An Exploratory study P-47.

देशातील एकूण लोकसंख्येपैकी ८.३७ टक्के लोकसंख्या २३ महानगरांत राहते. महानगरांत रोजगाराच्या व व्यवसायाच्या संधी जास्त असल्यामुळे महानगरांची नागरीकरण प्रवृत्ती फारच जास्त असते. तक्ता क्र. ३.८ वरून असे स्पष्ट होते, की भारतामध्ये महानगरांची संख्या सन १९०१ मध्ये फक्त एक होती, त्यात वाढ होऊन ती सन १९९१ मध्ये २३ एवढी झाली. सन १९०१ मध्ये भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ०.६३ टक्के लोकसंख्या महानगरांची होती. त्यात वाढ होऊन ती सन १९९१ मध्ये ८.३७ टक्के झाली. सन १९०१ मध्ये एकूण नागरी लोकसंख्येपैकी महानगरांत राहणारी लोकसंख्या ५.८४ टक्के होती. त्यात वाढ होऊन ती सन १९९१ मध्ये ३२.५४ टक्क्यांपर्यंत वाढली. कारण देशाच्या फाळणीमुळे अनेक लोक शहरी भागात स्थलांतरित झाले. महानगरांत लोकसंख्या दशवार्षिक वृद्धीदर सन १९११ मध्ये ८३.०२ टक्के होता. तो सन १९९१मध्ये ६७.७६ टक्क्यांपर्यंत कमी झाला. कारण महानगरातील नैसर्गिक लोकसंख्यावाढीचा दर कमी होता. ग्रामीण भागात रोजगाराचे विविध कार्यक्रम सुरु केलेले आहेत व उद्योगांचे विकेंद्रीकरण होत आहे. म्हणून महानगरांचा लोकसंख्यावाढीचा दशवार्षिक वृद्धीदर १९८१-९१ या कालखंडात कमी झाला आहे.

## ३.९ महानगरातील लोकसंख्येचा वृध्दिदर :

तक्ता क्र. ३.९ मध्ये महानगरांतील लोकसंख्या वाढीचा वृध्दिदर दर्शविण्यात आला आहे. एकूण २३ महानगरांपैकी विशाखापट्टणम महानगराचा लोकसंख्या वृध्दिदर सन १९६१ ते १९९१ या कालखंडात सर्वांत जास्त वाढला आहे, तर सर्वांत कमी लोकसंख्या वृध्दिदर वाराणसी व कलकत्ता महानगरांचा आहे. एकंदरीत सर्वच महानगरांचा लोकसंख्या वृध्दिदर सन १९५१ पासून सन १९९१ पर्यंत सतत वाढत

**तक्ता क्र. ३.८ भारतातील महानगरांची लोकसंख्या (१९०१ ते १९९१)**

| वर्ष | महानगरांची संख्या | एकूण लोकसंख्या | सरासरी लोकसंख्या (दशलक्षामध्ये) | लोकसंख्येशी प्रमाण (टक्केवारी) | महानगरांचा वाटा (टक्केवारी) | लोकसंख्या बदल (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1901 | 1 | 1510008 | 1.51 | 0.63 | 5.84 | -- |
| 1911 | 2 | 2763586 | 1.38 | 1.1 | 10.65 | 83.02 |
| 1921 | 2 | 3129518 | 1.56 | 1.25 | 11.14 | 13.24 |
| 1931 | 2 | 3406869 | 1.70 | 1.22 | 10.18 | 8.86 |
| 1941 | 2 | 5307540 | 2.65 | 1.67 | 12.02 | 55.79 |
| 1951 | 5 | 11746616 | 2.35 | 3.25 | 18.81 | 121.32 |
| 1961 | 7 | 18101748 | 2.59 | 4.12 | 22.93 | 54.10 |
| 1971 | 9 | 27831065 | 3.09 | 5.08 | 25.51 | 53.75 |
| 1981 | 12 | 42121700 | 3.51 | 6.16 | 26.41 | 51.35 |
| 1991 | 23 | 70661259 | 3.07 | 8.37 | 32.54 | 67.76 |

**Source :** Arup Mitra (१९९४) : Urbanisation, slums, Informal sector Employment and Poverty An Exploratory study P-47.

राहिला आहे; परंतू महानगरांतील नागरीकरण वाढीचा दर लहान नगरांपेक्षा कमी दिसून येतो. कारण महानगरांना, प्रदूषण, अस्वच्छता, झोपडपट्टी, गुन्हेगारी, महागाई, पाणीपुरवठा, गर्दीच्या समस्यांनी ग्रासून टाकले आहे. त्यामुळे रोजगार व व्यवसायाच्या संधी लहान महानगरांकडे वळत्या झाल्या आहेत. तसेच मोठया महानगरांचे नागरीकरण पर्याप्त झाले आहे. त्यामुळे लहान महानगराची नागरीकरण प्रवृत्ती वाढत आहे व मोठया महानगरांची लोकसंख्या कमी वेगाने वाढत आहे.[१७]

## ३.१० महानगरीय लोकसंख्येचे विभाजन :

सामान्यपणे मोठया महानगरात राहणारी लोकसंख्या जास्त आढळून येते. कारण मोठया शहरांचा औद्योगिक, आर्थिक, व्यावसायिक व शैक्षणिक विकास,

**तक्ता क्र. ३.९ एक दशलक्षापेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या नगरांतील लोकसंख्यावाढीचा निर्देशांक**

| दहा लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेली महानगरे | १८५१ | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ |
|---|---|---|---|---|---|
| मुंबई | १०० | १४० | २०१ | २७८ | ४२४ |
| कोलकत्ता | १०० | १२८ | १५९ | १९७ | २३४ |
| दिल्ली | १०० | १६४ | २५४ | ३९९ | ५८३ |
| चेन्नई | १०० | १२६ | २०६ | २७८ | ३४८ |
| हैदराबाद | १०० | ११० | १५९ | २२५ | ३७९ |
| बंगळूर | १०० | १५३ | २१२ | ३७२ | ५२० |
| अहमदाबाद | १०० | १३७ | २०० | २९० | ३७६ |
| पुणे | १०० | १३० | १८६ | २७७ | ४०८ |
| कानपूर | १०० | १३८ | १८१ | २३२ | २९९ |
| नागपूर | १०० | १४२ | १९२ | २६८ | ३४२ |
| लखनऊ | १०० | १३२ | १६४ | २०३ | ३३१ |
| सुरत | १०० | १३४ | २०८ | ३८५ | ६३९ |
| जयपूर | १०० | १३५ | २०९ | ३३४ | ४९८ |
| कोची | १०० | १३६ | २८६ | ३८७ | ६४३ |
| कोईम्बतुर | १०० | १६५ | २५६ | ३२० | ३९५ |
| वडोदरा | १०० | १६७ | २२१ | ३५२ | ५२८ |
| इंदुर | १०० | १२७ | १८० | २६७ | ३५५ |
| पटना | १०० | १२७ | १६९ | २८२ | ३३७ |
| मदुराई | १०० | १३२ | १९२ | २४५ | २९५ |
| भोपाळ | १०० | १०० | २१८ | ३७६ | ६५६ |
| विशाखापट्टणम | १०० | १९५ | ३३६ | ५५९ | ९७४ |
| वाराणसी | १०० | १३७ | १७२ | २१६ | २७८ |
| लुधियाना | १०० | १५९ | २६१ | ३९५ | ६५८ |

स्त्रोत : भारताची जनगणना १९९१, मालिका १, प्रपत्र २, पु.३९

राजधान्या, विभागीय कार्यालये यांमुळे विकास जास्त झालेला दिसून येतो. त्यामुळे मोठया नगराकडील ग्रामीण व लहान नगरातील बेकारांच्या स्थलांतराचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे मोठया नगरांमध्ये लोकसंख्या लहान नगरांपेक्षा जास्त राहते.[१८]

'अ' दर्जाच्या नगरांतील व महानगरांतील एकूण नागरी लोकसंख्येचा वाटा तक्ता क्र. ३.१० मध्ये दर्शविण्यात आला आहे. तक्ता क्र. ३.१० वरून असे स्पष्ट होते, की सन १९९१ मध्ये देशामध्ये एकूण 'अ' वर्ग व महानगराच्या लोकसंख्येपैकी 'अ' वर्ग नगरांचा लोकसंख्येतील वाटा ४९.४३ टक्के होता; तर महानगरांचा वाटा ५०.५७ टक्के होता. म्हणजेच २७७ 'अ' वर्ग नगरांमध्ये मोठया नगरांपैकी अर्धी लोकसंख्या राहते या वरून असे स्पष्ट होते, की नागरीकरणात महानगरांचा वाटा फार मोठा आहे. म्हणूनच महानगरांना आज महत्व आलेले आहे.

### ३.११ महाराष्ट्रातील नागरीकरण प्रवृत्ती :

महाराष्ट्र राज्य अस्तित्वात येण्यापूर्वी महाराष्ट्रातील मराठवाडा, हैदराबाद राज्याशी तर विदर्भातील काही जिल्हे मध्य प्रदेशशी जोडले होते; परंतु सन १९५२ मध्ये महाराष्ट्र हे स्वतंत्र भाषिक राज्य असावे म्हणून संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना करण्यात आली. सन १९५३ मध्ये भारत सरकारने राज्य पुनर्रचना आयोगाची स्थापना केली; म्हणून महाराष्ट्रातील पुढाऱ्यांनी एकत्र येऊन राज्याची भाषिक तत्त्वावर निर्मिती झाली पाहिजे असा करार सन १९५३ मध्ये केला, यालाच नागपूर करार म्हणतात. सन १९५६ सालापासून अनेक राज्यांची भाषावांर निर्मिती झाली त्यानुसार महाराष्ट्राची निर्मिती १ मे १९६० रोजी झाली.[१९]

**तक्ता क्र. ३.१० 'अ' वर्ग नगरांमध्ये व महानगरांमध्ये लोकसंख्येची वाटणी**

**(१९९१ च्या जनगणनेनुसार)**

| लोकसंख्येचा आकार | नगरांची संख्या | लोकसंख्या | 'अ' वर्ग नगरांची लोकसंख्या |
|---|---|---|---|
| 'अ' वर्ग नगरांची व महानगरांची लोकसंख्या | ३०० | १३,९७,३०,०५० | १०० |
| 'अ'वर्ग नगरांची एकूण लोकसंख्या | २७७ | ६९,०८,७९१ | ४९.४३ |
| १,००,००० ते १,९९,९९९ | १६७ | २,२९,३९,०८६ | १६.४२ |
| २,००,००० ते २,९९,९९९ | ४० | १,५५,८६,१५७ | ११.१५ |
| ३,००,००० ते ३,९९,९९९ | ४० | १,५५,८६,१५७ | ११.१५ |
| ५,००,००० ते ९,९९,९९९ | ३० | २,०९,३६,७३४ | १४.९८ |
| १०,००,००० ते १९,९९,९९९ | १४ | १,७१,७५,८४९ | ५०.२७ |
| २०,००,००० ते ४९,९९,९९९ | ०५ | १,६२,६०,७६२ | १२.२९ |
| ५०,००,००० व त्यापेक्षा जास्त | ०४ | ३,७२,२४,६४८ | ११.६४ |

**स्त्रोत : भारतीय जनगणना १९९१.**

महाराष्ट्राचे भौगोलिक क्षेत्रफळ ३,०७,६९० चौ.कि.मी. आहे. क्षेत्रफळाच्या बाबतीत महाराष्ट्राचा देशात तिसरा क्रमांक आहे. भारताच्या एकूण क्षेत्रफळापैकी ९.३६ टक्के भूभाग; महाराष्ट्राचा आहे. तर एकूण लोकसंख्येत ९.३२ टक्के लोकसंख्येचा आहे. महाराष्ट्रामध्ये १९९९ अखेर ३५ जिल्हे होते. महाराष्ट्र हे औद्योगिकदृष्ट्या व नागरीकरणात देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे.

भारतात महाराष्ट्राचे नागरीकरण प्रथम क्रमांकाचे झालेले आहे. सन १९८१ मध्येही महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येपैकी ३५ टक्के लोक नगरांमध्ये राहत होती.

म्हणजेच सन १९८१ मध्येही देशातील राज्यांपैकी महाराष्ट्र हे नागरीकरणाच्या बाबतीत प्रथम क्रमांकाचेच राज्य होते. महाराष्ट्रातील औद्योगिकीकरण देशातील इतर राज्यांपेक्षा जास्त झालेले आहे. त्यामुळे इतर राज्यांतून व महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून अनेक लोक नागरी भागात रोजगारासाठी व व्यवसायासाठी स्थलांतरित झालेले आहेत. म्हणूनच नागरीकरण जास्त झाले आहे. म्हणजेच औद्योगिकीकरणाचा व नागरीकरणाचा जवळचा संबंध आहे. म्हणूनच महाराष्ट्रातील औद्योगिकीकरण प्रवृत्ती इतर राज्यांपेक्षा जास्त राहिली आहे. महाराष्ट्रातील नागरीकरणाची पातळी व लोकसंख्या वृध्दिदर तक्ता क्र. ३.११ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

तक्ता क्र. ३.११ वरून असे स्पष्ट होते, की सन १९०१ मध्ये महाराष्ट्रातील नगरांची संख्या २१९ एवढी होती. सरासरी दशवार्षिक दराने वाढून ३३६ टक्क्यांपर्यंत पोहोचली. वाढत्या औद्योगिकीकरणाबरोबर महाराष्ट्रातील नगराची संख्या वाढल्याचे दिसून येते. सन १९०१ यावर्षी महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येपैकी १६.५९ टक्के लोक शहरांमध्ये राहत होते तर भारताची सरासरी १०.८४ टक्के एवढी होती. सन १९९१ मध्ये महाराष्ट्राचे नागरीकरण ३८.७३ टक्क्यांपर्यंत वाढले हे प्रमाण भारताच्या २५.७७ टक्क्यांपर्यंत जास्त आहे. महाराष्ट्राचे नागरीकरण भारताच्या सरासरीपेक्षा सन १९०१ पासून सन १९९१ पर्यंत जास्त असल्याचे दिसून येते. कारण महाराष्ट्र हे सुरुवातीपासूनच विकासाच्या दृष्टीने देशातील अग्रेसर राज्य राहिले आहे. महाराष्ट्रामध्ये मुंबई, ठाणे, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद, नांदेड या नगरांतील औद्योगिकीकरण सतत वाढत राहिले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील नागरीकरण पातळीही सतत वाढत राहिली आहे, हे स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ३.११ महाराष्ट्रातील नागरीकरणाची पातळी व लोकसंख्या वृध्दिदर**

| वर्ष | नगरांची संख्या | एकूण लोकसंख्येशी नागरी लोकसंख्येचे प्रमाण | दशकातील बदल लाखात | दशकातील बदल (टक्केवारीत) | संचित वृध्दिदर (टक्केवारीत) |
|---|---|---|---|---|---|
| १९०१ | २१९ | १६.५९ | -- | -- | -- |
| १९११ | २३२ | १५.१३ | ०.३२ | ०.९९ | ०.९९ |
| १९२१ | २३८ | १८.५० | ६.०८ | १८.७२ | १९.९९ |
| १९३१ | २५८ | १८.०६ | ५.९९ | १५.५४ | ३८.५३ |
| १९४१ | २६६ | २१.११ | १२.०८ | २७.११ | ७६.०९ |
| १९५१ | ३८३ | २८.७५ | ३५.३६ | ६२.४२ | १८५.९९ |
| १९६१ | २६६ | २८.२२ | १९.६२ | २१.३२ | २४६.९६ |
| १९७१ | २८६ | ३७.१७ | ४५.४९ | ४०.७५ | ३८८.३५ |
| १९८१ | ३०७ | ३५.०३ | ६२.८२ | ३९.९९ | ५८३.६२ |
| १९९१ | ३३६ | ३८.७३ | ८५.०३ | ३८.६६ | ८४७.९२ |

**संदर्भ** : भारतीय जनगणना १९९१.

महाराष्ट्रातील शहरी भागातील लोकसंख्यावाढीचा दशवार्षिक वृध्दिदर सन १९११ मध्ये ०.९९ टक्के होता तो सतत वाढत जाऊन सन १९५१ मध्ये सर्वाधिक ६२.४२ टक्के एवढा झाला. भारताला स्वातंत्र्य मिळाले व भारत-पाकिस्तान फाळणी झाली त्यामुळे अनेक लोक ग्रामीण भागातून नागरी भागात स्थलांतरित झाले होते व ग्रामीण भागात सन १९४८ च्या कालखंडात दुष्काळ पडला होता. त्यामुळे रोजगारासाठी लोक नागरी भागात स्थलांतरित झाले होते. म्हणून या दशकात दशवार्षिक वृध्दिदर जास्त वाढला होता. त्यानंतर मात्र सन १९९१ मध्ये लोकसंख्या दशवार्षिक वृध्दिदर ३८.६६ टक्के राहिला आहे. म्हणजेच साक्षरता व आरोग्य सुविधा

वाढल्यामुळे कुटुंब नियोजनाचे प्रमाण वाढून नैसर्गिक लोकसंख्या वाढ कमी झाली व ग्रामीण भागात अनेक रोजगारपुरस्कृत कार्यक्रम सुरू केल्यामुळे लोकसंख्यावाढीचा दशक वृध्दिदर घटला आहे.

### ३.१२ नगराच्या आकारमानानुसार नागरीकरण प्रवृत्ती:

नगरांचा आकार हा उत्पादन, वितरण, वाहतूक, दळणवळण या घटकांमुळे निश्चित होत असतो. म्हणूनच मोठ्या नगरांची नागरीकरण प्रवृत्ती जास्त आहे.

तक्ता क्र. ३.१२ वरून असे स्पष्ट होते, की महाराष्ट्रात 'अ' वर्ग नगरांची संख्या सन १९७१ मध्ये १८ होती, सन १९८१ मध्ये २९, तर सन १९९१ मध्ये ३३ एवढी होती; तर इतर नगरांची संख्या ३०३ झाली होती.[२०]

महाराष्ट्रात 'अ' वर्ग नगरांत सन १९९१ मध्ये एकूण नागरी लोकसंख्येच्या ७७.८५ टक्के लोकसंख्या राहत होती, तर 'ब', 'क', 'ड', 'ई' व 'उ' वर्ग नगरांत अनुक्रमे ६.४९, १०.३९, ४.१३, १.०३ व ०.११ टक्के लोकसंख्या राहत होती. सन १९७१-९१ या कालखंडात 'अ' वर्ग नगरांत राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण वाढले आहे; तर इतर नगरांमधील लोकसंख्येचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते. म्हणजेच महाराष्ट्रामध्येही नागरीकरणाची प्रवृत्ती मोठ्या नगरांमध्ये वाढत आहे व लहान नगरांतील कमी होत आहे. कारण महाराष्ट्रातील शेती दुबार पिकांखाली फक्त १५ टक्क्यांच्या आसपास आहे. त्यामुळे ग्रामीण भागात कमी रोजगार मिळतो, म्हणून जास्तीत-जास्त लोक रोजगारासाठी मोठ्या शहरांमध्ये स्थलांतरित होत आहे. होत आहेत. तसेच लहान नगरात व्यवसायाच्या व शिक्षणाच्या संधी कमी असतात; म्हणून लहान शहरांमधूनही मोठ्या नगरांमध्ये स्थलांतरण केले जात आहे. त्यामुळेच लहान

**तक्ता क्र. ३.१२ नगराच्या आकारमानानुसार महाराष्ट्रातील नागरीकरण प्रवृत्ती**

| वर्ग / गट | नगरांची संख्या | | | प्रतिशत प्रमाण | | | दशकातील वृध्दिदर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९७१ | १९८१ | १९९१ | १९७१ | १९८१ | १९९१ | १९७१-८१ | १९८१-९१ |
| सर्व वर्ग | २५७ | ३०७ | ३३६ | १०० | १०० | १०० | ३९.९९ | ३८.६६ |
| 'अ' वर्ग | १८ | २९ | ३३ | ७०.७९ | ७५.२६ | ७.८५ | ४८.८३ | ४३.४३ |
| 'ब' वर्ग | १६ | २५ | ३१ | ६.९३ | ५.९६ | ६.४९ | १९.९१ | ५१.४१ |
| 'क' वर्ग | ६१ | ८९ | ११३ | ११.१४ | १०.९४ | १०.३९ | ३७.७९ | ३१.४७ |
| 'ड' वर्ग | ९० | १०० | १०१ | ८.०८ | ६.०५ | ४.१३ | ४.८१ | -५.२७ |
| 'ई' वर्ग | ५८ | ४८ | ४७ | २.७६ | १.५४ | १.०३ | २२.११ | -७.२४ |
| 'उ' वर्ग | १४ | १६ | ११ | ०.३० | ०.२५ | ०.११ | १६.९० | -३९.०७ |

संदर्भ : भारतीय जनगणना अहवाल १९९१.

नगरांची नागरीकरण प्रवृत्ती घटत आहे व मोठ्या नगरांची वाढत आहे. महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्येचा सन १९७१-८१ दशकातील वृध्दिदर ३९.९९ टक्के होता तर सन १९८१-९१ या दशकातील वृध्दिदर ३८.६६ टक्के एवढा होता.

### ३.१३ भारतातील स्थलांतरण प्रवाह :

डॉ. संजीवनी मुळे यांनी स्थलांतरण प्रवाह ग्रामीण ते ग्रामीण, ग्रामीण ते नागरी, नागरी ते ग्रामीण, नागरी ते नागरी अशा चार प्रकारांत मांडले आहेत. भारतामध्ये नागरी भागातील उत्पादकता आधुनिक तंत्रज्ञानामुळे वाढत आहे. त्यामुळे रोजगारक्षमता वाढत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातून नागरी भागात स्थलांतरण केले जात आहे. व्ही. व्ही. सुब्रम्हण्यम (१९९८)[२१] यांच्या मते, ''ग्रामीण भागातील गरिबीमुळे नागरी भागात स्थलांतरण केले जात आहे. म्हणूनच भारतातील नागरीकरण वाढत आहे. नगरांत होणारे स्थलांतरण नगरातून बाहेर पडणाऱ्या स्थलांतरापेक्षा जास्त

असल्यामुळे नागरीकरण वाढत आहे.'' भारतातील स्थलांतरण प्रवाहाची प्रवृत्ती तक्ता क्र. ३.१३ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

तक्ता क्र. ३.१३ वरून असे स्पष्ट होते, की १९९१ मध्ये ग्रामीण भागातून नागरी भागात व नागरी भागातून नागरी भागात होणाऱ्या स्थलांतरात महिलांचा हिस्सा पुरुषापेक्षा जास्त आहे. कारण महिला आपल्या विवाहानंतर आपल्या पतीकडे जातात, त्यामुळे महिलांचा स्थलांतरातील वाटा जास्त आहे. एकूण स्थलांतरात विवाहामुळे

**तक्ता क्र. ३.१३ ग्रामीण भागातून नागरी भागात व नागरी भागातून नागरी भागात झालेले स्थलांतरण (टक्केवारी १९९१)**

| स्थलांतराचे कारण | ग्रामीण भागातून नागरी भागात झालेले स्थलांतरण | | | नागरी भागातून नागरी भागात झालेले स्थलांतरण | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | पुरुष | महिला | एकूण | पुरुष | महिला |
| एकूण स्थलांतरण | ६.३६ | ५.६४ | ७.१२ | १२.१५ | १०.०५ | १४.५३ |
| रोजगारासाठी | १.३४ | २.३४ | ०.२८ | २.१९ | ३.६० | ०.६१ |
| व्यवसायासाठी | ०.३१ | ०.५४ | ०.०६ | ०.५२ | ०.८५ | ०.१५ |
| शिक्षणासाठी | ०.२६ | ०.३७ | ०.१४ | ०.३६ | ०.४६ | ०.२५ |
| कुटुंबाची हालचाल | १.५० | १.२९ | १.७३ | ३.३७ | २.८२ | ३.९८ |
| लग्नामुळे | २.०४ | ०.१२ | ४.०९ | ३.६७ | ०.१९ | ७.५६ |
| नैसर्गिक आपत्तीमुळे | ०.०२ | ०.०२ | ०.०१ | ०.०२ | ०.०२ | ०.०२ |
| इतर | ०.८५ | ०.९३ | ०.७३ | २.०० | २.०७ | १.९२ |

**टीप :** १) टक्केवारी एकूण ग्रामीण व नागरी लोकसंख्येशी तुलना करुन काढली आहे.

२) पुरुष व महिला टक्केवारी एकूण ग्रामीण व नागरी पुरुष व स्त्री लोकसंख्येशी तुलना करून काढली आहे.

होणारे स्थलांतरण जास्त आहे. दुसऱ्या क्रमांकावर कुटुंबाच्या हालचालीमुळे तर तिसरा क्रमांक रोजगारामुळे होणाऱ्या स्थलांतराचा लागतो. ग्रामीण स्थलांतरापेक्षा लहान नगरांतून मोठ्या नगरांत होणाऱ्या स्थलांतराचे प्रमाण जास्त आढळून आले आहे; कारण लहान नगरांमध्ये व्यावसायिक, औद्योगिक, सामाजिक विकास ग्रामीण भागापेक्षा जास्त झालेला आहे. त्यामुळे लहान नगरांतून मोठ्या नगरात होणारे स्थलांतरण ग्रामीण स्थलांतरापेक्षा जास्त आढळून आले. लोकसंख्येच्या दृष्टीने ग्रामीण स्थलांतरण नागरी भागापेक्षा जास्त आहे. सन १९९१ मध्ये भारतातील ग्रामीण भागातून नागरी भागातील एकूण स्थलांतरण ६.३६ टक्के असून; ५.६४ टक्के पुरुष तर ७.१२ टक्के महिला स्थलांतरण आहे. याचवर्षी नागरी भागातून नागरी भागात झालेले एकूण स्थलांतरण १२.१५ टक्के असून, यामध्ये पुरुषांचे स्थलांतरण १०.०५ टक्के तर महिलांचे स्थलांतरण १४.१३ टक्के आहे. स्थलांरणाच्या कारणावरून असे स्पष्ट होते, की लग्न आणि रोजगार या दोन कारणांमुळे सर्वाधिक स्थलांतरण झाले आहे.

**३.१३.१ वास्तव्यानुसार होणारे स्थलांतरण :**

तक्ता क्र. ३.१४ वरून असे स्पष्ट होते, की सन १९९१ मध्ये भारतामध्ये ग्रामीण भागातून नागरी भागात एकूण लोकसंख्येच्या ६.३६ टक्के लोक स्थलांतरित झालेले आहे, तर एकूण नागरी लोकसंख्येपैकी १२.०५ टक्के लोक स्थलांतरित झालेले आहे. वास्तव्यानुसार होणाऱ्या स्थलांतरातही स्त्रियांचाच हिस्सा जास्त आढळून येतो. भारतामध्ये अल्प कालखंडासाठी फार कमी स्थलांतरण केले जाते, तर दीर्घकाळासाठी जास्त स्थलांतरण केले जाते. कारण एखादा रोजगार मिळाल्यास व स्त्रियांचे लग्न झाल्यास स्त्री पतीकडे व रोजगारधारक कामाच्या ठिकाणी स्थायिक होतात. त्यामुळे

**तक्ता क्र. ३.१४ वास्तव्य करणाऱ्या कालखंडावरून स्थलांतरण (टक्केवारीत) (१९९१)**

| स्थलांतराचे कारण | ग्रामीण भागातून नागरी भागात झालेले स्थलांतरण (टक्केवारीत) | | | नागरी भागातून नागरी भागात झालेले स्थलांतरण (टक्केवारीत) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | पुरुष | महिला | एकूण | पुरुष | महिला |
| एकूण स्थलांतरण | ६.३६ | ५.६४ | ७.१२ | १२.०५ | १०.०५ | १४.५३ |
| १ वर्षापेक्षा जास्त | ०.२० | ०.२१ | ०.१९ | ०.४२ | ०.४० | ०.४४ |
| १ ते ४ वर्षे | १.३४ | १.२९ | १.४० | २.७५ | २.४१ | ३.४१ |
| ५ ते ९ वर्षे | १.१२ | ०.९९ | १.२५ | २.१४ | १.७० | २.६३ |
| १० ते १९ वर्षे | १.५८ | १.३५ | १.८२ | २.८७ | २.१९ | ३.६२ |
| २० वर्षे | १.५९ | १.२७ | १.९२ | २.७७ | २.१८ | ३.४३ |
| कालखंड नाही | ०.५१ | ०.५१७ | ०.५१५ | १.१८ | १.१३ | १.२३ |

**सूचना :**१) टक्केवारी एकूण ग्रामीण व नागरी लोकसंख्येशी तुलना करुन काढली आहे.

२) पुरुष व महिला टक्केवारी एकूण ग्रामीण व नागरी पुरुष व स्त्री लोकसंख्येशी तुलना करून काढली आहे.

कायम वास्तव्यासाठी जास्त स्थलांतरण झालेले आहे, हे स्पष्ट होते. वास्तव्यानुसार झालेल्या स्थलांतरणावरून असे दिसून येते, की सर्वाधिक २.८७ टक्के स्थलांतरण हे १० ते १९ वर्षासाठी झालेले आहे. एक वर्षापेक्षा कमी स्थलांतरण हे एक टक्क्यापेक्षाही

कमी दिसून येते.

### ३.१३.२ व्यावसायिक वर्गीकरणानुसार स्थलांतरण :

तक्ता क्र. ३.१५ मध्ये भारतातील व्यावसायिक वर्गीकरणानुसार स्थलांतरण दर्शविण्यात आले आहे. ग्रामीण भागातील एकूण लोकसंख्येपैकी २.३० टक्के कामगार

**तक्ता क्र. ३.१५ १९९१ च्या जनगणनेनुसार व्यावसायिक वर्गीकरणानुसार कामगारांचे स्थलांतरण (टक्केवारीत)**

| स्थलांतराचे कारण | ग्रामीण भागातून नागरी भागात झालेले स्थलांतरण (टक्केवारीत) | | | नागरी भागातून नागरी भागात झालेले स्थलांतरण (टक्केवारीत) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | पुरुष | महिला | एकूण | पुरुष | महिला |
| एकूण स्थलांतरित | २.३० | ३.७५ | ०.७५ | ३.८४ | ६.०५ | १.३७ |
| कामगार | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |
| शेतकरी | ३.२९ | २.४३ | ७.८४ | १.३० | १.०६ | २.४७ |
| शेतमजूर | ६.४७ | ३.४२ | २२.५१ | २.४५ | १.५४ | ६.९५ |
| घरगुती | २.३६ | १.४७ | ७.०४ | २.०८ | १.३४ | ५.७२ |
| इतर व्यवसाय | ८७.८५ | ९२.६६ | ६२.५९ | ९४.१५ | ९६.०४ | ८४.८५ |

**टीप :** १) टक्केवारी एकूण ग्रामीण व नागरी लोकसंख्येशी तुलना करुन काढली आहे.

२) पुरुष व महिला टक्केवारी एकूण ग्रामीण व नागरी पुरुष व महिला लोकसंख्येशी तुलना करून काढली आहे.

नागरी भागात व्यवसायासाठी स्थलांतरित झालेले आहेत. यामध्ये महिलांचे प्रमाण ०.७५ टक्के, तर पुरुषांचे ३.७५ टक्के आहे. नागरी भागातून नागरी भागात व्यवसायासाठी एकूण ३.८४ टक्के स्थलांतरण झाले असून, या कारणामुळे ६.०५ टक्के पुरुष व १.३७ टक्के महिला स्थलांतरण झाले आहे. एकूण कामगारांच्या स्थलांतरात (ग्रामीण व नागरी) स्त्रियांचा वाटा पुरुषांपेक्षा कमी आढळून आला आहे. कारण रोजगारासाठी, स्त्रीकामगार कमी स्थलांतरित होतात. पुरुष हा कुटुंबप्रमुख असल्यामुळे पुरुषच कुटूंबाचे पोषण करण्यासाठी जास्त स्थलांतरित होतात, स्त्रिया कमी स्थलांतरित होतात. अशा प्रकारे ग्रामीण भागातून नागरी भागात व लहान नगरातून मोठ्या नगरात स्थलांतरण होत असल्यामुळे भारतातील नागरीकरण प्रवृत्ती वाढत आहे. तक्ता क्र. ३.१५ वरून असे स्पष्ट होते, की इतर व्यवसायांसाठी झालेले स्थलांतरण सर्वाधिक ९४ टक्क्यांपर्यंत आहे

**सारांश :**

नागरीकरणाची ओळख आर्थिक, सामाजिक, नगर रचना, नगरातील कार्यात्मकता, शासकीय प्रदेश, स्थानिक शासन संस्था या निकषांवरून होते. नागरी भागातील ६० ते ७५ टक्के लोकांचा मुख्य व्यवसाय बिगर कृषी असतो. नगरे त्या-त्या भागातील मुख्य केंद्रे असतात; म्हणून व्यक्तीची सामाजिक वागणूक बदलून वैचारिक पातळीमध्ये बदल होतो. नवीन व्यवसाय सुरू करून आर्थिक रचना बदलली जाते. प्रति चौ.कि.मी. लोकसंख्या घनता ४०० पेक्षा जास्त होते. त्या ठिकाणी नगरपालिका असते. विविध सुविधांचा पुरवठा ग्रामीण भागापेक्षा जास्त असतो वाहतुकीच्या सुविधा उपलब्ध

असतात, बाजारात विविधता असते. नागरीकरणामुळे सांस्कृतिक देवाण-घेवाण होते, जगण्यामध्ये आधुनिकता व फॅशन असते... अशा ठिकाणाला नगर म्हटले आहे.

महाराष्ट्राचा नागरीकरणाचा अभ्यास पी. एल. चौधरी, एच. डी. कोपर्डेकर, डॉ. अ. ब. देवगिरीकर, के. बालसुब्रम्हण्यम, डॉ. श्रीराम पेडगांवकर, डॉ. जफा पाटील व अजित डांगे या विविध तज्ज्ञांनी केला आहे. या सर्व तज्ज्ञांच्या मते, ''महाराष्ट्रात नागरीकरण प्रवृत्ती ही इतर राज्यांच्या तुलनेत जास्त आहे. तसेच महाराष्ट्रातील मराठवाडा व विदर्भाचे नागरीकरण पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत कमी झाले आहे. महाराष्ट्राच्या नागरीकरणात औद्योगिकीकरणाचा सिंहाचा वाटा असल्याचे दिसून येते तसेच नागरीकरणामुळे राज्यातील जिल्हा-जिल्हा व जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये विकासाचा असमतोल दिसून आला आहे. तसेच नागरीकरणाची दिशा लहान नगरांकडून मोठ्या नगरांकडे असल्याचे आढळून आले आहे.''

स्थलांतरासंबंधी लेविस, तोडारो, टोली थॉमस या विविध विचारवंतांनी आपली मते मांडली आहेत. लेविसच्या मते, ''ग्रामीण वेतनदारापेक्षा शहरी वेतनदार ३० टक्क्यांपेक्षा जास्त असतो, म्हणून ग्रामीण स्थलांतरण वाढून नागरीकरण वाढत आहे.'' तोडारोच्या मते, ''ग्रामीण व नागरी भागातील वास्तव उत्पन्नातील भिन्नतेमुळे व नागरी भागातील रोजगाराच्या संधीमुळे ग्रामीण भागातून नागरी भागात स्थलांतरण केले जाते.'' टोली थॉमस यांच्या मते, नगरांनी उत्पादनात वैशिष्ट्यीकरण प्राप्त केल्यामुळे उत्पादनाचे घटक त्याकडे आपोआपच आकर्षिले जातात. त्यामुळे नागरीकरण वाढत जाते.'' सोवनी यांच्या मते, ''आकर्षण व प्रतिआकर्षण या दोन घटकांमुळे ग्रामीण भागातून नागरी भागात कामगारांचे, विद्यार्थ्यांचे, विलासी जीवन जगणाऱ्यांचे

स्थलांतरण होऊन नागरीकरण वाढते.'' ए. एल. चौधरी यांच्या मते, ''व्यवसाय, शिक्षण, जात, वय, लिंगभेद यांमुळे ग्रामीण भागातून नागरी भागात स्थलांतरण केले जाते.'' मोहन व कन्नापान यांच्या मते, ''नागरी भागातील वाढत्या संघटित व असंघटित क्षेत्रामुळे रोजगार निर्माण होऊन ग्रामीण स्थलांतरण वाढत आहे. त्यामुळे नागरीकरण वाढत आहे.'' अशी विविध मते विविध विचारवंतांनी मांडली आहेत.

सन १९०१ मध्ये विकसित राष्ट्रांचे नागरीकरण ३० टक्के झाले होते; तर भारताचे नागरीकरण ११ टक्के झाले. सन १९९१ मध्ये विकसित राष्ट्रांचे नागरीकरण ८० टक्के झाले होते, तर भारताचे नागरीकरण २६ टक्के झाले. भारतात प्राचीन कालखंडात धार्मिक नावावरून, राजधान्या, लघुउद्योग यांमुळे अपेक्षित नागरीकरण घडून आलेले होते; परंतु मुघल कालखंडात भारतातील लघुउद्योगांचा नायनाट झाला, त्यामुळे भारतातील नागरीकरण कमी झालेले आढळून येते; परंतु जेव्हा ब्रिटिश सत्ता भारतात सत्तेवर आली तेव्हा ब्रिटिशांनी स्वतःच्या स्वार्थासाठी ग्रामीण भागात लघुउद्योग केंद्रे, कच्चामाल केंद्रे, व्यापारी केंद्रे, थंड हवेची केंद्रे विकसित केली. त्यामुळे अशा ठिकाणी विविध सुविधा वाढून नागरीकरणास सुरुवात झाली, त्याचा परिणाम नागरीकरण वाढीवर झाला आहे. सन १९०१ ते सन १९५१ या काळात भारताचे नागरीकरण ६.३५ टक्क्यांनी वाढले असून सन १९५१ ते सन १९९१ या काळात ८.४२ टक्क्यांनी वाढले. म्हणजेच ब्रिटिशांच्या तुलनेतही भारत सरकारने नागरीकरण वाढवण्यास फारसे प्रयत्न केलेले दिसून येत नाहीत. भारताला स्वातंत्र्य मिळूनही फारसे नागरीकरण वाढलेले नाही असेच चित्र स्पष्ट होते. भारतातील मोठया नगरांची नागरीकरण प्रवृत्ती वेगाने वाढली आहे, तर लहान नगरांची नागरीकरण प्रवृत्ती वेगाने

घटली आहे. सन १९०१ मध्ये भारतातील **अ** वर्ग नगरात एकूण नागरी लोकसंख्येच्या २६.०० टक्के लोक राहत होते, तर सन १९९१ मध्ये ६५.२० टक्के लोक राहत होते. इतर नागरी शहरांत सन १९०१ मध्ये २६.२४ टक्के लोक राहत होते, हे प्रमाण सन १९९१ मध्ये २.८९ टक्क्यांपर्यंत कमी झाले. म्हणजेच मोठया नगरांचा औद्योगिक, आर्थिक, व्यावसायिक विकास झाल्यामुळे ग्रामीण भागातील व लहान नगरांमधील अनेक लोक रोजगारासाठीश, व्यवसायासाठी, शिक्षणासाठी मोठया नगरांमध्ये स्थलांतरित झालेले आहेत.

भारतात महानगरांची नागरीकरण प्रवृत्ती वेगाने वाढत असल्याचे दिसून येते. सन १९०१ पासून सन १९९१ पर्यंत भारतातील महानगरांची संख्या १ वरून २३ पर्यंत पोहोचली. या महानगरांच्या लोकसंख्येचा एकूण नागरी लोकसख्येत सन १९०१ मध्ये ५.८४ टक्के इतका वाटा होता, तो सन १९९१ मध्ये ३२.५४ टक्क्यांपर्यंत वाढला. म्हणजे महानगरांची नागरीकरण प्रवृत्ती वेगाने वाढली आहे. महाराष्ट्र हे नागरीकरणाच्या बाबतीत प्रथम क्रमांकाचे राज्य असल्याचे दिसून येते. सन १९९१ मध्ये सर्वांत जास्त नागरीकरण महाराष्ट्राचे (३८.९१ टक्के) होते. त्याखालोखाल गुजरात व कर्नाटक राज्यांचा क्रमांक लागतो. तर सर्वांत कमी नागरीकरण आसामचे (११.०८टक्के) आहे. सन १९९१ मध्ये महाराष्ट्रातील नागरीकरण पातळी (२६.०० टक्के) भारताच्या सरासरी नागरीकरण पातळीपेक्षा (१३.३७ टक्के) १२.७३ प्रतिशतने जास्त आहे. सन १९९१ मध्ये ग्रामीण भागातून नागरी भागात ६.३६ टक्के लोकांचे स्थलांतरण झालेले आहे; तर नागरी भागातून नागरी भागात होणारे स्थलांतरण १२.१५ टक्के आढळून आले आहे. भारतातील नागरी भागातील नैसर्गिक लोकसंख्यावाढीमुळे

नागरीकरण जास्त वाढत असल्याचे दिसून येते. सन १९९१ मध्ये भारताच्या नागरी भागातील नैसर्गिक लोकसंख्यावाढीचा दर १००० व्यक्तीमागे १४ होता.

**संदर्भ:**


१. के.पी.एम., सुंदरम आणि रुद्रदत्त (१९९८) : भारतीय अर्थव्यवस्था, एस. चाँद आणि कम्पनी लि., रामनगर, नवी दिल्ली.

२. शरद कोलारकर (१९९३) : प्राचीन भारताचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, श्री शांतीदुर्ग निवास, रामदास पेठ, नागपूर

३. शरद कोलारकर (१९९३) : प्राचीन भारताचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, श्री शांतीदुर्ग निवास, रामदास पेठ, नागपूर

४. चौधरी, शिंदे आणि देशमुख (१९९४) : "भूगोल शास्त्राची मूलतत्त्वे", हिमालया पब्लिशिंग हाऊस, रामदूत, डॉ. भालेराव मार्ग, गिरगाव.

५. डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे (१९९०) : भारतीय राज्य व्यवस्था, पिंपळापुरे आणि कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

६. योजना, २८ फेब्रुवारी १९९३

७. डॉ. अरविंद दुनाखे (१९९८) : प्रागतिक शैक्षणिक तत्त्वज्ञान, नुतन प्रकाशन, पुणे.

८. भुजंगराव कुलकर्णी (१९९८), मराठवाड्याचा विकास : अभ्यास व चिंतन, पद्मा प्रकाशन, औरंगाबाद.

९. डॉ. व्ही. एम. दांडेकर समितीचा अहवाल (१९८४) : महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीचा अहवाल, महाराष्ट्र शासन.

१०. डॉ. रंजना जैन (१९९९) : लोकसंख्येचे अध्ययन, रिसर्च पब्लिकेशन हाऊस, जयपूर.

११. प्रा. नी. स. वैद्य (१९८७) : सामाजिक विचारवंत, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, साहित्य प्रसार केंद्र, सीताबर्डी, नागपूर.

१२. R.Ramchandram (1989) : Urbanisation and Urban system in India, Oxford University Press, Bombay.

१३. Ralph Thomilion (1969) : Urban Structure - The Social and Spatial Character of Cities, published by Random House, New York USA.

१४. Census of India (1991) : Serrious - १, Paper - २, Provisional Population : Total Rural Urban Distributation, Registar General India.

१५. David L. Sillis (1968) : International Encyclopedia of the social science, Vol-12, No. 14, The Mc.Million Company & The Free Press, USA.

१६. Shamsharishing (1994) : Development Planning and Policies, Anmol Publications Pvt. Ltd., New delhi.

१७. R.R. Lekhi & Joginder Singh (1993) : Migration and Remittance Interurban Linkages, Sage Publications (India) Ltd. New Delhi.

१८. Jayashri Roy Choudhari (1993) : Migration and Remittance Interurban linkages, Sage Publications (India), New Delhi.

१९. Orrisa Economic Journal, (1995) : Vol-XX, VII, No. 1,2. Orrisa Association, Bhubaneshwar.

२०. Mahadev Godbole (१९९०) : Rural Employment Strategy, Himalaya Publishing House, Delhi.

२१. Arup Mitra (1964) : Urbanisation slums Informal sector, Employment and Poverty : An Exploratory study, B.R. Publishing Corporation (A division of D.K. Publishers, Distributors (Pvt.) Ltd., Delhi.

# प्रकरण - चौथे

## उस्मानाबाद व सोलापूर शहरातील नागरीकरणाची प्रवृत्ती

### ४.१ प्रस्तावना:

महाराष्ट्र हे औद्योगिककीकरणाच्या व शहरीकरणाच्या बाबतीत देशातील प्रथम क्रमांकाचे राज्य आहे; परंतु महाराष्ट्रामध्ये मराठवाडा व विदर्भ हे दोन विभाग मागासलेले आहेत. या मागास मराठवाड्यात उस्मानाबाद शहराचा अंर्तभाव होतो. पर्यायानेच या शहरांचा औद्योगिक, आर्थिक व सामाजिक विकास कमी झाला आहे.

महाराष्ट्रात पश्चिम महाराष्ट्र हा विभाग औद्योगिकदृष्ट्या विकसित आहे. या विभागात सन १९८१ नंतर प्रति लाख लोकसंख्येमागे कारखान्यांतील कामगारांची संख्या १९६९.९२ आहे. हेच प्रमाण मुंबई, पुणे, ठाणे जिल्ह्यांत अनुक्रमे ४३०३.७८, २२१५.५२, २७११.४६ आहे; तर उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यात हेच प्रमाण अनुक्रमे ३७९.२९ व ८२२.८७ आहे. म्हणजेच औद्योगिकदृष्ट्या हे दोन्ही जिल्हे मागास आहेत. दांडेकर समितीच्या अहवालानुसार (१९८४) १९७८-७९ मध्ये देशांतर्गत उत्पादनाचे आकडे घेऊन महाराष्ट्र राज्यातून बृहन्मुंबई वगळून राज्याची सरासरी १०० धरली तर पश्चिम महाराष्ट्र १०६.४२, विदर्भ ८४.६६ आणि मराठवाडा ८१.०६ रुपये दरडोई उत्पन्न आहे. म्हणजेच मराठवाडा मागास आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे सोलापूर जिल्हा विकासात पुढे आहे तर उस्मानाबाद जिल्हा विकासात मागे आहे.[१]

पश्चिम महाराष्ट्रातील शेती विकासासाठी जलसिंचन सुविधांचा पुरवठा करण्यासाठी मोठमोठी धरणे बांधून हेतुतः कृषी विकास घडवून आणला आहे. सन २००१ साली सोलापूर जिल्ह्यातील दर हेक्टरी कृषी उत्पादनाचे मूल्य अनुक्रमे १५८५९

तर सन २०११ मध्ये १८८०१ रुपये आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील दर हेक्टरी कृषी उत्पादन मूल्य २००१ मध्ये ८५९१ रुपये व २०११ मध्ये १०८५९ रुपये आहे व महाराष्ट्राचे सरासरी मूल्य १२४३१ रुपये आहे.

मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत नैसर्गिक संपत्ती विपुल आहे. या उस्मानाबाद जिल्ह्यातून मांजरा नदी व तिच्या उपनद्या वाहतात; परंतु जलसंपत्तीचा उपयोग फारसा घेतलेला नाही. तर सोलापूर जिल्ह्यात जलसिंचनाचा भरपूर उपयोग घेतला गेला आहे. भीमा नदीवर माढा तालुक्यात उजनी येथे मोठे धरण बांधण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्वांत मोठा असा हा प्रकल्प आहे. याचा लाभ माढा, मंगळवेढा, पंढरपूर, माळशिरस, मोहोळ व उत्तर सोलापूर या तालुक्यांना होतो.

उस्मानाबाद जिल्ह्यातील वनक्षेत्राचा अभ्यास केला तर सन १९८१ मध्ये ३००० हेक्टर, सन २००१ मध्ये २००० हेक्टर वनक्षेत्र शिल्लक राहिले आहे. याच्या तुलनेत सोलापूर जिल्ह्यात सन २००१ मध्ये ३६००० हेक्टर वनक्षेत्र आहे. उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील एकूण लागवडीखालील कृषी क्षेत्रापैकी जलसिंचनाखालील कृषीचे प्रमाण अनुक्रमे ७ व ५ टक्के आहे. म्हणूनच पश्चिम महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न (९७९७ रु.), सोलापूर (८७५६ रु.) व उस्मानाबाद (४२६३ रु.) जिल्ह्यापेक्षा जास्त आहे. त्यामुळेच शहरामधील कृषीवर आधारित उद्योगांचा, तृतीय क्षेत्राचा विकास सोलापूरमध्ये जास्त तर उस्मानाबाद जिल्ह्यात कमी झाला आहे. एकंदरीत दोन्ही जिल्ह्यांतील औद्योगिक, आर्थिक, कृषी, सामाजिक विकास असमतोल झाल्यामुळे शहरीकरण प्रवृत्ती कशी वाढली आहे. याचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात आला आहे.[२]

## ४.२ उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील शहरी लोकसंख्या:

तक्ता क्र. ४.१ मध्ये उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील सन १९८१ ते सन २०११ कालखंडातील नागरी लोकसंख्या व त्यांचे प्रमाण दर्शविण्यात आले आहे. सन १९८१ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी नागरी लोकसंख्येचे प्रमाण १२.४० टक्के एवढे होते, त्यात सतत वाढ होऊन सन १९९१ मध्ये ते १५.१९ टक्के, सन २००१ मध्ये १५.६९ टक्के, तर सन २०११ मध्ये हे प्रमाण १७.२५ टक्के झाले. सोलापूर जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी सन १९८१ मध्ये नागरीकरणाचे प्रमाण २९.६५ टक्के होते; ते सन २०११ मध्ये ३४.९९ टक्क्यांपर्यंत वाढले.

दोन्ही जिल्ह्यांतील नागरीकरण प्रवृत्ती महाराष्ट्राच्या सरासरी पातळीपेक्षा कमी आहे; तर उस्मानाबाद व सोलापूर जिल्हा यांची तुलना केली तर सोलापूर जिल्हा हा नागरीकरणाबाबत पूढे आहे. कारण औद्योगिकदृष्ट्या, कृषी विकासाच्या दृष्टीने, सेवा क्षेत्राच्या दृष्टीने सोलापूर जिल्हा पूढे आहे किंवा विकसित आहे; परंतू उस्मानाबाद जिल्हा हा सर्वच दृष्टींनी मागासलेला आहे, तसेच ऐतिहासिकदृष्ट्या या जिल्ह्यावर निजाम राजवट असल्यामुळे विकासाकडे दुर्लक्ष झालेले होते, त्यामुळे उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरीकरण कमी झाले आहे. उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील नागरी लोकसंख्येतील बदल सन १९८१-९१ या दशकात अनुक्रमे ३२.२४ टक्के व २४.४७ टक्के, तर सन २००१-११ या दशकात अनुक्रमे २२.८५ टक्के व ३१.९४ टक्के एवढा होता. उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्वांत जास्त नागरी लोकसंख्येतील बदल सन १९९१ या दशकात ४८.९२ टक्के व सर्वांत कमी बदल सन २००१ या दशकात २०.३१ टक्के झालेला दिसून येतो. सोलापूर जिल्ह्यातील सर्वांत जास्त नागरी लोकसंख्येतील बदल

### तक्ता क्र. ४.१ उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील एकूण शहरी लोकसंख्या

| वर्ष | उस्मानाबाद जिल्हा | | | | | सोलापूर जिल्हा | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शहरी लोकसंख्या | दशकातील फरक | दशकातील बदलाची टक्केवारी | उस्मानाबाद जिल्ह्याची एकूण लोकसंख्या | एकूण लोकसंख्येत शहरी लोकसंख्येचा वाटा (%) | शहरी लोकसंख्या | दशकातील फरक | दशकातील बदलाची टक्केवारी | सोलापूर जिल्हयाची एकूण लोकसंख्या | एकुण लोकसंख्येत शहरी लोकसंख्येचा वाटा (%) |
| १९८१ | १३०१८८ | ३१७३९ | ३२.२४ | १०२९७०२ | १२.४० | ७६७४६६ | १५०९१४ | २४.४७ | २५८८१३९ | २९.६५ |
| १९९१ | १९३८८० | ६३६९२ | ४८.९२ | १२७६३२७ | १५.१९ | ९२९४८३ | १६२०१७ | २१.११ | ३२३१०५७ | २८.७६ |
| २००१ | २३३२५६ | ३९३७६ | २०.३१ | १४८६५८६ | १५.६९ | १२२६२८२ | २९६७९९ | ३१.९३ | ३८५६५४३ | ३१.७९ |
| २०११ | २८६५४६ | ५३२९० | २२.८५ | १६६०३११ | १७.२५ | १६१७९३८ | ३९१६५६ | ३१.९४ | ४६२३८२४ | ३४.९९ |

स्त्रोतः १. उस्मानाबाद जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २००१.

२. सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २००१

सन २०११ या दशकात ३१.९४ टक्के व सर्वात कमी बदल सन १९९१ साली २१.११ टक्के झालेला आहे.[३]

## ४.३ सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील शहरी लोकसंख्या :

सन १९८१-२००१ या कालखंडातील उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील शहरनिहाय लोकसंख्यावाढीचा दशवार्षिक वृद्धिदर तक्ता क्र. ४.२ मध्ये दर्शविण्यात आला आहे. उस्मानाबाद जिल्ह्यात सन १९८१-९१ या दशकात सर्वात जास्त लोकसंख्या वृद्धी उस्मानाबाद शहराची आहे व सर्वात कमी परंडा नगराची राहिली आहे. सन  १९९१-२००१ या दशकांत सर्वात जास्त लोकसंख्या वृद्धी तुळजापूर (२४.७६टक्के) नगराची राहिली आहे व सर्वात कमी वृद्धी कळंब व उमरगा (१३.७० टक्के) नगराची आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये सन १९९१-२००१ या दशकातील सर्वाधिक लोकसंख्या वृद्धिदर फक्त सोलापूर (३३.७० टक्के) व सांगोला (२९.६५ टक्के) एवढा आहे. कारण व्यावसायिकदृष्ट्या ही नगरे पुढारलेली दिसून येतात. तसेच जिल्हा मुख्यालयाचे ठिकाण असल्यामुळे अनेक लोक सोलापूर नगरामध्ये रोजगारासाठी स्थलांतरित झालेले आहेत.

उस्मानाबाद व सोलापूर नगरातील लोकसंख्येचा दशवार्षिक वृद्धिदर हा त्या-त्या जिल्ह्यातील नगरांपेक्षा जास्त दिसून येतो. कारण दोन्ही नगरे जिल्हा मुख्यालयाची ठिकाणे आहेत. दोन्ही नगरांचा व्यावसायिक, शैक्षणिक विकास इतर नगरांपेक्षा जास्त झाला आहे. सन १९८१ ते २००१ या कालखंडातील उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरी लोकसंख्येचा सरासरी वृद्धिदर ३.१७ टक्के होता तर सोलापूर जिल्ह्याचा हा दर १.५७ टक्के होता. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये सर्वाधिक वार्षिक वृद्धिदर उस्मानाबाद शहराचा

**तक्ता क्र. ४.२ उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्याच्या शहरी भागातील लोकसंख्या वृद्धिदर (टक्केवारीत)**

| उस्मानाबाद जिल्हा | | | | सोलापूर जिल्हा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शहरांची नावे | १९८१-९१ | १९९१-२००१ | १९८१-२००१ कालखंडातील सरासरी वार्षिक वृध्दीदर | शहरांची नावे | १९८१-९१ | १९९१-२००१ | १९८१-२००१ कालखंडातील सरासरी वार्षिक वृद्धिदर |
| उस्मानाबाद | + ७४.१० | + १५.६२ | ४.४८ | सोलापूर | + १८.६६ | + ३३.७० | २.६१ |
| कळंब | + ४४.०५ | + १३.७० | २.८८ | करमाळा | + १५.४१ | + ११.६१ | १.३५ |
| उमरगा | + ३८.७९ | + १३.७० | ३.१७ | कुर्डूवाडी | + ९.९१ | + ५.३४ | ०.७६ |
| तुळजापूर | + ३४.९० | + २४.७६ | ३.१७ | बार्शी | + २०.१७ | + १६.५० | १.८३ |
| परंडा | + ३०.९६ | + १६.०१ | २.३४ | पंढरपूर | + २१.५२ | + १३.४० | १.७४ |
| भूम | + ४४.२१ | + १५.२२ | २.९७ | सांगोला | + ३३.६२ | + २९.६५ | ३.१६ |
| | | | | मंगळवेढा | + १५.६७ | + ९.९० | ०.२७ |
| | | | | अक्कलकोट | + २१.५९ | + ८.१० | १.४८ |
| | | | | मैंदगी | + ११.९२ | - २.७२ | ०.७३ |
| | | | | दुधनी | + २१.१२ | + ११.५५ | १.७८ |
| सरासरी | | | ३.१७ | सरासरी | | | १.५७ |

स्त्रोत : १. उस्मानाबाद जिल्हा जनगणना पुस्तिका, १९८१, १९९१ २००१.

२. सोलापूर जिल्हा जनगणना पुस्तिका, १९८१, १९९१ २००१..

४.४८ टक्के तर उमरगा नगराचा ३.१७ टक्के एवढा सरासरी वार्षिक वृद्धिदर दिसून येतो. सोलापूर जिल्ह्यामध्ये सरासरी वार्षिक वृद्धिदर सर्वांत जास्त सांगोला नगराचा ३.१६ टक्के व सोलापूर नगराचा २.६१ टक्के आढळून येतो; तर सर्वात कमी सरासरी वार्षिक वृद्धिदर कुर्डुवाडी व मैंदर्गी नगराचा अनुक्रमे ०.७६ टक्के व ०.७३ टक्के आहे. कारण कुर्डुवाडी नगर हे फक्त रेल्वे जंक्शन असल्यानेच मोठे झाले आहे, तर मैंदर्गी नगरात थोडाफार औद्योगिक विकास आहे; परंतु तो बंद पडण्याच्या मार्गावर आहे.

## ४.४ नागरी लोकसंख्येतील नगरांचा वाटा:

सन १९८१ ते २००१ कालखंडातील दोन्ही जिल्ह्यांच्या नागरी लोकसंख्येतील नगरांचा वाटा तक्ता क्र. ४.३ मध्ये दर्शविण्यात आला आहे. उस्मानाबाद, तुळजापूर व परंडा शहराचा वाटा सन १९८१ ते २००१ कालखंडापर्यंत सतत वाढल्याचे दिसून येते. सन १९८१ मध्ये नागरी लोकसंख्येत उस्मानाबाद शहराचा वाटा ५५.४५ टक्के होता. त्यात सतत वाढ होऊन तो सन २००१ मध्ये ६१.११ टक्के झाला. याला कारण औद्योगिकीकरण आहे. यानंतर तुळजापूर शहराचा वाटा सन १९८१ मध्ये १४.६३ टक्के होता, त्यात वाढ होऊन सन २००१ मध्ये १६.२७ टक्के झाला. या वाढीचे प्रमुख कारण धार्मिक क्षेत्राचा विकास हा आहे.

सोलापूर जिल्ह्यामध्ये नगरी लोकसंख्येत सोलापूर शहराचा वाटा सन १९८१-१९९१ दशकात २०.३९ टक्के होता तो सन १९९१ ते २००१ या दशकात ३९.९१ टक्क्यांपर्यंत वाढला; तर कुर्डुवाडी, करमाळा, बार्शी, सांगोला, मंगळवेढा, मैंदर्गी व दुधनी शहराचा वाटा सतत घटत गेला, तर सोलापूर शहराचा वाटा सतत वाढत गेला, कारण सोलापूर जिल्ह्याचे ठिकाण असल्याने औद्योगिक, सामाजिक व आर्थिक

**तक्ता क्र. ४.३ उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील एकूण नागरी लोकसंख्येत प्रत्येक नगराचा वाटा (टक्केवारीत)**

| **उस्मानाबाद जिल्हा** | | | | | **सोलापूर जिल्हा** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शहरांची नावे | १९८१ % | १९९१ % | २००१ % | १९८१-२००१ कालखंडातील प्रत्येक नगराचा वाटा | शहरांची नावे | १९८१ % | १९९१ % | २००१ % | १९८१-२००१ कालखंडातील प्रत्येक नगराचा वाटा |
| उस्मानाबाद | ५५.४५ | ५८.३४ | ६१.११ | ५८.३ | सोलापूर | २०.३९ | ३३.५० | ३९.११ | ३१ |
| कळंब | ९.५२ | ८.२ | ६.३५ | ८.०२ | करमाळा | ९.१४ | ७.५५ | ६.६८ | ७.७९ |
| उमरगा | ६.२५ | ५.८५ | ४.७५ | ५.६२ | कुर्डूवाडी | ८.७४ | ७.५९ | ६.९५ | ७.७६ |
| तुळजापूर | १४.६३ | १५.६४ | १६.२७ | १५.५१ | बार्शी | ८.४३ | ६.९५ | ६.०५ | ७.१४ |
| परंडा | ३.५४ | ५.६० | ५.७० | ४.९५ | पंढरपूर | १९.०० | १५.७३ | १६.९८ | १७.२४ |
| भूम | ८.६३ | ५.९९ | ५.८३ | ६.८२ | सांगोला | ७.२४ | ६.९२ | ५.०४ | ६.४ |
| | | | | | मंगळवेढा | ९.९२ | ८.७४ | ६.५९ | ८.४२ |
| | | | | | अक्कलकोट | ५.७ | ४.६८ | ५.३० | ५.२३ |
| | | | | | मैंदगी | ५.०१ | ४.७५ | ४.५० | ४.७५ |
| | | | | | दुधनी | ५.७५ | ३.२५ | २.२० | ३.७३ |

स्त्रोत : १. उस्मानाबाद जिल्हा जनगणना पुस्तिका, १९८१, १९९१ २००१.

२. सोलापूर जिल्हा जनगणना पुस्तिका, १९८१, १९९१ २००१..

विकासाकडे शासन व राज्यकर्त्यांचे लक्ष जास्त आहे. त्यामुळे इतर शहरांचा वाटा घटत गेला आहे.

**४.५ शहराच्या आकारमानानुसार वर्गीकरण:**

सन २००१ च्या जनगणनेनुसार दोन्ही जिल्ह्यांतील एकूण लोकसंख्येचे शहरांच्या आकारमानानुसार वर्गीकरण तक्ता क्र. ४.४ मध्ये दर्शविण्यात आले आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरी लोकसंख्येतील वर्ग 'अ' शहरांचा वाटा ३४.५६ टक्के, वर्ग 'क' शहरांचा वाटा ४०.७७ टक्के, वर्ग 'ड' शहरांचा वाटा ९.८६ टक्के व वर्ग 'ई' शहरांचा वाटा १४.७९ टक्के आहे. सोलापूर जिल्ह्यातील नागरी लोकसंख्येतील वर्ग 'अ' शहरांचा वाटा ७९.७५ टक्के, वर्ग 'ब' शहरांचा वाटा ७.४५ टक्के, वर्ग 'क' शहरांचा वाटा ९.२२ टक्के व वर्ग ड शहरांचा वाटा ३.५६ टक्के आहे. म्हणजेच दोन्ही जिल्ह्यातील वर्ग अ शहरांचा वाटा जास्त आहे. कारण 'अ' वर्ग शहरांचा सर्वांगीण विकास होत आहे. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये क वर्ग शहरांचा शहरीकरणातील वाटा बराच जास्त आहे. कारण उस्मानाबाद जिल्ह्यातील शहरीकरण विकेंद्रित स्वरूपाचे झालेले आहे. लहान-लहान शहरांचा विकास बऱ्यापैकी झाला आहे. म्हणूनच 'क' वर्ग शहरांचा वाटा जास्त आहे. सोलापूर जिल्ह्यात क वर्ग शहरांचा वाटा ९.२२ टक्के आहे; कारण सोलापूर जिल्ह्यात शहरीकरणाची प्रवृत्ती केंद्रित स्वरूपाची आहे. महाराष्ट्राशी तुलना करता, महाराष्ट्राच्या शहरीकरणात उस्मानाबाद जिल्ह्यांतील 'अ' वर्ग शहरांचा वाटा ३.०३ टक्के तर सोलापूर जिल्ह्याचा वाटा ६.०६ टक्के आहे. म्हणजेच महाराष्ट्राच्या तुलनेत या दोन्ही जिल्ह्यांचा विकास कमी आहे. म्हणजेच दोन्ही जिल्ह्यांतील शहरीकरण विकेंद्रित स्वरूपाचे आहे. याचाच अर्थ लहान शहरांचे

**तक्ता क्र. ४.४ उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील लोकसंख्येचे शहराच्या आकारमानानुसार वर्गीकरण (२००१ च्या जनगणनेनुसार)**

| वर्गवारी | उस्मानाबाद जिल्ह्यातील शहरांची संख्या | उस्मानाबाद जिल्ह्याचे महाराष्टातील स्थान (%) | सोलापूर जिल्ह्यातील शहरांची संख्या | सोलापूर जिल्ह्याचे महाराष्टातील स्थान (%) | उस्मानाबाद जिल्ह्यात शहरात राहणारी लोकसंख्या | टक्केवारी | सोलापूर जिल्ह्यात शहरात राहणारी लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| I | १ | ३.०३ | २ | ६.०६ | ८०६२५ | ३४.५६ | ९७७२६३ | ७९.७५ |
| I I | - | - | १ | ३.३३ | - | - | ९१३७९ | ७.४५ |
| I I I | २ | १.७५ | ५ | ४.३८ | ९५११० | ४०.७७ | ११३००८ | ९.२२ |
| IV | १ | ०.९८ | २ | १.९६ | २३०२२ | ९.८६ | ४३६३५ | ३.५६ |
| V | २ | ४.३५ | - | - | ३४४९९ | १४.७९ | - | - |
| एकूण | ६ | १०.११ | १० | १५.७३ | २३३२५६ | १०० | १२२५२८४ | १०० |

स्त्रोत : १. उस्मानाबाद जिल्हा जनगणना पुस्तिका, १९८१, १९९१ २००१.
२. सोलापूर जिल्हा जनगणना पुस्तिका, १९८१, १९९१ २००१..

शहरीकरण दोन्ही जिल्ह्यांत महाराष्ट्राच्या तुलनेत जास्त झालेले आहे. त्यामुळेच 'अ' वर्ग शहरांचे शहरीकरण दोन्ही जिल्ह्यात कमी राहिले आहे.[४]

## ४.६ शहरी लोकसंख्येचे व्यावसायिक वर्गीकरण:

व्यवसायाचे प्रामुख्याने शेती, उद्योग व सेवा असे वर्गीकरण केले जाते; परंतु शहरी भागात शेती व्यवसायापेक्षा बिगरशेती व्यवसायाचे वर्चस्व जास्त असल्याचे दिसून येते. शहरातील व्यवसायातील विविधतेमुळे शहरीकरण प्रवृत्ती वाढत आहे. शहरी भागातील कामगारवर्ग प्रामुख्याने संघटित व असंघटित क्षेत्रामध्ये गुंतलेला आहे. शहरामध्ये शेती व्यवसायात कमी तर बिगरशेती व्यवसायात जास्त कामगार गुंतलेले असतात. भारतीय जनगणनेप्रमाणे शहरीकरणाच्या व्याख्येनुसार ज्या ठिकाणी ७५ टक्क्यांपेक्षा जास्त कामगार बिगरशेती व्यवसायात गुंतलेले असतात अशा ठिकाणाला शहर म्हणावे हा एक शहरीकरणाचा निकष आहे[५]. उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरी भागातील कामगारांचे शहरांच्या आकारमानानुसार सन १९८१ ते सन २००१ या कालावधीतील व्यवसायांनुसार वर्गीकरण तक्ता क्र. ४.५ मध्ये दर्शविण्यात आले आहे; तर सोलापूर जिल्ह्यातील हे वर्गीकरण तक्ता क्र. ४.६ मध्ये दर्शविण्यात आले आहे. शहरीकरण व बिगर कृषी क्षेत्राचा जवळचा संबंध असतो. वाढत्या शहरीकरणाबरोबर नागरी भागातील बिगर कृषी क्षेत्र वाढत जाते. लहान-लहान उद्योग, हॉटेल्स, औषधी दुकाने, कापड दुकाने, कृषीवर आधारित उद्योग, वाहतूक अशा विविध क्षेत्रांचा विकास होऊन कृषी क्षेत्राचे महत्त्व नागरी भागात कमी होत जाते. म्हणजेच नागरीकरण व बिगर कृषी क्षेत्र एकमेकांवर अवलंबून असल्याचेच दिसून येते.

सन १९८१ मध्ये उस्मानाबाद व सोलापूर या 'अ' वर्ग नगरामध्ये एकूण मुख्य

**तक्ता क्र. ४.५ उस्मानाबाद जिल्ह्यातील शहरी लोकसंख्येचे व्यावसायिक वर्गीकरण (१९८१ ते २००१, टक्केवारीत)**

| वर्गवारी | १९८१ | | | १९९१ | | | २००१ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शहरांची नावे | कृषी क्षेत्र | बिगर कृषी क्षेत्र | शहरांची नावे | कृषी क्षेत्र | बिगर कृषी क्षेत्र | शहरांची नावे | कृषी क्षेत्र | बिगर कृषी क्षेत्र |
| अ वर्ग | उस्मानाबाद | १७.७१ | १३.३६ | उस्मानाबाद | १७.७१ | १.६६ | उस्मानाबाद | १८.७१ | १४.४० |
| ब वर्ग | - | - | - | - | - | - | - | - | - |
| क वर्ग | तुळजापूर | २०.३५ | १६.६१ | तुळजापूर | २०.३५ | १६.६१ | तुळजापूर | १८.७८ | १६.६१ |
| | उमरगा | १९.५७ | १३.०७ | उमरगा | १९.५७ | १३.०७ | उमरगा | १५.४२ | ९.८५ |
| ड वर्ग | कळंब | १६.३९ | ९.३९ | कळंब | १६.३९ | ९.३९ | कळंब | १४.५० | ७.५० |
| | - | - | - | - | - | - | परंडा | १४.०९ | १८.६७ |
| | | | | | | | भूम | १०.१५ | २५.४० |
| ई वर्ग | परंडा | १४.०९ | १८.६७ | परंडा | १४.०९ | १८.६७ | | - | - |
| | भूम | ११.८५ | २८.७० | भूम | ११.८५ | २८.७० | | - | - |

स्त्रोत : १. उस्मानाबाद जिल्हा जनगणना पुस्तिका, १९८१, १९९१ २००१.

कामगारांपैकी बिगर कृषी क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण अनुक्रमे १३.६६ टक्के व ५.०० टक्के होते. म्हणजेच उस्मानाबाद शहरात सोलापूर शहरापेक्षा कृषी क्षेत्रात कमी कामगार आढळून आले आहेत. याचाच अर्थ विविध उद्योग व व्यवसाय, तृतीय क्षेत्र यांचा विकास उस्मानाबाद शहरात सोलापूर शहरापेक्षा जास्त झाला आहे. म्हणूनच सन १९८१ मध्ये उस्मानाबाद शहराची नागरीकरण प्रवृत्ती सोलापूर शहरापेक्षा जास्त होती. सन १९८१ मध्ये दोन्ही जिल्ह्यांतील 'क' वर्ग नगरांतील कामगारांची स्थिती पाहिली असता असे स्पष्ट होते, की उस्मानाबाद जिल्ह्यात तुळजापूर व उमरगा आणि सोलापूर जिल्ह्यात करमाळा, पंढरपूर, सांगोला व मंगळवेढा या नगरामध्ये ५० टक्क्क्यांपेक्षा जास्त कामगार बिगर कृषी क्षेत्रात गुंतलेले दिसून येतात. इतर नगरांमध्ये मात्र ५० टक्क्यांपेक्षा कमी कामगार बिगर कृषी क्षेत्रात गुंतलेले आहेत. म्हणजेच नागरीकरणाच्या एका निकषाची पूर्तता उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर, उमरगा आणि सोलापूर जिल्ह्यातील करमाळा, पंढरपूर, सांगोला व मंगळवेढा या नगरांनी पुर्ण केली आहे.

सन १९८१ मध्ये दोन्ही जिल्ह्यांतील 'ड' वर्ग नगरांमध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब नगरात ९.३९ व सोलापूर जिल्ह्यांतील बार्शी नगरात ८.५८ टक्के कामगार बिगर कृषी क्षेत्रात गुंतलेले आहेत. म्हणजेच कळंब व बार्शी या नगरांतील तृतीय क्षेत्राचा विकास अपेक्षित झाला आहे; तर सोलापूर जिल्ह्यातील या गटातील इतर नगरांमध्ये ६० ते ६५ टक्के कामगार बिगर कृषी क्षेत्रात गुंतलेले आहेत व ४० ते ३५ टक्के कामगार कृषी क्षेत्रात गुंतलेले आहेत. म्हणजेच या नगरांचा व्यावसायिक व तृतीय क्षेत्राचा विकास कमी झाल्याचे आढळून येते.

**तक्ता क्र. ४.६ सोलापूर जिल्ह्यातील शहरी लोकसंख्येचे व्यावसायिक वर्गीकरण (१९८१ ते २००१, टक्केवारीत)**

| वर्गवारी | १९८१ | | | १९९१ | | | २००१ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शहरांची नावे | कृषी क्षेत्र | बिगर कृषी क्षेत्र | शहरांची नावे | कृषी क्षेत्र | बिगर कृषी क्षेत्र | शहरांची नावे | कृषी क्षेत्र | बिगर कृषी क्षेत्र |
| अ वर्ग | सोलापूर | ४.३८ | ४.४९ | सोलापूर | ४.३८ | ४.४९ | सोलापूर | १८.७१ | १४.४० |
| ब वर्ग | - | - | - | - | - | - | - | - | - |
| क वर्ग | करमाळा | १०.०५ | १२.७९ | करमाळा | १०.०५ | १२.७९ | करमाळा | १८.७८ | १६.६१ |
| | पंढरपूर | ८.०२ | ८.०१ | पंढरपूर | ८.०२ | ८.०१ | पंढरपूर | १५.४२ | ९.८५ |
| | सांगोला | १०.०४ | १७.३८ | सांगोला | १०.०४ | १७.३८ | सांगोला | १४.५० | ७.५० |
| | मगळवेढा | ७.०० | ३.९३ | मगळवेढा | ७.०० | ३.९३ | मगळवेढा | १४.०९ | १८.६७ |
| ड वर्ग | अक्कलकोट | ८.७४ | ३.९९ | अक्कलकोट | ८.७४ | ३.९९ | अक्कलकोट | - | - |
| | बार्शी | ९.५६ | ८.५८ | बार्शी | ९.५६ | ८.५८ | बार्शी | - | - |
| | कुर्डूवाडी | ४.३० | ३.७८ | कुर्डूवाडी | ४.३० | ३.७८ | कुर्डूवाडी | - | - |
| ई वर्ग | मैंदगी | ५.४५ | ४.९८ | मैंदगी | ५.४५ | ४.९८ | मैंदगी | - | - |
| | दुधनी | ३.०२ | ३.५९ | दुधनी | ३.०२ | ३.५९ | दुधनी | - | - |

स्त्रोत : १. सोलापूर जिल्हा जनगणना पुस्तिका, १९८१, १९९१ २००१..

सन १९८१ मध्ये 'ई' वर्ग नगरांच्या गटात उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम नगरात २८.७० टक्के कामगार बिगर कृषी क्षेत्रात गुंतलेले आहेत. सोलापूर जिल्ह्यातील मैंदर्गी नगरात ४.९८ टक्के कामगार बिगर कृषी क्षेत्रात गुंतलेले आहेत. सन १९९१ मध्ये याच गटातील उस्मानाबाद व सोलापूर जिह्यातील नगरात काहीही फरक आढळत नाही. म्हणजेच विकासाची गती ही समान आहे; तर सन २००१ मध्ये या गटातील उस्मानाबाद व सोलापूर जिह्यातील नगरांची स्थिती बदललेली दिसून येते. म्हणजेच दोन्ही जिल्ह्यातील 'ई' वर्गातील नगरे 'ड' वर्गात समाविष्ट झालेली आहेत. याचाच अर्थ सभोवतालच्या भागातून अनेक लोक तृतीय व्यवसायात रस घेत आहेत.

सन १९९१ मध्ये 'अ' वर्ग नगरांमध्ये बिगर कृषी क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण उस्मानाबाद जिल्ह्यात उस्मानाबाद शहर १३.६६ टक्के तर सन २००१ मध्ये याच गटातील प्रमाण १४.४० टक्के दिसून येते; म्हणजेच सन १९८१ व सन १९९१ च्या तुलनेत सन २००१ मध्ये कृषी क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण वाढलेले दिसून येते. याचा अर्थ मात्र नागरीकरण कमी होत आहे, असा होत नसून नागरीकरण वाढत आहे; परंतु नागरी भागात विलीन झालेल्या खेड्यातील लोकांच्या मूळ व्यवसायात बदल झालेला नाही. तसेच नगरामध्ये राहूनही अनेक लोक नगरांभोवतालची शेती कसत आहेत, त्यामुळे या नगरात कृषी कामगारांचे प्रमाण वाढले आहे. अशीच परिस्थिती सोलापूर नगरातदेखील दिसून येते. सन १९९१ मध्ये ४.४९ टक्के बिगर कृषी क्षेत्रातील कामगार होते तर सन २००१ मध्ये बिगर कृषी क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण ५.०० टक्के आहे.

सन १९८१ ते सन २००१ मध्ये 'ब' वर्ग गटात दोन्ही जिल्ह्यांतील एकही नगर नाही. सन १९९१ मध्ये एकूण मुख्य कामगारांपैकी 'क' वर्ग गटातील उस्मानाबाद

जिल्ह्यातील तुळजापूर व उमरगा या नगरांमध्ये बिगर कृषी क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण अनुक्रमे १६.६१ व १३.०७ टक्के असल्याचे दिसून येते; तर सन २००१ मध्ये अनुक्रमे १६.६१ व ९.८५ टक्के आढळून आले आहे. सन १९९१ मध्ये 'क' वर्ग गटातील सोलापूर जिल्ह्यातील करमाळा, पंढरपूर, सांगोला व मंगळवेढा या नगरांमध्ये बिगर कृषी क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण अनुक्रमे १२.७९, ८.०१, १७.३८ व ३.९३ टक्के असल्याचे दिसून येते; तर सन २००१ मध्ये या नगरांशिवाय अक्कलकोट, बार्शी, कुर्डुवाडी, मैंदर्गी व दुधनी या नगरांचा समावेश झालेला आहे. यांचे प्रमाण ४.८८, ८.७१, ४.०५, ५.१५ व ३.६९ टक्के आहे. म्हणजेच या नगरांत उद्योग व व्यवसायांचे प्रमाण वाढल्यामुळे या नगरातील बिगर कृषी क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण वाढले आहे.

सन १९९१ मध्ये 'ड' वर्ग गटात उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब या नगरामध्ये एकूण कामगारांपैकी बिगर कृषी क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण ९.३९ टक्के होते तर सन २००१ मध्ये ७.५० टक्के झाले. याशिवाय सन २००१ मध्ये 'ई' वर्ग गटातील नगरे परंडा व भूम ही उच्च नागरीकरण गटात समाविष्ट झाली. यांचे प्रमाण अनुक्रमे १८.६७ व २५.४० टक्के आहे. म्हणजेच याही ठिकाणी व्यवसाय व उद्योग वाढलेले दिसून येतात. म्हणजेच सन १९९१ मध्ये 'ई' वर्गातील तृतीय क्षेत्र, सेवा क्षेत्र, औद्योगिक व व्यावसायिक विकास लोकसंख्या वाढीच्या तुलनेत कमी झाला आहे.

सन १९९१ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील 'ड' वर्ग गटात अक्कलकोट, बार्शी, कुर्डुवाडी, मैंदर्गी, दुधनी या नगरांमध्ये अनुक्रमे बिगर कृषी क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण ३.९९, ८.५८, ३.७८, ४.९८ व ३.५९ टक्के होते; तर सन २००१ मध्ये 'ड' वर्ग गटात एकही नगर नाही ही सर्व नगरे 'क' वर्गात समाविष्ट झालेली आहेत. सन १९९१ मध्ये

या ठिकाणी बिगर कृषी क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण वाढलेले होते; परंतू सन २००१ मध्ये औद्योगिक विकास झाल्यामुळे बिगर कृषी क्षेत्र घटलेले आहे. सन १९९१ मध्ये 'ई' वर्ग गटात फक्त उस्मानाबाद जिल्ह्यातील परंडा व भूम ही नगरे होती, तीही सन २००१ साली 'ड' वर्ग गटात समाविष्ट झाली आहेत.

एकंदरीत या दोन्ही जिल्ह्यांतील नगरांमध्ये कृषी क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण वाढले आहे; हे अनपेक्षित आहे; परंतु मागासपणाचेही एक लक्षण आहे. दोन्ही जिल्ह्यांत तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्था कमी आहेत; त्यामुळे कमी उद्योजक निर्माण झाले आहेत. त्यामुळे बिगर कृषी क्षेत्राचा विकास कमी झाल्याचे आढळून येते.

नागरीकरणाच्या वाढीबरोबर बिगर शेती क्षेत्रातील लोकसंख्येचे प्रमाण वाढते. नागरी लोकसंख्येचा आकार व बिगरशेती कामगारांचे प्रमाण यांच्यातील संबंध प्रतिपगमन विश्लेषणाच्या साहाय्याने अभ्यासण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यासाठी पुढील रेषीय प्रतिगमन अभ्यासण्यात आले आहे.

$Y = a + bx$

Y = बिगर शेती क्षेत्रातील कामगारांचे शेकडा प्रमाण

X = लोकसंख्या (हजारात)

a = अंतर्छेद

b = चढ

उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील १६ नगरांसाठी प्रतिपगमनाचे निष्कर्ष पुढील प्रमाणे आले आहेत.

y = ५३.२१ + ०.१४४९ X

y = चा प्रमाप विभ्रम ११.१२५

x = चा प्रमाप विभ्रम ०.०३४

$R^२$ = ०.४५५

याचा अर्थ नागरी लोकसंख्येत १००० ने वाढ झाली, तर बिगरशेती क्षेत्रातील रोजगार ०.१४४९ टक्क्यांनी वाढतो. दोन्ही जिल्ह्यांतील 'अ' वर्ग ते 'ई' वर्ग गटातील सर्वच नगरांमध्ये कृषी क्षेत्रातील कामगारांचा वाटा वाढला आहे. तर बिगर कृषी क्षेत्रातील कामगारांचा वाटा घटला आहे. तरीही नागरीकरण वाढले आहे याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१) प्रामुख्याने दोन्ही जिल्ह्यातील अर्थव्यवस्था ही कृषिप्रधान अर्थव्यवस्था आहे. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे शेती क्षेत्राला व्यवसायाचे स्वरूप येऊ लागले आहे. त्यामुळे नागरी भागातील लोक कृषी व्यवसायाकडे आकर्षित झालेले आढळून येत आहेत.

२) नगराच्या भोवतालची खेडी नगरांमध्ये विलीन होत आहेत; परंतू लोकांच्या व्यवसायात मात्र फारसा बदल होत नाही. म्हणून नागरीकरण वाढीबरोबर कृषी क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण वाढत आहे.

३) दोन्ही जिल्ह्यांतील नागरी भागातील बिगर कृषी क्षेत्र वाढत्या लोकसंख्येला रोजगार देण्यास अपुरे पडत आहे. त्यामुळे नगरांमधील कामगार कृषी क्षेत्राकडे वळले आहेत.

४) नगरांभोवतालची बरीचशी लोकसंख्या नगरांमध्ये आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी

घर करून राहत आहे. म्हणजेच नगरातून शेती केली जात आहे, त्यामुळे दोन्ही जिल्ह्यांच्या नागरी भागात कृषी कामगारांची संख्या वाढत आहे.

५) नगरांमध्ये पशुसंवर्धन वाढले आहे, त्यामुळे चारा विकणारे कामगार, भाजीपाला, फळे विकणारे कामगार वाढले आहेत.

वरील विविध कारणांमुळे दोन्ही जिल्ह्यांच्या नागरी भागात कृषी क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण वाढले आहे; तर बिगर कृषी क्षेत्रातील कामगारसंख्या घटली आहे. बिगर कृषी क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण कमी झाल्यामुळे नागरीकरण मात्र कमी झालेले नसून वाढत आहे, हे यातून दिसून येते.

## ४.७ उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील नागरीकरणाची कारणे:

सन १९८१ मध्ये उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यांतील एकूण लोकसंख्येत नागरी लोकसंख्येचा वाटा अनुक्रमे १२.६४ व २९.६५ टक्के होता. त्यात सतत वाढ होऊन सन २००१ मध्ये १५.६९ व २८.७६ टक्के आहे तर सन २०११ मध्ये दोन्ही जिल्ह्यांचा वाटा अनुक्रमे १७.२५ व ३४.९९ टक्के झाला आहे. म्हणजेच दोन्ही जिल्ह्यांतील नागरीकरण प्रवृत्ती ३ दशकांमध्ये वाढलेली आहे. उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यांच्या नागरीकरण वाढीच्या प्रवृत्तीची प्रामुख्याने स्थलांतरण, नगरांच्या हद्दीत किंवा सीमांमध्ये वाढ, नैसर्गिक लोकसंख्या वाढ आणि मागासवर्गीय लोकसंख्या ही प्रमुख चार कारणे दिसून येतात.

### ४.७.१ स्थलांतरण:

उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातून नागरी भागात व नागरी भागातून नागरी भागात स्थलांतरण झाल्याचे आढळून येते. कारण दोन्ही जिल्ह्यांमध्ये

९० ते ९२ टक्के जमीन निसर्गावर आधारित आहे. म्हणजेच ओलिताचे प्रमाण अल्प आहे. त्यामुळे ग्रामीण भागात दारिद्र्य, बेकारी कमालीची आढळून येते. त्यामुळे ग्रामीण भागातून नागरी भागात लोक रोजगारासाठी स्थलांतरित झालेले आहेत, कारण नागरी भागामध्ये व्यवसायाच्या, शिक्षणाच्या संधी, रोजगाराच्या संधी ग्रामीण भागापेक्षा व लहान नगरापेक्षा मोठ्या नगरात जास्त आहेत. त्यामुळेच दोन्ही जिल्ह्यांत ग्रामीण भागातून व लहान नगरांतून मोठ्या नगरात स्थलांतरण झालेले आहे. तसेच नागरी भागातील विलासी जीवन जगण्यासाठी ग्रामीण भागातून व लहान नगरांतून मोठ्या नगरामध्ये स्थलांतरण केले आहे[६].

तक्ता क्र. ४.७ मध्ये उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील स्थलांतरण दर्शविले आहे. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये सन १९९१-२००१ या दशकात भूम नगरामध्ये नैसर्गिक लोकसंख्या वाढ १.३१ टक्के आहे. त्यामुळे भूम नगरातील लोकसंख्या वाढ स्थलांतरण या घटकामुळे झालेली आहे. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये उस्मानाबाद, उमरगा व तुळजापूर नगरांमध्ये ग्रामीण भागातून नागरी भागात स्थलांतरण वाढत आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये सोलापूर नगर वगळता सर्वच नगरांमध्ये ग्रामीण भागातून नागरी भागात स्थलांतरण वाढत आहे. सोलापूर नगरात मात्र इतर सर्व लहान नगरांतून स्थलांतरण होत आहे. कारण सोलापूर नगरात आर्थिक, सामाजिक व राजकीय सेवासुविधा उपलब्ध झाल्या आहेत. त्याबरोबर शैक्षणिक व रोजगाराच्या संधी वाढल्या आहेत. या सर्व कारणांनी सोलापूर नगरात लहान नगरांतून स्थलांतरण झालेले आढळून आले आहे. उस्मानाबाद जिल्ह्यात सर्वाधिक २१.६८ टक्के स्थलांतरण तुळजापूर शहरात झालेले दिसून येते. त्यानंतर परंडा (१३.४३ टक्के) व उस्मानाबाद (११.७६ टक्के) यांचा

**तक्ता क्र. ४.७ उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील स्थलांतरण ( १९९१ ते २००१, टक्केवारीत)**

| शहरांची नावे | उस्मानाबाद जिल्हा | | | शहरांची नावे | सोलापूर जिल्हा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९९१-२००१ दशकातील लोकसंख्या वृद्धिदर | १९९१-२००१ दशकातील नैसर्गिक लोकसंख्या वाढीचा दर | वाढ / घट | | १९९१-२००१ दशकातील लोकसंख्या वृद्धिदर | १९९१-२००१ दशकातील नैसर्गिक लोकसंख्या वाढीचा दर | वाढ / घट |
| उस्मानाबाद | १५.६२ | ३.८६ | ११.७६ | सोलापूर | ३३.७० | ४.६३ | २९.०७ |
| कळंब | १३.७० | २.०९ | ११.६१ | करमाळा | ११.६१ | ८.६४ | २.९७ |
| उमरगा | २४.७६ | ५.३२ | १९.४४ | कुर्डूवाडी | ५.३४ | ३.० | २.२५ |
| तुळजापूर | २४.७६ | ३.०८ | २१.६८ | बार्शी | १६.५० | ४.६५ | ११.८५ |
| परंडा | १६.०१ | २.५८ | १३.४३ | पंढरपूर | १३.४० | ३.६३ | ९.७७ |
| भूम | १५.२२ | १.३१ | १३.९१ | सांगोला | २९.६५ | ६.०३ | २३.६२ |
| | | | | मंगळवेढा | ९.९० | ७.३५ | २.५५ |
| | | | | अक्कलकोट | ८.१० | ५.०६ | ३.०४ |
| | | | | मैंदर्गी | २.७२ | १.५८ | १.१४ |
| | | | | दुधनी | ११.५५ | ७.९८ | ३.५७ |
| सरासरी | | | १५.३१ | सरासरी | | | ८.९८ |

स्त्रोत : १. उस्मानाबाद जिल्हा जनगणना पुस्तिका, १९८१, १९९१ २००१.

२. सोलापूर जिल्हा जनगणना पुस्तिका, १९८१, १९९१ २००१..

क्रमांक लागतो. सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक २९.०७ टक्के स्थलांतरण सोलापूर शहरात झाले असून, त्यांनतर सांगोला (२३.६२ टक्के) व बार्शी (११.८५ टक्के) या नगरांचा क्रमांक लागतो. सन १९०१ ते सन २००१ या दशकातील उस्मानाबाद जिल्ह्यातील सरासरी स्थलांतरण १५.३१ टक्के असून सोलापूर जिल्ह्यातील सरासरी स्थलांतरण ८.९८ टक्के आहे.

**४.७.२ आर्थिक कार्यानुसार कामगारांचे स्थलांतरण:**

उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील सन २००१ सालातील व्यवसायानुसार ग्रामीण भागातून नागरी भागात व नागरी भागातून नागरी भागात होणारे स्थलांतरण तक्ता क्र. ४.८ मध्ये दर्शविण्यात आले आहे. एकूण मुख्य कामगारांपैकी उस्मानाबाद जिल्ह्यात व सोलापूर जिल्ह्यात अनुक्रमे ४.४८ व ३.६६ टक्के कामगारांचे स्थलांतरण झालेले आहे. दोन्ही जिल्ह्यांमध्ये पुरुष कामगारांचे स्थलांतरण प्रमाण स्त्री कामगारांपेक्षा जास्त आढळून आले आहे. एकुण स्थलांतरित मुख्य कामगारांपैकी उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातून नागरी भागात अनुक्रमे ५.४२ व ४.२८ टक्के कामगारांचे स्थलांतरण झालेले आहे. नागरी भागातील एकूण मुख्य कामगारांपैकी उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील कामगारांचे एकूण स्थलांतरण अनुक्रमे ६.०७ व ४.५६ टक्के झालेले आहे. दोन्ही जिल्ह्यांमध्ये नागरी भागातून नागरी भागात होणाऱ्या स्थलांतरात महिला कामगारांचा वाटा जास्त आहे. उस्मानाबाद जिल्ह्यांत व्यवसायानुसार झालेल्या स्थलांतरणावरून असे दिसून येते, की इतर कामगारांचे स्थलांतरणातील प्रमाण ७२.२४ टक्के असून त्यानंतर शेतमजूर २०.०५ टक्के व जमीन कसणारे शेतकरी यांचे प्रमाण ६.०९ टक्के आहे. सोलापूर जिल्ह्याच्या

**तक्ता क्र. ४.८ उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील व्यवसायाच्या वर्गीकरणानुसार कामगारांचे स्थलांतरण ( २००० ते २००१, टक्केवारीत)**

| कामगारांचे उद्योगानुसार वर्गीकरण | | उस्मानाबाद जिल्हा | | | सोलापूर जिल्हा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी |
| जमीन करणारे शेतकरी | एकूण | ६.०९ | ६.९७ | २.६० | ६.११ | ६.६९ | ३.५० |
| | पुरुष | ५.५५ | ६.३४ | २.७१ | ४.३७ | ४.९७ | १.९५ |
| | स्त्री | ७.८५ | ८.९२ | २.०८ | ११.३१ | ११.५२ | ११.१४ |
| शेतमजूर | एकूण | २०.०५ | २२.०५ | १२.१५ | २०.०० | २१.९५ | ११.२७ |
| | पुरुष | ११.३५ | १२.५७ | ६.४९ | ७.५५ | ९.५७ | ४.४९ |
| | स्त्री | ४९.०० | ५१.११ | ३७.०५ | ५३.०३ | ५६.८० | ३८.३७ |
| घरगुती उद्योगातील कामगार | एकूण | १.६१ | १.७४ | १.११ | २.०३ | १.९२ | २.४९ |
| | पुरुष | १.३६ | १.५७ | ०.६० | १.२१ | १.२२ | १.१७ |
| | स्त्री | २.४५ | २.२६ | ३.४७ | ४.४७ | ३.८८ | ७.८० |
| इतर कामगार | एकूण | ७२.२४ | ६९.२३ | ८४.११ | ७१.९० | ६९.४२ | ८२.६३ |
| | पुरुष | ८२.५७ | ७९.४९ | ९०.०३ | ८५.८५ | ८४.२१ | ९२.३८ |
| | स्त्री | ४०.६९ | ३७.६९ | ५६.९४ | ३०.१८ | २७.७८ | ४३.६८ |
| एकूण जिल्हा | एकूण | ४.४८ | ४.१९ | ६.१७ | ३.६६ | ३.४९ | ४..६९ |
| | पुरुष | ५.५५ | ५.४२ | ६.०७ | ४.३३ | ४.२८ | ४.५६ |
| | स्त्री | २.१४ | २.४७ | ६.७० | २.५१ | २.२९ | ५.२६ |

स्त्रोत : भारताची जनगणना,२००१.

बाबतीत हे प्रमाण ७१.९० टक्के इतर कामगार, २०.०० टक्के शेतमजूर, व ६.११ टक्के शेतकरी असे दिसून येते. दोन्ही जिल्ह्यांत ग्रामीण कामगारांपेक्षा नागरी भागातील कामगारांचे स्थलांतराचे प्रमाण जास्त आढळून आले आहे. कारण लहान नगरांमध्ये ग्रामीण भागातील स्थलांतरित आल्यामुळे लहान शहरातील व्यवसायाच्या, रोजगाराच्या संधी कमी होत जातात. त्यामुळे लहान नगरांमध्येही बेकारी, दारिद्र्य वाढत चालले आहे. त्यामुळे लहान नगरांतील कामगार मोठ्या नगरांमध्ये रोजगारासाठी स्थलांतरण करत आहेत.

दोन्ही जिल्ह्यांतील इतर कामगारांचे ग्रामीण भागातून नागरी भागात व नागरी भागातून नागरी भागात होणारे स्थलांतरण जास्त आहे. कारण इतर कामगारांत बांधकाम, मासेमारी, तांत्रिक कामगार, दुरुस्ती करणारे कामगार असतात. ग्रामीण भागात फारसा रोजगार मिळत नाही; त्यामुळे हे कामगार नागरी भागात स्थलांतरित होत आहेत. शेतमजुरांना हंगामामध्येच काम मिळते. उरलेल्या फावल्या वेळात बेकार राहावे लागते. त्यामुळे शेतमजूर ग्रामीण भागातून नागरी भागात स्थलांतरण करत आहेत. लहान-लहान नगरांमध्ये शेतमजुरांची ग्रामीण शेतमजुरांसारखीच परिस्थिती असल्यामुळे हे मजूर मोठ्या नगरांमध्ये स्थलांतरण करतात.

**४.७.३ उद्योगाच्या वर्गीकरणानुसार कामगारांचे स्थलांतरण :**

ग्रामीण भागात बांधकाम, दळणवळण, वाणिज्य व सेवा क्षेत्रातील काम करणारे कुशल कामगार कमी असतात; तर लहान-लहान नगरांमध्ये या कामगारांचे प्रमाण जास्त असते; परंतु मोठ्या नगरांमध्ये या कामगारांना मागणी जास्त असल्यामुळे दोन्ही जिल्ह्यातील नागरी कामगारांचे स्थलांतराचे प्रमाण जास्त आहे. एकंदरीत दोन्ही

जिल्ह्यांतील ग्रामीण व नागरी स्थलांतराची तुलना करता सोलापूर जिल्ह्यापेक्षा उस्मानाबाद जिल्ह्यांतील कामगारांचे स्थलांतराचे प्रमाण जास्त दिसून येते[७] कारण उस्मानाबाद जिल्ह्याचा भाग जरी सुपीक असला तरीही ग्रामीण उद्योगांची संख्या कमी आहे. सोलापूर जिल्ह्यांतील लहान-लहान नगरे सोलापूर नगरापासून दूर अंतरावर असल्यामुळे व्यावसायिकदृष्ट्या विकसित आहेत. तसेच ग्रामीण लोकांना स्थानिक पातळीवर रोजगार हमीची कामे जास्त मिळालेली आहेत. त्यामुळे ग्रामीण स्थलांतरण कमी आहे. तक्ता क्र. ४.९ मध्ये उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील कामगारांचे उद्योगांनुसार स्थलांतरण दर्शविण्यात आले आहे.

तक्ता क्र. ४.९ वरून असे दिसून येते, की उस्मानाबाद जिल्ह्यात सन २००१ मध्ये सर्वाधिक ४३.२५ टक्के कामगारांचे स्थलांतरण इतर सेवा उद्योगांतील असून त्याखालोखाल २०.०३ टक्के व्यापार व वाणिज्य, ११.०० टक्के बिगर घरगुती उद्योग आणि ९.८१ टक्के वाहतूक व दळणवळण या उद्योगांचा क्रमांक लागतो. सोलापूर जिल्ह्याच्या बाबतीत सर्वाधिक ३९.५४ टक्के कामगारांचे स्थलांतरण इतर सेवा उद्योगांतील असून त्यानंतर व्यापार व वाणिज्य २१.२५ टक्के, बिगर घरगुती १३.८२ टक्के व बांधकाम ११.६२ टक्के या उद्योगांचा क्रमांक लागतो.

### ४.८ उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील औद्योगिकीकरणाची स्थिती:

उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यांच्या ग्रामीण व नागरी भागातील औद्योगिकीकरणाची स्थिती तक्ता क्र. ४.१० व ४.११ मध्ये दर्शविण्यात आली आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात प्रतिहजार  लोकसंख्येमागे उद्योगांची संख्या अनुक्रमे १७.४० व १८.२४ टक्के होती. या

## तक्ता क्र. ४.९ उद्योगांच्या वर्गीकरणानुसार कामगारांचे स्थलांतरण ( २००० ते २००१ टक्केवारीत)

| कामगारांचे उद्योगानुसार वर्गीकरण | | उस्मानाबाद जिल्ह्याच्या शहरी भागात | | | सोलापूर जिल्ह्याच्या शहरी भागात | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | ग्रामीण | नागरी | एकूण | ग्रामीण | नागरी |
| पशुसंवर्धन, मासेमारी, शिकार, फळबाग इत्यादी | एकूण | ३.८६ | ३.७१ | ४.४० | २.४६ | २.२७ | ३.३० |
| | पुरुष | ४.१७ | ३.९५ | ४.९२ | २.६४ | २.४२ | ३.६२ |
| | स्त्री | १.९० | २.०६ | १.४३ | १.१४ | १.०९ | १.३१ |
| खनिज व दगडकाम | एकूण | ०.१६ | ०.१९ | ०.०४ | ०.०६ | ०.०६ | ०.०६ |
| | पुरुष | ०.१४ | ०.१६ | ०.०५ | ०.०४ | ०.०४ | ०.०२ |
| | स्त्री | ०.३० | ०.४१ | ०.०० | ०.२४ | ०.२१ | ०.३२ |
| घरगुती उद्योगातील उत्पादन प्रकिया व दुरुस्ती | एकूण | २.१६ | २.२४ | १.८८ | २.४७ | २.२२ | ३.५७ |
| | पुरुष | १.६६ | १.७३ | १.१५ | १.१५ | १.०२ | १.७८ |
| | स्त्री | ५.७६ | ५.६७ | ६.०३ | १.२१ | ११.४७ | १४.६३ |
| बिगर घरगुती उद्योगातील उत्पादन प्रकिया व दुरुस्ती | एकूण | ११.०० | ११.७२ | ८.८५ | १३.८२ | १४.२६ | ११.५७ |
| | पुरुष | १०.५८ | ११.२२ | ८.३४ | १३.६६ | १२.५० | ११.५० |
| | स्त्री | १४.२३ | १५.०६ | ११.७७ | १४.५६ | १५.२५ | १२.०० |
| बांधकाम | एकूण | ९.६२ | ९.४१ | १०.३३ | ११.६२ | ११.९६ | ९.५८ |
| | पुरुष | १०.०५ | ९.६१ | ११.५७ | ११.६८ | ११.८९ | १०.६८ |
| | स्त्री | ६.८७ | ८.०८ | ३.२७ | १०.४४ | १२.४८ | २.७९ |
| व्यापार व वाणिज्य | एकूण | २०.०३ | २०.१० | १९.८० | २१.२५ | २१.५२ | २०.४४ |
| | पुरुष | २१.६३ | २१.६४ | २१.५८ | २२.९७ | २३.०५ | २२.६४ |
| | स्त्री | ९.७८ | ९.८३ | ९.६२ | ९.१९ | ९.८० | ६.९० |
| वाहतूक व दळणवळण | एकूण | ९.८१ | ९.९२ | ९.४४ | ८.८१ | ८.९३ | ८.२९ |
| | पुरुष | ११.१६ | ११.२९ | १०.७३ | ९.९० | १०.११ | ९.४२ |
| | स्त्री | १.१८ | ०.८५ | २.१४ | ०.७९ | ०.६५ | १.३१ |
| इतर सेवा | एकूण | ४३.२५ | ४२.६६ | ४५.२२ | ३९.५४ | ३८.७४ | ४३.१५४०.३० |
| | पुरुष | ४०.६४ | ४०.३५ | ४१.६३ | ३७.९२ | ३७.४१ | ६०.६९ |
| | स्त्री | ५९.९४ | ५८.०१ | ६५.७१ | ५१.४७ | ४९.०१ | ३.१९ |
| एकूण जिल्हा एकूण मुख्य कामगारांपैकी | एकूण | ३.२३ | २.९२ | ५.०१ | २.६० | २.५० | ३.१५ |
| | पुरुष | ४.५० | ४.३५ | ५.१० | ३.६१ | ३.६७ | ५.९२ |
| | स्त्री | १.१४ | ०.७७ | ४.५५ | ६.८५ | ०.७२ | |

स्त्रोत : भारत जनगणना २००१, जनगणना मोहिम संचालक, महाराष्ट.

**तक्ता क्र. ४.१० उस्मानाबाद जिल्ह्यातील प्रति हजार लोकसंख्येमागे प्रमुख उद्योगांची व कामगारांची संख्या ( २००१ च्या जनगणनेनुसार)**

| नाव | ग्रामीण | | नागरी | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उद्योगांची संख्या | कर्मचारी संख्या | उद्योगांची संख्या | कर्मचारी संख्या | उद्योगांची संख्या | कर्मचारी संख्या |
| कृषी | १.३४ | २.१३ | ०.७८ | २.१० | १.२२ | २.१२ |
| खनिज उत्पादन व खाणकाम | ०.०२ | ०.०३ | ०.०२ | ०.११ | ०.०२ | ०.०५ |
| वस्तुनिर्माण | ४.३९ | ८.६१ | ५.११ | २०.२७ | ४.५५ | ११.२४ |
| वीज, गॅस, पाणीपुरवठा | ०.०२ | ०.१५ | ०.०८ | २.८८ | ०.०४ | ०.७७ |
| बांधकाम | ०.१४ | ०.३९ | ०.३५ | ०.६६ | ०.१८ | ०.४५ |
| घाऊक व्यापार | ०.१२ | ०.२५ | १.२६ | ४.०८ | ०.३८ | १.१० |
| किरकोळ व्यापार | ३.७४ | ६.२६ | १५.६३ | २७.५० | ७.३७ | ११.०४ |
| उपाहार गृहे व हॉटेल | ०.४९ | ०.९९ | २.३५ | ७.८८ | ०.९१ | २.५४ |
| वाहतूक | ०.०६ | ०.११ | ०.७६ | २.६२ | ०.२२ | ०.६८ |
| साठवणगृहे व गोदाम | ०.०२ | ०.०३ | ०.२१ | ०.४९ | ०.०७ | ०.१३ |
| दळणवळण | ०.०८ | ०.१६ | ०.०७ | १.१९ | ०.०८ | ०.३९ |
| वित्तीय संस्था, विमा, स्थावर मालमत्ता आणि व्यावसायिक सेवा | ०.१९ | ०.५० | १.१० | ४.१९ | ०.४० | १.४९ |
| सामूहिक, सामाजिक व व्यक्तिगत सेवा | ५.४८ | ५.१८ | ९.११ | ५२.४० | ६.३० | २०.५३ |
| इतर सेवा | ०.०० | ०.०० | ०.०१ | ०.०१ | ०.०० | ०.०० |
| एकूण | १७.४० | ५.१८ | ३६.९० | १२६.९८ | २१.७९ | ५२.६० |

स्त्रोत: १. उस्मानाबाद जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१०.

**तक्ता क्र. ४.११ सोलापूर जिल्ह्यातील प्रति हजार लोकसंख्येमागे प्रमुख उद्योगांची व कामगारांची संख्या (२००१ च्या जनगणनेनुसार)**

| नाव | ग्रामीण | | नागरी | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उद्योगांची संख्या | कर्मचारी संख्या | उद्योगांची संख्या | कर्मचारी संख्या | उद्योगांची संख्या | कर्मचारी संख्या |
| कृषी | १.६१ | २.५५ | ०.७५ | १.०२ | १.४२ | २.२२ |
| खनिज उत्पादन व खाणकाम | ०.०१ | ०.०२ | ०.०० | ०.०० | ०.०१ | ०.०२ |
| वस्तुनिर्माण | ४.३३ | ८.६३ | ६.१८ | २०.९६ | ४.७३ | ११.३१ |
| वीज, गॅस, पाणीपुरवठा | ०.०५ | ०.१३ | ०.०५ | ०.५३ | ०.०५ | ०.२२ |
| बांधकाम | ०.२४ | ०.४१ | ०.२७ | ०.४७ | ०.२४ | ०.४२ |
| घाऊक व्यापार | ०.१० | ०.२२ | १.०७ | ४.२७ | ०.३१ | १.१० |
| किरकोळ व्यापार | ५.८५ | ७.६७ | १५.३९ | २८.६९ | ७.९२ | १२.२४ |
| उपाहार गृहे व हॉटेल | ०.८८ | १.७३ | २.७० | २.९० | १.२७ | ३.२७ |
| वाहतूक | ०.१० | ०.२६ | ०.४५ | १.८० | ०.१८ | ०.६० |
| साठवणगृहे व गोदाम | ०.०४ | ०.०८ | ०.१७ | ०.४३ | ०.०७ | ०.१६ |
| दळणवळण | ०.०८ | ०.१७ | ०.०७ | ०.८४ | ०.०७ | ०.३२ |
| वित्तीय संस्था, विमा, स्थावर मालमत्ता आणि व्यावसायिक सेवा | ०.२६ | ०.६९ | १.०८ | ४.९६ | ०.४४ | १.६२ |
| सामूहिक, सामाजिक व व्यक्तिगत सेवा | ४.६६ | १०.६५ | ८.६९ | ४१.०२ | ५.५३ | १७.२५ |
| इतर सेवा | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| एकूण | १८.२४ | ३७.१३ | ३६.९३ | ११३.८६ | २२.३० | ५०.७९ |

स्त्रोत : १. सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१०.

उद्योगांत प्रतिहजार लोकसंख्येमागे उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यांतील अनुक्रमे ५.१८ व ३७.२३ लोकांना रोजगार मिळाला आहे. प्रतिहजार लोकसंख्येमागे उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील नागरी भागात उद्योगांची संख्या अनुक्रमे ३६.९० व ३६.९३ आहे. या उद्योगांत प्रतिहजार लोकसंख्येमागे जिल्हानिहाय अनुक्रमे १२६.९८ व ११३.८६ लोकांना रोजगार मिळाला आहे. तर दर हजार लोकसंख्येमागे, महाराष्ट्रात उद्योगांची संख्या ४३.०५ टक्के एवढी आहे व कामगारांची संख्या २००.१५ आहे. म्हणजेच महाराष्ट्राच्या तुलनेत दोन्ही जिल्ह्यांच्या नागरी भागातील औद्योगिकीकरण कमी झालेले आहे. दोन्ही जिल्ह्यांच्या ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात औद्योगिकीकरण जास्त झालेले आहे. सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात औद्योगिकीकरण काही अंशी झालेले आहे, परंतु उस्मानाबाद जिल्ह्याच्या ग्रामीण भागात अतिशय कमी औद्योगिकीकरण झालेले दिसून येते. दोन्ही जिल्ह्यांत वस्तू निर्माण उद्योगांची संख्या सर्वाधिक उस्मानाबाद जिल्ह्यात ४.३९ टक्के; तर सोलापूर जिल्ह्यात ४.३३ एवढी आहे.

### ४.९ उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यांच्या ग्रामीण भागातील दारिद्र्यः

दोन्ही जिल्ह्यांतील शेतीची कमी उत्पादकता, ओलिताखालील जमिनीचे अल्प प्रमाण, शेतीचे असमान वाटप यांमुळे ग्रामीण भागामध्ये दारिद्र्य निर्माण झालेले आहे[८] ग्रामीण भागामध्ये बेकारी जास्त आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील दारिद्र्यात जीवन जगणारे लोक नागरी भागात रोजगारासाठी स्थलांतरण करत आहेत. उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यांतील ग्रामीण दारिद्र्याचे विवेचन तक्ता क्र. ४.१२ व ४.१३ मध्ये दर्शविण्यात आले आहे. उस्मानाबाद जिल्ह्यांमध्ये एकूण ग्रामीण कुटुंबापैकी सर्वांत जास्त तुळजापूर तालुक्यात दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे आढळतात. तर उस्मानाबाद

**तक्ता क्र. ४.१२ उस्मानाबाद जिल्ह्याच्या ग्रामीण व नागरी भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची संख्या (२००१ च्या जनगणनेनुसार)**

| तहसील | ग्रामीण / नागरी | दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचे जातीनिहाय वर्गीकरण | | दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचे जातीनिहाय वर्गीकरण (टक्केवारीत) | |
|---|---|---|---|---|---|
| | | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती |
| परंडा | ग्रामीण | १२४४७ | ८७० | ९३.४६ | ६.५३ |
| | नागरी | २०९२ | १४१ | ९३.६८ | ६.३१ |
| भूम | ग्रामीण | १२७१९ | ८३५ | ९३.८३ | ६.१७ |
| | नागरी | २५६९ | ४७६ | ८४.३६ | १५.६४ |
| वाशी | ग्रामीण | १५११२ | २४२६ | ८६.१६ | १३.८४ |
| | नागरी | ० | ० | ०.०० | ०.०० |
| कळंब | ग्रामीण | ३१८६९ | ३२२३ | ९०.८१ | ९.१९ |
| | नागरी | ३०८३ | ६३१ | ८३.०१ | १६.९९ |
| उस्मानाबाद | ग्रामीण | ४६३९८ | ८६१९ | ८४.३३ | १५.६७ |
| | नागरी | १०९१८ | १८६ | ८६.६२ | १३.३८ |
| तुळजापूर | ग्रामीण | ३८११८ | २१८७ | ९४.५७ | ५.४३ |
| | नागरी | ६७८० | ५०१ | ९३.११ | ६.८९ |
| लोहार | ग्रामीण | १९५३५ | १२८६ | ९३.८२ | ६.१८ |
| | नागरी | ० | ० | ०.०० | ०.०० |
| उमरगा | ग्रामीण | ३६४६८ | ३९९४ | ९०.१२ | ९.८८ |
| | नागरी | ७६८२ | ९८२ | ८८.६६ | ११.३४ |

स्त्रोत: १. उस्मानाबाद जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१०.

## तक्ता क्र. ४.१३ सोलापुर जिल्हयाच्या ग्रामीण व नागरी भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या (२००१ च्या जनगणनेनुसार)

| तहसील | ग्रामीण / नागरी | दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचे जातीनिहाय वर्गीकरण | | दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचे जातीनिहाय वर्गीकरण (टक्के वारीत) | |
|---|---|---|---|---|---|
| | | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती |
| करमाळा | ग्रामीण | ३३१६ | ४२७ | ८८.९९ | ११.४१ |
| | नागरी | २५७ | १०२ | ७१.५८ | २८.४२ |
| माढा | ग्रामीण | ३०१३ | २०२ | ९३.७१ | ६.२९ |
| | नागरी | २३५ | १८५ | ५५.९५ | ४४.०५ |
| बार्शी | ग्रामीण | २०३२ | ९१ | ९५.७१ | ४.२९ |
| | नागरी | ८१६ | ६७७ | ५४.६५ | ४५.३५ |
| सोलापूर | ग्रामीण | १५५८ | १९७ | ८८.७७ | ११.२३ |
| | नागरी | ३५१६ | ५२० | ८७.११ | १२.८९ |
| मोहोळ | ग्रामीण | ३७२६ | ११६ | ९६.९८ | ३.०२ |
| | नागरी | ० | ० | ०.०० | ०.०० |
| पंढरपूर | ग्रामीण | ४६५१ | ३६६ | ९२.७० | ७.०३ |
| | नागरी | ३०४ | १०७ | ७३.९६ | २६.०४ |
| माळशिरस | ग्रामीण | ६२१७ | ३५ | ९९.४४ | ०.५६ |
| | नागरी | ० | ० | ०.०० | ०.०० |
| सांगोला | ग्रामीण | ४५७७ | १८ | ९९.६० | ०.०४ |
| | नागरी | ५६० | २४ | ९९.८९ | ०.११ |
| मंगळवेढा | ग्रामीण | २५६२ | ८ | ९९.६८ | ०.३२ |
| | नागरी | २८२ | २ | ९९.२९ | ०.७१ |
| द.सोलापूर | ग्रामीण | ३०३१ | ६८० | ८१.६७ | १८.३३ |
| | नागरी | ० | ० | ०.०० | ०.०० |
| अक्कलकोट | ग्रामीण | ३९४९ | ८५२ | ८२.२५ | १७.७५ |
| | नागरी | १५०४ | ८१९ | ६४.७४ | ३५.२६ |

स्त्रोतः १. सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१०.

जिल्ह्याच्या नागरी भागात सर्वात जास्त कुटुंबे कळंब नगरात आढळतात. यांपैकी ग्रामीण भागातील अनुसूचित जातींचे प्रमाण अनुक्रमे परंडा (९३.४६), भूम (९३.८३), वाशी (८६.१६), कळंब (९०.८१), उस्मानाबाद (८४.८३), तुळजापूर (९४.५७), लोहारा (९३.८२) व उमरगा (९०.१२ टक्के) तालुक्यांत आहे; तर नागरी भागातील अनुसूचित जातींचे प्रमाण अनुक्रमे परंडा (९३.६८), भूम (९३.८३), कळंब (८३.०१), उस्मानाबाद (८६.६२), तुळजापूर (९३.११), उमरगा (८८.६६ टक्के) आहे. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये अनुसूचित जमातींचे ग्रामीण भागातील प्रमाण अनुक्रमे कळंब (९.१९), परंडा (६.५३), भूम (६.१७), वाशी (१५.६४), उस्मानाबाद (१५.६७), तुळजापूर (५.४३), लोहारा (६.१८) व उमरगा (९.८८ टक्के) आहे; तर नागरी भागातील अनुसूचित जमातींचे प्रमाण अनुक्रमे परंडा (६.३१), भूम (१५.६४), कळंब (१६.९९), उस्मानाबाद (१३.३८), तुळजापूर (६.८९) व उमरगा (११.३४ टक्के) आहे.

सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अनुसूचित जातींचे प्रमाण करमाळा, माढा, बार्शी, सोलापूर, मोहोळ, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा, दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यात अनुक्रमे ८८.९९, ९३.११, ९५.७१, ८८.७७, ९६.९८, ९२.७०, ९९.४४, ९९.६०, ९९.६८, ८१.६७ व ८२.२५ टक्के एवढे आहे. तर नागरी भागातील करमाळा, कुर्डुवाडी, बार्शी, सोलापूर, पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा व अक्कलकोट नगरांतील प्रमाण अनुक्रमे ७१.५८, ५५.९५, ५४.६५, ५४.६५, ८७.११, ७३.९६, ९९.८९, ९९.२९ व ६४.७४ टक्के एवढे आहे. सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अनुसूचित जमातींचे प्रमाण अनुक्रमे करमाळा (११.४१), माढा (६.२९), बार्शी (४.२९), सोलापूर (११.२३), मोहोळ (३.०२), पंढरपूर (७.३), माळशिरस (०.५६),

सांगोला (०.४), मंगळवेढा (०.३२), दक्षिण सोलापूर (१८.३३) व अक्कलकोट (१७.७५ टक्के) आहे.  तर नागरी भागातील अनुसूचित जमातीचे प्रमाण अनुक्रमे करमाळा (२८.४२), कुर्डुवाडी (४४.०५), बार्शी (४५.३५), सोलापूर (१२.८९), पंढरपूर (२६.०४), सांगोला (०.११), मंगळवेढा (०.७१) व अक्कलकोट (३५.२६ टक्के) असे आहे.

वरील दोन्ही जिल्ह्यांच्या ग्रामीण भागात दारिद्र्याचे सरासरी प्रमाण सारखेच आढळून आले आहे. त्यामुळे दोन्ही जिल्ह्यांच्या ग्रामीण भागातून नागरी भागात रोजगारासाठी आपली आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी दारिद्र्यरेषेखालील लोक स्थलांतरण करत आहेत.

### ४.१० उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्याच्या नागरी भागातील अशोधित जननदर व मृत्युदर:

स्थलांतरण या घटकाबरोबर नैसर्गिक लोकसंख्यावाढ हा घटकही नागरीकरणास जबाबदार आहे. आजही नगरातील पुष्कळ कुटुंबांना कुटुंब नियोजनाचे महत्त्व पटलेले नाही. कमी वयात लग्न करणे अशा विविध प्रथा चालू आहेत. त्यामुळे नैसर्गिक लोकसंख्या वाढ वेगाने होत आहे[१] याचाच अभ्यास या ठिकाणी करण्यात येणार आहे. दोन्ही जिल्ह्यांच्या नागरी भागातील जननदराचे व मृत्युदराचे प्रमाण तक्ता क्र. ४.१४ मध्ये दर्शविण्यात आले आहेत. प्रतिहजार लोकसंख्येमागे उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यांच्या नागरी भागाचा जननदर अनुक्रमे १४२.०० व ६३.९३ टक्के आढळून आला आहे. तर मृत्यूदर अनुक्रमे १८.९३ व १६.८७ टक्के आढळून आला आहे. महाराष्ट्रातील जननदराच्या तुलनेत उस्मानाबाद जिल्ह्याचा जननदर जास्त आहे. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये सर्वांत जास्त नैसर्गिक लोकसंख्यावाढीचा दर उस्मानाबाद

**तक्ता क्र. ४.१४ उस्मानाबाद व सोलापुर जिल्हयाच्या नागरी भागातील अशोधित जननदर व मृत्यूदर (२००१ च्या जनगणनेनुसार)**

| तहसील | उस्मानाबाद जिल्हा | | | | | तहसील | सोलामूर जिल्हा | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जन्म झालेल्या एकूण बालकांची संख्या | मृत्यू पावलेल्या एकूण व्यक्तींची संख्या | प्रति हजार व्यक्तींमागे मृत्यू पावलेल्या व्यक्तींची संख्या | प्रति हजार व्यक्तींमागे जन्मलेल्या बालकांची संख्या | नैसर्गिक लोकसंख्या वाढ | | जन्म झालेल्या एकूण बालकांची संख्या | मृत्यू पावलेल्या एकूण व्यक्तींची संख्या | प्रति हजार व्यक्तींमागे मृत्यू पावलेल्या व्यक्तींची संख्या | प्रति हजार व्यक्तींमागे जन्मलेल्या बालकांची संख्या | नैसर्गिक लोकसंख्या वाढ |
| परंडा | २०९२ | १४१ | ०.६० | ८.९६ | ८.३६ | करमाळा | २०९७ | २०१ | ०.१६ | १.७१ | १.५५ |
| भूम | २५६९ | ४७६ | २.०४ | ११.०१ | ८.९७ | माढा | २१०३ | १९३ | ०.१५ | १.७१ | १.५६ |
| कळंब | ३०८३ | ६३१ | २.७० | १३.२१ | १०.५१ | बार्शी | ६२४८ | १३७३ | १.१२ | ५.०९ | ३.९६ |
| उस्मानाबाद | १०९१८ | १६८६ | ७.२२ | ४६.८० | ३९.५८ | सोलापूर | ५७६५४ | १७२१६ | १४.०५ | ४७.०५ | ३३.०० |
| तुळजापूर | ६७८० | ५०१ | २.१४ | २९.०६ | २६.९२ | पंढरपूर | ३९८९ | ६६८ | ०.५४ | ३.२५ | २.७१ |
| उमरगा | ७६८२ | ९८२ | ४.२० | ३२.९३ | २८.७३ | सांगोला | १८७४ | १७८ | ०.१४ | १.५२ | १.३८ |
| **सरासरी** | ५५२१ | ७३६ | ३.१५ | २३.६६ | २०.५१ | मंगळवेढा | १७८३ | १८७ | ०.१५ | १.४५ | १.३० |
| | | | | | | अक्कलकोट | २५९३ | ६५८ | ०.५३ | २.११ | १.५८ |
| | | | | | | **सरासरी** | ९७९३ | २५८४ | २.११ | ७.९९ | ५.८८ |

स्त्रोत: १. उस्मानाबाद जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१०.

२. सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१०.

(३९.५८ टक्के) नगरात आहे. त्या पाठोपाठ उमरगा (२८.७२ टक्के) नगर आहे. याचाच अर्थ उस्मानाबाद व उमरगा नगरामध्ये निश्चितच साक्षरता प्रमाण कमी आहे त्यामुळे कुटूंब नियोजनाचे महत्त्व पटलेले नाही; तर परंडा नगराचा नैसर्गिक लोकसंख्यावाढीचा दर सर्वात कमी आढळून आला आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये सर्वांत जास्त नैसर्गिक लोकसंख्या वाढीचा दर बार्शी (३.९७ टक्के) शहरामध्ये आहे. तर सर्वांत कमी नैसर्गिक लोकसंख्यावाढीचा दर मंगळवेढा (१.३० टक्के) नगरामध्ये आढळून आला आहे. सोलापूर नगराचा नैसर्गिक लोकसंख्यावाढीचा दर ३३ टक्के एवढा आहे. त्यामुळेच सोलापूर नगराचे नागरीकरण वेगाने वाढत आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील नैसर्गिक लोकसंख्या वाढीचा सरासरी दर २०.५१ टक्के तर सोलापूर जिल्ह्याचा सरासरी दर ५.८८ टक्के दिसून येतो.

**सारांश:**

महाराष्ट्रात पश्चिम महाराष्ट्र हा विभाग औद्योगिकदृष्ट्या विकसित आहे. या विभागात सन १९८१ नंतर प्रति लाख लोकसंख्येमागे कारखान्यांतील कामगारांची संख्या १९६९.९२ आहे. हेच प्रमाण मुंबई, पुणे, ठाणे जिल्ह्यात अनुक्रमे ४३०३.७८, २२१५.५२, २७११.४६ आहे; तर उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यात हेच प्रमाण अनुक्रमे ३७९.२९ व ८२२.८७ आहे; म्हणजेच औद्योगिकदृष्ट्या हे दोन्ही जिल्हे मागास आहेत. दांडेकर समितीच्या अहवालानुसार (१९८४) १९७८-७९ मध्ये देशांतर्गत उत्पादनाचे आकडे घेऊन महाराष्ट्र राज्यातून बृहन्मुंबई वगळून राज्याची सरासरी १०० धरली तर पश्चिम महाराष्ट्र १०६.४२, विदर्भ ८४.६६ आणि मराठवाडा ८१.०६ रुपये दरडोई

उत्पन्न आहे. म्हणजेच मराठवाडा मागास आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे सोलापूर जिल्हा विकासात पुढे आहे तर उस्मानाबाद जिल्हा विकासात मागे आहे.

मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत नैसर्गिक संपत्ती विपुल आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातून मांजरा नदी व तिच्या उपनद्या वाहतात; परंतु जलसंपत्तीचा फारसा उपयोग करून घेतलेला नाही; तर सोलापूर जिल्ह्यात जलसिंचनाचा भरपूर उपयोग करून घेतला आहे. भीमा नदीवर माढा तालुक्यात उजनी येथे मोठे धरण बांधण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्वांत मोठा असा हा प्रकल्प आहे. याचा लाभ माढा, मंगळवेढा, पंढरपूर, माळसिरस, मोहोळ व उत्तर सोलापूर या तालुक्यांना होतो.

उस्मानाबाद जिल्ह्यातील वनक्षेत्राचा अभ्यास केला तर सन १९८१ मध्ये ३००० हेक्टर, सन २००१ मध्ये २००० हेक्टर वनक्षेत्र शिल्लक राहिले आहे. याच्या तुलनेत सोलापूर जिल्ह्यात सन २००१ मध्ये ३६००० हेक्टर वनक्षेत्र आहे. उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील एकूण लागवडीखालील कृषी क्षेत्रापैकी जलसिंचनाखालील कृषीचे प्रमाण अनुक्रमे ७ व ५ टक्के आहे. म्हणूनच पश्चिम महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न (९७९७ रु.), सोलापूर (८७५६ रु.), व उस्मानाबाद (४२६३ रु.) जिल्ह्यापेक्षा जास्त आहे. त्यामुळेच शहरामधील कृषीवर आधारित उद्योगांचा, तृतीय क्षेत्राचा विकास सोलापूरमध्ये जास्त तर उस्मानाबाद जिल्ह्यात कमी झाला आहे. एकंदरीत दोन्ही जिल्ह्यांतील औद्योगिक, आर्थिक, कृषी, सामाजिक विकास असमतोल झाल्यामुळे शहरीकरण प्रवृत्ती कशी वाढली आहे याचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात आला आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्वात जास्त नागरी लोकसंख्येतील बदल सन १९९१ या दशकात ४८.९२ टक्के व सर्वांत कमी बदल सन २००१ या दशकात २०.३१ टक्के झालेला दिसून येतो. सोलापूर जिल्ह्यातील सर्वांत जास्त नागरी लोकसंख्येतील बदल सन २०११ या दशकात ३१.९४ टक्के व सर्वांत कमी बदल सन १९९१ मध्ये २१.११ टक्के झालेला आहे.

सोलापूर जिल्ह्यामध्ये सरासरी वार्षिक वृद्धिदर सर्वांत जास्त सांगोला नगराचा ३.१६ टक्के व सोलापूर नगराचा २.६१ टक्के आढळून येतो; तर सर्वांत कमी सरासरी वार्षिक वृद्धीदर कुर्डुवाडी व मैंदर्गी नगराचा अनुक्रमे ०.७६ टक्के व ०.७३ टक्के आहे. कारण कुर्डुवाडी नगर हे फक्त रेल्वे जंक्शन असल्यानेच मोठे झाले आहे तर मैंदर्गी नगरात थोडाफार औद्योगिक विकास आहे; परंतु तो बंद पडण्याच्या मार्गावर आहे.

सन १९८१ मध्ये उस्मानाबाद व सोलापूर या 'अ' वर्ग नगरामध्ये एकूण मुख्य कामगारांपैकी बिगर कृषी क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण अनुक्रमे १३.६६ टक्के व ५.०० टक्के होते. म्हणजेच उस्मानाबाद शहरात सोलापूर शहरापेक्षा कृषी क्षेत्रात कमी कामगार आढळून आले आहेत. याचाच अर्थ विविध उद्योग व व्यवसाय, तृतीय क्षेत्र यांचा विकास उस्मानाबाद शहरात सोलापूर शहरापेक्षा जास्त झाला आहे. म्हणूनच सन १९८१ मध्ये उस्मानाबाद शहराची नागरीकरण प्रवृत्ती सोलापूर शहरापेक्षा जास्त होती.

सन १९८१ मध्ये उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यांतील एकूण लोकसंख्येत नागरी लोकसंख्येचा वाटा अनुक्रमे १२.६४ व २९.६५ टक्के होता. त्यात सतत वाढ होऊन सन २००१ मध्ये १५.६९ व २८.७६ टक्के आहे; तर सन २०११ मध्ये दोन्ही

जिल्ह्यांचा वाटा अनुक्रमे १७.२५ व ३४.९९ टक्के झाला आहे. म्हणजेच दोन्ही जिल्ह्यांतील नागरीकरण प्रवृत्ती ३ दशकांमध्ये वाढलेली आहे. उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यांच्या नागरीकरण वाढीच्या प्रवृत्तीची प्रामुख्याने स्थलांतरण, नगरांच्या हद्दीत किंवा सीमांमध्ये वाढ, नैसर्गिक लोकसंख्या वाढ आणि मागासवर्गीय लोकसंख्या ही प्रमुख चार कारणे दिसून येतात.

**संदर्भ :**


१. मराठवाडा २००१, खंड - २, पृ. ७-५४.

२. Osmanabad District Census Hand Book (2001) : p-50 & Solapur District census Hand Book (2001), p-46.

३. Osmanabad District Census Hand Book 2001, p. 66, 72, 76.

४. Solapur District Census Hand Book 2001, p. 70.

५. दांडेकर समितीचा अहवाल, (१९८४), इंग्रजी प्रत, पृ. ४१.

६. योजना, ऑक्टोबर १९९४, पृ. ६१४.

७. कित्ता, पृ. ७३.

८. कित्ता, पृ. ७-५४.

९. Research Tradition in the comparative study of urbanisation towards an Inter Disciplinary, Approach (November १९७३), Published by school of Architecture and Urban Planning University of California, Los Angeles, p.-21.

## प्रकरण - पाचवे
## उस्मानाबाद व सोलापूर शहरातील नागरीकरणाच्या समस्या

### ५.१ प्रस्तावना:

भारतातील नगरांची लोकसंख्या प्रचंड व सातत्याने वाढत आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतात एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या नगरांची संख्या ३०० एवढी होती. यापैकी २४ नगरांना महानगरांचा दर्जा प्राप्त झाला आहे. सन १९९१-२००१ या दशकात मुंबई, कोलकत्ता व दिल्ली या महानगरांची लोकसंख्या अनुक्रमे ५५, ३७ व ३६ लाखांनी वाढली आहे. सन २००१ मध्ये मुंबई १७५३५, कोलकत्ता २४७८९ व दिल्ली २३५२० प्रति चौ.कि.मी. एवढे लोकसंख्या घनता होती.[१]

वाढत्या औद्योगिकीकरणामुळे खेड्यातील लोक रोजगारासाठी नागरी भागाकडे प्रयाण करत आहेत. त्यामुळे नगरांची लोकसंख्या वाढून नगरांमध्ये घरांच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. नगरांमधील अनेक लोक प्लॅटफॉर्म, फुटपाथ, पाण्याच्या टाक्यांखाली व पुलांखाली राहत आहेत. सन २००१ च्या जनगणनेनुसार पुणे नगरात केवळ ९ टक्के कुटुंबे स्वत:च्या घरात राहत होते, तर ८० टक्के कुटुंबे भाड्याच्या घरांत राहत होती. कोलकत्ता नगरातील ७.३ टक्के लोक स्वत:च्या घरात राहत होते. म्हणजेच वाढत्या नागरीकरणामुळे नगरांमध्ये घराच्या समस्या निर्माण होत आहेत. औद्योगिकीकरण हे झोपडपट्टीचे मूळ असते. यामुळे नगरांमध्ये स्थलांतरित लोकसंख्या वाढत आहे. त्यामुळे घरटंचाई निर्माण होऊन झोपडपट्ट्या निर्माण होत आहेत. सन २००१ मध्ये कोलकत्ता, दिल्ली, लुधियाना व पुणे या नगरांच्या एकूण लोकसंख्येपैकी अनुक्रमे ३४.९, ३२.८, ४०.०० व २०.० टक्के लोक झोपडपट्टीत राहत आहेत. म्हणजेच

भारतातील मोठ्या नगरांमध्ये झोपडपट्टी समस्येने उग्र रूप धारण केलेले आहे. वाढत्या नागरीकरणामुळे नागरी भागात नागरी सुविधांचा तुटवडा भासत आहे. सन २००१ मध्ये हैदराबाद नगरातील २३.५ टक्के कुटुंबे चाळीतील सार्वजनिक नळांवर पाणी भरत होती, तर ३५.५ टक्के कुटूंबे सार्वजनिक नळांवर पाणी भरत होती. सन २००१ मध्ये चेन्नई नगरातील ५४८ झोपडपट्ट्यांपैकी ४०५ झोपडपट्ट्यांमध्ये शौचालयाची सुविधा नव्हती. वाढत्या नागरीकरणाबरोबर वाहनही आवश्यक गरज झाली आहे. मार्च १९९७ मध्ये एकट्या दिल्ली नगरात २८,४७,६९५ वाहने होती. या वाहनांमुळे नगरातील प्रदूषण वाढत आहे. याच वर्षी दिल्ली नगरात प्रतिदिन ८६२ टन धूलिकण (Suspended Particulates) वाहनांमधून हवेमध्ये सोडले जात होते. म्हणजेच वाढते नागरीकरण पर्यावरणाचा प्रचंड प्रमाणात नाश करत आहे.[२]

नगरांमधील वाढत्या प्रदूषणामुळे हवेतील ओझोनचा थर कमी होऊन कार्बन डायऑक्साईड वाढत आहे. त्यामुळेच बांग्लादेशातील अनेक गावे शीतगृह परिणामामुळे समुद्राखाली गेली आहेत. एकंदरीत नागरीकरण वाढत असल्यामुळे आरोग्य समस्या, प्रदूषण, पाणीपुरवठा, घरांची टंचाई, अपघात, गर्दी अशा विविध समस्या निर्माण होत आहेत. मोठ्या नगरांमधील लोक या समस्यांना कंटाळून गेले आहेत, त्यामुळे मोठ्या नगरांतील नागरिक ग्रामीण भागाकडे चला असा नारा देत आहेत.[३]

मोठ्या नगरांमधील व लहान नगरांमधील समस्या मात्र भिन्न आढळून येतात. लहान नगरांमध्ये प्रदूषण, आरोग्य, घरटंचाई, लोकसंख्या गर्दी अशा समस्यांची तीव्रता कमी असते. त्यामुळे लहान व मोठ्या नगरांतील समस्यांचे स्वरूप भिन्न आढळून येते.[४]

उस्मानाबाद व सोलापूर या दोन्ही जिल्ह्यांत उस्मानाबाद व सोलापूर ही दोन नगरे `अ` दर्जाची आहेत तर इतर सर्व नगरे लहान आहेत. म्हणून उस्मानाबाद व सोलापूर नगरांतील समस्यांची तीव्रता पुणे, मुंबई व दिल्ली नगरांमधील समस्येपेक्षा कमी आढळून येते; तर या दोन्ही जिल्ह्यांतील लहान नगरांमधील समस्यांची तीव्रता उस्मानाबाद व सोलापूर नगरांपेक्षा कमी आहे, असे दिसून येते. प्रस्तुत प्रकरणात उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील नागरी भागात निर्माण झालेल्या समस्यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

## ५.२ नागरीकरणामुळे उद्‌भवणाऱ्या समस्या:

नागरीकरण प्रक्रियेमुळे नगरांची लोकसंख्या सतत वाढून नागरी भागात लोकसंख्या गर्दी वाढत आहे. त्यातूनच नगरांमध्ये असंख्य समस्या निर्माण होत आहेत.

### ५.२.१ घरांची समस्या:

घर ही मानवाची मूलभूत गरज आहे. घर मानवाच्या जेवणाच्या, झोपण्याच्या, आसऱ्याच्या गरजा भागवते; म्हणून निवास स्थिती देशाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे निदर्शक आहे, असे राज्य नगरपालिका आयोगाने ४९ व्या फेरीत (१९९३)[५] म्हटले आहे. यावरून घराचे महत्त्व आपल्या लक्षात येते. प्रा. डी. व्ही. आर. राव (१९६९) यांच्या मते, ग्रामीण स्थलांतरामुळे नागरीकरण वाढत आहे, म्हणून पुढील २० वर्षांत नगरातील लोकसंख्या मात्र दुप्पट होईल व घरे मात्र लोकसंख्येच्या प्रमाणात वाढणार नाहीत; त्यामुळे नगरांमध्ये घरांचा तुटवडा निर्माण होईल. राष्ट्रीय बांधकाम आयोगाच्या मते, “ सन २००१ मध्ये भारतात १०.५ दशलक्ष घरांचा तुटवडा निर्माण

झाला आहे. '' पील आणि बुरकी यांच्या मते, '' सन १९९६ मध्ये भारतात १५० दशलक्ष लोक असमाधानकारक घरात राहतात. ''

घरांच्या मागणी व पुरवठ्यातील अंतरामुळे व वाढत्या भाड्यांमुळे अनेक लोकांना राहण्यासाठी घरे मिळत नाहीत, त्यामुळे अनेक लोक रेल्वे स्टेशनच्या बाजूला पाले ठोकून, पुलाखाली, रस्त्याच्या बाजूला उघड्यावर राहत आहेत, कारण दारिद्र्यामुळे ते घरे बांधू शकत नाहीत व भाड्याने ही राहू शकत नाहीत. त्यामुळे अनेक लोक बेघर असल्याचे दिसून येतात.[६]

तक्ता क्र. ५.१ मध्ये उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील बेघर कुटुंबाची संख्या दर्शविण्यात आली आहे. तक्ता क्र. ५.१ वरून असे स्पष्ट होते की, सन २००१ मध्ये उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील एकूण नागरी लोकसंख्येपैकी अनुक्रमे ०.३१ व ०.४४ टक्के लोकसंख्या बेघर होती. उस्मानाबाद जिल्ह्यात सर्वांत जास्त बेघर लोकसंख्या परंडा नगरामध्ये आढळून आली आहे. कारण परंडा नगरात मागासवर्गीयांचे प्रमाण बरेच जास्त आहे, त्यामुळे गरिबीचे प्रमाण जास्त आहे. म्हणून या नगरात बेघर लोकसंख्या जास्त आहे, तर सर्वांत कमी बेघर लोकसंख्या तुळजापूर नगरात आढळून आली आहे. उस्मानाबाद नगरात बेघर लोकसंख्या ०.३० टक्के आहे.

सोलापूर जिल्ह्यामध्ये सर्वांत जास्त बेघर लोकसंख्या कुर्डुवाडी नगरात आढळुन आली आहे. कारण कुर्डुवाडी नगराचा विकास अतिशय कमी झाला आहे. याबरोबरच रेल्वे जंक्शन असल्याने अनेक मागासवर्गीय लोक या ठिकाणी येऊन राहिले आहेत. त्यामुळे गरिबी वा दारिद्र्य जास्त असल्यामुळे बेघर लोकसंख्या जास्त आहे, तर सर्वांत

**तक्ता क्र. ५.१ उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील शहरी भागातील बेघर लोकसंख्येचे प्रमाण (२००१ च्या जनगणनेनुसार)**

| नागरी संस्था | उस्मानाबाद जिल्हा | | | | नागरी संस्था | सोलापूर जिल्हा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण कुटुंबांशी बेघर कुटुंबांचे प्रमाण | एकूण नागरी लोकसंख्येशी बेघर लोकसंख्येचे प्रमाण | बेघर कुटुंबांची संख्या | बेघर कुटुंबांची लोकसंख्या | | एकूण कुटुंबांशी बेघर कुटुंबांचे प्रमाण | एकूण नागरी लोकसंख्येशी बेघर लोकसंख्येचे प्रमाण | बेघर कुटुंबांची संख्या | बेघर कुटुंबांची लोकसंख्या |
| परंडा | ०.७३ | ०.५५ | १६ | ७८ | करमाळा | ०.६८ | ०.४८ | १७ | ७३ |
| भूम | ०.५३ | ०.३३ | २१ | ७४ | कुर्डूवाडी | १.४४ | १.११ | ३७ | १८५ |
| कळंब | ०.२८ | ०.२५ | १२ | ६१ | बार्शी | ०.५० | ०.३४ | १३ | ५४ |
| उस्मानाबाद | ०.४५ | ०.३० | १५३ | ५८८ | सोलापूर | ०.४० | ०.२९ | २०४ | ०९० |
| तुळजापूर | ०.४१ | ०.१९ | ३७ | १०७ | पंढरपूर | ०.८० | ०.४७ | ५७ | २०१ |
| उमरगा | १.२६ | ०.४८ | ६० | १३९ | सांगोला | १.०१ | ०.७५ | २९ | १२५ |
| एकूण जिल्हा | ०.५३ | ०.३१ | २९९ | १०४७ | मंगळवेढा | ०.४३ | ०.३२ | १९ | ८३ |
| | | | | | अक्कलकोट | ०.६७ | ०.५० | २२ | १०४ |
| | | | | | मैंदर्गी | ०.०४ | ०.०२ | २ | ७ |
| | | | | | दुधनी | ०.११ | ०.०२ | २ | ३ |
| | | | | | एकूण जिल्हा | ०.५४ | ०.४४ | ४०२ | १७४४ |

स्त्रोत : १. उस्मानाबाद जिल्हा जनगणना पुस्तिका, २००१

२. सोलापूर जिल्हा जनगणना पुस्तिका, २००१

कमी बेघर लोकसंख्या मैंदर्गी व दुधनी नगरात आढळून आली आहे. कारण मैंदर्गी व दुधनी नगरात अनेक उद्योगधंदे स्थापन झाले आहेत. त्यामुळे रोजगाराच्या सोई या ठिकाणी उपलब्ध झाल्या आहेत; त्यामुळेच व्यवसायाच्या विकासाबरोबरच घरांची उपलब्धताही जास्त आहे. म्हणून बेघर लोकसंख्या जास्त नाही. सोलापूर नगरात ०.२९ टक्के लोकसंख्या बेघर आहे.

सोलापूर जिल्ह्यात उस्मानाबाद जिल्ह्यापेक्षा बेघर लोकसंख्येचे प्रमाण जास्त आढळून आले आहे. कारण सोलापूर नगर उस्मानाबाद नगरापेक्षा लोकसंख्येच्या दृष्टीने मोठे नगर आहे. तसेच सोलापूर रेल्वे स्टेशनवर बेघर लोकसंख्येचे प्रमाण उस्मानाबाद रेल्वे स्टेशनपेक्षा जास्त दिसून येते. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यात बेघर लोकसंख्येचे प्रमाण जास्त आढळून आले आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार उस्मानाबाद जिल्ह्यात २९९ कुटुंबे बेघर होती, तर सोलापूर जिल्ह्यात ४०२ कुटुंबे बेघर होती. बेघर कुटुंबातील लोकसंख्येवरून असे दिसून येते, की उस्मानाबाद जिल्ह्यात १०४७ लोक बेघर होते, तर सोलापूर जिल्ह्यात १७४४ लोक बेघर असल्याचे दिसून येते.

### ५.३ संस्थात्मक लोकसंख्या:

भारतात धर्माच्या नावावर अनेक लोक मंदिरे, धर्मशाळा या ठिकाणी राहतात, तर काहींना राहण्यासाठी घर नसल्यामुळे ते समाज मंदिराच्या ठिकाणी राहतात. काही वृद्धांना घरातून हाकलून दिल्यामुळे वृद्धाश्रमात राहतात, तर कुमारिका माता व वेश्या आपल्या मुलांना बालक आश्रमात सोडतात. याला सोलापूर व उस्मानाबाद जिल्हेसुद्धा

अपवाद नाहीत. त्यामुळे या अनेक समस्यांमुळे संस्थात्मक लोकसंख्या वाढत आहे. तक्ता क्र. ५.२ वरून असे स्पष्ट होते, की सन २००१ मध्ये एकूण नागरी लोकसंख्येपैकी उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यात १.०० व १.०२ टक्के संस्थात्मक लोकसंख्या होती. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये सर्वांत जास्त संस्थात्मक लोकसंख्या परंडा नगरात आढळून येते. कारण परंडा भाग मागासलेला आहे. त्यामुळे उत्पन्नाअभावी लोक आश्रम, धर्मशाळा, वृद्धाश्रम, मंदिरे या ठिकाणी राहतात. सर्वांत कमी लोकसंख्या कळंब नगरामध्ये आढळून आली आहे. कारण हा भाग कृषीदृष्ट्या विकसित आहे, त्यामुळे लोकांना उत्पन्न जास्त मिळते; म्हणून मंदिरांत, धर्मशाळांत, हॉटेलमध्ये राहणारी लोकसंख्या कमी आढळून येते.

सोलापूर जिल्ह्यामध्ये सर्वांत जास्त संस्थात्मक लोकसंख्या सांगोला नगरामध्ये आढळून आली आहे. कारण सांगोला नगरासभोवतालच्या ग्रामीण भागातून नागरी भागाकडे स्थलांतर होत आहे; परंतु नगरामध्ये उत्पन्नाअभावी हे लोक मंदिरे, आश्रम, धर्मशाळा अशा ठिकाणी राहतात; म्हणून सांगोला नगरात संस्थात्मक लोकसंख्या जास्त आहे. सर्वांत कमी संस्थात्मक लोकसंख्या करमाळा नगरामध्ये आढळून आली आहे. कारण करमाळा नगराचा परिसर शेतीदृष्ट्या विकसित आहे व या नगरात मागासवर्गीय लोकसंख्या कमी आहे; म्हणून या नगरात संस्थात्मक लोकसंख्या कमी आहे.

सोलापूर नगरातील एकूण लोकसंख्येपैकी १.३८ व उस्मानाबाद नगरात ०.६८ टक्के लोकसंख्या सन २००१ मध्ये संस्थात्मक होती. सोलापूर नगरात संस्थात्मक

**तक्ता क्र. ५.२ उस्मानाबाद व सोलापूर जिल्हयातील नागरी भागातील संस्थात्मक कुटुंबे व लोकसंख्या (२००१ च्या जनगणनेनुसार)**

| नागरी संस्था | | | | | नागरी संस्था | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कुटुंबांची संख्या | संस्थात्मक लोकसंख्या | एकूण नागरी कुटुंबांशी प्रमाण | एकुण नागरी लोकसंख्येशी संस्थात्मक लोकसंख्येचे प्रमाण | | कुटुंबांची संख्या | संस्थात्मक लोकसंख्या | एकूण नागरी कुटुंबांशी प्रमाण | एकूण नागरी लोकसंख्येशी संस्थात्मक लोकसंख्येचे प्रमाण |
| परंडा | ११ | ६१० | ०.४२ | ३.६६ | करमाळा | ६ | १५६ | ०.१३ | ०.५५ |
| भूम | ५ | २०९ | ०.२८ | २.०१ | कुर्डूवाडी | ५७ | ३२७ | १.४५ | १.४९ |
| कळंब | १० | ३२८ | ०.२१ | १.१३ | बार्शी | ४ | ३१० | ०.०८ | १.१२ |
| उस्मानाबाद | ५२ | २५२८ | ०.१५ | १.३५ | सोलापूर | ६९ | २१३४ | ०.१३ | ०.६८ |
| तुळजापूर | १० | ३४८ | ०.३८ | २.२० | पंढरपूर | १७ | ६०५ | ०.२७ | १.६२ |
| उमरगा | २६ | ५११ | ०.३६ | १.२० | सांगोला | ६ | २५३ | ०.३९ | ३.०३ |
| एकूण जिल्हा | ११४ | ४५३४ | ०.२२ | १.०० | मंगळवेढा | ५ | २६५ | ०.१४ | १.३४ |
| | | | | | अक्कलकोट | १६ | ४१९ | ०.१७ | ०.७६ |
| | | | | | मैंदर्गी | ३ | १४४ | ०.१२ | ०.९५ |
| | | | | | दुधनी | २ | ७७ | ०.०८ | ०.५८ |
| | | | | | एकूण जिल्हा | १८५ | ४६९० | ०.१६ | १.०२ |

स्त्रोत : १. उस्मानाबाद जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, २००१

२. सोलापूर जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन,, २००१

लोकसंख्या जास्त आहे. कारण उस्मानाबाद नगरापेक्षा सोलापूर नगराचा व्यावसायिक विकास जास्त झाला आहे. याचा परिणाम संस्थात्मक लोकसंख्या सोलापूर नगरात कमी आढळून आली आहे. दोन्ही जिल्ह्यांची तुलना करता, सोलापूर जिल्ह्यात संस्थात्मक लोकसंख्या उस्मानाबाद नगरापेक्षा जास्त आहे, याचाच अर्थ उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरी भागात सामाजिक संस्थांचा विकास कमी असल्याचे दिसून येते.

**५.४ उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील नागरी भागातील घरांची स्थिती:**

प्रत्येक व्यक्तीची आर्थिक परिस्थिती सारखी नसते, त्यामुळे काही लोक पक्क्या घरांत, काही लोक अर्धपक्क्या घरांत तर काही लोक कच्च्या घरांत राहतात. एखाद्या घराच्या भिंती विटांनी व सिमेंटनी बांधून घरावर छत टाकलेली असते व घरात फरशी चांगल्या दर्जाची असेल तर, त्याला पक्के घर म्हणतात. ज्या घरांच्या भिंती विटा, दगडांनी व पोलादाच्या पत्र्यांनी बांधल्या आहेत व घरांवर पोलादी पत्र्यांचे छत आहे व घरात साधी फरशी आहे अशा घराला अर्धपक्के घर म्हणतात. ज्या घरांच्या भिंती माती, दगड यांनी बांधलेल्या आहेत. घरावर छप्पर, लाकडे टाकून गवत, पाने अंथरली आहेत व घरात फरशी नसते, अशा घराला कच्चे घर म्हणतात.[७] उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील नागरी भागातील वाढते दारिद्र्य, बेकारी, प्लॉटच्या किमतीतील वृद्धी व भाडे यांमुळे बहुसंख्य लोक कच्च्या घरांत राहतात. तक्ता क्र. ५.३ मध्ये उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील नागरी भागातील घरांची स्थिती दर्शविण्यात आली आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरी भागात सन २००१ च्या जनगणनेनुसार एकूण

**तक्ता क्र. ५.३ उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील शहरी भागातील घरांची स्थिती (२००१ च्या जनगणनेनुसार)**

| विवरण | उस्मानाबाद जिल्ह्याच्या नागरी भागातील घरांची संख्या | सोलापूर जिल्ह्याच्या नागरी भागातील घरांची संख्या |
|---|---|---|
| एकूण घरे | ५०१८० | १००४८० |
| अ) कच्ची व अर्धकच्ची घरे | - | - |
| १. गवत, पाने, वेळू इत्यादी | २२३० | ४५५० |
| २. माती | २४८५ | ११८७० |
| ३.कच्च्या विटा | १८३० | ९७३० |
| ४. लाकूड | १६०५ | ६४६५ |
| ब) पक्की घरे | - | - |
| १. पक्क्या विटांची | १४९५० | ५१२४० |
| २. लोखंडी किंवा धातुचे पत्रे | १७२५ | १३३० |
| ३. दगड | १४७०० | ८६२० |
| ४. सिमेंट कॉंक्रिट | १२०५ | ५६३५ |
| ५. इतर साधन सामग्री | १३०० | १०३० |
| एकूण कच्ची व अर्धकच्ची घरे | ८१५० (१९.३९) | ३२६१५ (३२.४६) |
| एकूण पक्की घरे | ३३८८० (८०.६१) | ६७८५५(६७.५४) |
| एकूण घरे | ४२०३० (१००) | १००४७०(१००) |

स्त्रोत: १. उस्मानाबाद जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, २००१

२. सोलापूर जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन,, २००१

घरे ५०१८०; तर सोलापूर जिल्ह्यात १००४७० घरे होती. उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यांत नागरी पक्की घरे अनुक्रमे १६.२५ टक्के व ३२.४७ टक्के होती. दोन्ही जिल्ह्यांची महाराष्ट्राशी तुलना करता दोन्ही जिल्ह्यांत पक्क्या घरांची संख्या कमी आढळून येते व कच्च्या आणि अर्धपक्क्या घरांची संख्या जास्त आढळून येते. कारण दोन्ही जिल्ह्यांतील नागरी भागात दारिद्र्याचे प्रमाण जास्त आहे. तसेच मध्यमवर्गीय कुटुंबांचे प्रमाण जास्त आढळून येते. त्यामुळे अनेक कुटुंबांचे उत्पन्न कमी राहिल्यामुळे कच्च्या घरांत राहणारी लोकसंख्या दोन्ही जिल्ह्यांत जास्त आढळून आली आहे.

### ५.५ नागरी भागातील घरभाड्याची समस्या:

उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्याच्या नागरी भागात घरांची मागणी पुरवठ्यापेक्षा जास्त झाल्यामुळे दोन्ही जिल्ह्यांच्या नागरी भागात घरभाडे समस्या निर्माण झाल्या आहेत. घरभाडे जाणून घेण्यासाठी सन २०११ मध्ये सोलापूर, अक्कलकोट, उस्मानाबाद व तुळजापूर या प्रत्येक नगरातील ५ कुटुंबांची पाहणी करण्यात आली आहे. त्यावरुन पुढीलप्रमाणे तक्ता तयार करून निष्कर्ष काढण्यात आले आहेत. तक्ता क्र. ५.४ वरून असा निष्कर्ष निघतो, की उस्मानाबाद जिल्ह्यात सन २००१ व सन २०११ या दोन्ही वर्षी सोलापूर नगरातील भाड्याचे दर उस्मानाबाद नगरापेक्षा जास्त होत; कारण उस्मानाबाद हे लहान नगर आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये तुळजापूर नगरातील भाड्याचे दर २००१, २०११ दोन्ही वर्षी उस्मानाबाद नगरापेक्षा कमी राहिले आहेत; परंतू नऊ वर्षांच्या कालखंडात तुळजापूर नगरातील भाडयातील वृद्धी उस्मानाबाद शहरापेक्षा जास्त आढळून आली

**तक्ता क्र. ५.४ उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील नागरी भागातील घरभाडे (प्रति महिना रुपयांत)**

| नगराचे नाव | सर्वे केलेल्या घरांची संख्या | २००१ | | २०११ | | घरभाडयातील वाढ / घट | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एक रूमसाठी भाडे | दोन रूमसाठी भाडे | एक रूमसाठी भाडे | दोन रूमसाठी भाडे | एक रूमच्या भाडयातील वाढ / घट | दोन रूमच्या भाडयातील वाढ / घट |
| अ) सोलापूर जिल्हा | | | | | | | |
| १. सोलापूर | ५ | ३०० | ६०० | ८०० | १४०० | २६६.६० | २३३.३३ |
| २. अक्कलकोट | ५ | २०० | ५०० | ५०० | ११०० | २५०.०० | २२०.०० |
| सरासरी | | २५० | ५५० | ६५० | १२५० | २५८.३० | २२६.६६ |
| ब) उस्मानाबाद जिल्हा | | | | | | | |
| १. उस्मानाबाद | ५ | २५० | ६०० | ६०० | १००० | २४०.०० | १६६.६६ |
| २. तुळजापूर | ५ | २०० | ५०० | ५०० | ८०० | २५०.०० | १६०.०० |
| सरासरी | | २२५ | ५५० | ५५० | ९०० | २४५.०० | १६३.३३ |

स्त्रोत : सर्वेक्षण.

आहे. कारण तुळजापूर नगराच्या उत्तरेकडील भागात उस्मानाबाद नगर येते. त्यामुळे अनेक लोक व्यवसायासाठी, मुलांच्या शिक्षणासाठी, रोजगारासाठी तुळजापूर नगरात स्थलांतरित झाल्याचे दिसते. त्यामुळे घरांची मागणी व पुरवठा यांतील अंतर वाढले आहे. म्हणून तुळजापूर नगरातील भाड्यातील वृध्दी उस्मानाबाद नगरापेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. सोलापूर जिल्ह्यात सोलापूर नगरातील भाड्याचे दर दोन्ही वर्षी अक्कलकोट नगरापेक्षा जास्त आहेत. याशिवाय नऊ वर्षांच्या कालखंडात सोलापूर नगरातील भाड्यातील वृद्धी अक्कलकोट नगरापेक्षा जास्त आहे. कारण सोलापूर नगरामध्ये मुबलक प्रमाणात नागरी सुखसुविधा उपलब्ध आहेत; त्यामुळे लोक रोजगारासाठी, शिक्षणासाठी, व्यवसायासाठी, आरोग्यासाठी, मनोरंजनासाठीच्या सोयी उपलब्ध असल्याने सोलापूर नगरातील घरभाड्यात नेहमीच वृद्धी होत आहे. उस्मानाबाद जिल्ह्यात एक खोलीच्या भाड्यात सरासरी २४५ टक्क्यांनी तर दोन खोलीच्या भाड्यात सरासरी १६३.३३ टक्क्यांनी वाढ झाली असून, हे प्रमाण सोलापूर जिल्ह्यात अनुक्रमे २५८.३३ टक्के व २२६.६६ टक्के दिसून येते.

### ५.६ झोपडपट्टी वस्ती:

भारतामध्ये झोपडपट्टीच्या प्रश्नाने उग्र रूप धारण केले आहे. नागरीकरणाचा मोठा दुष्परिणाम म्हणजे झोपडपट्टी होय. रोजगारातून झोपडपट्टी वस्त्या नागरी भागात निर्माण होत आहेत. झोपडपट्ट्यांमध्ये शिक्षणाचा अभाव असतो, स्वच्छता नसते, नैतिकता व सामाजिक मूल्ये ढासळलेली असतात असेच नाही; तर तेथील परिस्थिती त्यांना तसे बनविते. सिनेमातील नायक मुलांचा आदर्श असतात. झोपडपट्टीमध्ये रस्ते,

विद्युत, पाणीपुरवठा, शौचालय अशा नागरी सुविधा फार कमी उपलब्ध असतात. झोपडपट्टी प्रश्नाने मोठ्या नगरांना तर प्रत्यक्षात ग्रासलेच आहे. एकंदरीत झोपडपट्टी भूभाग विकासापासून वंचित असतो, त्यामुळे नगरांच्या विकासात असमतोल निर्माण झालेला दिसतो.

नेल्स अँडरसन[८] यांच्या मते, ''झोपडपट्टी म्हणजे अतिगर्दीचा विभाग, जेथील परिस्थिती निकृष्ट असते, आरोग्यास हानिकारक असते, ज्या ठिकाणी सुरक्षिततेला व नैतिकतेला धोका निर्माण होतो, त्याला झोपडपट्टी म्हणतात.'' उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील नागरी भागातील झोपडपट्ट्यांची स्थिती अनुक्रमे तक्ता क्र. ५.५ व ५.६ मध्ये दर्शविण्यात आली आहे. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये सन २००१-०२ व सन २०१०-११ या वर्षी झोपडपट्टीत राहणारी लोकसंख्या एकूण नागरी लोकसंख्येपैकी अनुक्रमे २०९७९ व ९६७०४ होती, हेच प्रमाण सोलापूर जिल्ह्यात अनुक्रमे २९९१३ व १३७२२६ एवढे होते. उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरी भागात झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकसंख्येत घट झाली नाही, तर ती वाढत गेली आहे. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये सर्वांत जास्त झोपडपट्टीत राहणारी लोकसंख्या दोन्ही वर्षी उस्मानाबाद नगरात आढळते, तर सर्वांत कमी लोकसंख्या कळंब नगरात आढळते.

सोलापूर जिल्ह्यामध्ये सन २००१-२००२ व सन २०१० - २०११ या वर्षी सर्वांत जास्त झोपडपट्टीत राहणारी लोकसंख्या सोलापूर नगरात आढळते; कारण या ठिकाणी रोजगारासाठी, व्यवसायासाठी प्रचंड लोक या स्थलांतरित झालेले आहेत; त्यामुळे राहण्यासाठी जागा अपुरी पडत आहे. यामुळेच हे लोक झोपडपट्टीत राहत असल्याचे

## तक्ता क्र. ५.५ उस्मानाबाद जिल्हयातील झोपडपट्यांची स्थिती

| नागरी संस्था | झोपडपट्टी संख्या | २००१-०२ | | | झोपडपट्टी संख्या | २००१०-११ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण झोपड्यांची संख्या | झोपडपट्टीतील एकूण लोकसंख्या | झोपडपट्टीतील सुविधांवर वर्षात केलेला एकूण खर्च (रुपयांत) | | एकूण झोपड्यांची संख्या | झोपडपट्टीतील एकूण लोकसंख्या | झोपडपट्टीतील सुविधांवर वर्षात केलेला एकूण खर्च (रुपयांत) |
| उस्मानाबाद | ३५ | १५५३६ | ६८६२२ | ९१६००० | ८७ | २५९४५ | १४०५९९ | ६७४४९०८ |
| उमरगा | १२ | ३०५८ | १३९९० | ७८५६५ | १५ | ८०० | ९६०० | १०१५०० |
| तुळजापूर | ७ | १५८४ | ८२६० | १०९७२० | ११ | १९९६ | ६२९९ | ३८४५०० |
| कळंब | ५ | १०३ | ५३५ | २७५०० | ७ | ५० | ४१० | ० |
| भूम | ३ | ३११ | १५५४ | ८८८५ | ५ | ११५ | ८१६ | ३०००० |
| परंडा | ५ | ३८७ | ३७४३ | ० | ७ | २०० | ५६५ | ० |
| एकूण जिल्हा | ६७ | २०९७९ | ९६७०४ | ११४०६७० | १३२ | २८३०६ | १५८२८९ | ७२६०९०८ |

स्त्रोत : नगरपालिका वार्षिकी, उस्मानाबाद जिल्हा: २००१-०२, २०१०-११.

## तक्ता क्र. ५.६ सोलापूर जिल्ह्यातील झोपडपट्यांची स्थिती

| नागरी संस्था | झोपडपट्टी संख्या | २००१-०२ | | | झोपडपट्टी संख्या | २००१०-११ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण झोपड्यांची संख्या | झोपडपट्टीतील एकूण लोकसंख्या | झोपडपट्टीतील सुविधांवर वर्षात केलेला एकूण खर्च (रुपयांत) | | एकूण झोपड्यांची संख्या | झोपडपट्टीतील एकूण लोकसंख्या | झोपडपट्टीतील सुविधांवर वर्षात केलेला एकूण खर्च (रुपयांत) |
| सोलापूर | ४० | १६५८० | ८८६२२ | ९८५००० | ८९ | २९९९२ | १९०५८२ | ८७४२५०८ |
| करमाळा | ७ | ३७७ | २४२५ | १५७००८ | ७ | ३५० | २१२२ | १६५०० |
| कुर्डूवाडी | १२ | ६८९८ | १७५२० | ६४०००० | १३ | ६९२० | १८५०० | ६४५००० |
| बार्शी | ५ | ७४७ | १८८१ | १२३८०० | ६ | ६६४ | २९९६ | २४४००० |
| पंढरपूर | ७ | ३०५८ | १३९९० | ७८५६५ | १० | ५०५८ | १६८६० | ३८४५०० |
| सांगोला | ३ | ११९६ | ६०४३ | ० | ३ | ११९६ | ६२९९ | ० |
| मंगळवेढा | २ | ४४० | २४०० | १६३३४ | २ | ३८५ | ३०८५ | ० |
| अक्कलकोट | २ | ५०० | २५०० | ० | ३ | ६०० | ३०२८ | ३०००० |
| मैंदर्गी | १ | २०० | ११५० | ६६८०० | १ | २०२ | ११०७ | ० |
| दुधनी | १ | १९० | ६८५ | १७३८५ | १ | १९० | ६९५ | १७३८५ |
| एकूेण जिल्हा | ८० | २९९१३ | १३७२२६ | २०८४८९२ | १३५ | ४५५५७ | २४५२७४ | १००७९८९३ |

स्त्रोत : नगरपालिका वार्षिकी, उस्मानाबाद जिल्हा: २००१-०२, २०१०-११.

दिसून येत आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये सर्वांत कमी झोपडपट्टीत राहणारी लोकसंख्या दुधनी या नगरात आढळते; कारण या ठिकाणी मुबलक व्यवसाय, रोजगार व कृषीव्यवस्था सुधारित मानली जाते; त्यामुळे येथील प्रत्येकाचा आर्थिक दर्जा सुधारलेला आहे; म्हणजेच यांचे दारिद्र्य संपलेले आहे. त्यामुळेच या ठिकाणी झोपडपट्टयांची संख्या कमी आहे. झोपडपट्टी सुधारणेसाठी उस्मानाबाद जिल्ह्यात सन २०१०-११ मध्ये ७२०६० हजार रुपये खर्च करण्यात आला तर सोलापूर जिल्ह्यात याच वर्षी झोपडपट्टी सुधारणेसाठी एक कोटी रुपये खर्च करण्यात आले.

## ५.७ नगरातील जमिनीच्या (प्लॉटच्या) किमती :

नगरांमध्ये जमिनीचा वापर घरांसाठी, कार्यालयांसाठी, उद्योग व व्यवसायांसाठी, शाळा, महाविद्यालयांसाठी केला जात आहे. त्यामुळे जमिनीच्या किमती वाढत आहेत. नागरी विकास नियोजन संघटनेच्या मते, सन १९७३ च्या नागरी जमीन किंमत नियमन कायद्यामुळे नगरातील जमिनींच्या किमती कमी वेगाने वाढल्या आहेत.[९] उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील नगरीय जमिनीच्या किमती अनुक्रमे तक्ता क्र. ५.७ व तक्ता क्र. ५.८ मध्ये दर्शविण्यात आल्या आहेत.

तक्ता क्र. ५.७ व ५.८ वरून असे स्पष्ट होते, की सन २००१ ते सन २०११ दरम्यानच्या कालखंडात उस्मानाबाद व सोलापूर नगरातील प्रतिचौरस मीटर जागेच्या किमती त्या-त्या जिल्ह्यातील इतर नगरांपेक्षा जास्त वाढल्या आहेत. कारण दोन्ही ठिकाणे जिल्हा मुख्यालयाची आहेत. आर्थिक व सामाजिकदृष्ट्या इतर नगरांपेक्षा विकसित असल्यामुळे उद्योग, व्यापार व घरगुती क्षेत्रांकडून जमिनीची मागणी जास्त

**तक्ता क्र. ५.७ उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरी भागातील खुल्या जमिनीच्या किमती (प्रति चौरस मीटरची किंमत रुपयांत)**

| नगराचे नाव | सन २०११ | | सन २००१ | | सन २००१ ते २०११ या कालवधीतील वाढ / घट | |
|---|---|---|---|---|---|---|
| | जास्तीत जास्त किंमत | कमीत कमी किंमत | जास्तीत जास्त किंमत | कमीत कमी किंमत | जास्तीत जास्त किंमत | कमीत कमी किंमत |
| उस्मानाबाद | ३००० | १६०० | १९८० | ११२२ | ५१.५१ | ४२.६ |
| उमरगा | २५०० | १४०० | १९८० | ९९० | २६.२६ | ४१.४१ |
| तुळजापूर | २१०० | ८५० | १२०२ | ६१८ | ७४.७ | ३७.५४ |
| कळंब | १२०० | ५३० | ८२२ | २५३ | ४५.९८ | १०९.४८ |
| भूम | ९५० | ५०० | ५४० | ४१४ | ७५.९२ | २०.७७ |
| परंडा | ९०० | ४०० | ५७५ | ३४५ | ५६.५२ | १५.९४ |

स्त्रोत : दुय्यम निबंधक कार्यालय, उस्मानाबाद जिल्हा, २००१ ते २०११.

**तक्ता क्र. ५.८ सोलापूर जिल्ह्यातील नागरी भागातील खुल्या जमिनीच्या किमती (प्रति चौरस मीटरची किंमत रुपयांत)**

| नगराचे नाव | सन २०११ | | सन २००१ | | सन २००१ ते २०११ या कालवधीतील वाढ / घट | |
|---|---|---|---|---|---|---|
| | जास्तीत जास्त किंमत | कमीत कमी किंमत | जास्तीत जास्त किंमत | कमीत कमी किंमत | जास्तीत जास्त किंमत | कमीत कमी किंमत |
| सोलापूर | ४५९५ | ३६९५ | २४८४ | २४८४ | ८४.९८ | ४८.७५ |
| करमाळा | ८५० | ३०० | ४९६ | २३४ | ७१.३७ | २८.२ |
| कुर्डूवाडी | ३६९५ | २७७० | २४३० | २२२० | ५२.०५ | २४.७७ |
| बार्शी | १३०० | १३०० | ९९० | ४३० | ३१.३१ | २०२.३२ |
| पंढरपूर | २५५० | १८२० | १५९० | ६०० | ६०.३७ | २०२.३२ |
| सांगोला | १०५० | ६०० | ७४७ | ४८३ | ४०.५६ | २४.२२ |
| मंगळवेढा | ९०० | ३२० | ४८६ | २९४ | ८५.१८ | ८.८४ |
| अक्कलकोट | १००० | ६०० | ४१५ | ३१३ | १४०.९६ | ९१.६९ |
| मैंदर्गी | ३२०० | २५०० | १८२४ | ५५० | ७५.४३ | ३५४.५४ |
| दुधनी | ८५० | ६०० | ६३२ | ३१६ | ३४.४९ | ८९.८७ |

स्त्रोत : दुय्यम निबंधक कार्यालय, उस्मानाबाद जिल्हा, २००१ ते २०११.

असल्यामुळे उस्मानाबाद व सोलापूर नगरातील जमिनीच्या किमती जास्त वाढल्या आहेत.

उस्मानाबाद जिल्हा (सन २०११) नोंदणी (रजिस्ट्री) अधिकाऱ्यांच्या मते, ''उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये जास्तीत जास्त खुल्या जागेच्या किमतीतील वृद्धी सर्वात जास्त भूम नगरात ७५.९२ टक्के झालेली आहे. कमीत कमी खुल्या जागेच्या किमतीतील सर्वात जास्त वद्धी कळंब नगरात १०९.४८ टक्के झालेली आहे.'' सोलापूर जिल्हा (सन २०११) नोंदणी (रजिस्ट्री) अधिकाऱ्यांच्या मते, ''सोलापूर जिल्ह्यामध्ये जास्तीत जास्त खुल्या जागेच्या किंमतीतील वद्धी सर्वात जास्त अक्कलकोट नगरात १४०.९६ टक्के झालेली आहे. कमीत कमी खुल्या जागेच्या किमतीतील सर्वात जास्त वृद्धी मैंदर्गी नगरात ३५४.५४ टक्के झालेली आहे.''

## ५.८ नागरी दारिद्र्य:

शेती व्यवसाय मागासलेला असल्यामुळे ग्रामीण भागात दारिद्र्य व बेकारी वाढत आहे. त्यामुळे हे लोक ग्रामीण भागातून नागरी भागात रोजगारासाठी स्थलांतरण करत आहेत; परंतु नागरी भागातही रोजगाराच्या संधी कमी झाल्यामुळे नागरी भागातील दारिद्र्यात, ग्रामीण दारिद्र्य व बेकारीने भर पेडत आहे. तसेच नागरी भागातही धर्माच्या नावाखाली व वंशाचा दिवा या नावाखाली कुटुंबनियोजन कमी केले जात आहे, म्हणून डॉ. एस. एल. पेडगांवकर (सन १९८६)[१०] यांच्या मते, ''कुटुंबाच्या मोठ्या आकारामुळे नागरी दारिद्र्य वाढत आहे. त्याचबरोबर नागरी भागात मजुरांना महागाईच्या निर्देशांकापेक्षा कमी वेतन दिले जाते. त्यामुळे कामगारांचे वा मजुरांचे कमी

उत्पन्न राहून दारिद्र्यात भर पडत आहे. नगरांमध्ये ज्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे, त्या प्रमाणात उद्योग-व्यवसायात वाढ होत नसल्यामुळे रोजगारात घट होत आहे. म्हणून नागरी दारिद्र्य वाढत आहे.''

उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी पुरवलेल्या माहितीवरुन, उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील इ.स. २००१ सालातील नगरनिहाय दारिद्र्याचे प्रमाण तक्ता क्र. ५.९ व तक्ता क्र. ५.१० मध्ये दर्शविण्यात आले आहे. एकूण नागरी लोकसंख्येपैकी उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यात दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण सन २००१ मध्ये अनुक्रमे १६.०९ व १६.०२ टक्के एवढे होते.

दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण सन २००१ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यात सर्वात जास्त उमरगा नगरात (१८.२७ टक्के) होते. कारण उमरगा नगराच्या भोवतालचा भाग डोंगराळ आहे, त्यामुळे ग्रामीण दारिद्र्य उमरगा नगरात जास्त स्थलांतरित झालेले आहे व उमरगा नगरात मागासवर्गीय लोकसंख्या इतर नगरांपेक्षा जास्त आहे. तसेच नगरात व्यावसायीक विकास कमी झाल्यामुळे उमरगा नगरात दारिद्र्याचे प्रमाण इतर नगरांपेक्षा जास्त आहे; तर सर्वांत कमी दारिद्र्याचे प्रमाण परंडा नगरात (१३.१४ टक्के) आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये सर्वांत जास्त दारिद्र्याचे प्रमाण अक्कलकोट नगरात (१६.९४ टक्के) होते. कारण व्यवसायिकदृष्ट्या मागासलेला भाग म्हणून या नगराची ओळख आहे. केवळ धार्मिक व्यवसाय या नगरात दिसून येतात; त्यामुळे रोजगाराचे प्रमाण कमी होऊन दारिद्र्याचे प्रमाण वाढले आहे. सर्वांत कमी दारिद्र्याचे प्रमाण दुधनी नगरात (१३.२० टक्के) दिसून येते. कारण दुधनी

**तक्ता क्र. ५.९ उस्मानाबाद जिल्ह्यातील नगरनिहाय दारिद्र्य (२००१ च्या जनगणनेनुसार)**

| नगरपालिकेचे नाव | एकुण नागरी कुटुंबसंख्या | दारिद्र्यरेषेखालील कुटुंबसंख्या | दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या | एकूण नागरी कुटुंबांपैकी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण | एकूण नागरी लोकसंख्येपैकी दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| उस्मानाबाद | २३२५ | १६२५ | १२६०४ | ६९.८९ | १५.६३ |
| उमरगा | २२६८ | १५२५ | ८६६४ | ६७.२३ | १८.२७ |
| तुळजापूर | ३०४० | १३११ | ७२८१ | ४३.१२ | १५.२६ |
| कळंब | १८१३ | ९६५ | ३७१४ | ५३.२२ | १६.१३ |
| भूम | १५२० | ७८९ | ३०४५ | ५१.९ | १७.३९ |
| परंडा | १३२५ | ६२५ | २२३३ | ४७.१६ | १३.१४ |
| एकूण जिल्हा | १२२९१ | ६८४० | ३७५४१ | ५५.६५ | १६.०९ |

स्त्रोत : १. उस्मानाबाद जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, २००१.

**तक्ता क्र. ५.१० सोलापूर जिल्ह्यातील नगरनिहाय दारिद्र्य (२००१ च्या जनगणनेनुसार)**

| नगरपालिकेचे नाव | एकूण नागरी कुटुंबसंख्या | दारिद्र्यरेषेखालील कुटुंबसंख्या | दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या | एकूण नागरी कुटुंबांपैकी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण | एकूण नागरी लोकसंख्येपैकी दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| करमाळा | ४५२८ | ८२१ | २२५३७ | १८.१३ | १३.९५ |
| कुर्डूवाडी | ४६२० | ९४९ | ४०५२५ | २०.५४ | १५.०५ |
| बार्शी | २४३५० | ४२५० | ४३६५४ | १७.४५ | १३.३९ |
| उत्तर सोलापूर | १६१३४९ | ४००५२ | १०३१२९ | २४.८२ | १३.८६ |
| पंढरपूर | १८००० | १४२१ | ५४५२५ | ७.८९ | १५.४५ |
| सांगोला | ५३९७ | १८९८ | ३२२३० | ३५.१७ | १४.०५ |
| मंगळवेढा | ४८९६ | १३८३ | २२२६० | २८.२५ | १५.९८ |
| अक्कलकोट | ७८७८ | ४२३९ | ४२८७४ | ५३.८१ | १६.९४ |
| मैंदर्गी | २२५० | ९९४ | १०१०८ | ४४.१८ | १३.२ |
| दुधनी | २४०५ | ९९२ | १२२४१ | ४१.२५ | १४.१५ |
| एकूण जिल्हा | २३५६७३ | ५६९९९ | ३९४०८३ | २४.१९ | १६.०२ |

स्त्रोत : १. उस्मानाबाद जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, २००१.

नगराचा व्यावसायिकदृष्ट्या बऱ्यापैकी विकास झाला आहे. सोलापूर नगरात दारिद्र्याचे प्रमाण १३.८६ टक्के आढळून आले आहे.

एकूण सोलापूर जिल्ह्यात नागरी दारिद्र्याचे प्रमाण १६.०२ टक्के, तर उस्मानाबाद जिल्ह्यात १६.०९ टक्के एवढे दिसून येते. दारिद्र्याचे प्रमाण सोलापूर जिल्ह्यात थोडे कमी दिसून येते; कारण सोलापूर हे नगर औद्योगिकदृष्ट्या प्रगत नगर आहे व सोलापूर जिल्ह्यात जास्त जंगल क्षेत्र असल्यामुळे नागरी भागात लाकूड उद्योग, कागद उद्योग, फर्निचर उद्योग विकसित झाल्यामुळे रोजगार जास्त मिळाला आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्याच्या नागरी भागात दारिद्र्याचे प्रमाण उस्मानाबाद जिल्ह्यापेक्षा कमी आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरी भागात फारसा व्यावसायिक विकास न झाल्यामुळे व रोजगार कमी उपलब्ध झाल्यामुळे दारिद्र्याचे प्रमाण जास्त आहे.

### ५.९ रस्त्यावरील वाहनांची संख्या:

नागरीकरण वाढीबरोबर नगरातील बाजारपेठांचा केंद्रबिंदू बदलत आहे. त्यामुळे बाजारात जाण्यासाठी, कार्यालयास, शाळेत जाण्यासाठी वाहन ही नगरातील आवश्यक गरज झाली आहे.[११]

तक्ता क्र. ५.११ वरून असे स्पष्ट होते, की मार्च २००१ मध्ये उस्मानाबाद व सोलापूर नगरात वाहनांची संख्या अनुक्रमे दर हजार लोकसंख्येमागे ८९.७२ टक्के व ९५.०० टक्के एवढी आहे. सोलापूर नगरातील वाहनांची गर्दी उस्मानाबाद नगरांपेक्षा जास्त आहे. म्हणजेच ज्या ठिकाणी नागरीकरण जास्त झाले आहे, त्या ठिकाणी

**तक्ता क्र. ५.११ दर हजार लोकसंख्येमागे वाहनांची संख्या (मार्च २००१ )**

| वाहनांची वर्गवारी | सोलापूर नगरात दर हजार लोकसंख्येमागे वाहनांची संख्या | उस्मानाबाद नगरात दर हजार लोकसंख्येमागे वाहनांची संख्या |
|---|---|---|
| दुचाकी | ७२.०४ | ६४.६९ |
| चारचाकी | ७.२४ | ९.९१ |
| टॅक्सी | १.२७ | ०.३४ |
| ऑटोरिक्षा | ३.९४ | २.९९ |
| बसेस | १.०६ | १.५८ |
| मालवाहतुक वाहन | ३.९६ | ४.१२ |
| ट्रॅक्टर | २.२० | ३.२५ |
| टेडर्स | २.४५ | १.९२ |
| इतर | ०.८४ | ०.९२ |
| एकूण | ९५.०० | ८९.७२ |

स्त्रोतः १. उस्मानाबाद जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, २००१.

२. सोलापूर जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, २००१.

रस्त्यावरील वाहनांची संख्या जास्त आहे, हे स्पष्ट होते. उस्मानाबाद नगरापेक्षा सोलापूर नगरात जास्त गर्दी आहे हे स्पष्ट होते. सोलापूर नगरामध्ये रस्त्यावर वाहनांची कोंडी झाली, तर तीन-तीन तास वाहनांची कोंडी हटत नाही. सोलापूर ऑटो संघटनेच्या मते व शहर वाहतूक पोलिसांच्या मते, एखाद्या चौकात संध्याकाळी दररोज ३०० ते ३५० वाहने अर्ध्या तासात रस्त्यावरून जातात. तर उस्मानाबाद नगरात २०० ते २५० वाहने अर्ध्या तासात रस्त्यावरून जातात. उस्मानाबाद जिल्ह्यात दरहजार लोकसंख्येमागे सर्वाधिक ६४.६९ टक्के दुचाकी वाहने असून त्यानंतर ९.९१ टक्के एवढी चारचाकी वाहनांची संख्या आहे. हेच प्रमाण सोलापूर जिल्ह्यात अनुक्रमे ७२.०४ टक्के व ७.२४ टक्के एवढे आहे.

नागरीकरण वाढीबरोबर नगरांमधील बाजारपेठ, विविध कार्यालये, शाळा, महाविद्यालये, यांचे घरापासून अंतर वरचेवर वाढत आहे. त्यामुळे बाजारात, महाविद्यालयांत, कार्यालयांत जाण्यासाठी नगरांमध्ये वाहन ही आवश्यक गरज झाली आहे, म्हणून नगरामधील वाहनांची संख्या वाढत आहे. म्हणजेच नगर विस्तार व वाहतूक यांचा जवळचा संबंध असतो. वाहतुकीमुळेच जुळी नगरेही निर्माण होत आहेत. वाढत्या वाहनांच्या संख्येमुळे नगरांमध्ये गर्दी, अपघात व हवा प्रदूषण वाढत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, नगरांमधील प्रदूषणाचे मुख्य साधन वाहन हे आहे.

तक्ता क्र. ५.११ वरुन असे स्पष्ट होते की, मार्च २००१ मध्ये जिल्ह्यातील एकूण वाहनांपैकी उस्मानाबाद व सोलापूर नगरात वाहनांचे प्रमाण अनुक्रमे ८९.७२ व ९५.०० टक्के आहे. सन १९९४ मध्ये भारतातील एकूण वाहनांपैकी ३२.६५ टक्के

वाहनांचे प्रमाण २३ महानगरांत आढळून आले आहे.

यावरून असा निष्कर्ष निघतो, की मोठ्या व विकसित नगरांमध्ये वाहनांची संख्या जास्त असते; तर लहान व कमी विकसित नगरांत वाहनांची संख्या कमी असते, तर विकसित देशांत वाहनांची संख्या भारतापेक्षा २००० पटींनी जास्त आहे हे स्पष्ट होते. तक्ता क्र. ५.११ वरून असे स्पष्ट होते, की उस्मानाबाद, सोलापूर नगरांत दर हजार लोकसंख्येमागे दुचाकी वाहनांची संख्या इतर वाहनांपेक्षा जास्त आहे. कारण दुचाकी वाहन सामान्य व्यक्तीसुध्दा घेऊन आपल्या वेळेची बचत करू शकते. दर हजार लोकसंख्येमागे ऑटोरिक्षांची संख्या उस्मानाबाद व सोलापूर नगरात अनुक्रमे २.९९ टक्के व ३.९४ टक्के आहे. म्हणजेच नगरांमध्ये दुचाकी, कार, ऑटोरिक्षा व माल वाहतूक करणाऱ्या वाहनांची संख्या जास्त आहे. एकंदरीत उस्मानाबाद व सोलापूर नगरात तुलना करता उस्मानाबाद नगरापेक्षा सोलापूर नगरात वाहनांची संख्या जास्त आहे.

**५.१० महानगरांमधील हवा प्रदूषण:**

तक्ता क्र. ५.१२ मध्ये महानगरांतील हवा प्रदूषण दर्शविण्यात आले आहेत. तक्ता क्र. ५.१२ वरून असे स्पष्ट होते, की दिल्ली महानगरात ६५.०० टक्के, कोलकत्ता व मुंबई महानगरात वाहनांमुळे हवाप्रदूषण अनुक्रमे ३५.०० व ५३.०० टक्के झालेले आहे. सोलापूर शहरामध्ये सर्वाधिक ५३ टक्के प्रदुषण औद्योगिकीकरणामुळे झाले असून, ४५ टक्के प्रदूषण वाहनांमुळे झालेले आहे. म्हणजेच नगरांमधील हवाप्रदूषणात ५० टक्के वाटा वाहनांचा असल्याचे स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ५.१२ महानगरातील हवा प्रदूषण (टक्केवारीत)**

| महानगर | वाहतूक | औद्योगिक | घरगुती |
|---|---|---|---|
| दिल्ली | ६५.०० | २९.०० | ६.०० |
| कलकत्ता | ३५.०० | ४६.०० | १९.०० |
| मुंबई | ५३.०० | ४३.०० | ४.०० |
| सोलापूर | ४५.०० | ५३.०० | २.०० |

स्त्रोत : Dilip Roy (1998) Environmental Management with India Experience.

**५.११ प्रदूषण घटकः**

तक्ता क्र. ५.१३ मध्ये विविध वाहनांतील प्रदूषण घटक दर्शविण्यात आले आहेत. तक्ता क्र. ५.१३ वरून असे स्पष्ट होते, की कार्बन मोनॉक्साईडचे सर्वात जास्त प्रमाण कारमधून (२४.०३ टक्के) निघते. हायड्रोकार्बन सर्वात जास्त ऑटोरिक्षामधून (७.६५ टक्के) व दुचाकी वाहनांमधून (५.२८ टक्के) निघतो. नायट्रोजन ऑक्साईड सर्वात जास्त बस व ट्रक (२.५० टक्के) मधून निघतो. सल्फर डायऑक्साईड व एकूणच हवेत पसरणा-या सुक्ष्म कणांचे उत्सर्जन होते. हे कण बस व ट्रक या वाहनांच्या द्वारे निघतात. एकंदरीत नगरांमध्ये दिवसाकाठी हजारो किलोमीटर अंतराचा एकूण वाहनांचा प्रवास होतो. त्यामुळे दररोज हवा प्रदूषण करणारे घटक नगरांमध्ये वाहनांतून हवेमध्ये सोडले जातात. त्यामुळे हवा प्रदूषण जास्त होत आहे. प्रति दिवसाला दिल्ली, मुंबई व कोलकत्ता नगरात वरील वायूंचे प्रमाण अनुक्रमे २९. टन, १८.३१ टन व ८.१७ टन आहे.[१२]

**तक्ता क्र. ५.१३ विविध वाहनांतील प्रदूषण घटक (प्रति कि.मी. ग्रॅम)**

| वाहने | कार्बन मोनॉक्साईड | हायड्रोकार्बन | नायट्रोजन ऑक्साईड | सल्फर डायऑक्साईड | शिसे | हवेतील लहान कण |
|---|---|---|---|---|---|---|
| दुचाकी | ८.३० | ५.१८ | ०.१० | ०.०५ | ०.०५ | ०.०५ |
| कार | २४.०३ | ३.५७ | १.५७ | ०.०५ | ०.०१ | - |
| तीनचाकी | १२.२५ | ७.६५ | ०.१० | ०.१० | ०.०१ | ०.५० |
| बस | १२.७० | २.१० | २.५० | २.५० | - | २.०० |
| ट्रक | १२.७० | २.१० | २.५० | २.५० | - | २.०० |
| जड वाहने | ५.३९ | ०.६६ | ०.९० | ०.९० | - | ०.८३ |

स्त्रोत : Teri Energy Date Directory and year book, 1996-97 & 1997-98.

### ५.१२ कचरा व टाकाऊ पदार्थांची समस्या:

नगरांतील वाढत्या मानवी गरजांमुळे कचरा व टाकाऊ पदार्थ वाढत आहेत. प्लॅस्टिक, ग्लास, नासका भाजीपाला, दवाखान्यांतील टाकाऊ पदार्थ यामुळे टाकाऊ पदार्थ वाढत आहेत.

नगरांमधील टाकाऊ पदार्थ प्रमुख चार क्षेत्रांमध्ये निर्माण केले जातात.

**१) घरगुती क्षेत्र:**

स्वयंपाकघरातील घाण, पेपर, प्लास्टिक, धातू, ग्लास, लेसर, राख यांचा समावेश या क्षेत्रात होतो.

**२) उद्योग व व्यापार क्षेत्र:**

पॅकिंग डबे, पेपर, प्लॅस्टिक, बाजारातील टाकाऊ वस्तू, नासका भाजीपाला, मांस इत्यादी.

**३) दवाखाने:**

वैद्यकीय महाविद्यालये व दवाखाने यांमूधन टाकाऊ बाटल्या, मुदत संपलेली औषधे, रासायनिक प्रक्रियायुक्त औषधे, रोग्यावर उपचार करून वाया गेलेली साधने इत्यादी बाहेर टाकली जातात.

**४) सामान्य ठिकाणी:**

बाजारपेठा, बसस्टँड, रेल्वे स्टेशन, चौक, सिनेमागृहे, विविध कार्यालये अशा सार्वजनिक ठिकाणी लोक कचरा जास्त करतात. नगरांमध्ये नष्ट न होणारे व नष्ट होणारी जैविके निर्माण करून टाकून दिली जातात. त्यामुळे प्रदूषण वाढून नगरांमध्ये

गॅस्ट्रो, साथीचे रोग, कॉलरा, कावीळ असे रोग वाढून प्राणहानी होत आहे. सन १९८९ मध्ये National Institute of Urban Affairs यांनी भारतातील अनेक शहरांतील अभ्यास केला आहे.[१३] त्यांच्या मते, ''एकूण निर्मित कचऱ्यापैकी ७२ टक्के कचरा गोळा केला जातो तर २८ टक्के कचरा नगरात घाण निर्माण करतो.''

उस्मानाबाद नगरात दररोज २५ टन टाकाऊ पदार्थांचा कचरा गोळा केला जातो. म्हणजेच २५००० किलो कचरा गोळा केला जातो. याचे विभाजन ग्रॅममध्ये करण्यात आले असता, २५००० x १००० = २,५०,००,००० ग्रॅम कचरा दररोज गोळा केला जातो. म्हणून ७२ टक्क्यांसाठी २५,००० किलो तर १०० टक्क्यांसाठी किती? या त्रैराशिक सूत्राचा वापर करून कचरा निर्मिती काढली आहे.

$$\frac{२५०००}{७२} \times १०० = ३४७२३ \text{ किलो होय.}$$

म्हणजेच दररोज ३४७२३ x १००० = ३,४७,२३,००० ग्रॅम कचरा दररोज निर्माण केला जातो.

### ५.१२.१ उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील नागरी भागातील टाकाऊ पदार्थ:

सन २००१ वर्षातील उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्याच्या नागरी भागातील टाकाऊ पदार्थांची स्थिती अनुक्रमे तक्ता क्र. ५.१४ व तक्ता ५.१५ मध्ये दर्शविण्यात आली आहे. उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील नागरी भागात सरासरी प्रतिदिन दरडोई अनुक्रमे १८३.५९ व २७१.६६ ग्रॅम कचरा निर्माण होतो; तर सरासरी प्रतिदिन दरडोई उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्याच्या नागरीभागात अनुक्रमे १३२.१८ व १९५.५९

**तक्ता क्र. ५.१४ उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरी भागातील कचरा व टाकाऊ पदार्थ (सन २००१, किलो ग्रॅम)**

| नगरपालिकेचे नाव | प्रतिदिन निर्माण होणारा कचरा व टाकाऊ पदार्थ | प्रतिदिन निर्माण गोळा होणारा कचरा व टाकाऊ पदार्थ | प्रतिदिन दरडोई निर्माण होणारा कचरा व टाकाऊ पदार्थ | प्रतिदिन दरडोई गोळा होणारा कचरा व टाकाऊ पदार्थ | प्रतिदिन दरडोई शिल्लक राहणारा कचरा व टाकाऊ पदार्थ |
|---|---|---|---|---|---|
| उस्मानाबाद | ३४७२३ | २५००० | १५२.५० | १३१.४० | ५१.१० |
| तुळजापूर | १६६६६ | १२००० | ५१४.५७ | ४१६.१४ | ९८.४३ |
| उमरगा | ८३३४ | ६००० | ३०१.३९ | २१६.९९ | ८४.४० |
| कळंब | २७७८ | २००० | १७६.१६ | १२६.८७ | ४९.२९ |
| भूम | ४१६७ | ३००० | ९८.४२ | ९२.६२ | ५.८० |
| परंडा | २७७६ | २००० | २५९.५० | १८६.८९ | ७२.६१ |
| एकूण जिल्हा | ६९४४४ | ५०००० | १८३.५९ | १३२.१८ | ५१.४१ |

स्त्रोत : नगरपालिका वार्षिकी, उस्मानाबाद जिल्हा, २००१.

### तक्ता क्र. ५.१५ सोलापूर जिल्ह्यातील नागरी भागातील कचरा व टाकाऊ पदार्थ (सन २००१, किलो ग्रॅम)

| नगरपालिकेचे नाव | प्रतिदिन निर्माण होणारा कचरा व टाकाऊ पदार्थ | प्रतिदिन निर्माण गोळा होणारा कचरा व टाकाऊ पदार्थ | प्रतिदिन दरडोई निर्माण होणारा कचरा व टाकाऊ पदार्थ | प्रतिदिन दरडोई गोळा होणारा कचरा व टाकाऊ पदार्थ | प्रतिदिन दरडोई शिल्लक राहणारा कचरा व टाकाऊ पदार्थ |
|---|---|---|---|---|---|
| करमाळा | ५५५६ | ४००० | २५३.५० | १८२.५० | ७१.०० |
| कुर्डूवाडी | १३८८८ | १०००० | ८३४.६६ | ६००.९९ | २३३.६७ |
| बार्शी | २७७६ | २००० | ११५.४६ | ८३.१९ | ३२.२७ |
| सोलापूर | ८०५५६ | ५८००० | २६०.४३ | १८७.५१ | ७२.९२ |
| पंढरपूर | ५५५५६ | ३५००० | १७०.४२ | १०२.८० | ६६.१४ |
| सांगोला | ८५५४ | ६००० | ५५३.२० | ३९८.२७ | १५४.९३ |
| मंगळवेढा | ५५५७ | ४००० | ४२२.६४ | ३०४.२२ | ११८.४२ |
| अक्कलकोट | ६९४४ | ५००० | २५५.१८ | १३४.३६ | १२०.८२ |
| मैंदर्गी | १३९० | १००० | १३३.७५ | ९६.२२ | ३७.५३ |
| दुधनी | २७२७ | २००० | १६८.५७ | १२१.४१ | ४७.१६ |
| एकूण जिल्हा | १८३४८४ | १२७००० | २७१.६६ | १९५.५९ | ७६.०७ |

स्त्रोत : नगरपालिका वार्षिकी, सोलापूर जिल्हा, २००१.

ग्रॅम कचरा गोळा केला जातो. म्हणजेच सोलापूर जिल्ह्यामध्ये दरडोई प्रतिदिन कचरा निर्मिती उस्मानाबाद जिल्ह्यापेक्षा जास्त आहे. भारतामध्ये नागरी भागात प्रतिदिन दरडोई ३०० ते ५०० ग्रॅम कचरा निर्माण केला जातो. भारताच्या तुलनेमध्ये दोन्ही जिल्ह्यांतील नागरी भागात दरडोई प्रतिदिन कचरा निर्मितीची तीव्रता कमी आहे. म्हणजेच दोन्ही जिल्ह्यांत भारताच्या तुलनेत नागरीकरण अतिशय कमी झालेले आहे, हे स्पष्ट होते व कचरा निर्मिती समस्या अतिशय कमी आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यात सर्वांत जास्त दरडोई कचरा निर्मिती तुळजापूर नगरात निर्माण होते. कारण तुळजापुरमध्ये पुरातन जगदंबा मंदिर आहे; त्यामुळे दररोज हजारो भाविक तुळजापुरात दाखल होतात त्यामुळे नगरात गर्दी जास्त होते व कचराकुंड्या त्या प्रमाणात उपलब्ध नाहीत; म्हणून तुळजापूर नगरात कचरा निर्मिती जास्त आहे, तर सर्वांत कमी दरडोई कचरा निर्मिती परंडा नगरात केली जाते. कारण नागरीकरण कमी झाल्यामुळे उपभोग पातळी कमी असण्याची शक्यता परंडा नगरात जास्त आहे व कचराकुंडीत कचरा टाकण्याची सवयही जास्त असण्याची शक्यता आहे.

सोलापूर जिल्ह्यात सर्वांत जास्त प्रतिदिन दरडोई कचरा निर्मिती कुर्डुवाडी नगरात केली जाते. कारण कुर्डुवाडी हे नगर मोठे जंक्शन म्हणून ओळखले जाते, त्याचबरोबर लोकसंख्या घनता बरीच जास्त आहे. तर सर्वांत कमी दरडोई कचरा निर्मिती बार्शी नगरात होते. उस्मानाबाद व सोलापूर नगरात प्रतिदिन दरडोई कचरा निर्मिती अनुक्रमे १८२.५० व २६०.४३ ग्रॅम केली जाते. सोलापूर नगराचे नागरीकरण जास्त झाल्यामुळे घरगुती, औद्योगिक, वैद्यकीय महाविद्यालयांतून व सार्वजनिक

ठिकाणी जास्त कचरा निर्मिती होते. यामुळेच सोलापूर नगरात उस्मानाबाद नगरापेक्षा जास्त कचरा निर्मिती होते. बऱ्याच लहान नगरांमध्ये तर कचराही गोळा केला जात नाही. यामुळे अशा नागरी भागात कावीळ, गॅस्ट्रो, पोटाचे आजार, कॉलरा या रोगांना नागरिकांना सामोरे जावे लागत आहे.

### ५.१३ पाणीप्रदूषण समस्या:

भारतामध्ये एकूण पाणीपुरवठ्याच्या ७० टक्के पाणी प्रदूषित होते. नगरांमधील घरगुती क्षेत्रातील व उद्योग व्यापार क्षेत्रातील मळीमुळे, ड्रेनेजमुळे, पाईप फुटल्यामुळे व नाल्यांची योग्य सुविधा नसल्यामुळे पाणीप्रदूषण होत आहे. दिल्ली शहरातून दर दिवशी घरगुती व औद्योगिक क्षेत्रातून १७० व ३० कोटी लिटर प्रदूषित पाणी यमुना नदीत सोडले जाते. याचाच अर्थ ८५ टक्के घरगुती क्षेत्रातून व १५ टक्के पाणी औद्योगिक क्षेत्रातून प्रदूषित केले जाते. यमुना नदीतील एकूण प्रदूषित पाण्यापैकी ७१ टक्के पाणी प्रदूषण एकट्या दिल्ली शहराने केले आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मते एकूण पाणी पुरवठ्याच्या ८० टक्के पाणी मैलायुक्त होते. त्यामुळे पाणी प्रदूषणाचे प्रमाण वाढत आहे. प्रदूषणामुळे पाण्यातील कोलीफॉर्मचे व पाण्यातील लहान-लहान कणांचे प्रमाण वाढत असल्यामुळे ऑक्सिजनचे प्रमाण कमी होऊन पाण्यातील जलचर मृत्यू पावत आहेत. पाण्याचा सामू (PH) वाढत असल्यामुळे पाणी कमी पिण्यायोग्य होत आहे.[१४]

#### ५.१३.१ उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यांच्या नगरांमधील पाणीप्रदूषण:

उस्मानाबाद व सोलापूरच्या जीवन प्राधिकरण कार्यालयाने अनुक्रमे प्रति १००

लिटरमागे ६० लिटर  किंवा १४० लिटरमागे ८४ लिटर पाणी प्रदूषित होते, असे प्रमाण काढले आहे.  म्हणजेच ६० टक्के पाणी दोन्ही जिल्ह्यांच्या नागरी भागात प्रदूषित होते, असे प्रमाण काढण्यात आले आहे. सन २००१ वर्षातील उस्मानाबाद व सोलापूर या जिल्ह्यांच्या नागरी भागातील पाणीप्रदूषण अनुक्रमे तक्ता क्र. ५.१६ व ५.१७ मध्ये दर्शविण्यात आले आहे. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये प्रतिदिन दरडोई सरासरी पाणीप्रदूषण घरगुती, औद्योगिक व इतर क्षेत्रांत अनुक्रमे ३९.३३ लिटर, ३.०४ लिटर व १.६८ लिटर होते. सोलापूर जिल्ह्यात अनुक्रमे ५१.५२ लिटर, ०.९२ लिटर व ४.३८ लिटर होते. सोलापूर जिल्ह्यात पाणीप्रदूषणाचे प्रमाण उस्मानाबाद जिल्ह्यापेक्षा जास्त आहे. कारण सोलापूर जिल्ह्यात सोलापूर नगराचा पाणीप्रदूषणातील सरासरी वाटा जवळपास ७५ टक्के आहे, सोलापूर नगराचे नागरीकरण उस्मानाबाद नगरापेक्षा जास्त झालेले आहे, म्हणून सोलापूर जिल्ह्याचा पाणीप्रदूषणाचा वाटा उस्मानाबाद जिल्ह्यापेक्षा जास्त आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये सर्वांत जास्त प्रतिदिन दरडोई पाणीप्रदूषणाचे प्रमाण तुळजापूर नगरात होते. कारण तुळजापूर नगरात कचऱ्याचे प्रमाण जास्त आहे व नाल्यांचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे घाणीचे साम्राज्य या नगरात जास्त आहे. म्हणून पाणीप्रदूषणाचे प्रमाण या नगरात जास्त आहे. याबरोबरच उमरगा, भूम, कळंब, परंडा व उस्मानाबाद नगरात घरगुती क्षेत्रामुळे होणाऱ्या पाणीप्रदूषणाचे प्रमाण जास्त आहे. कारण या नगरांमध्ये जलनिःसारण व्यवस्थेची कमतरता असल्यामुळे मैला जास्त निर्माण होतो, म्हणून पाण्ी प्रदूषणाचे प्रमाण या नगरांमध्ये जास्त आहे.

सोलापूर जिल्ह्यामध्ये सर्वांत जास्त प्रतिदिन दरडोई पाणीप्रदूषणाचे प्रमाण

**तक्ता क्र. ५.१६ उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरी भागातील प्रदूषित पाणी (सन २००१, हजार लिटर)**

| नगरपालिकेचे नाव | प्रतिदिन प्रदूषित होणारे पाणी | | | प्रतिदिन दरडोई प्रदूषित होणारे पाणी | | | प्रतिदिन एकुण प्रदूषित पाण्यापैकी नगराचे प्रदूषित पाण्यातील प्रमाण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | घरगुती | औद्योगिक | इतर | घरगुती | औद्योगिक | इतर | घरगुती | औद्योगिक | इतर |
| उस्मानाबाद | ८८५० | १५० | ० | ४६.५१ | ०.७८ | ०.०० | ४७.२० | १२.३२ | ५.०० |
| तुळजापूर | ३००० | १२० | ० | ५५.०८ | २.२० | ०.०० | १६.०० | १८.२५ | ६.०० |
| उमरगा | १५०० | १३ | १२ | ५३.०५ | ०.४५ | १०.०४ | १८.०० | ०.८९ | १०.१४ |
| कळंब | १०२० | ० | ६० | ३१.४९ | ०.०० | १.८५ | ९.४४ | ०.०० | १७.४५ |
| भूम | ८४० | ९६० | १२० | २९.१३ | ३३.२९ | ४.१४ | ४.४८ | ६४.२७ | २४.९० |
| परंडा | ९६० | २४० | ३०० | ३४.७१ | ८.६७ | १०.८४ | ५.१२ | १६.५१ | ३७.२६ |
| एकुण जिल्हा | १६१७० | १४८३ | ४९२ | ३९.३३ | ३.०४ | १.६८ | १००.०० | १००.०० | १००.०० |

**स्त्रोत** : उस्मानाबाद जिल्हा जीवन प्राधिकरण कार्यालय, उस्मानाबाद, २००१.

**तक्ता क्र. ५.१७ सोलापूर जिल्ह्यातील नागरी भागातील प्रदूषित पाणी (सन २००१, हजार लिटर)**

| नगरपालिकेचे नाव | प्रतिदिन प्रदूषित होणारे पाणी | | | प्रतिदिन दरडोई प्रदूषित होणारे पाणी | | | प्रतिदिन एकूण प्रदूषित पाण्यापैकी नगराचे प्रदूषित पाण्यातील प्रमाण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | घरगुती | औद्योगिक | इतर | घरगुती | औद्योगिक | इतर | घरगुती | औद्योगिक | इतर |
| करमाळा | ५५ | | | ५.७१ | ०.०० | ०.०० | ०.५८ | ०.०० | ०.०० |
| कुर्डुवाडी | ११४० | २५० | ११० | ३०.६३ | ५.०० | ८.०६ | ४.६५ | २५.७५ | १३.२५ |
| बार्शी | ५८० | २० | | २४.१२ | १.८० | ०.०० | २.८५ | ०.८० | ०.०० |
| सोलापूर | २३२१६ | २१८० | १६७४ | ६८.५९ | ५.५८ | ५.४८ | ८१.३५ | ३८.३२ | ७५.५० |
| पंढरपूर | ९०० | | ६० | ५४.५८ | ०.०० | ४.५६ | ५.५८ | ०.०० | ६.१८ |
| सांगोला | ४२० | १२० | ५७ | ३२.१८ | ७.९६ | ३.७८ | १.०१ | १५.७५ | ४.१५ |
| मंगळवेढा | ८४ | २४ | | ८.०३ | २.३० | ०.०० | ०.८४ | ०.९५ | ०.०० |
| अक्कलकोट | ४८ | ६ | ६ | ५.७४ | ०.७१ | ०.७१ | ०.४८ | ०.१० | ०.२७ |
| मैंदर्गी | १३२ | ६४ | | ९.४५ | २.६६ | ०.०० | १.३२ | २.२८ | ०.०० |
| दुधनी | १८० | १२० | | ८.९५ | ७.९६ | ०.०० | १.८० | १५.७५ | ०.०० |
| एकूण जिल्हा | २६७५५ | २७८४ | १९०७ | ५१.५२ | ०.९२ | ४.३८ | १००.०० | १००.०० | १००.०० |

स्त्रोत : सोलापूर जिल्हा जीवन प्राधिकरण कार्यालय, उस्मानाबाद, २००१.

सोलापूर नगरामध्ये आढळून आले. कारण सोलापूर नगराचे नागरीकरण वेगाने वाढत आहे व सोलापुरातील झोपडपट्टी भागामध्ये नाल्यांची व कचराकुंडीची सुविधा नाही. त्यामुळे घाणीचे साम्राज्य निर्माण होऊन मैला जास्त निर्माण होत आहे. त्यामुळे पाणी प्रदूषणाचे प्रमाण ही तेथे जास्त आहे; तर करमाळा, मंगळवेढा या ठिकाणी पाणीप्रदूषणाचे प्रमाण कमी आढळून येते.

दोन्ही जिल्ह्यांच्या एकूण पाणीप्रदूषणात दरदिवशी दरडोई पाणीप्रदूषणात उस्मानाबाद व सोलापूर नगरांचा वाटा अनुक्रमे जवळपास ६० व ७० टक्के असल्याचे निदर्शनास येते. म्हणजेच दोन्ही नगरांमध्ये पाणीप्रदूषणाची समस्या बिकट आहे. दोन्ही जिल्ह्यांत पाणीप्रदूषणात घरगुती क्षेत्राचा वाटा जवळपास ९० टक्के असल्याचे आढळून येते. म्हणजेच औद्योगिकीकरण कमी झाले आहे हे स्पष्ट होते.

**५.१४ नागरी भागातील पाणीपुरवठा समस्या:**

पाणी ही प्राणिमात्रांची मुलभूत गरज आहे. पाण्याला मागणी घरगुती, कृषी व औद्योगिक क्षेत्र या प्रमुख तीन क्षेत्रांमधून येते. नगरातील वाढत्या औद्योगिकीकरणामुळे, व्यवसायामुळे व वाढत्या लोकसंख्येमुळे पाण्याला मागणी वाढत आहे. नागरी संस्था वाढत्या पाण्याच्या मागणीची पूर्तता करण्यास असमर्थ ठरत आहेत. वाढत्या नागरीकरणामुळे दरदिवशी प्रत्येक माणसाला जेवढे पाणी पाहिजे, तेवढेही मिळेनासे झाले आहे.

तक्ता क्र. ५.१८ वरून असे स्पष्ट होते, की सन २००१ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील नगरनिहाय प्रतिदिन दरडोई पाण्याची आवश्यकता उस्मानाबाद १४०

**तक्ता क्र. ५.१८ उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील नागरी पाणीपुरवठयाची स्थिती (सन २००१, लिटरमध्ये)**

| नगरपालिकेचे नाव | उस्मानाबाद जिल्हा | | | नगरपालिकेचे नाव | सोलापूर जिल्हा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | दर दिवशी दर माणशी आवश्यक पाणीपुरवठा | दर दिवशी दर माणशी केला जाणारा पाणीपुरवठा | दर दिवशी दर माणशी पाण्याचा तुटवडा | | दर दिवशी दर माणशी आवश्यक पाणीपुरवठा | दर दिवशी दर माणशी केला जाणारा पाणी पुरवठा | दर दिवशी दर माणशी पाण्याचा तुटवडा |
| उस्मानाबाद | १४० | ७० | ७० | करमाळा | ७० | ७० | - |
| उमरगा | ९० | ६० | ३० | कुर्डूवाडी | १०० | ४५ | ५५ |
| तुळजापूर | १०० | ५० | ५० | बार्शी | ७० | ५० | २० |
| कळंब | ७० | ६० | १० | सोलापूर | १४० | ११० | ३० |
| भूम | ७४ | ७४ | - | पंढरपूर | १२० | ८० | ४० |
| परंडा | ५० | ५० | - | सांगोला | ७५ | ५० | २५ |
| | | | | मंगळवेढा | ६१ | ४५ | १६ |
| | | | | अक्कलकोट | १०० | ४५ | - |
| | | | | दुधनी | ५३ | ५३ | - |
| | | | | मैंदर्गी | ४४ | ४४ | - |
| एकुण जिल्हा | ५२४ | ३६४ | १६० | एकुण जिल्हा | ८४४ | ६०३ | २४१ |
| सरासरी | ८७.३३ | ६०.६६ | २६.६६ | सरासरी | ८४.४० | ६०.३० | २४.१० |

स्त्रोत : १. नगरपालिका वार्षिकी, सोलापूर जिल्हा, २००१.
२. नगरपालिका वार्षिकी, सोलापूर जिल्हा, २००१.

लिटर, उमरगा ९० लिटर, तुळजापूर १०० लिटर, कळंब ७० लिटर, भूम ७४ लिटर व परंडा ५० लिटर एवढी आहे. सोलापूर जिल्ह्यातील नगरनिहाय प्रतिदिन दरडोई पाण्याची आवश्यकता करमाळा ७० लिटर, कुर्डुवाडी १०० लिटर, बार्शी ७० लिटर, सोलापूर १४० लिटर, पंढरपूर १२० लिटर, सांगोला ७५ लिटर, मंगळवेढा ६१ लिटर, अक्कलकोट १०० लिटर, दुधनी ५३ लिटर, मैंदर्गी ५५ लिटर असताना, या नगरांना अनुक्रमे ७० लिटर, ४५ लिटर, ५० लिटर, ११० लिटर, ८० लिटर, ५० लिटर, ४५ लिटर, ४५ लिटर, ५३ लिटर, ५५ लिटर पाण्याचा पुरवठा नागरी संस्थांनी केला आहे. उस्मानाबाद जिल्ह्यात दरमाणशी सरासरी दररोज ८७.३३ लिटर पाण्याची आवश्यकता असून प्रत्यक्ष ६०.६६ लिटर पाणीपुरवठा केला जातो. सोलापूर जिल्ह्यात दरमाणशी सरासरी दररोज ८४.४० लिटर पाण्याची आवश्यकता असून प्रत्यक्ष ६०.३० लिटर पाणीपुरवठा केला जातो. वाढत्या नागरीकरणामुळे दोन्ही जिल्ह्यात पाणीपुरवठा समस्या निर्माण झाल्या आहेत. दोन्ही जिल्ह्याच्या नागरी भागात जवळपास एकूण पाणीपुरवठ्याच्या १० टक्के पाणी वाया जाते.

### ५.१५ सोलापूर व उस्मानाबाद शहरातील सामाजिक व व्यावसायिक परिस्थिती:

प्रत्येक सार्वजनिक सत्तेचे कल्याणकारी राज्याची निर्मिती करणे हे उदिद्ष्ट असते. सामाजिक कल्याणातच राज्याचे कल्याण दडलेले असते. कल्याणकारी राज्यात जनतेच्या कल्याणासाठी अनेक सेवा जनतेला फायद्या-तोटयाचा विचार न करता पुरवाव्या लागतात. याला नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाही अपवाद नाहीत. नागरी

स्थानिक स्वराज्य संस्थांना आपल्या नागरिकांच्या कल्याणासाठी पाणीपुरवठा, साफसफाई, आरोग्य व शिक्षण इत्यादी सुविधा पुरवाव्या लागतात. जसजसे शहराचे आकारमान वाढते तसतसे शहरीकरण वाढत जाते. वाढत्या शहरीकरणाबरोबर नागरी सुविधांमध्ये वाढ करावी लागते यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या खर्चात वाढ होते. स्थानिक स्वराज्य संस्था आपला खर्च भागविण्यासाठी विविध प्रकारची कर आकारणी नागरिकांवर करीत असतात. सोलापूर व उस्मानाबाद शहरातील निवडक १०० स्थलांतरित नागरिकांच्या मुलाखती घेऊन त्यांची सामाजिक व व्यावसायिक परिस्थिती; तसेच सोलापूर व उस्मानाबाद शहरातील सोयीसुविधांबाबतची मते प्रस्तुत विभागात मांडण्यात आली आहेत.

**५.१६ भाषा व स्थलांतरण :**

उस्मानाबाद व सोलापूर शहरामध्ये स्थलांतरणाचे प्रमाण कमीअधिक प्रमाणात आढळून येते. उस्मानाबाद व सोलापूर शहरांमध्ये स्थलांतरित झालेल्या प्रत्येकी ५० अशी एकूण १०० स्थलांतरित कुटुंबांद्वारे प्रश्नावलीच्या आधारे मुलाखती घेऊन त्यांची आर्थिक , सामाजिक स्थिती व नागरीकरणासंदर्भातील मते जाणून घेण्यात आली. तक्ता क्र. ५.१९ मध्ये सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे भाषेनुसार वर्गीकरण दर्शविण्यात आले आहे. सोलापूर जिल्ह्यात ९८ टक्के मराठी भाषिकांचे स्थलांतरण झालेले असून, केवळ दोन टक्के कन्नड भाषकांचे स्थलांतरण झालेले दिसून येते. उस्मानाबाद जिल्ह्याच्या बाबतीत हे प्रमाण अनुक्रमे ७२ टक्के व २८ टक्के एवढे दिसून येते.

**तक्ता क्र. ५.१९ सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे भाषेनुसार वर्गीकरण**

| भाषा | सोलापूर | | उस्मानाबाद | |
|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | शेकडा प्रमाण | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
| मराठी | ४९ | ९८.०० | ३६ | ७२.०० |
| कन्नड | १ | २.०० | १४ | २८.०० |
| इतर | ० | ०.०० | ० | ०.०० |
| एकूण | ५० | १००.०० | ५० | १००.०० |

### ५.१७ धर्म व स्थलांतरण :

सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे धर्मानुसार वर्गीकरण तक्ता क्र. ५.२० मध्ये दर्शविण्यात आले आहे. सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील स्थलांतरीत नागरीकांच्या धर्मनिहाय वर्गीकरणावरून असे दिसते, की सोलापूर जिल्ह्यात स्थलांतरित निवडक ५० कुटुंबांपैकी ४७ कुटुंबे हिंदू धर्मातील असून २ कुटुंबे जैनधर्मीय तर एक कुटुंब मुस्लिमधर्मीय आढळून आले. उस्मानाबाद जिल्ह्यात स्थलांतरित निवडक ५० कुटुंबांपैकी ४९ कुटुंबे हिंदू धर्मातील असून एक कुटुंब जैनधर्मीय, तर मुस्लिमधर्मीय एकही कुटुंब स्थलांतरित झालेले नाही. शेकडा प्रमाण विचारात घेतल्यास सोलापूर जिल्ह्यात ९४ टक्के तर उस्मानाबाद जिल्हयात ९८टक्के हिंदु धर्माय कुटुंब स्थलांतरीत झालेले दिसून येतात.

**तक्ता क्र. ५.२० सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे धर्मानुसार वर्गीकरण**

| धर्म | सोलापूर | | उस्मानाबाद | |
|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | शेकडा प्रमाण | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
| हिंदू | ४७ | ९४.०० | ४९ | ९८.०० |
| जैन | २ | ४.०० | १ | २.०० |
| मुस्लिम | १ | २.०० | ० | ०.०० |
| एकूण | ५० | १००.०० | ५० | १००.०० |

## ५.१८ संवर्ग व स्थलांतरण:

सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे संवर्गनिहाय वर्गीकरण तक्ता क्र. ५.२१ मध्ये दर्शविण्यात आले आहे. सोलापूर जिल्ह्यातील निवडक ५० स्थलांतरित कुटुंबांपैकी सर्वाधिक ४० टक्के कुटुंबे इतर मागासवर्ग संवर्गातील असून त्यानंतर ३६ टक्के कुटुंबे खुल्या संवर्गातील, १४ टक्के कुटुंबे भटक्या जमाती या संवर्गातील, तर १० टक्के कुटुंबे अनुसुचित जाती या संवर्गातील आहेत. उस्मानाबाद जिल्ह्याच्या बाबतीत निवडक ५० स्थलांतरित कुटुंबांपैकी सर्वाधिक ४४ टक्के कुटुंबे इतरमागासवर्ग संवर्गातील असून त्यानंतर २६ टक्के कुटुंबे खुल्या संवर्गातील, २० टक्के कुटुंबे भटक्या जमाती या संवर्गातील, तर १० टक्के कुटुंबे अनुसुचित जाती या संवर्गातील आहेत. सोलापूर व उस्मानाबाद या दोन्ही

**तक्ता क्र. ५.२१ सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे संवर्गनिहाय वर्गीकरण**

| संवर्ग | सोलापूर | | उस्मानाबाद | |
|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | शेकडा प्रमाण | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
| खुला | १८ | ३६.०० | १३ | २६.०० |
| अनुसूचित जाती | ५ | १०.०० | ५ | १०.०० |
| भटक्या जमाती | ७ | १४.०० | १० | २०.०० |
| इतर मागासवर्ग | २० | ४०.०० | २२ | ४४.०० |
| एकूण | ५० | १००.०० | ५० | १००.०० |

जिल्हयात स्थलांतरित कुटुंबांपैकी सर्वाधिक कुटुंबे इतर मागासवर्ग संवर्गातील असून सर्वांत कमी अनुसूचित जाती या संवर्गातील कुटुंबे स्थलांतरित झालेली दिसतात.

**५.१९ स्थलांतरित नागरिकांच्या घराचे स्वरूप :**

मानवाच्या अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत स्वरूपाच्या गरजा आहेत; परंतु समाजात व्यवसाय व आर्थिक परिस्थितीनुसार घराचे स्वरूप बदललेले दिसते. सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांच्या घरांचे स्वरूप

तक्ता क्र. ५.२२ मध्ये दर्शविण्यात आले आहे. सोलापूर जिल्ह्यातील निवडक ५० स्थलांतरित कुटुंबांपैकी पक्की घर असलेल्या कुटुंबाचे प्रमाण ८८ टक्के असून कच्ची घरे असलेल्या कुटुंबाचे प्रमाण १२ टक्के एवढे आहे. तर उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक ५० स्थलांतरित कुटुंबांपैकी पक्की घरे असलेल्या कुटुंबाचे प्रमाण ९० टक्के असून, कच्ची घरे असलेल्या कुटुंबांचे प्रमाण १० टक्के एवढे आहे. उस्मानाबाद जिल्हयात सोलापूर जिल्हयाच्या तुलनेत पक्के घर असलेल्या कुटुंबांचे प्रमाण जास्त आढळून येते.

**तक्ता क्र. ५.२२ सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांच्या घरांचे स्वरूप**

| घराचा प्रकार | सोलापूर | | उस्मानाबाद | |
|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | शेकडा प्रमाण | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
| पक्के | ४४ | ८८.०० | ४५ | ९०.०० |
| कच्चे | ६ | १२.०० | ५ | १०.०० |
| झोपडी | ० | ०.०० | ० | ०.०० |
| एकूण | ५० | १००.०० | ५० | १००.०० |

### ५.२० स्थलांतरित नागरिकांचे सुविधेनुसार वर्गीकरण :

सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे सुविधेनुसार वर्गीकरण तक्ता क्र. ५.२३ मध्ये दर्शविण्यात आले आहे. सोलापूर

जिल्ह्यातील निवडक ५० स्थलांतरित कुटुंबांपैकी ९६ टक्के कुटुंबांकडे वीज सुविधा आहे तर ९६ टक्के कुटुंबांकडे शौचालय, ९२ टक्के कुटुंबांकडे स्वतंत्र नळ व फक्त ६ टक्के कुटुंबांकडे सार्वजनिक नळाची सुविधा असल्याचे दिसून आले. उस्मानाबाद जिल्हयातील निवडक ५० स्थलांतरित कुटुंबांपैकी ९२ टक्के कुटुंबांकडे वीज सुविधा आहे तर ९६ टक्के कुटुंबांकडे शौचालय, ८० टक्के कुटुंबांकडे स्वतंत्र नळ व फक्त ५ टक्के कुटुंबांकडे सार्वजनिक नळाची सुविधा असल्याचे दिसून येते. यावरून स्पष्ट होते की सोलापूर जिल्ह्यातील ८ टक्के कुटुंबांकडे पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही तर उस्मानाबाद जिल्ह्यातील २० टक्के कुटुंबांकडे पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही.

**तक्ता क्र. ५.२३ सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे सुविधेनुसार वर्गीकरण**

| **सुविधा** | **सोलापूर** | | **उस्मानाबाद** | |
|---|---|---|---|---|
| | **वारंवारिता** | **शेकडा प्रमाण** | **वारंवारिता** | **शेकडा प्रमाण** |
| वीज | ४८ | ९६ | ४६ | ९२ |
| शौचालय | ४८ | ९६ | ४८ | ९६ |
| स्वतंत्र नळ | ४६ | ९२ | ४० | ८० |
| सार्वजनिक नळ | ३ | ६ | ५ | १० |

## ५.२१ स्थलांतरित नागरिकांचे साफसफाईबाबत मत :

आरोग्याच्या दृष्टीने शहरी भागात साफसफाई असणे आवश्यक आहे. साफसफाईबाबत सोलापूर व उस्मानाबाद शहरातील निवडक नागरिकांची मते, तक्ता

क्र. ५.२४ मध्ये दर्शविण्यात आली आहेत. सोलापूर जिल्ह्यातील सर्वाधिक ४० टक्के नागरिकांनी साफसफाई दररोज होत असल्याचे सांगितले; तर ३० टक्के नागरिकांनी साफसफाई कधीतरी होत असल्याचे, २६ टक्के नागरिकांनी आठवडयाला व ४ टक्के नागरिकांनी महिन्याला साफसफाई होत असल्याचे नमूद केले. उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्वाधिक ५० टक्के नागरिकांनी साफसफाई कधीतरी होत असल्याचे सांगितले तर ३६ टक्के नागरिकांनी साफसफाई आठवडयाला होत असल्याचे, १२ टक्के नागरिकांनी दररोज व २ टक्के नागरिकांनी महिन्याला साफसफाई होत असल्याचे नमुद केले. उस्मानाबाद जिल्ह्यातील ४० टक्के नागरिकांनी साफसफाई दररोज होत असल्याचे सांगितले तर सोलापूर जिल्ह्यातील केवळ १२ टक्के नागरकिांनी साफसफाई दररोज होत असल्याचे सांगितले. यावरून स्पष्ट होते की उस्मानाबाद जिल्ह्यातील स्थानिक प्रशासन साफसफाईकडे फारसे लक्ष देत नाही.

**तक्ता क्र. ५.२४ सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे साफसफाईबाबत मत**

| साफसफाई | सोलापूर | | उस्मानाबाद | |
|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | शेकडा प्रमाण | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
| दररोज | २० | ४०.०० | ६ | १२.०० |
| आठवडयाला | १३ | २६.०० | १८ | ३६.०० |
| कधीतरी | १५ | ३०.०० | २५ | ५०.०० |
| महिन्याला | २ | ४.०० | १ | २.०० |
| एकूण | ५० | १००.०० | ५० | १००.०० |

## ५.२२ स्थलांतरित नार्गोरिकांचे कचराकुंडी बाबत मत :

आरोग्याच्या दृष्टीने शहरी भागात साफसफाई असणे आवश्यक आहे. तसेच कचरा व्यवस्थापनासाठी ठराविक ठिकाणी कचराकुंडी असणे आवश्यक आहे. कचराकुंडीबाबत सोलापूर व उस्मानाबाद शहरातील निवडक नागरिकांनी नोंदविलेली मते तक्ता क्र. ५.२५ मध्ये दर्शविण्यात आली आहेत. सोलापूर जिल्ह्यातील ६८ टक्के नागरिकांनी कचराकुंडी नसल्याचे सांगितले तर उस्मानाबाद जिल्ह्यातील ५४ टक्के नागरिकांनी कचराकुंडी नसल्याचे सांगितले. यावरून स्पष्ट होते, की सोलापूर व उस्मानाबाद शहरातील स्थानिक प्रशासन कचरा व्यवस्थापनाकडे फारसे लक्ष देत नाही.

**तक्ता क्र. ५.२५ सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे कचराकुंडीबाबत मत**

| कचराकुंडी | सोलापूर | | उस्मानाबाद | |
|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | शेकडा प्रमाण | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
| आहे | ३४ | ६८.०० | २७ | ५४.०० |
| नाही | १६ | ३२.०० | २३ | ४६.०० |
| एकूण | ५० | १००.०० | ५० | १००.०० |

## ५.२३ सोलापूर व उस्मानाबाद शहरातील कचरा व्यवस्थापन :

आरोग्याच्या दृष्टीने शहरीभागात साफसफाई असणे आवश्यक आहे. यासाठी दररोज कचरा गोळा करुन त्याचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. सोलापूर व

उस्मानाबाद शहरातील निवडक नागरिकांची नियमित कचरा गोळा करण्यासंदर्भातील मते तक्ता क्र. ५.२६ मध्ये दर्शविण्यात आली आहेत. सोलापूर जिल्ह्यातील सर्वाधिक ४२ टक्के नागरिकांनी कधी तरी, ३० टक्के नागरिकांनी दररोज तर २८ टक्के नागरिकांनी आठवडयाला कचरा गोळा करीत असल्याचे नमूद केले. उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्वाधिक ३८ टक्के नागरिकांनी कधीतरी, ३० टक्के नागरिकांनी दररोज तर ३० टक्के नागरिकांनी आठवडयाला कचरा गोळा करीत असल्याचे नमूद केले.

**तक्ता क्र. ५.२६ सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे नियमित कचरा गोळा करण्यासंदर्भातील मत**

| कचरा गोळा करण्यासंदर्भातील मत | सोलापूर | | उस्मानाबाद | |
|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | शेकडा प्रमाण | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
| दररोज | १५ | ३०.०० | १५ | ३०.०० |
| आठवडयाला | १४ | २८.०० | १५ | ३०.०० |
| कधी तरी | २१ | ४२.०० | १९ | ३८.०० |
| महिन्याला | ० | ०.०० | १ | २.०० |
| एकूण | ५० | १००.०० | ५० | १००.०० |

### ५.२४ सोलापूर व उस्मानाबाद शहरातील सांडपाण्याची सुविधा :

सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांची सांडपाण्याच्या सुविधेसंदर्भातील मते तक्ता क्र. ५.२७ मध्ये दर्शविण्यात आली आहेत.

तक्ता क्र. ५.२७ वरून स्पष्ट होते, की सोलापूर जिल्ह्यातील ७४ टक्के तर उस्मानाबाद जिल्ह्यातील ५० टक्के नागरिकांनी सांडपाण्याची सुविधा असल्याचे सांगितले तर सोलापूर जिल्ह्यातील २६ टक्के व उस्मानाबाद जिल्हयातील ५० टक्के नागरिकांनी सांडपाण्याची सुविधा नसल्याचे नमुद केले. सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्याची तुलना करता सोलापूर जिल्ह्यात उस्मानाबाद जिल्ह्याच्या तुलनेत सांडपाण्याची सुविधा चांगली आहे.

**तक्ता क्र. ५.२७ सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे सांडपाणी सुविधेबाबत मत**

| सांडपाणी सुविधा | सोलापूर | | उस्मानाबाद | |
|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | शेकडा प्रमाण | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
| होय | ३७ | ७४.०० | २५ | ५०.०० |
| नाही | १३ | २६.०० | २५ | ५०.०० |
| एकूण | ५० | १००.०० | ५० | १००.०० |

## ५.२५ सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील स्थालांतरित नागरिकांचे व्यवसानुसार वर्गीकरण :

सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे व्यवसायानुसार वर्गीकरण तक्ता क्र. ५.२८ मध्ये दर्शविण्यात आले आहे. सोलापूर जिल्हयातील सर्वाधिक ८८ टक्के नागरिक नोकरी करीत असून १२ टक्के नागरिक व्यवसाय करीत असल्याचे दिसून येते. उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्वाधिक ८८ टक्के

नागरिक नौकरी करीत असून १० टक्के नागरीक व्यवसाय तर ४ टक्के नागरिक मजुरी करीत असल्याचे दिसून येते. तक्ता क्र. ५.२८ स्पष्ट होते, की सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील ८६ ते ८८ टक्के स्थलांतरित नागरिक नोकरी करतात; तर १० ते १२ टक्के स्थलांतरित नागरिक व्यवसाय करीत असल्याचे दिसून येते. सोलापुर जिल्ह्यात एकही स्थलांतरित नागरिक मजुरी करीत नसल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र. ५.२८ सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे व्यवसायानुसार वर्गीकरण**

| व्यवसाय | सोलापूर | | उस्मानाबाद | |
|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | शेकडा प्रमाण | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
| नोकरी | ४४ | ८८.०० | ४३ | ८६.०० |
| व्यवसाय | ६ | १२.०० | ५ | १०.०० |
| मजुरी | ० | ०.०० | २ | ४.०० |
| एकूण | ५० | १००.०० | ५० | १००.०० |

**५.२६ सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील स्थलांतरित नागरिकांचे ठिकाण :**

सर्वसाधारणपणे ग्रामीण भागातून शहरी भागात लोक रोजगारासाठी स्थलांतरित होतात. सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे त्यांच्या मूळ राहण्याच्या ठिकाणानुसार वर्गीकरण तक्ता क्र. ५.२९ मध्ये दर्शविण्यात आले आहे. तक्ता क्र. ५.२९ वरून स्पष्ट होते की सोलापूर जिल्ह्यातील ९४ टक्के तर उस्मानाबाद जिल्ह्यातील १०० टक्के नागरिक हे ग्रामीण भागातून शहरी भागात स्थलांतरित झाले

आहेत. सोलापूर जिल्ह्यातील ३ टक्के नागोरिक शहरी भागातून शहरी भागात स्थलांतरित झालेले दिसतात. यावरून स्पष्ट होते, की ग्रामीण भागातील नागरिक रोजगारासाठी मोठया प्रमाणात शहरी भागात स्थलांतरित होत आहेत.

**तक्ता क्र. ५.२९ सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे मूळ राहण्याच्या ठिकाणानुसार वर्गीकरण**

| ठिकाण | सोलापूर | | उस्मानाबाद | |
|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | शेकडा प्रमाण | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
| खेडेगाव | ४७ | ९४.०० | ५० | १००.०० |
| शहर | ३ | ६.०० | ० | ०.०० |
| एकूण | ५० | १००.०० | ५० | १००.०० |

**५.२७ सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील स्थलांतरणाची कारणे :**

सर्वसाधारणपणे ग्रामीण भागातून शहरी भागात लोक रोजगारासाठी स्थलांतरित होत असल्याचे आढळून येते. सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागोरिकांच्या स्थलांतरणाची कारणे तक्ता क्र. ५.३० मध्ये दर्शविण्यात आली आहेत. तक्ता क्र. ५.३० वरून स्पष्ट होते, की सोलापूर जिल्ह्यातील सर्वाधिक ६० टक्के नागरिक नोकरीसाठी त्यानंतर २० टक्के नागरिक शिक्षणासाठी, १० टक्के नागरिक रोजगारासाठी, ६ टक्के नागरिक व्यवसायासाठी; तर ४ टक्के नागरिक लग्नामुळे शहरात स्थलांतरित झाल्याचे दिसून येते. उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्वाधिक ७६ टक्के नागरिक नोकरीसाठी त्यानंतर १२ टक्के नागरिक शिक्षणासाठी, ६ टक्के नागरिक

व्यवसायासाठी, ४ टक्के नागरिक रोजगारासाठी तर २ टक्के नागरिक लग्नामुळे शहरात स्थलांतरित झाल्याचे दिसून येते. उस्मानाबाद जिल्ह्याच्या तुलनेत सोलापूर जिल्ह्यात शिक्षणासाठी स्थलांतरित होणा-या नागरिकांचे प्रमाण जवळपास दुप्पट असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र. ५.३० सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे शहरात येण्याचे कारण**

| कारण | सोलापूर | | उस्मानाबाद | |
|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | शेकडा प्रमाण | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
| रोजगार | ५ | १० | २ | ४.०० |
| नोकरी | ३० | ६० | ३८ | ७६.०० |
| लग्न | २ | ४ | १ | २.०० |
| व्यवसाय | ३ | ६ | ३ | ६.०० |
| शिक्षण | १० | २० | ६ | १२.०० |
| एकूण | ५० | १०० | ५० | १०० |

### ५.२८ सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरी समस्या :

सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक नागरिकांना नागरी भागातील समस्यांविषयी विचारले असता त्यांनी दिलेली उत्तरे तक्ता क्र. ५.३१ मध्ये दर्शविण्यात आली आहेत. सोलापूर शहरातील सर्वाधिक ३३.६४ टक्के नागरिकांनी पाणीटंचाई ही प्रमुख समस्या असल्याचे नमूद केले. त्यानंतर ३०.८४ टक्के नागरिकांनी प्रदूषण, २०.५६ टक्के नागरिकांनी वाढती गर्दी, १३.०८ टक्के नागरिकांनी वाढते घरभाडे तर

१.८७ टक्के नागरिकांनी असुरक्षितता इत्यादी शहरी समस्या असल्याचे मत व्यक्त केले आहे. उस्मानाबाद शहरातील सर्वाधिक ३३.९८ टक्के नागरिकांनी पाणीटंचाई ही प्रमुख समस्या असल्याचे नमूद केले असून, त्यानंतर २९.१३ टक्के नागरिकांनी प्रदूषण, १६.५० टक्के नागरिकांनी वाढती गर्दी, ११.६५ टक्के नागरिकांनी वाढते घरभाडे तर ८.७४ टक्के नागरिकांनी असुरक्षितता इत्यादी प्रमुख शहरी समस्या असल्याचे मत व्यक्त केले आहे. सोलापूर शहराच्या तुलनेत उस्मानाबाद जिल्ह्यात असुरक्षितता अधिक असल्याचे दिसून येते. सोलापूर व उस्मानाबाद या दोन्ही जिल्ह्यात पाणीटंचाई व प्रदुषण या दोन प्रमुख समस्या असल्याचे तक्ता क्र. ५.३१ वरून स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ५.३१ सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे नागरी समस्यांबाबत मत**

| **नागरी समस्या** | **सोलापूर** | | **उस्मानाबाद** | |
|---|---|---|---|---|
| | **वारंवारिता** | **शेकडा प्रमाण** | **वारंवारिता** | **शेकडा प्रमाण** |
| प्रदूषण | ३३ | ३०.८४ | ३० | २९.१३ |
| गर्दी | २२ | २०.५६ | १७ | १६.५० |
| असुरक्षितता | २ | १.८७ | ९ | ८.७४ |
| पाणीटंचाई | ३६ | ३३.६४ | ३५ | ३३.९८ |
| जास्तीचे घरभाडे | १४ | १३.०८ | १२ | ११.६५ |
| एकूण | १०७ | १००.०० | १०३ | १००.०० |

## ५.२९ स्थलांतरित नागरिकांचा कुटुंबप्रकार :

आधुनिक कालावधीत ग्रामीण व शहरी भागात विभक्त कुटुंब पध्दती वाढल्याचे दिसून येते. सोलापूर व उस्मानाबाद शहरातील निवडक नागरिकांची कुटुंब

पद्धतीबाबतची माहिती तक्ता क्र. ५.३२ मध्ये दर्शविण्यात आली आहे. सोलापूर

**तक्ता क्र. ५.३२ सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक स्थलांतरित नागरिकांचे कुटुंबप्रकारानुसार वर्गीकरण**

| कुटुंबप्रकार | सोलापूर | | उस्मानाबाद | |
|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | शेकडा प्रमाण | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
| संयुक्त | १४ | २८.०० | १५ | ३०.०० |
| विभक्त | ३६ | ७२.०० | ३५ | ७०.०० |
| एकूण | ५० | १००.०० | ५० | १००.०० |

शहरातील निवडक कुटुंबांपैकी ७२ टक्के कुटुंबे विभक्त असून, २८ टक्के कुटुंबे संयुक्त कुटुंब असल्याचे दिसून येते. उस्मानाबाद शहराच्या बाबतीत असे दिसून येते, की निवडक ५० कुटुंबांपैकी ७० टक्के कुटुंबे विभक्त तर ३० टक्के कुटुंबे संयुक्त कुटुंबे आहते. आधुनिक कालावधीत शहरी भागातील संयुक्त कुटुंब पद्धती नाहीशी होत असल्याचे दिसत आहे. संयुक्त कुटुंब पद्धती एक सामाजिक गरज म्हणून समाजाने व शासनाने बळकट करणे आवश्यक आहे.

**सारांश:**

प्रस्तुत प्रकरणात घरांच्या समस्या, झोपडपट्टी, नागरी दारिद्र्य, प्रदूषण, पाणीपुरवठा, लोकसंख्या गर्दी अशा विविध समस्यांचा अभ्यास केला आहे. नागरीकरणवाढीमुळे दोन्ही जिल्ह्यांत बेघर व संस्थात्मक लोकसंख्या वाढत आहे.

नगरांमध्ये लोकसंख्यावाढीमुळे लोकांना राहण्यास घरे मिळत नाहीत किंवा घरभाडे जास्त असल्यामुळे गरीब लोकांना भाडे परवडत नाही, त्यामुळे बेघर लोकसंख्या वाढत आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार उस्मानाबाद व सोलापूर या जिल्ह्यांतील नागरी भागांत अनुक्रमे १०४७ व १७४४ लोक बेघर होते; म्हणजेच रेल्वे स्टेशनवर, पुलाखाली व मोकळ्या जागेत हे लोक राहत असल्याचे दिसून आले आहे. तसेच दोन्ही जिल्ह्यांत संस्थात्मक लोकसंख्या जास्त असल्याचे दिसून येते. सन २००१ मध्ये उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील नागरी भागात अनुक्रमे ४५३४ व ४६९० लोक धर्मशाळा, मंदिरे, हॉटेल्स, समाज मंदिरे, वृद्धाश्रम, बालकाश्रम, कुंटणखाना अशा विविध संस्थांमध्ये राहत असल्याचे दिसते.

वाढत्या वाहनांच्या संख्येमुळे उस्मानाबाद व सोलापूर नगरातील अपघातांचे व वाहन प्रदूषणाचे प्रमाण वाढत आहे. सन २००१ मध्ये दोन्ही जिल्ह्यांतील एकूण वाहनांपैकी उस्मानाबाद व सोलापूर नगरात वाहनांचे प्रमाण अनुक्रमे ८९.७२ व ९५.०० टक्के आढळून आले आहे. सन २००१ मध्ये उस्मानाबाद व सोलापूर नगरांमधील वाहनांमधून प्रतिदिन अनुक्रमे १३.१६ टन व २२.२९ टन धूलिकण हवेमध्ये सोडले जातात, त्यामुळे दोन्ही नगरांतील हवाप्रदूषण वाढून लोकांना दमा, छातीचे विकार, त्वचा रोग, कॅन्सर असे महाभयानक रोग होत आहेत, ही चिंतेची बाब आहे.

दोन्ही जिल्ह्यांच्या नागरी भागातील कचऱ्यामुळे पाणीप्रदूषण व हवाप्रदूषण वाढत आहे. सन २००१ या वर्षी उस्मानाबाद व सोलापूर नगरात प्रतिदिन दरडोई कचरा निर्मिती अनुक्रमे १८२.५० व २६०.४३ ग्रॅम केली जाते. यांपैकी दोन्ही नगरांत ७२ टक्के

कचरा गोळा केला जातो, तर २८ टक्के कचरा शिल्लक राहतो. त्यामुळे हवेमध्ये दुर्गंधी सुटून हवाप्रदूषण होत आहे. तसेच परतीच्या पाण्यामध्ये कचऱ्याचा मैला पडून ६० टक्के पाणीप्रदूषण होत आहे. त्यामुळे पाण्याचा सामू वाढत आहे, पाण्यातील BODS चे प्रमाण वाढत आहे.

दोन्ही जिल्ह्यांच्या नागरी भागात पाणीतुटवडा भासत असल्याचे दिसून आले आहे. वाढत्या नागरीकरणामुळे घरगुती, उद्योग व व्यवसायांकडून पाण्याला मागणी जास्त येत आहे. परंतु नगरपालिका वाढत्या पाण्याच्या मागणीची पूर्तता करु शकत नाहीत, त्यामुळे पाण्याचा तुटवडा भासत आहे. सन २००१ मध्ये सोलापूर व उस्मानाबाद नगरात प्रतिदिन दरडोई पाण्याची आवश्यकता १४० लिटर होती, परंतु पुरवठा मात्र सोलापूर महापालिकेने ११० लिटर व उस्मानाबाद नगरपालिकेने ७० लिटर प्रतिदिन दरडोई केला आहे. दोन्ही जिल्ह्यांच्या नगरपालिकांनी पाणीपट्टीच्या दरात वेगाने वाढ केली आहे. नगरपालिकांचा पाणीपुरवठाखर्च वाढत्या महागाईमुळे वाढत आहे.

दोन्ही जिल्ह्यांच्या नागरी भागातील मोकळ्या जागांच्या किमती वेगाने वाढल्या आहेत. लोकसंख्यांवाढीबरोबर घरांची मागणी वाढत आहे. जागांचा उपयोग व्यवसाय, उद्योग, विविध संस्थांसाठी होत आहे, म्हणून सन २००१ ते सन २०११ या काळात उस्मानाबाद व सोलापूर नगरातील मोकळ्या जागांच्या जास्तीत जास्त किमतीतील वृध्दी अनुक्रमे ७५.९२ टक्के व १४०.९६ टक्के प्रति चौरस मीटर झाली आहे. उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यांच्या नागरी भागात विविध समस्या निर्माण

होण्यापाठीमागे नागरीकरणात वाढ, हे कारण आपणास सांगता येते.

सोलापूर जिल्हयातील सर्वाधिक ८८ टक्के नागरिक नोकरी करीत असून १२ टक्के नागरिक व्यवसाय करीत असल्याचे दिसून येते. उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्वाधिक ८८ टक्के नागरिक नौकरी करीत असून १० टक्के नागरिक व्यवसाय तर ४ टक्के नागरिक मजुरी करीत असल्याचे दिसून येते. तक्ता क्र. ५.२८ स्पष्ट होते, की सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील ८६ ते ८८ टक्के स्थलांतरित नागरिक नोकरी करतात; तर १० ते १२ टक्के स्थलांतरित नागरिक व्यवसाय करीत असल्याचे दिसून येते. सोलापूर जिल्ह्यात एकही स्थलांतरित नागरिक मजुरी करीत नसल्याचे दिसून येते. सोलापूर जिल्ह्यातील सर्वाधिक ६० टक्के नागरिक नोकरीसाठी त्यानंतर २० टक्के नागरिक शिक्षणासाठी, १० टक्के नागरिक रोजगारासाठी, ६ टक्के नागरिक व्यवसायासाठी; तर ४ टक्के नागरिक लग्नामुळे शहरात स्थलांतरित झाल्याचे दिसून येते. उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्वाधिक ७६ टक्के नागरिक नोकरीसाठी त्यानंतर १२ टक्के नागरिक शिक्षणासाठी, ६ टक्के नागरिक व्यवसायासाठी, ४ टक्के नागरीक रोजगारासाठी तर २ टक्के नागरीक लग्नामुळे शहरात स्थलांतरीत झाल्याचे दिसून येते. उस्मानाबाद जिल्ह्याच्या तुलनेत सोलापूर जिल्ह्यात शिक्षणासाठी स्थलांतरित होणा-या नागरिकांचे प्रमाण जवळपास दुप्पट असल्याचे दिसून येते. सोलापूर शहरातील सर्वाधिक ३३.६४ टक्के नागरिकांनी पाणीटंचाई ही प्रमुख समस्या असल्याचे नमूद केले. त्यानंतर ३०.८४ टक्के नागरिकांनी प्रदूषण, २०.५६ टक्के नागरिकांनी वाढती गर्दी, १३.०८ टक्के नागरिकांनी वाढते घरभाडे तर १.८७ टक्के नागरीकांनी

असुरक्षितता इत्यादी शहरी समस्या असल्याचे मत व्यक्त केले आहे. उस्मानाबाद शहरातील सर्वाधिक ३३.९८ टक्के नागरिकांनी पाणीटंचाई हि प्रमुख समस्या असल्याचे नमूद केले असून, त्यानंतर २९.१३ टक्के नागरिकांनी प्रदुषण, १६.५० टक्के नागरिकांनी वाढती गर्दी, ११.६५ टक्के नागरिकांनी वाढते घरभाडे तर ८.७४ टक्के नागरिकांनी असुरक्षितता इत्यादी प्रमुख शहरी समस्या असल्याचे मत व्यक्त केले आहे. सोलापूर शहराच्या तुलनेत उस्मानाबाद जिल्ह्यात असुरक्षितता अधिक असल्याचे दिसून येते.

**संदर्भ:**


१. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (१९९३-९४) : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई, पृ. ९८.

२. डॉ. सुधा काळदाते (१९९१) : भारतातील सामाजिक समस्या, पिंपळापुरे ॲण्ड पब्लिशर्स, नागपूर, पृ. ४५.

३. डॉ.दा.धों.काचोळे (१९९८) : भारताच्या विघटनात्मक समस्या, कैलास पब्लिकेशन्स हाऊस, औरंगाबाद, पृ. ८१.

४. पी. के. कुलकर्णी (१९९८) : भारतातील सामाजिक समस्या, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ. ९९.

५. मनोरमा इअर बुक (१९९९) : मल्याळम मनोरमा कोट्टयाम, पृ. ४३.

६. डॉ. देसाई व डॉ. सौ. भालेराव (१९९८) : भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे, पृ. ६०.

७. योजना, ऑक्टोबर १९९४, पृ. ८.

८. लोकराज्य, १६ डिसेंबर १९९५, पृ. १२.

९. विज्ञान पत्रिका, जुलै १९९६, मराठी विज्ञान परिषद, मुंबई, पृ. ४.

१०. नगरपालिका वार्षिकी, उस्मानाबाद जिल्हा, २००१, नगरपालिका वार्षिकी, सोलापूर जिल्हा, २००१. जिल्हा सांख्यिकी कार्यालय, उस्मानाबाद व सोलापूर जिल्हा.

११. डॉ. दा. धों. काचोळे (१९९२) : वैद्यकीय समाजशास्त्र, कैलास पब्लिकेशन हाऊस, औरंगाबाद, पृ. ११९.

१२. डॉ. सौ. सुधा काळदाते व डॉ.शंकर गायकवाड (१९९३) : वैद्यकीय समाजशास्त्र, श्री.लक्ष्मी प्रकाशन, औरंगाबाद, पृ. ११३.

१३. Towards Population and Development Goals, UNFPA United Nations System in India (१९९७) : Oxford University Press, Bombay, p-१०५, १०६.

१४. R.K. Bhardwaj (१९७४) : ``Urban Development in India``, National Publishing House, Daryaganj, Delhi, p-९२.

## प्रकरण-सहावे

## सारांश, निष्कर्ष व शिफारशी

**सारांश:**

कोणत्याही देशाच्या विकासात औद्योगिक विकास हा एक महत्त्वाचा घटक आहे. औद्योगिकीकरण ही विकासाची पूर्वअट, आवश्यकता मानली जात आहे. देशाचा आर्थिक विकास साध्य करण्यासाठी औद्योगिककीकरणावर भर देण्यात येत आहे. त्यामुळे औद्योगिक केंद्राच्या भोवती लोकांच्या रहिवासाला, वस्तीस्थानांच्या निर्मितीला वेग आला; परिणामी वाढत्या लोकसंख्येचे रोजगारासाठी स्थलांतर होण्यास सुरुवात झाली. या प्रक्रियेला शहरीकरण असे म्हणतात. आज लहान शहरांतून मोठ्या शहरांतही लोक स्थलांतर करत आहेत. कारण मोठ्या शहरांत लहान शहरांपेक्षा जास्त सोयी उपलब्ध आहेत. उदा. रेल्वे, विमान, शैक्षणिक संस्था, औद्योगिकीकरण, तांत्रिक सुविधा इत्यादी शहरीकरणाच्या प्रक्रियेमुळे एका बाजूने विकास प्रक्रियेने वेग घेतला असे दिसत असले; तरी याच प्रक्रियेने अनेक सामाजिक व आर्थिक समस्यांना जन्म दिला असे दिसत आहे.

भारतामध्ये नागरीकरणाची प्रक्रिया १९ व्या शतकात सुरू झाली आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नागरीकरणाची प्रक्रिया अधिक वेगाने सुरू झाली. साधारणपणे पंचवार्षिक योजनेमुळे उद्योगिकीकरणास चालना मिळाली. दळण-वळण क्षेत्रात अनेक सुधारणा घडू लागल्या आहेत. त्यामुळे नागरीकरणाच्या प्रक्रियेला वेग आला. नागरीकरण ही अशी प्रक्रिया आहे, की ज्या प्रक्रियेमध्ये ग्रामीण वसाहतीचे नागरी वसाहतीमध्ये रूपांतर होत आहे. अनेक लोक ग्रामीण भागातून सतत नागरी भागाकडे

स्थलांतरित होत असतात. साधारणपणे शेतीचे यांत्रिकीकरण घडून येते, तेव्हा शेती क्षेत्रावर अवलंबून असणारे लोक अधिक मात्रेने अतिरिक्त (Surplus) ठरतात. त्याच वेळी उद्योग क्षेत्रामध्ये उत्पादन हाताऐवजी यंत्राच्या साहाय्याने घेतले जाते. तेव्हा अशा मोठ्या कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या मजुरांना मागणी वाढते, व्यापार वाढत जातो. त्यासाठी ग्रामीण भागातील अतिरिक्त लोकसंख्या नागरी भागाकडे कामधंद्याच्या निमित्ताने स्थलांतरित होत आहे. त्यामुळे शहरीकरणाची प्रक्रिया विकसित होत आहे.

विकसनशील देशांपुढील विकासाच्या समस्या सर्वसाधारणपणे सारख्याच असतात. नागरीकरणाची प्रक्रिया व विकासाच्या प्रक्रियेचा सहसंबंध आलेखाद्वारे ठळकपणे दाखवू शकतो. भारतातील शहरीकरणाचा विचार केला तर भारतात शहरीकरणाची प्रवृत्ती जास्त वेगाने वाढत आहे. यात मोठ्या शहरांची वाढण्याची प्रवृत्ती लहान शहरापेक्षा जास्त आढळून येते. त्यामुळे मोठ्या शहरात वाढत्या नागरीकरणामुळे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. आज महाराष्ट्र हे देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे, की ज्याचे शहरीकरण जास्त झाले आहे. कारण महाराष्ट्राचे औद्योगिकीकरण जास्त झाले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातून शहरी भागात जास्त स्थलांतरण झालेले आहे. उस्मानाबाद व सोलापूर जिल्हा हे मागास जिल्हे म्हणून ओळखले जातात. या जिल्ह्यातील एकूण उद्योगांची व कारखान्यांची संख्या कमी आहे परंतु एका विशिष्ट उद्योग-केंद्राभोवती स्थलांतर प्रक्रियेतून नागरीकरणाचा वेग वाढलेला दिसत आहे. त्यामुळे झालेच्या आर्थिक सामाजिक समस्यांचा अभ्यास करण्यासाठी सदरील विषयाची निवड करण्यात आली आहे.

शहरीकरणामुळे शेती क्षेत्राचासुध्दा फायदा झाला आहे. शहरीकरणामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून यांत्रिकी उत्पादन वाढत आहे. त्यामुळे शेती क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादकता वाढवता येते. भारतामध्ये १९९४-९५ या वर्षी दर हजार कृषी कामगारांमध्ये पाच ट्रॅक्टर व शेती यंत्रे उपलब्ध आहेत; तर हेच प्रमाण अमेरिकेत १,४५२, इंग्लंड ८७०, जपान ५९३, कॅनडा १६८३ असे आहे. म्हणजे शहरीकरण व शेतीविकास यांचासुध्दा संबंध आहे.

शहरीकरणामुळे उत्पादन वाढत आहे. त्यामुळे उत्पादनाच्या घटकांचा, बाजारपेठांचा विकास होत आहे. शहरीकरण वाढीबरोबर दळणवळण व वाहतुकीमध्ये वाढ होत आहे. यामुळे उत्पादकांच्या वाहतूक खर्चामध्ये घट होत आहे. तसेच एकमेकांवर अवलंबून असणाऱ्या उद्योगांना कच्चा माल जागेवरच उपलब्ध होत आहे, म्हणजेच बाजारपेठांची समस्या निर्माण होत नाही. शहरीकरण वाढीमुळे उत्पादन वाढून शहराचे आकारमान वाढत आहे. यामुळे वेतनदरात वाढ होऊन कामगारांचे राहणीमान उंचावत आहे.

भारतामध्ये प्राचीन काळी शहरे होती, हे हडप्पा व मोहन्जोदाडो संस्कृतीमुळे सिध्द होते. आर्यांनी भारतामध्ये सिंधू, यमुना खोऱ्यांमध्ये नद्यांकाठी आपली गावे वसवली होती. त्यामुळेच या नद्याकाठी जास्त नागरीकरण पाहण्यास मिळते. इतिहासकारांच्या मते वैदिक कालखंडातसुध्दा शहरांची रचना आधुनिक पध्दतीनेच होती. आर्यांनी धर्माच्या नावावर गावे वसवलेली आहेत. भारतामध्ये झुसी, कौरांबी, मथुरा, अयोध्या, हस्तिनापूर ही महत्त्वाची शहरे आर्यांनीच धर्माच्या नावावर निर्माण केलेली आहेत. प्राचीन कालखंडात वर्णव्यवस्था व जातीनुसार व्यवसाय केले जात

होते. म्हणूनच भारतात बांगडी उद्योगामध्ये फिरोजाबाद व चामडी उद्योगामुळे कानपूर ही नगरे विकसित झाली आहेत.

प्राचीन कालखंडातील कौशल, मगध, पाटलीपुत्र राजधानी असणा-या अशोक, मौर्य, गुप्त, चोल या राजांनी आपल्या राजधान्यांचे नागरीकरण घडवून आले आहे. नालंदा व तक्षशिला विद्यापीठांनी आसपासची शहरे निर्माण केली होती. तर बुध्दाने कुशीनगर, लुंबिनी अशी सहा शहरे निर्माण केली होती. म्हणजेच भारतामध्ये प्राचीन कालखंडामध्ये धर्मामुळे, शिक्षणामुळे, राजधान्यांमुळे अनेक नगरे विकसित झाली आहेत. १६ व्या शतकात मराठा कालखंडामध्ये २९ मुलकी विभाग होते. या मुलकी विभागाची प्रशासकीय कार्यालये पुणे, वाई, सातारा, भिवंडी, कल्याण, महाड, जुन्नर, रायगड व कोल्हापूर अशा अनेक शहरांमध्ये होती. तसेच शिवाजी महाराजांनी, अहल्याबाई होळकरांनी अनेक ठिकाणी मंदिरे बांधून त्या ठिकाणांचा धार्मिक विकास करून त्यांना शहरांचा दर्जा प्राप्त करून दिला.

वाढते औद्योगिकीकरण, व्यावसायिकीकरण व नगरांतील गर्दीमुळे नगरे विस्तारून महसुली खेडी व ग्रामीण भूमी नगरामध्ये विलीन होऊन घटत आहे. नगरामध्ये मोकळया जागा शिल्लक नसल्यामुळे नवीन उद्योग, घरे, शाळा, महाविद्यालये, हॉटेल्स, दुरुस्ती सेवा केंद्रे, शासकीय व प्रशासकीय कार्यालये नगराच्या बाहेर निर्माण होत आहेत. त्यामुळे नगरपालिका हद्द वाढून ग्रामीण भूमी घटत आहे. त्यामुळे नागरीकरणाला गती आली आहे. वरील सर्व अभ्यासावरून नागरीकरणावरील अभ्यासाचे सिंहावलोकन केल्यास असे लक्षात येते, की नागरीकरणामुळे लोकांचे जीवनमान सुधारले, कृषी क्षेत्रावरील भार कमी होतो; परंतु नगरीय समस्याही निर्माण

होतात.

फार अल्पप्रमाणात महाराष्ट्र राज्यस्तरावर व विभागीय स्तरावर नागरीकरणाचे अध्ययन करण्यात आले आहे. उस्मानाबाद व सोलपूर शहराचे १९८१ नंतरचे नागरीकरण या संदर्भात कोणत्याही प्रकारचा अभ्यास सर्वसाधारणपणे महाराष्ट्रात व विशेषतः उस्मानाबाद व सोलापूर जिल्हयात झालेला नाही. नागरीकरणाच्या अध्ययनामधील हे अंतर या संशोधनामुळे निश्चितच दूर होईल.

मानवी जीवनाच्या आतापर्यंतच्या इतिहासात नगराची संकल्पना अस्तित्वात होती. मात्र नागरीकरण १९ व्या शतकापासून गतिमान झालेले दिसून येते. जगामध्ये अनेक राष्ट्रे पाश्चात्त्य साम्राज्यांपासून मुक्त झाली. त्याच वेळेस वाफेच्या इंजिनाचा शोध लागला आणि औद्योगिक क्रांती घडून आली. त्यामुळे यंत्रोत्पादन सुरू झाले आणि अनेक कारखाने शहरी भागामध्ये निर्माण झाले. त्यामुळे आजूबाजूच्या परिसरातील, ग्रामीण भागातील लोक नगरांमध्ये रोजगारासाठी, व्यवसायासाठी स्थलांतरित झाले; म्हणून नागरीकरण प्रवृत्तीस सुरुवात झाली.

जगामध्ये ज्या देशांनी औद्योगिकीकरणाची कास सुरुवातीपासून धरली आहे, त्या देशांचे नागरीकरण जास्त झालेले आहे व विकसनशील देशांत औद्योगिकीकरणास सुरुवात उशिरा केल्यामुळे नागरीकरण कमी झालेले आहे. वाढत्या यांत्रिकीकरणामुळे विकसित देशांतील नागरीकरण अंतिम टप्प्यात जाऊन पोहोचले आहे; तर विकसनशील देशांमधील नागरीकरण प्रवृत्ती हळूहळू वाढत आहे. कारण तेथे यांत्रिकीकरणाचा अवलंब उशिरा केला आहे; तरी परंतु आज विकसनशील देशांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे औद्योगिकीकरणाने

जोर धरला आहे; म्हणून नागरीकरण प्रवृत्ती वाढत आहे. सन १९०१ मध्ये जगातील विकसित देशांमध्ये सरासरी ३० टक्के नागरीकरण झालेले होते; तर भारतात ११ टक्के नागरीकरण झालेले होते. सन २०११ मध्ये विकसित देशांचे ७५ ते ८० टक्के नागरीकरण झालेले आहे. तर भारताचे २६ टक्के व विकसनशील देशांचे २५ ते ३० टक्के नागरीकरण झालेले होते. जगामध्ये नागरी लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा चीन, रशिया व अमेरिकेनंतर चौथा क्रमांक लागतो.

**निष्कर्ष :** प्रस्तुत संशोधनाचे प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे :

१. युरोप कालखंडातील नागरी लोकसंख्या सन १९२० मध्ये ३४.७ टक्के; तर सन २००० मध्ये ५५ टक्के होती. याच कालखंडात कमी विकसित देशांतील शहरी लोकसंख्या सन १९२० मध्ये ६.७ टक्के होती; तर सन २००० पर्यंत ३१.२ टक्के एवढी होती.

२. पाकिस्तान, चीन या शेजारी राष्ट्रांतील नागरीकरण भारतापेक्षा जास्त झालेले आहे. अमेरिका, रशिया, ऑस्ट्रेलिया, जपान या राष्ट्रांपेक्षा भारतातील नागरीकरणाची पातळी अतिशय खालच्या पातळीवर आहे हे स्पष्ट होते. जगातील नागरीकरणाची टक्केवारी ४५ असून, जगात सर्वाधिक नागरिकरण ८५ टक्के ऑस्ट्रेलिया, त्यानंतर ७७ टक्के जपान, ७५ टक्के अमेरिका, ७३ टक्के युरोप तर भारतात केवळ २६ टक्के नागरीकरण झाले आहे.

३. जगातील औद्योगिकदृष्ट्या मागास देशांमध्येसुध्दा चांगले नागरीकरण झालेले आहे. भारतामध्ये सन १९०१ ते १९९१ या कालखंडात प्रतिवर्ष २.४ टक्के दराने नागरीकरण वाढले आहे. भारतामध्ये खऱ्या अर्थाने १९०१ पासून नागरीकरणास

सुरुवात झाली आहे.  भारतामध्ये मागील ४० वर्षांच्या कालखंडात लहान नगरांपेक्षा मोठ्या नगरांची नागरीकरण प्रवृत्ती जास्त वाढली आहे.

४. दुसऱ्या महायुध्दानंतर व भारताच्या फाळणीनंतर भारतातील नागरीकरण जास्त वाढले. कारण या कालखंडात ग्रामीण भागातून नागरी भागात जास्त स्थलांतर झालेले आहे. सन १९७१-८१ व १९८१-९० या दशकातील नागरीकीकरणाचा दर अनुक्रमे ४६ व ३६ टक्के होता. सन १९७१-८१ या दशकात नागरीकीकरणाचा दर जास्त राहिला आहे.

५. सन १९०१ मध्ये भारतातील नागरीकरण १०.९४ टक्के होते, ते सतत वाढत जाऊन सन १९९१ पर्यंत २५.७१ टक्के झाले. सन १९०१ ते १९९१ या कालखंडात भारतातील नागरीकरणात अडीच पटींपेक्षा जास्त वाढ झाल्याचे दिसून येते. भारतातील नागरी लोकसंख्या वाढीचा दशवार्षिक वृध्दीदर १९५१ पर्यंत सतत वाढल्याचे दिसून येते. सन १९६१ मध्ये मात्र नागरीकरणात घट झाल्याचे दिसून येते; कारण १९६१ मध्ये भारतीय जनगणनेने नागरीकरणाच्या व्याख्येत बदल केला आहे.

६. सन १९०१ मध्ये भारतात एकूण नगरांची संख्या १८२७ होती. सन १९६१ चे दशक वगळता सतत वाढ होत जाऊन सन १९९१ मध्ये ती ३७३८ नगरांपर्यंत पोहचली. कारण शहरी भागामध्ये औद्योगिक व व्यावसायिक विकास झाल्यामुळे अनेक नगरांमध्ये ग्रामीण भागातील लोक रोजगारासाठी स्थलांतरित झाले. त्यामुळे एकुण नगरांच्या संख्येत वाढ झाली. सन १९६१ च्या भारतीय जनगणनेनुसार नागरीकरणाची व्याख्या बदलल्यामुळे या दशकात नगरांची

संख्या घटून २३६५ एवढी झाल्याचे दिसून येते. त्यानंतर मात्र वाढत्या औद्योगिक, व्यावसायिक सेवाक्षेत्राच्या विकासामुळे नगरांची संख्या वाढून त्यात सन १९९१ मध्ये ३७६८ पर्यंत वाढ झाली.

७. सन १९०१ मध्ये देशामध्ये आंध्र प्रदेश, आसाम, बिहार, मध्य प्रदेश, ओरिसा व केरळ ही राज्ये भारताच्या (१०.८४ टक्के) सरासरी नागरीकरण पातळीपेक्षा खालच्या पातळीवर होती; तर गुजरात, महाराष्ट्र, राजस्थान, तामिळनाडू हरियाना, कर्नाटक, पंजाब, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश या राज्यांचे नागरीकरण भारताच्या सरासरीपेक्षा जास्त होते, कारण इंग्रजांनी जास्तीत-जास्त भांडवली गुंतवणूक या राज्यांमध्ये केलेली होती.

८. सन १९९१ मध्ये भारताचे नागरीकरण २५.७७ टक्के झाल्याचे आढळून येते. राज्या-राज्यातील नागरीकरणात महाराष्ट्र (३८.७२ टक्के) अग्रेसर असून त्यानंतर गुजरात (३४.८० टक्के), तमिळनाडू (३४.४० टक्के), कर्नाटक (३०.९१ टक्के), पंजाब (२९.४२ टक्के) राज्यांचा क्रमांक लागतो. महाराष्ट्र, गुजरात, तमिळनाडू, पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये औद्योगिकीकरण जास्त झालेले आहे.

९. आंध्र प्रदेश, बिहार, गुजरात, हरियाना, कर्नाटक, महाराष्ट्र व उत्तर प्रदेश इत्यादी राज्यांचा नागरी लोकसंख्येचा दशवार्षिक वृद्धीदर १९५१-६१ ते १९७१-८१ या दशकापर्यंत वाढल्याचे दिसून येते. कारण ही राज्ये मुळातच जास्त लोकसंख्येची असून औद्योगिकीकरणही सतत वाढत असल्यामुळे लोकसंख्येचा दशवार्षिक वृध्दी दर अधिक आहे.

१०. सन १९९१ मध्ये भारतात नगरांची संख्या ३७६८ होती. त्यापैकी सर्वात जास्त वाटा उत्तर प्रदेश १८.६९ टक्के, मध्य प्रदेश ११.४९ टक्के, महाराष्ट्र ७.६९ टक्के, तमिळनाडू ६.९० टक्के, कर्नाटक ६.७४ टक्के, गुजरात ५.९७ टक्के, राजस्थान ५.७० टक्के व बिहार ५.५९ टक्के एवढा होता. जी राज्ये आकाराने व लोकसंख्येने मोठी आहेत, त्या राज्यांमध्ये नगराची संख्या जास्त आढळून आली आहे. जरी नगरांची संख्या या राज्यांमध्ये जास्त असली तरीही उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार, राजस्थान राज्यांतील शहरी लोकसंख्येचे प्रमाण गोवा, हरियाना, केरळ या राज्यांपेक्षा कमी आहे.

११. सन १९८१ ते १९९१ या दशकात सर्वाधिक ६६.६६ टक्के नगरांच्या संख्येतील वाढ अरुणाचल प्रदेश या राज्याने नोंदविली आहे; तर सर्वांत कमी -८.९८ टक्के वाढ आंध्र प्रदेश या राज्याची आहे. भारतातील सन १९९१ मधील एकूण नगरांच्या संख्येतील वाढीचे सर्वाधिक प्रमाण (६.७४ टक्के) कर्नाटक या राज्याचे असून त्या खालोखाल ५.९७ टक्के गुजरात, ५.६५ टक्के आंध्र प्रदेश व ५.५९ टक्के बिहार या राज्यांचा क्रमांक लागतो. अरुणाचल प्रदेश व गोवा या राज्यांचा भारतातील एकूण नगरांतील हिस्सा एक टक्क्यांपेक्षाही कमी आहे.

१२. भारतामध्ये महानगरांची संख्या सन १९०१ मध्ये फक्त एक होती, त्यात वाढ होऊन ती सन १९९१ मध्ये २३ एवढी झाली. सन १९०१ मध्ये भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ०.६३ टक्के लोकसंख्या महानगराची होती. त्यात वाढ होऊन सन १९९१ मध्ये ८.३७ टक्के झाली. सन १९०१ मध्ये एकूण नागरी लोकसंख्येपैकी महानगरात राहणारी लोकसंख्या ५.८४ टक्के होती; त्यात वाढ

होऊन ती सन १९९१ साली ३२.५४ टक्क्यांपर्यंत वाढली. कारण देशाच्या फाळणीमुळे अनेक लोक शहरी भागात स्थलांतरित झाले.

१३. सन १९९१ मध्ये देशामध्ये एकूण 'अ'वर्ग व महानगरांच्या लोकसंख्येपैकी 'अ' वर्ग नगरांचा लोकसंख्येतील वाटा ४९.४३ टक्के होता; तर महानगराचा वाटा ५०.५७ टक्के होता. म्हणजेच २७७ 'अ' वर्ग नगरांमध्ये मोठया नगरांपैकी अर्धी लोकसंख्या राहते व या वरून असे स्पष्ट होते, की नागरीकरणात महानगराचा वाटा फार मोठा आहे.

१४. सन १९०१ मध्ये महाराष्ट्रातील नगरांची संख्या २१९ एवढी होती ती सन २००१ पर्यंत वाढून ३३६ पर्यंत पोहोचली. वाढत्या औद्योगिकीकरणाबरोबर महाराष्ट्रातील नगरांची संख्या वाढल्याचे दिसून येते. सन १९०१ यावर्षी महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येपैकी १६.५९ टक्के लोक शहरांमध्ये राहत होते, तर भारताची सरासरी १०.८४ टक्के एवढी होती.

१५. सन १९९१ मध्ये महाराष्ट्राचे नागरीकरण ३८.७३ टक्क्यांपर्यंत वाढले, हे प्रमाण भारताच्या २५.७७ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. महाराष्ट्राचे नागरीकरण भारताच्या सरासरीपेक्षा सन १९०१ पासून सन १९९१ पर्यंत जास्त असल्याचे दिसून येते. कारण महाराष्ट्र हे सुरुवातीपासूनच विकासाच्या दृष्टीने देशातील अग्रेसर राज्य राहिले आहे.

१६. महाराष्ट्रातील शहरी भागातील लोकसंख्यावाढीचा दशवार्षिक वृध्दीदर सन १९११ मध्ये ०.९९ टक्के होता, तो सतत वाढत जाऊन सन १९५१ मध्ये

सर्वाधिक ६२.६१ टक्के एवढा झाला. त्यानंतर मात्र सन १९९१ मध्ये लोकसंख्या दशवार्षिक वृध्दीदर ३८.६६ टक्के एवढा राहिला आहे.

१७. महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्येचा सन १९७१-८१ दशकातील वृध्दीदर ३९.९९ टक्के होता; तर सन १९८१-९१ या दशकातील वृध्दीदर ३८.६६ टक्के एवढा होता. महाराष्ट्रात 'अ' वर्ग नगराची संख्या सन १९७१ मध्ये १८ होती, सन १९८१ मध्ये २९, तर सन १९९१ मध्ये ३३ एवढी होती; तर इतर नगरांची संख्या ३०३ एवढी होती.

१८. सन १९९१ मध्ये भारतातील ग्रामीण भागातून नागरी भागातील एकूण स्थलांतरण ६.३६ टक्के असून यात ५.६४ टक्के पुरुष तर ७.१२ टक्के महिला स्थलांतरण आहे. याच वर्षी नागरी भागातून नागरी भागात झालेले एकूण स्थलांतरण १२.१५ टक्के असून यामध्ये पुरुषांचे स्थलांतरण १०.०५ टक्के तर महिलांचे स्थलांतरण १४.१३ टक्के आहे.

१९. सन १९९१ मध्ये भारतामध्ये ग्रामीण भागातून नागरी भागात एकूण लोकसंख्येच्या ६.३६ टक्के लोक स्थलांतरित झाले, आहे तर एकूण नागरी लोकसंख्येपैकी १२.०५ टक्के लोक स्थलांतरित झालेले आहे.

२०. ग्रामीण भागातील एकूण लोकसंख्येपैकी २.३० टक्के कामगार नागरी भागात व्यवसायासाठी स्थलांतरित झालेले आहेत. यांमध्ये महिलांचे प्रमाण ०.७५ टक्के, तर पुरुषांचे प्रमाण ३.७५ टक्के आहे. नागरी भागातून नागरी भागात व्यवसायासाठी एकूण ३.८४ टक्के स्थलांतरण झाले असून या कारणामुळे ६.०५ टक्के पुरुष व १.३७ टक्के महिला स्थलांतरण झाले आहे.

२१. सन १९८१ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी नागरी लोकसंख्येचे प्रमाण १२.४० टक्के एवढे होते, त्यात सतत वाढ होऊन सन १९९१ मध्ये ते १५.१९ टक्के, सन २००१ मध्ये १५.६९ टक्के, तर सन २०११ मध्ये हे प्रमाण १७.२५ टक्के झाले. सोलापूर जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी सन १९८१ मध्ये नागरीकरणाचे प्रमाण २९.६५ टक्के होते, ते सन २०११ मध्ये ३४.९९ टक्के इतके वाढले.

२२. उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील नागरी लोकसंख्येतील बदल सन १९८१-९१ या दशकात अनुक्रमे ३२.२४ टक्के व २४.४७ टक्के, तर सन २००१-११ या दशकात अनुक्रमे २२.८५ टक्के व ३१.९४ टक्के एवढा होता. उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्वांत जास्त नागरी लोकसंख्येतील बदल सन १९९१ या दशकात ४८.९२ टक्के व सर्वांत कमी बदल सन २००१ या दशकात २०.३१ टक्के झालेला दिसून येतो. सोलापूर जिल्ह्यातील सर्वांत जास्त नागरी लोकसंख्येतील बदल सन २०११ या दशकात ३१.९४ टक्के व सर्वांत कमी बदल सन १९९१ मध्ये २१.११ टक्के झालेला आहे.

२३. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये सर्वाधिक वार्षिक वृध्दीदर उस्मानाबाद शहराचा ४.४८ टक्के; तर उमरगा नगराचा ३.१७ टक्के एवढा सरासरी वार्षिक वृध्दीदर दिसून येतो. सोलापूर जिल्ह्यामध्ये सरासरी वार्षिक वृध्दीदर सर्वांत जास्त सांगोला नगराचा ३.१६ टक्के व सोलापूर नगराचा २.६१ टक्के आढळून येतो; तर सर्वांत कमी सरासरी वार्षिक वृध्दीदर कुर्डुवाडी व मैंदर्गी नगराचा अनुक्रमे ०.७६ टक्के व ०.७३ टक्के आहे. कारण कुर्डुवाडी नगर हे फक्त रेल्वे जंक्शन

असल्यानेच मोठे  झाले आहे तर मैंदर्गी नगरात थोडाफार औद्योगिक विकास आहे; परंतु तेथील उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर आहे.

२५. सन १९८१ मध्ये नागरी लोकसंख्येत उस्मानाबाद शहराचा वाटा ५५.४५ टक्के होता. त्यात सतत वाढ होऊन तो सन २००१ मध्ये ६१.११ टक्के झाला. सोलापूर जिल्ह्यामध्ये नागरी लोकसंख्येत सोलापूर शहराचा वाटा सन १९८१-१९९१ या दशकात २०.३९ टक्के होता तो, सन १९९१ ते २००१ या दशकात ३९.९१ टक्के इतका वाढला.

२६. उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरी लोकसंख्येतील वर्ग 'अ' शहरांचा वाटा ३४.५६ टक्के, वर्ग 'क' शहरांचा वाटा ४०.७७ टक्के, वर्ग 'ड' शहरांचा वाटा ९.८६ टक्के व वर्ग 'ई' शहरांचा वाटा १४.७९ टक्के आहे. सोलापूर जिल्ह्यातील नागरी लोकसंख्येतील वर्ग 'अ' शहरांचा वाटा ७९.७५ टक्के, वर्ग 'ब' शहरांचा वाटा ७.४५ टक्के, वर्ग 'क' शहरांचा वाटा ९.२२ टक्के व वर्ग 'ड' शहरांचा वाटा ३.५६ टक्के आहे. म्हणजेच दोन्ही जिल्ह्यांतील वर्ग 'अ' शहरांचा वाटा जास्त आहे. कारण अ वर्ग शहरांचा सर्वांगीण विकास होत आहे.

२७. महाराष्ट्राच्या शहरीकरणात उस्मानाबाद जिल्ह्यातील 'अ' वर्ग शहरांचा वाटा ३.०३ टक्के, तर सोलापूर जिल्ह्याचा वाटा ६.०६ टक्के आहे. म्हणजेच महाराष्ट्राच्या तुलनेत या दोन्ही जिल्ह्यांचा विकास कमी आहे. म्हणजेच दोन्ही जिल्ह्यांतील शहरीकरण विकेंद्रित स्वरुपाचे आहे. याचाच अर्थ लहान नगरांचे शहरीकरण दोन्ही जिल्ह्यांत महाराष्ट्राच्या तुलनेत जास्त झालेले आहे.

त्यामुळेच ‘अ’ वर्ग शहरांचे शहरीकरण दोन्ही जिल्ह्यात कमी राहिले आहे.

२८. सन १९८१ मध्ये उस्मानाबाद व सोलापूर या ‘अ’ वर्ग नगरांमध्ये एकूण मुख्य कामगारांपैकी बिगर कृषी क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण अनुक्रमे १३.६६ टक्के व ५.०० टक्के होते. म्हणजेच उस्मानाबाद शहरात सोलापूर शहरापेक्षा कृषी क्षेत्रात कमी कामगार आढळून आले आहेत.

२९. सन १९८१ मध्ये उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यांतील एकूण लोकसंख्येत नागरी लोकसंख्येचा वाटा अनुक्रमे १२.६४ व २९.६५ टक्के होता. त्यात सतत वाढ होऊन सन २००१ मध्ये १५.६९ व २८.७६ टक्के वाढ झाली आहे तर सन २०११ मध्ये दोन्ही जिल्ह्यांचा वाटा अनुक्रमे १७.२५ व ३४.९९ टक्के आहे. म्हणजेच दोन्ही जिल्ह्यांतील नागरीकरण प्रवृत्ती ३ दशकामध्ये वाढलेली आहे. उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यांच्या नागरीकरण वाढीच्या प्रवृत्तीची प्रामुख्याने स्थलांतरण, नगरांच्या हद्दीत किंवा सीमांमध्ये वाढ, नैसर्गिक लोकसंख्या वाढ आणि मागासवर्गीय लोकसंख्या ही प्रमुख चार कारणे दिसून येतात.

३०. उस्मानाबाद जिल्ह्यात सर्वाधिक २१.६८ टक्के स्थलांतरण तुळजापूर शहरात झालेले दिसून येते. त्यानंतर परंडा (१३.४३ टक्के) व उस्मानाबाद (११.७६ टक्के) यांचा क्रमांक लागतो. सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक २९.०७ टक्के स्थलांतरण सोलापूर शहरात झाले असून त्यांनतर सांगोला (२३.६२ टक्के) व बार्शी (११.८५ टक्के) या नगरांचा क्रमांक लागतो. सन १९९१ ते सन २००१ या दशकातील उस्मानाबाद जिल्ह्यातील सरासरी स्थलांतरण १५.३१ टक्के असून सोलापूर जिल्ह्यातील सरासरी स्थलांतरण ८.९८ टक्के आहे.

३१. एकूण मुख्य कामगारांपैकी उस्मानाबाद जिल्ह्यात व सोलापूर जिल्ह्यात अनुक्रमे ४.४८ व ३.६६ टक्के कामगारांचे स्थलांतरण झालेले आहे. दोन्ही जिल्ह्यांमध्ये पुरुष कामगारांचे स्थलांतरण प्रमाण स्त्री कामगारांपेक्षा जास्त आढळून आले आहे. एकुण स्थलांतरित मुख्य कामगारांपैकी उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातून नागरी भागात अनुक्रमे ५.४२ व ४.२८ टक्के कामगारांचे स्थलांतरण झालेले आहे. नागरी भागातील एकूण मुख्य कामगारांपैकी उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील कामगारांचे एकूण स्थलांतरण अनुक्रमे ६.०७ व ४.५६ टक्के झालेले आहे. दोन्ही जिल्ह्यांमध्ये नागरी भागातून नागरी भागात होणाऱ्या स्थलांतरात महिला कामगारांचा वाटा जास्त आहे.

३२. उस्मानाबाद जिल्ह्यात व्यवसायानुसार स्थलांतरणावरून असे दिसून येते, की इतर कामगारांचे स्थलांतरणातील प्रमाण ७२.२४ टक्के असून त्यानंतर शेतमजूर २०.०५ टक्के व जमीन कसणारे शेतकरी यांचे प्रमाण ६.०९ टक्के आहे. सोलापूर जिल्ह्याच्या बाबतीत हे प्रमाण ७१.९० टक्के इतर कामगार, २०.०० टक्के शेतमजूर, व ६.११ टक्के शेतकरी असे दिसून येते. दोन्ही जिल्ह्यांत ग्रामीण कामगारांपेक्षा नागरी भागातील कामगारांचे स्थलांतराचे प्रमाण जास्त आढळून आले आहे. कारण लहान नगरांमध्ये ग्रामीण भागातील स्थलांतरित आल्यामुळे लहान शहरांतील व्यवसायाच्या, रोजगाराच्या संधी कमी होत जातात.

३३. उस्मानाबाद जिल्ह्यात सन २००१ मध्ये सर्वाधिक ४३.२५ टक्के कामगारांचे स्थलांतरण इतर सेवा उद्योगातील असून, त्याखालोखाल २०.०३ टक्के व्यापार व वाणिज्य, ११.०० टक्के बिगर घरगुती उद्योग आणि ९.८१ टक्के वाहतूक व दळणवळण या उद्योगांचा क्रमांक लागतो. सोलापूर जिल्ह्याच्या बाबतीत सर्वाधिक ३९.५४ टक्के कामगारांचे स्थलांतरण इतर सेवा उद्योगातील असून त्यानंतर व्यापार व वाणिज्य २१.२५ टक्के, बिगर घरगुती १३.८२ टक्के व बांधकाम ११.६२ टक्के या उद्योगांचा क्रमांक लागतो.

३४. सन २००१ च्या जनगणनेनुसार उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात प्रतिहजार लोकसंख्येमागे उद्योगांची संख्या अनुक्रमे १७.४० व १८.२४ टक्के होती. या उद्योगात प्रतिहजार लोकसंख्येमागे उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यांतील अनुक्रमे ५.१८ व ३७.२३ टक्के लोकांना रोजगार मिळाला आहे. प्रतिहजार लोकसंख्येमागे उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील नागरी भागात उद्योगांची संख्या अनुक्रमे ३६.९० व ३६.९३ टक्के आहे. या उद्योगात प्रतिहजार लोकसंख्येमागे जिल्हानिहाय अनुक्रमे १२६.९८ व ११३.८६ टक्के लोकांना रोजगार मिळाला आहे.

३५. सोलापूर जिल्ह्यामध्ये सर्वांत जास्त नैसर्गिक लोकसंख्या वाढीचा दर बार्शी (३.९७ टक्के) शहरामध्ये आहे; तर सर्वांत कमी नैसर्गिक लोकसंख्या वाढीचा दर मंगळवेढा (१.३० टक्के) नगरामध्ये आढळून आला आहे. सोलापूर नगराचा नैसर्गिक लोकसंख्यावाढीचा दर ३३ टक्के एवढा आहे. त्यामुळेच सोलापूर नगराचे नागरीकरण वेगाने वाढत आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील नैसर्गिक

लोकसंख्या वाढीचा सरासरी दर २०.५१ टक्के तर सोलापूर जिल्ह्याचा सरासरी दर ५.८८ टक्के दिसून येतो.

३६. सन २००१ मध्ये उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील एकूण नागरी लोकसंख्येपैकी अनुक्रमे ०.३१ व ०.४४ टक्के लोकसंख्या बेघर होती. उस्मानाबाद जिल्ह्यात सर्वात जास्त बेघर लोकसंख्या परंडा नगरामध्ये आढळून आली आहे. कारण परंडा नगरात मागासवर्गीयांचे प्रमाण बरेच जास्त आहे, त्यामुळे गरिबीचे प्रमाण जास्त आहे. म्हणून या नगरात बेघर लोकसंख्या जास्त आहे, तर सर्वांत कमी बेघर लोकसंख्या तुळजापूर नगरात आढळून आली आहे. उस्मानाबाद नगरात बेघर लोकसंख्या ०.३० टक्के आहे.

३७. सन २००१ च्या जनगणनेनुसार उस्मानाबाद जिल्ह्यात २९९ कुटुंबे बेघर होती तर सोलापूर जिल्ह्यात ४०२ कुटुंबे बेघर होती. बेघर कुटुंबांतील लोकसंख्येवरून असे दिसून येते, की उस्मानाबाद जिल्ह्यात १०४७ लोक बेघर होते; तर सोलापूर जिल्ह्यात १७४४ लोक बेघर असल्याचे दिसून येते.

३८. सोलापूर नगरातील एकूण लोकसंख्येपैकी १.३८ व उस्मानाबाद नगरात ०.६८ टक्के लोकसंख्या सन २००१ मध्ये संस्थात्मक होती. सोलापूर नगरात संस्थात्मक लोकसंख्या जास्त आहे. कारण उस्मानाबाद नगरापेक्षा सोलापूर नगराचा व्यावसायिक विकास जास्त झाला आहे.

३९. उस्मानाबाद व सोलापूर जिल्हयात नागरी पक्की घरे अनुक्रमे १६.२५ टक्के व ३२.४७ टक्के होती. दोन्ही जिल्ह्याची महाराष्ट्राशी तुलना करता, दोन्ही जिल्ह्यांत पक्क्या घरांची संख्या कमी आढळून येते व कच्च्या आणि अर्धपक्क्या

घरांची संख्या जास्त आढळून येते. कारण दोन्ही जिल्ह्यांतील नागरी भागात दारिद्र्याचे प्रमाण जास्त आहे.

४०. एकूण नागरी लोकसंख्येपैकी उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यात दारिद्र्यरेषेचे प्रमाण सन २००१ मध्ये अनुक्रमे १६.०९ व १६.०२ टक्के एवढे होते.

४१. उस्मानाबाद जिल्ह्यात दरहजार लोकसंख्येमागे सर्वाधिक ६४.६९ टक्के दुचाकी वाहने असून त्यानंतर ९.९१ टक्के एवढी चारचाकी वाहनांची संख्या आहे. हेच प्रमाण सोलापूर जिल्ह्यात अनुक्रमे ७२.०४ टक्के व ७.२४ टक्के एवढे आहे.

४२. उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील नागरी भागात सरासरी प्रतिदिन दरडोई अनुक्रमे १८३.५९ व २७१.६६ ग्रॅम कचरा निर्माण होतो; तर सरासरी प्रतिदिन दरडोई उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्याच्या नागरी भागात अनुक्रमे १३२.१८ व १९५.५९ ग्रॅम कचरा गोळा केला जातो. म्हणजेच सोलापूर जिल्ह्यामध्ये दरडोई प्रतिदिन कचरा निर्मिती उस्मानाबाद जिल्ह्यापेक्षा जास्त आहे. भारतामध्ये नागरी भागात प्रतिदिन दरडोई ३०० ते ५०० ग्रॅम कचरा निर्माण केला जातो. भारताच्या तुलनेमध्ये दोन्ही जिल्ह्यांतील नागरी भागात दरडोई प्रतिदिन कचरानिर्मितीची तीव्रता कमी आहे.

४३. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये प्रतिदिन दरडोई सरासरी पाणीप्रदूषण घरगुती, औद्योगिक व इतर क्षेत्रांत अनुक्रमे ३९.३३ लिटर, ३.०४ लिटर व १.६८ लिटर होते. सोलापूर जिल्ह्यात अनुक्रमे ५१.५२ लिटर, ०.९२ लिटर व ४.३८ लिटर होते. सोलापूर जिल्ह्यात पाणी प्रदूषणाचे प्रमाण उस्मानाबाद जिल्ह्यापेक्षा जास्त आहे.

४४. उस्मानाबाद जिल्ह्यात दरमाणशी सरासरी दररोज ८७.३३ लिटर पाण्याची आवश्यकता असून प्रत्यक्ष ६०.६६ लिटर पाणीपुरवठा केला जातो. सोलापूर जिल्ह्यात दरमाणशी सरासरी दररोज ८४.४० लिटर पाण्याची आवश्यकता असून प्रत्यक्ष ६०.३० लिटर पाणीपुरवठा केला जातो. वाढत्या नागरीकरणामुळे दोन्ही जिल्ह्यांत पाणीपुरवठा समस्या निर्माण झाल्या आहेत. दोन्ही जिल्ह्यांच्या नागरी भागात जवळपास एकूण पाणीपुरवठ्याच्या १० टक्के पाणी वाया जाते.

४५. सोलापूर जिल्ह्यात ९४ टक्के तर उस्मानाबाद जिल्हयात ९८टक्के हिंदु धर्मीय कुटुंबे स्थलांतरीत झालेली दिसून येतात. सोलापूर व उस्मानाबाद या दोन्ही जिल्हयात स्थलांतरित कुटुंबांपैकी सर्वाधिक कुटुंबे इतर मागासवर्ग संवर्गातील असून सर्वांत कमी अनुसूचित जाती या संवर्गातील कुटुंबे स्थलांतरित झालेले दिसतात.

४६. सोलापूर जिल्ह्यातील निवडक ५० स्थलांतरित कुटुंबांपैकी पक्की घर असलेल्या कुटुंबाचे प्रमाण ८८ टक्के असून कच्चे घर असलेल्या कुटुंबाचे प्रमाण १२ टक्के एवढे आहे. तर उस्मानाबाद जिल्ह्यातील निवडक ५० स्थलांतरित कुटुंबांपैकी पक्के घर असलेल्या कुटुंबाचे प्रमाण ९० टक्के असून, कच्चे घर असलेल्या कुटुंबांचे प्रमाण १० टक्के एवढे आहे. उस्मानाबाद जिल्हयात सोलापूर जिल्हयाच्या तुलनेत पक्के घर असलेल्या कुटुंबांचे प्रमाण जास्त आढळून येते.

४७. सोलापूर जिल्ह्यातील ८ टक्के कुटुंबांकडे पीण्याच्या पाण्याची सुविधा नाही तर उस्मानाबाद जिल्ह्यातील २० टक्के कुटुंबांकडे पीण्याच्या पाण्याची सुविधा नाही.

४८. उस्मानाबाद जिल्ह्यातील ४० टक्के नागरिकांनी साफसफाई दररोज होत असल्याचे सांगितले तर सोलापूर जिल्ह्यातील केवळ १२ टक्के नागरकिंनी साफसफाई दररोज होत असल्याचे सांगितले. यावरून स्पष्ट होते की उस्मानाबाद जिल्ह्यातील स्थानिक प्रशासन साफसफाईकडे फारसे लक्ष देत नाही. सोलापूर जिल्ह्यातील ६८ टक्के नागरिकांनी कचराकुंडी नसल्याचे सांगितले तर उस्मानाबाद जिल्ह्यातील ५४ टक्के नागरिकांनी कचराकुंडी नसल्याचे सांगितले. यावरून स्पष्ट होते, की सोलापूर व उस्मानाबाद शहरातील स्थानिक प्रशासन कचरा व्यवस्थापनाकडे फारसे लक्ष देत नाही.

४९. सोलापूर जिल्ह्यातील २६ टक्के व उस्मानाबाद जिल्हयातील ५० टक्के नागरीकांनी सांडपाण्याची सुविधा नसल्याचे नमुद केले. सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्याची तुलना करता सोलापूर जिल्ह्यात उस्मानाबाद जिल्ह्याच्या तुलनेत सांडपाण्याची सुविधा चांगली आहे.

५०. सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील ८६ ते ८८ टक्के स्थलांतरित नागरिक नोकरी करतात; तर १० ते १२ टक्के स्थलांतरित नागरिक व्यवसाय करीत असल्याचे दिसून येते. सोलापुर जिल्ह्यात एकही स्थलांतरित नागरिक मजुरी करीत नसल्याचे दिसून येते.

५१. सोलापूर जिल्ह्यातील ९४ टक्के तर उस्मानाबाद जिल्ह्यातील १०० टक्के नागरिक हे ग्रामीण भागातून शहरी भागात स्थलांतरित झाले आहेत. यावरून स्पष्ट होते, की ग्रामीण भागातील नागरिक रोजगारासाठी मोठया प्रमाणात शहरी भागात स्थलांतरित होत आहेत.

५२. सोलापूर जिल्ह्यातील सर्वाधिक ६० टक्के नागरिक नोकरीसाठी त्यानंतर २० टक्के नागरिक शिक्षणासाठी, १० टक्के नागरिक रोजगारासाठी, ६ टक्के नागरिक व्यवसायासाठी; तर ४ टक्के नागरिक लग्नामुळे शहरात स्थलांतरित झाल्याचे दिसून येते. उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्वाधिक ७६ टक्के नागरिक नोकरीसाठी त्यानंतर १२ टक्के नागरिक शिक्षणासाठी, ६ टक्के नागरिक व्यवसायासाठी, ४ टक्के नागरीक रोजगारासाठी तर २ टक्के नागरीक लग्नामुळे शहरात स्थलांतरीत झाल्याचे दिसून येते. उस्मानाबाद जिल्ह्याच्या तुलनेत सोलापूर जिल्ह्यात शिक्षणासाठी स्थलांतरित होणा-या नागरिकांचे प्रमाण जवळपास दुप्पट असल्याचे दिसून येते.

५३. सोलापूर शहरातील सर्वाधिक ३३.६४ टक्के नागरिकांनी पाणीटंचाई ही प्रमुख समस्या असल्याचे नमूद केले. त्यानंतर ३०.८४ टक्के नागरिकांनी प्रदूषण, २०.५६ टक्के नागरिकांनी वाढती गर्दी, १३.०८ टक्के नागरिकांनी वाढते घरभाडे तर १.८७ टक्के नागरीकांनी असुरक्षितता इत्यादी शहरी समस्या असल्याचे मत व्यक्त केले आहे. उस्मानाबाद शहरातील सर्वाधिक ३३.९८ टक्के नागरिकांनी पाणीटंचाई हि प्रमुख समस्या असल्याचे नमूद केले असून, त्यानंतर २९.१३ टक्के नागरिकांनी प्रदुषण, १६.५० टक्के नार्गेरिकांनी वाढती गर्दी, ११.६५ टक्के नागरिकांनी वाढते घरभाडे तर ८.७४ टक्के नागरिकांनी असुरक्षितता इत्यादी प्रमुख शहरी समस्या असल्याचे मत व्यक्त केले आहे.

**शिफारशी:**

वरील निष्कर्षांच्या अधारे काही प्रमुख शिफारशी पुढीलप्रमाणे करण्यात येत आहेत.

१. जगातील नागरीकरणाची टक्केवारी ४५ असून जगात सर्वाधिक नागरीकरण ८५ टक्के ऑस्ट्रेलिया, त्यानंतर ७७ टक्के जपान, ७५ टक्के अमेरिका, ७३ टक्के युरोप तर भारतात केवळ २६ टक्के नागरीकरण झाले आहे. नागरीकरण हे सर्वांगीण विकासाचे प्रतीक असून शासनाने नागरीकरणाच्या योजना प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता आहे.

२. भारतामध्ये मागील ४० वर्षांच्या कालखंडात लहान नगरांपेक्षा मोठ्या नगरांची नागरीकरण प्रवृत्ती जास्त वाढली आहे. नागरीकरणामुळे निर्माण होणा-या समस्यांवर मात करण्यासाठी लहान नगरांमधील नागरीकरणाला प्राधान्य देणे गरजेचे आहे.

३. सन १९०१ मध्ये देशामध्ये आंध्र प्रदेश, आसाम, बिहार, मध्य प्रदेश, ओरिसा व केरळ या राज्यातील नागरीकरण (१०.८४ टक्के) भारताच्या सरासरी नागरीकरण पातळीपेक्षा खालच्या पातळीवर होती तर गुजरात, महाराष्ट्र, राजस्थान, तमिळनाडू, हरियाना, कर्नाटक, पंजाब, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश या राज्यांचे नागरीकरण भारताच्या सरासरीपेक्षा जास्त आहे. भारतात नागरीकरणाच्या बाबतीत मोठी विषमता असल्याचे लक्षात येते. ही विषमता कमी करण्यासाठी मागास राज्यांना अधिकची आर्थिक मदत करणे आवश्यक आहे.

४. ग्रामीण भागातील एकूण लोकसंख्येपैकी २.३० टक्के कामगार नागरी भागात व्यवसायासाठी स्थलांतरित झालेले आहेत. यामध्ये महिलांचे प्रमाण ०.७५ टक्के तर पुरुषांचे प्रमाण ३.७५ टक्के आहे. नागरी भागातून नागरी भागात व्यवसायासाठी एकूण ३.८४ टक्के स्थलांतरण झाले असून या कारणामुळे ६.०५ टक्के पुरुष व १.३७ टक्के महिला स्थलांतरण झाले आहे. स्त्रियांचे व्यवसायासाठी स्थलांतरित होण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. हे प्रमाण वाढविण्यासाठी स्त्रियांना व्यवसायिक प्रशिक्षण देऊन त्यांना आर्थिक मदतही करण्यात यावी.

५. सन १९८१ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी, नागरी लोकसंख्येचे प्रमाण सन २०११ मध्ये १७.२५ टक्के होते. हे प्रमाण सोलापूर जिल्ह्याच्या बाबतीत ३४.९९ टक्के एवढे होते. उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरीकरण सोलापूर जिल्हयांपेक्षा कमी आहे. हे प्रमाण वाढविण्यासाठी उस्मानाबाद जिल्हयांत औद्योगिकीकरणाला गती देण्यासाठी स्थानिक प्रशासनाने विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे.

६. सर्वाधिक वार्षिक वृध्दीदर उस्मानाबाद शहराचा ४.४८ टक्के तर सोलापूर नगराचा २.६१ टक्के आढळून येतो; तर सर्वात कमी सरासरी वार्षिक वृध्दीदर कुर्डुवाडी व मैंदर्गी नगराचा अनुक्रमे ०.७६ टक्के व ०.७३ टक्के आहे. कृषी आधारीत उद्योगांचा विकास लहान नगरांमध्ये करून तेथील नागरीकरणास मदत करण्यात यावी; तरच मोठया शहरातील गर्दी कमी होण्यास मदत होईल.

७. उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरी लोकसंख्येतील वर्ग 'अ' शहरांचा वाटा ३४.५६ टक्के, तर सोलापूर जिल्ह्यांतील नागरी लोकसंख्येतील वर्ग 'अ' शहरांचा वाटा ७९.७५ टक्के आहे. म्हणजेच दोन्ही जिल्ह्यातील वर्ग 'अ' शहराचा वाटा जास्त आहे. कारण 'अ' वर्ग शहरांचा सर्वांगीण विकास होत आहे. मोठया शहरांमध्ये नागरीकरणामुळे अनेक समस्या निर्माण होत आहे. या कमी करण्यासाठी वर्ग 'ब', 'क', आणि 'ड' शहरातील नागरीकरणाला प्राधान्य देण्यात यावे.

८. उस्मानाबाद जिल्ह्यात व्यवसायानुसार स्थलांतरणावरून असे दिसून येते, की इतर कामगारांचे स्थलांतरणातील प्रमाण ७२.२४ टक्के आहे; तर सोलापूर जिल्ह्याच्या बाबतीत हे प्रमाण ७१.९० टक्के दिसून येते. या कामगारांच्या सर्वांगिण विकासासाठी शासनाद्वारे त्यांना व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देण्यात यावे व व्यवसायासाठी आर्थिक मदत करण्यात यावी.

९. उस्मानाबाद जिल्ह्यात सर्वाधिक ४३.२५ टक्के कामगारांचे स्थलांतरण इतर सेवा उद्योगांतील असून त्याखालोखाल २०.०३ टक्के व्यापार व वाणिज्य; तर सोलापूर जिल्ह्याच्या बाबतीत सर्वाधिक ३९.५४ टक्के कामगारांचे स्थलांतरण इतर सेवा उद्योगांतील असून त्यानंतर व्यापार व वाणिज्य क्षेत्रातील कामगार स्थलांतरण २१.२५ टक्के, एवढे आहे. व्यापार व वाणिज्य उद्योगातील स्थलांतरण वाढविण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण कार्यक्रम प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.

१०. सन २००१ च्या जनगणनेनुसार उस्मानाबाद जिल्ह्यात २९९ कुटूंबे बेघर होती; तर सोलापूर जिल्ह्यात ४०२ कुटुंबे बेघर होती. बेघर कुटुंबांतील

लोकसंख्येवरून असे दिसून येते, की उस्मानाबाद जिल्ह्यात १०४७ लोक बेघर होते, तर सोलापूर जिल्ह्यात १७४४ लोक बेघर असल्याचे दिसून येते. मानवी हक्काच्या दृष्टिकोनातून बेघर कुटुंबाचे प्रमाण कमी करण्यासाठी इंदिरा गांधी आवास योजनेचे कार्यक्षेत्र वाढवून, ही योजना या दोन्ही जिल्हयांत प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.

११. उस्मानाबाद व सोलापूर जिल्हयात नागरी पक्की घरे अनुक्रमे १६.२५ टक्के व ३२.४७ टक्के होती. दोन्ही जिल्ह्यांची महाराष्ट्राशी तुलना करता दोन्ही जिल्ह्यांत पक्क्या घरांची संख्या कमी आढळून येते व कच्च्या आणि अर्धपक्क्या घरांची संख्या जास्त आढळून येते. कारण दोन्ही जिल्ह्यांतील नागरी भागात दारिद्र्याचे प्रमाण जास्त आहे. पक्क्या घरांची संख्या वाढविण्याकरिता कमी व्याजदरात गृहकर्ज उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे.

१२. उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्यातील नागरी भागात सरासरी प्रतिदिन दरडोई अनुक्रमे १८३.५९ व २७१.६६ ग्रॅम कचरा निर्माण होतो; तर उस्मानाबाद व सोलापूर जिल्ह्याच्या नागरी भागात सरासरी प्रतिदिन दरडोई अनुक्रमे १३२.१८ व १९५.५९ ग्रॅम कचरा गोळा केला जातो. मानवनिर्मीत कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र प्रभावी यंत्रणा उभारण्यात यावी व कचरा प्रक्रीया उद्योग उभारण्यात यावेत.

१३. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये प्रतिदिन दरडोई सरासरी पाणीप्रदूषण घरगुती, औद्योगिक व इतर क्षेत्रांत अनुक्रमे ३९.३३ लिटर, ३.०४ लिटर व १.६८ लिटर होते. सोलापूर जिल्ह्यात हे प्रमाण अनुक्रमे ५१.५२ लिटर, ०.९२ लिटर व ४.३८

लिटर आहे. पाणीप्रदूषणाचे प्रमाण जास्त असल्यामूळे नागरिकांना अनेक आजारांना सामोरे जावे लागते; यामुळे शासनाचा आरोग्यावरील खर्च वाढतो; यासाठी स्थानिक प्रशासनाने नागरिकांना शुध्द पाणीपुरवठा करण्याची व्यवस्था करावी.

१४. उस्मानाबाद जिल्ह्यात दरमाणशी सरासरी दररोज ८७.३३ लिटर पाण्याची आवश्यकता असून प्रत्यक्ष ६०.६६ लिटर पाणीपुरवठा केला जातो. सोलापूर जिल्ह्यात दरमाणशी सरासरी दररोज ८४.४० लिटर पाण्याची आवश्यकता असून प्रत्यक्ष ६०.३० लिटर पाणी पुरवठा केला जातो. वाढत्या नागरीकरणामुळे दोन्ही जिल्ह्यात पाणीपुरवठा समस्या निर्माण झाल्या आहेत. दोन्ही जिल्ह्यांच्या नागरी भागात जवळपास एकूण पाणीपुरवठ्याच्या १० टक्के पाणी वाया जाते. याकरिता पाणीगळतीचे प्रमाण कमी करावे तसेच या दोन्ही जिल्हयांमध्ये लघु व मध्यम प्रकल्प उभारून त्याद्वारे पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यात यावी.

१५. सोलापूर जिल्ह्यातील ६८ टक्के नागरिकांनी कचराकुंडी नसल्याचे सांगितले तर उस्मानाबाद जिल्ह्यातील ५४ टक्के नागरिकांनी कचराकुंडी नसल्याचे सांगितले. यावरून स्पष्ट होते, की सोलापूर व उस्मानाबाद शहरातील स्थानिक प्रशासन कचरा व्यवस्थापनाकडे फारसे लक्ष देत नाही. शहरातील प्रदुषण व रोगराई थांबविण्याकरिता घनकचरा व्यवस्थापन यंत्रणा प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.

१६. सोलापूर जिल्ह्यातील २६ टक्के व उस्मानाबाद जिल्हयातील ५० टक्के नागरीकांनी सांडपाण्याची सुविधा नसल्याचे नमुद केले. सोलापूर व

उस्मानाबाद जिल्ह्याची तुलना करता सोलापूर जिल्ह्यात उस्मानाबाद जिल्ह्याच्या तुलनेत सांडपाण्याची सुविधा चांगली आहे. दोन्ही जिल्हयात सांडपाण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे ज्यामुळे शहरातील रस्ते व्यवस्थित राहण्यास मदत होईल.

१७. सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील ८६ ते ८८ टक्के स्थलांतरित नागरिक नोकरी करतात; तर १० ते १२ टक्के स्थलांतरित नागरिक व्यवसाय करीत असल्याचे दिसून येते. स्थलांतरित नागरिकांचे व्यवसायातील प्रमाण वाढविण्याकरिता त्यांना व्यवसायिक प्रशिक्षण देणे तसेच व्यवसायासाठी सुलभ व्याजदराने भांडवल पुरवठा करण्यात यावा.

१८. सोलापूर जिल्ह्यातील ९४ टक्के तर उस्मानाबाद जिल्ह्यातील १०० टक्के नागरिक हे ग्रामीण भागातून शहरी भागात स्थलांतरित झाले आहेत. यावरून स्पष्ट होते, की ग्रामीण भागातील नागरिक रोजगारासाठी मोठया प्रमाणात शहरी भागात स्थलांतरित होत आहेत. ग्रामीण भागातून शहरी भागात स्थलांतरित होण्याचे प्रमाण कमी करण्याकरिता ग्रामीण भागात लघु व कुटिर उद्योगांची उभारणी करणे आवश्यक आहे.

१९. उस्मानाबाद जिल्ह्याच्या तुलनेत सोलापूर जिल्ह्यात शिक्षणासाठी स्थलांतरित होणा-या नागरिकांचे प्रमाण जवळपास दुप्पट असल्याचे दिसून येते. उस्मानाबाद जिल्हयातील शिक्षणाचे प्रमाण वाढविण्याकरिता शिक्षणाच्या प्रसारासोबत शैक्षणिक सोयीसुविधा व सवलती देणे आवश्यक आहे.

२०. सोलापूर शहरातील सर्वाधिक ३३.६४ टक्के नागरिकांनी तर उस्मानाबाद शहरातील सर्वाधिक ३३.९८ टक्के नागरिकांनी पाणीटंचाई ही प्रमुख समस्या असल्याचे नमूद केले. त्यानंतर सोलापूर शहरातील ३०.८४ टक्के नागरिकांनी व उस्मानाबाद शहरातील २९.१३ टक्के नागरिकांनी प्रदूषणाची समस्या असल्याचे सांगितले. या दोन्ही शहरातील पाणी टंचाई दुरकरण्याकरिता पाणीपुरवठा यंत्रणा सक्षमकरणे व प्रदुषन टाळण्याकरिता सीएनजी वाहणांचा जास्तीत जास्त वापर करणे आवश्यक आहे.

# संदर्भ सूची

## अ) ग्रंथ:


१. A.N. Agarwal A.N. (१९९३) : Indian Economy Problems of Development and Planning. Wiley Eastern Publishing Ltd, Delhi.

२. Aziz Abdul (१९८४) : Urban Poor and Urba Informal Sector, Ashish Publishing House, Punjabi Bagh, New Delhi.

३. Bose A. (१९७८) : Indias Urbanisation १९०१-२००१, Second Revised Edition, Tata Mcgraw Hill Publishing Company Ltd, New Delhi.

४. Beain J. L. Berry ( १९७३) : The Human consequences of Urbanisation, Affiliated Publishers, Mc Millan, Londan, Bombay.

५. Balasubramanian K. (March १९८८) : Population projection for Aurangabad Municipal Corporation १९८१-२००१, Artha Vijnana Journal of the Gokhale Institute of Politics & Economics, vol-xxx, No-१, Pune.

६. Bose A.(१९७८) : India Urbanisation १९०१-२००१; Tata MeGrow Hill Publishing Company, Ltd., New Delhi.

७. Bah, M. , Cisse, S., Diyamett, B., Diallo, G. and Lerise, F.

(२००७) : Changing Rural ड़Urban Linkages in Mali, Nigeria and Tanzania.

८. Baker, J. (२००७) : Survival and Accumulation Strategies at the Rural-Urban Interface in North-West Tanzania, Chapter २ in The Earthscan Reader in Rural Urban Linkages, edited by Tacoli, Cecilia.

९. Bicgrami S.A.R. (१९९६) : An Introduction to Agricultural Economics, Himalaya Publishing House Ltd, Bombay.

१०. Choudhari J.Y. (१९९३) : migration and Remittance Inter Urban Linkages, Sage Publications (India) Ltd. Block Market, New Delhi.

११. Chakravorty, S., & Lall, S. V. (२००७) : Made in India: the economic geography and political economy of industrialization. New Delhi: Oxford University Press.

१२. Chandrasekhar, S., & Sharma, A. (२०१३) : Internal Migration Among Youth for Education and Employment, in State of the Urban Youth, India.

१३. Denis, E. and Kamala M. (२०११) : Toward a Better Appraisal of Urbanisation in India, Cybergeo: European Journal of Geography.

१४. Dupont, V. (ed.) (२००५) : Peri-urban dynamics: population, habitat and environment on the peripheries of large Indian metropolises, CSH Occasional Paper, No.१४, Centre de Sciences Humaines, New Delhi.

१५. Dyson, T., and P. Visaria (२००४) : Migration and Urbanization: Retrospect and Prospects, Dyson, R. Cassen and L. Visaria (eds.) Twenty-first century India.

१६. Forbes, D., Lindfield, M. (१९९७) : Urbanisation in Asia: Lessons Learned and Innovative Responses, AusAid, Canberra.

१७. Government of India (१९८८) : Report of the National Commission on Urbanisation, Government of India, New Delhi.

१८. Godbole Mahadev (१९९०) : Rural Employment Strategy, Himalaya Publishing House, Delhi.

१९. High Powered Expert Committee (२०११) : Report on India Urban Infrastructure and Services, Government of India, New Delhi.

२०. Himanshu (२००७) : Recent trends in poverty and inequality: Some preliminary results, Economic and Political Weekly, १०

February.

२१. Jackson J. (१९७२) : Urban and Regional Studies No. ३ The Urban Future, George Allen and Unwin Ltd, at the alden perss, Oxford.

२२. जैन रंजना (१९९९) : लोकसंख्येचे अध्ययन, रिसर्च पब्लिकेशन हाऊस, जयपूर.

२३. John Walton and Lausis H.Masotti (१९७६) : The city in comperative Perspective, Cross National Research and New Direction in Theory, Halsted Press Division, John Willey & Sons, New York.

२४. Kopardekar H.D. (१९८६) : Social Aspects of Urban Development, Bombay Popular Prakashan, Bombay.

२५. Kundu, A. and Sarangi, N. (२००७) : Migration, employment status and poverty: An analysis across urban centres in India, Economic and Political Weekly, Vol ४२, No ४.

२६. Kundu, A. (२००६) : Trends and pattern of urbanisation and their economic implications, India Infrastructure Report २००६, Oxford, New Delhi.

२७. Kundu, A. (२००३) : Urbanisation and urban governance: Search for a perspective beyond neo-liberalism, Economic and Political Weekly, Vol ३८, No २९.

२८. Kundu, A. (१९८९) :The dynamic of city hinterland relationship: The Indian case. In: Vennetier, P. (ed.), La Peri-Urbanisation Dans Les Pays Tropicaux, CEGET-CNRS, Talence.

२९. Kundu, A., Pradhan, B.K., Subramanium, A. (२००२) : Dichotomy or continuum: Analysis of impact of urban centres on their periphery, Economic and Political Weekly, Vol ३७, No १४.

३०. Kundu, A., Thakur, S. (२००६) : Access to drinking water in urban India: An analysis of emerging spatial pattern in the context of new system of governance, In Dev, Mahendra and Reddy, V Ratna (eds), Managing Water Resources: Policies, Institutions and Technologies, Oxford University Press, New Delhi.

३१. Kanhu Charan Pradhan (२०१३) : Unacknowledged Urbanisation: New Census Towns of India.

३२. Kundu, A. (२००६) : Trends and Patterns of Urbanization and their Economic Implications, India Infrastructure Report.

३३. Kundu, A. and N Sarangi (२००७) : Migration, Employment Status and Poverty: An Analysis across Urban Centres, Economic and Political Weekly, vol. ४२, no. ४.

३४. कोलारकर शरद (१९९३) : प्राचीन भारताचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, श्री शांतीदुर्ग निवास, रामदास पेठ, नागपूर.

३५. कुलकर्णी भुजंगराव (१९९८) : मराठवाड्याचा विकास : अभ्यास व चिंतन, पद्मा प्रकाशन, औरंगाबाद.

३६. Lekhi R.R. & Joginder Singh (१९९३) : Migration and Remittance Interurban Linkages, Sage Publications (India) Ltd. New Delhi.

३७. Lipton, Michael (१९७७) : Why Poor People Stay Poor: Urban Bias in World Development, Temple Smith, London.

३८. Mohanty B. (१९९७) : Employment perspective in Rural India, A.P.H. Publishing Corporation, Ansari Road, Daryaganj, New Delhi.

३९. Mitra Arup (१९६४) : Urbanisation slums Informal sector, Employment and Poverty : An Exploratory study, B.R. Publishing Corporation (A division of D.K. Publishers, Distributors (Pvt.) Ltd., Delhi.

४०. Mohan, Rakesh, Dasgupta, S. (२००५) : The २१st century: Asia becomes urban, Economic and Political Weekly, १५-२१ January XL(३).

४१. Mohan, Rakesh, Pant, C. (१९८२): Morphology of urbanization

in India: Some results from १९८१ census, Economic and Political Weekly, १८ and २५ September.

४२. Mathur, O. P. (२००९) : National urban reduction strategy, NIPFP, New Delhi, India.

४३. Mohanan, P. C. (२००८) : Differentials in the Rural-Urban Movement of Workers, Journal of Income and Wealth.

४४. Mathur, O. P. (१९९९) : Fiscal Innovations and Urban Governance in Mathur, O. P. (ed.) India: the Challenge of Urban Governance, National Institute of Public Finance and Policy, New Delhi.

४५. Mehta M.(१९८४) : Urbanisation in Western India : Historical Perspective; Published by Gujrat University, Ahmedabad.

४६. Mukharji C.P. (१९७२) : Urban Growth in a Rural Area, Vishwa Bharti Research Publications, Colcutta.

४७. National Sample Survey Organisation (२०१०) : Migration in India, Report No. ५३३, Ministry of Statistics and Programme Implementation, Government of India, New Delhi.

४८. Nigel Harries (१९९३) : Cities in the १९९०, The challenge for the Developing Countries, U.C.L. Press Ltd. University College, Londan WCIE BT, England.

४९. Premi, M. K. (१९८५) : City Characteristics, Migration and Urban Development Policies in India, Paper no ९२, East West Centre, Honolulu.

५०. Prakash J., (१९९४) : Agricultural Production in India (Flood Prone Areas under Risk), Radhu Publication, New Delhi.

५१. Ramchandram R. (१९८९) : Urbanisation and Urban System in India, Oxford University press, Bombay.

५२. Raman Weitz (१९७१) : Urbanisation and the developing countries, Report on the sixth Rehovot Conference, praeger Publisher, new york.

५३. Rao, (१९९९) : Financing Urban Infrastructure, The Emerging Trends, Monograph presented at International Seminar on Financing and Pricing of Urban Infrastructure, Human Settlement Management Institute, New Delhi.

५४. Sharma A. and Chandrasekhar S. (२०१३) : Growth of the Urban Shadow, Spatial Distribution of Economic Activities and Commuting by Workers in Rural and Urban India, Manuscript, Indira Gandhi Institute of Development Research, Mumbai, India.

५५. Sivaramakrishnan, K. C., A. Kundu and B. N. Singh (२००५) :

Handbook of Urbanization in India, Oxford University Press.

५६. Shulka V. & Brain, Berry J. L. (१९९६) : Urbanisation and Economic Geowth, Oxford University press, Bombay.

५७. सुंदरम के.पी.एम., आणि रुद्रदत्त (१९९८) : भारतीय अर्थव्यवस्था, एस. चाँद आणि कम्पनी लि., रामनगर, नवी दिल्ली.

५८. Subramanayam V. V. and Bali R. L. (१९९८) : Urban Economic Development in India; Golgotiq Publishing Company, Karal Bagh, New Delhi.

५९. Shamsharishing (१९९४) : Development Planning and Policies, Anmol Publications Pvt. Ltd., New delhi.

६०. Thomilion R. (१९६९) : Urban Structure - The Social and SSpatial Character of Cities, published by Random House, New York USA.

६१. United Nations (२००८) : An overview of urbanization, internal migration, population distribution and development in the world, Expert Group Meeting on Urbanization, Internal Expert Migration, Population Distribution and Development, New York.

६२. United Nations (२००८) : World Urbanization Prospects: The २००७ Revision. NY: United Nations Population Division.

६३. United Nations (२००९) : World Population Prospects: The २००८ Revision, NY: United Nations Population Division.

६४. United Nations (२०१२) : World urbanization Prospects: The २०११ revision, NY: United Nations Population Division.

६५. UNFPA (२००७) : State of World Population २००७: Unleashing the Potential of Urban Growth, UNFPA, New York, २००७.

६६. UNFPA (२००६) : State of World Population २००६: A Passage to hope, Women and International Migration, UNFPA, New York, २००७.

६७. World Bank (१९९९-२०००) : World Bank Development Report, Entering the २१st Century, Oxford University Press, New York.

६८. वाघ राम (१९९३) : लोकसंख्याशास्त्र, न्यू रचना प्रकाशन, लातूर.

**ब) अहवाल:**

१. Census of India (१९९१) :Serrious - १, Paper - २, Provisional Population, Total Rural Urban Distributation, Resistar General India.

२. मराठवाडा २००१, खंड -२.

३. दांडेकर व्ही. एम. समितीचा अहवाल (१९८४) : महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीचा अहवाल, महाराष्ट्र शासन.

४. Osmanabad District Census Hand Book (२००१), p-५० & Solapur District census Hand Book.

५. Osmanabad District Census Hand Book २००१.

६. Solapur District Census Hand Book २००१.

७. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (१९९३-९४) : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

८. नगरपालिका वार्षिकी, उस्मानाबाद जिल्हा, २००१, नगरपालिका वार्षिकी, सोलापूर जिल्हा, २००१. जिल्हा सांख्यिकी कार्यालय, उस्मानाबाद व सोलापूर जिल्हा.

९. Horit Parikh (१९९७) : Indian Development Report, Indira Gandhi Institute of Development Research, Oxford University Press, New Delhi.

१०. District Census Hand Book, Osmanabad District, १९९१, २००१.

११. District Census Hand Book, Solapur District, १९९१, २००१.

१२. Socio-Economic Abstract of Osmanabad District, १९९१ to २०११.

१३. Socio-Economic Abstract of Solapur District, १९९१ to २०११.